(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.:सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु.....

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले): सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. अर्थसंकल्पात ज्या कृषी विषयक योजना दिलेल्या आहेत त्यासंदर्भात मला सांगावयाचे आहे की, शेतक-यांना केवळ 3 गोष्टींची गरज असते. एक म्हणजे शेतीसाठी मुबलक पाणी दुसरे शेतातून उत्पादित केलेला माल मार्केट पर्यंत आणण्यासाठी रस्ते व तिसरी गोष्ट शेतक-याने उत्पादित केलेल्या मालाला उत्पादन खर्चावर भाव. या तीन गोष्टी मिळाल्या तर संपूर्ण महाराष्ट्रच नव्हे तर संपूर्ण देशातील शेतकरी संपन्न होऊ शकतो. नागपूरच्या अधिवेशनामध्ये शेतक-यांच्या नुकसान भरपाईसाठी 2 हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले होते. परंतु पूर्व विदर्भातील एकाही शेतक-याला या पॅकेजचा फायदा झालेला नाही. या पॅकेजचा फायदा केवळ सोयाबीन उत्पादक शेतक-याला व कापूस उत्पादक शेतक-यालाच झालेला आहे. पूर्व विदर्भात सुरुवातीला व शेवटीही पाऊस न झाल्यामुळे धान उत्पादक शेतक-याला या पॅकेजमध्ये जी 25 टक्कयाची अट घातली होती त्या अटीमुळे धान उत्पादक शेतक-याचा फायदा होऊ शकला नाही. त्यामुळे जसा शासनाने कापूस उत्पादक व सोयाबीन उत्पादक शेतक-याला या पॅकेजचा फायदा दिला तसा फायदा धान उत्पादकांनाही दिला पाहिजे असे माझे मत आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात शासनाने रासायनिक खतांसाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. मागच्या वर्षी रासायनिक खतासाठी जेवढी तरतूद केली होती त्यामुळे खताच्या गैरप्रकाराला किमान 50 टक्के आळा बसला होता. रासायनिक खताच्या संदर्भात आपण कृषी अधिका-याला तसेच व्यापा-यांना जबाबदार धरत असतो. खतांचा मुबलक साठा शासनाने उपलब्ध करुन दिला तर त्याचा फायदा राज्यातील शेतक-यांना निश्चितपणे मिळू शकेल. केवळ सहा महिनेच शासनाला रासायनिक खतांमध्ये पैसे गुंतवावे लागतात. त्यामुळे अन्य विभागाची रक्कम खतांच्या खरेदीसाठी शासनाने वळती केली तर शेतक-यांना न्याय मिळू शकतो.

सभापती महोदय, बजेटमध्ये बियाण्यांसाठी 138 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे ती अतिशय अल्प आहे. मला कल्पना आहे की, आपण दर वर्षीच्या पुरवणी 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर.....

अर्थसंकल्पात यासंदर्भात तरतूद करीत असतो. त्यामुळे बियाण्यांच्या संदर्भातील निधी शासनाने वाढवून द्यावा असे मला वाटते.

सभापती महोदय, शासनाने अर्थसंकल्पात शेतक-यांच्या वीजेच्या संदर्भात 250 कोटींची तरतूद केलेली आहे ती अतिशय चांगली तरतूद आहे. चांगल्या गोष्टीला चांगले म्हटले पाहिजे ब वाईट असेल त्याला वाईट म्हटले पाहिजे. शासनाने शेतक-यांसाठी 2500 कोटी रुपयांची मदत दिलेली आहे त्यामुळे मी माननीय अर्थमंत्र्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, लघु पाटबंधारे तसेच एकात्मिक विकास योजनांसाठी तरतूद केलेली आहे. परंतु ब-याच ठिकाणी लघु पाटबंधा-याचे प्रकल्पांचे काम बंद पडलेले आहे किंवा ज्या प्रकल्पांना इ ुडपी जंगलांमुळे मान्यता प्राप्त झाल्या नाहीत अशा सर्व प्रकल्पांना मान्यता देण्याची आवश्यकता आहे. लघु पाटबंधा-याचे प्रकल्प पूर्ण झाले तर आता सिंचनाचा जो एक टक्का वाढला आहे तो सिचंनाचे प्रकल्प पूर्ण झाले तर सिचंनाच्या क्षेत्रात फार मोठी वाढ होऊ शकेल त्यामुळे यासंदर्भात शासनाने योग्य तो निर्णय घ्यावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, कोरडवाहू शेतीसाठी अर्थसंकल्पात 200 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे परंतु ही तरतूद अत्यंत अल्प आहे. राज्यातील हवालदील शेतकरी हा कोरडवाहू शेतकरी आहे. अमरावती, यवतमाळ या ठिकाणी ज्या आत्महत्या होतात त्या कोरडवाहू शेतकऱ्यांच्याच होत असतात. ख-या अर्थाने विदर्भात व मराठवाडयामध्ये सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, दुधाळ जनांवराच्या गट वाटपासाठी अत्यंत कमी रक्कम उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. शेतक-याला जर त्याच्या पायावर उभे करावयाचे असेल तर त्यांना दुधाळ जनावरे जास्त प्रमाणात दिली गेली पाहिजे. दुधाळ जनावरे एका पंचायत समितीला, जिल्हयाला किती देणार आहात ? शेतक-याला जर आपल्याला दुधाळ जनावरे द्यावयाचीच असतील एका शेतकऱ्याला किमान 10 दुधाळ जनावरे तसेच त्याबरोबर नर सुध्दा दिला तर शेतक-यांचे दुधाचे उत्पादन वाढेल व पर्यायाने शेतक-याचा चांगला फायदा होऊ शकेल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

त्या पासून शेणखत मिळाले तर रासायनिक खताचे प्रमाण हळू हळू कमी होईल. ही योजना अत्यंत चांगली आहे. आज मोठया प्रमाणावर जनावरांची कत्तल होत आहे. त्यासाठी कायदा करून जनावरांची कत्तल थांबवली पाहिजे. ट्रक भरून जनावरे चालली आहेत. 25 ते 30 हजार रूपयाला जोडी विकली जात आहे. आपण कायदा केला तर दुधाळ जनावरांची कत्तल थांबू शकेल.

केंद्रीय पुरस्कृत राष्ट्रीय योजने 410 कोटी रूपये 100 बाजार समित्यांसाठी दिले आहेत. हा निधी महानगरपालिकेच्या क्षेत्रात असलेल्या बाजार समितीसाठी उपयुक्त आहे. अन्य महापालिकेत ही योजना सफल होणार नाही. मी आमगाव बाजार समितीचा संचालक आहे. कृषी उत्पन्न बाजार समितीचा संचालक आहे. असे जरी असले तरी आज आपले अधिकारी प्रोजेक्ट देऊ शकलेले नाहीत. इमारत, संगणक, व्यवस्थापनासाठी कुठलीही व्यवस्था करण्यात आलेली नाही. एवढेच नव्हे तर कुठल्याही बाजार समितीमध्ये आज प्रशिक्षित कर्मचारी नाहीत. त्यासाठी पदे निर्माण करावी लागतील. यासाठी वेतन बाजार समिती देईल. ते पद निर्माण केल्याशिवाय काही होणार नाही. या निमित्ताने माझी अशी सूचना आहे की, "अ" वर्ग नगरपालिके पासून आपण टप्प्याटप्प्याने सुरूवात केली आहे. ही योजना चांगली आहे. आज कुठलाही व्यापारी इंटरनेटच्या माध्यमातून खरेदी-विक्रीचे व्यवहार करू शकत नाही. शेतकऱ्याला तर संगणकाचे ज्ञानच नाही. त्यामुळे संगणकाची योजना देखील टप्प्याटप्प्याने लागू केल्यास बरे होईल असे माझे मत आहे. त्यामुळे हा जो निधी आहे तो नाला, रस्ते साठी वापरण्यासाठी परवानगी दिली पाहिजे, अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, आपण मला वेळ कमी दिलेला आहे. अन्य सन्माननीय सदस्यांना पाऊण तास बोलायला अनुमती दिली आहे. त्यामुळे आता मी अर्थसंकल्पाच्या भाग-2 कडे वळतो. संपूर्ण देशामध्ये, महाराष्ट्रामध्ये महागाई वाढली आहे. याला आळा घालण्यासाठी कुठली उपाययोजना केली आहे याचे दृश्य मला काही दिसत नाही. विक्री कर वाढवून 4 हजार कोटी जमा केले ही आनंदाची गोष्ट आहे. कापडाच्या विक्रीवर आपण 5 टक्के कर लावला आहे. गोरगरिबांच्या विडीवर 12.5 टक्के कर लावला आहे, ही खेद जनक बाब आहे. सिगारेटवर आपण कर लावला असता

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर...

तर मी समजू शकलो असतो. विडी गोरगरीब माणूस ओढतो. त्यावर आपण 12.5 टक्के कर लावला आहे तो कमी करण्याच्या दृष्टीने विचार करावा अशी मी विनंती करतो.

घरगुती एलपीजी गॅस संबंधी अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. घरगुती एलपीजी गॅसवर केलेली कर वाढ परत घेण्यात यावी अशी मागणी करण्यात येत आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसवर 5 टक्केवरून 12.5 टक्के कर वाढविण्याचे प्रस्तावित केले आहे. प्लास्टर ऑफ पॅरिसपासून अनेक गोरगरीबांना रोजगार मिळतो. यापासून ते विविध आकर्षक अशा मूर्ती बनवतात. अशा कामगारांना त्यातून सूट द्यावी अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे. विमानावरील इंधन कर 4 टक्के ठेवण्यात आला होता. त्यात फक्त 1 टक्क्यानेच म्हणजे 5 टक्के वाढ करण्यात आली आहे. विमान हे श्रीमंतीचे लक्षण आहे. विमानाने जाणारा माणूस गरीब नसतो. हा कर आपण वाढविला असता तर त्याचा आम्ही स्वीकार केला असता. पण खेदाने सांगावेसे वाटते की, जेथे कर वाढ करायला पाहिजे होती तेथे ती केली नाही.

कापूस आणि तेलबियां संबंधी आदरणीय श्री.पांडुरंग फुंडकर यांनी आपले विचार मांडले आहेत. त्यामुळे मी देखील त्यावर माझे जास्त विचार मांडणार नाही. खाण्याच्या तेलापासून, डोक्यावर लावण्यात येणारे तेल, मालिशसाठी लागणारे तेल हे तेलबियां पासून तयार होते. त्यामुळे महागाईला निमंत्रण देणार हा निर्णय आहे. त्यामुळे या संबंधातील निर्णय राज्य शासनाने परत घ्यावा अशी मी मागणी करीत आहे.

स्थावर मालमत्तेवर टॅक्स लावला आहे. ग्रामीण भागामध्ये स्थावर मालमत्तेच्या व्यवहारावर 1 टक्का स्टॅम्प डयुटी द्यावी लागत होती. पण या अर्थसंकल्पातून काहीच स्पष्ट होत नाही. ग्रामपंचायत क्षेत्रासाठी 3 टक्के, नगरपालिका क्षेत्रात 4 टक्के आणि महानगरपालिका क्षेत्रात 5 टक्के मुद्रांक शुल्क दर आकारण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे. हा दर स्टॅम्प सहित आहे की, स्टॅम्प सोडून आहे हे शासनाने स्पष्ट केले पाहिजे. या पासून मोठे उत्पन्न मिळणार आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थावर मालमत्तेच्या खरेदीचे व्यवहार खूप मोठ्या प्रमाणात होत आहेत आणि किंमतीही आकाशाला भिडलेल्या आहेत. मी याठिकाणी केवळ एक-दोन मुद्दे मांडून माझे भाषण संपविणार असून जास्त वेळ घेणार नाही.

सभापती महोदय, अर्थसंकल्पामध्ये नमूद केल्याप्रमाणे पेट्रोलवर चालणाऱ्या कार व जीप्सवरील करात 2 टक्के वाढ करण्याचे प्रस्तावित आहे आणि डिझेल वर चालणाऱ्या कार व जीप्स वरील करात 4 टक्के वाढ प्रस्तावित केली आहे. त्यामुळे वाहतुकीचा खर्च वाढणार आहे. आम्ही टॅक्सीने प्रवास करतो. त्यामुळे टॅक्सीचे देखील भाव वाढतील. त्यामुळे शासनाने दोन टक्के आणि चार टक्के करामध्ये वाढ करण्याचे सुचविलेले आहे, त्याबाबत देखील विचार करावा. कारण खऱ्या अर्थाने त्यांना सूट देण्याची गरज आहे. मी मोठ्या माणसांना, श्रीमंतांना सूट द्या असे म्हणत नाही. पण जो टॅक्सी, टेम्पो किंवा छोट्या वाहनांमधून माल वाहतूक करीत आहे त्यांना सूट देण्याची गरज आहे. तसेच अर्थसंकल्पातील पान क्र.5 वरील अनु.क्र.19 मध्ये असे म्हटलेले आहे की,"अनोंदित कंत्राटदाराकडून केलेल्या कार्यकंत्राटात देय रकमेतून 4 टक्के करापोटी कपात करण्याची तरतूद आहे. सर्वसाधारण आपसमेळ कर हा 5 टक्के असल्यामुळे कपातीचा दर 5 टक्के करण्यात येत आहे." हा मुद्दा समजला नाही. खरे म्हणजे बांधकामामध्ये इतका भ्रष्टाचार होत आहे की, त्याठिकाणी काम मिळविण्यापासून त्याचे बिल काढेपर्यंत 40 टक्के रक्कम अशीच वाटली जाते आणि आता 4 टक्के, 5 टक्के अधिभार लावण्यात आला आहे. मग कामाची क्वॉलिटी कशी रहाणार आहे ? म्हणून याबाबतीतही शासनाने निर्णय घेतला पाहिजे.

सभापती महोदय, शासनाने वाळूच्या बाबतीत निर्णय घेतला ही चांगली गोष्ट आहे, पण त्याची नीट अंमलबजावणी होत नाही. तेथील अधिकाऱ्यांच्या खिशात सर्व पैसे जातात. वाळू माफीयांच्या संबंधात सदनामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. त्याबाबत जास्त बोलत नाही कारण सभापती महोदय, आपण मला भाषण संपविण्यासाठी घाई करीत असल्यामुळे मी एवढेच म्हणेन की, महाराष्ट्र राज्याचे बजेट हे राज्याला दिशा देणारे आहे असे वाटत नाही उलट हे बजेट लोकांना महागाईच्या खाईत लोटणारे आहे. गोव्यासारख्या प्रांताने डिझेल-पेट्रोलवरील भाव कमी केले आणि आपण मात्र येथे 25 टक्के व्हॅट घेतो. त्यामुळे आपणही हा व्हॅट 10 टक्क्यांनी कमी करावा अशी मी यानिमित्ताने विनंती करतो आणि महाराष्ट्र राज्याला खाईत लोटणाऱ्या बजेटबाबत मी निषेध व्यक्त करतो. भारत माता की जय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त्) : सभापती महोदय, मला याठिकाणी भाषण करण्याची संधी दिली, त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शेतकरी, शेतमजूर, समाजातील दुर्बल घटक, अनुसूचित जाती जमाती, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक इत्यादींचा समावेश असलेला, सामाजिक समतेचा शिलकी अर्थसंकल्प सदनामध्ये माननीय वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी मांडला, त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपण यावर्षी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांचे शताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. साहेबांनी सामाजिक परिवर्तन दिले. यावेळी माननीय वित्त मंत्र्यांनी महाराष्ट्राचे महाराज्य बनविण्याचा निर्धार केलेला आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतीला आदरांजली अर्पण करीत असताना आणि त्यांचे शताब्दी वर्ष साजरे करीत असताना त्यासाठी 100 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केलेला आहे. त्याबद्दल मी माननीय वित्त मंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करतो. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांना समोर ठेऊन, त्यांना केंद्र बिंदू मानून सत्ता ही समाजहितासाठी असते हे धोरण नजरेसमोर ठेऊन माननीय अर्थमंत्र्यांनी हा अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयत्न केलेला आहे. राज्याचा अर्थसंकल्प हा सामाजिक न्यायावर आधारित असतो आणि त्यामध्ये सामाजिक न्यायाची भूमिका असते आणि अर्थसंकल्प म्हणजे राज्याचा दस्तऐवज आहे. राज्य शासनाची जी भूमिका आहे ती आघाडी सरकारची आहे. मी माननीय अर्थमंत्र्यांना सांगू इच्छितो की, टीका ही काही जणांच्या पाचवीला पुजलेली असते. राज्य शासनाची इच्छा नसतानाही काही निर्णय घ्यावे लागतात. राज्यावर काही कोटी रुपयांचे कर्ज आहे हे मी मान्य करतो. मात्र त्यांनी आर्थिक शिस्त लावलेली आहे. मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे साहेबांना सांगू इच्छितो की,गेल्या दोन वर्षामध्ये राज्य शासनाने कोणत्याही प्रकारचा ओव्हर ड्राफ्ट घेतलेला नाही. राज्य शासनाचे आर्थिक स्थितीवर नियंत्रण आहे.

श्री.अजितदादा पवार (खाली बसून) : सभापती महोदय, गेल्या दोन वर्षामध्ये नाही तर 2005 पासून ओव्हर ड्राफ्ट घेतलेला नाही.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, ही अभिनंदनीय बाब आहे.

श्री.विनोद तावडे (खाली बसून) : माननीय श्री.सुशीलकुमार शिंदेसाहेब असल्यापासून घेतलेला नाही काय ?

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण . . ..

साहेबांना सांगू इच्छितो की, त्यावेळी दिल्लीमध्ये तुमच्या पक्षाची सत्ता होती. तेव्हा आपणही तेथे जात होतात. परंतु तेव्हा तिजोरी रिकामी झाली होती आणि त्यावेळी सोने गहाण ठेवावे लागले होते.

सभापती महोदय, यावर्षी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी महिलांना 50 टक्के आरक्षण लागू केलेले आहे. त्यामुळे जास्तीतजास्त 50 टक्के महिलांच्या हातात स्थानिक स्वराज्य संस्था आलेल्या आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

तेव्हा स्थानिक स्वराज्य संस्थांवर जे कर लावलेले आहेत ते रद्द करावे अशी आघाडीतील सर्व सदस्यांची मागणी आहे. तेव्हा माननीय उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी आपल्या भाषणात तशी घोषणा करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, राज्याचे महसूल उत्पन्न रुपये 1 लाख 36 हजार 711 कोटी 70 लाख एवढे अपेक्षित आहे. तर महसुली खर्च रुपये 1 लाख 36 हजार 559 कोटी 21 लाख एवढा आहे. यातील 40 टक्के रक्कम कर्मचाऱ्यांच्या वेतनावर खर्च होणार आहे. 10 टक्के रक्कम सेवानिवृत्ती वेतनावर खर्च होणार आहे. कर्जावरील व्याज द्यावे लागणार आहे उर्वरित फक्त 30 टक्के रक्कम राज्याच्या विकासासाठी खर्च होणार आहे.

सभापती महोदय, राज्याचे दरडोई उत्पन्न रुपये 87 हजार 686 इतके आहे. राज्याच्या वार्षिक योजनेचे आकारमान 45 हजार कोटी रुपये आहे. अनुसूचित जाती उपयोजनेसाठी 10.2 टक्के या प्रमाणे 4 हजार 590 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. परंतु लोकसंख्येचा विचार करता त्यामध्ये आणखी 915 कोटी रुपयांची तरतूद करावी अशी माझी विनंती आहे. आदिवासी उपयोजनेसाठी रुपये 4 हजार 5 कोटी म्हणजे 8.9 टक्के प्रमाणे तरतूद केलेली आहे. परंतु हा निधी कमी आहे. तेव्हा 955 कोटी रुपयांची आणखी तरतूद करावी अशी विनंती आहे. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी एकूण 8595 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती उपयोजनेसाठी 1 हजार 870 कोटी रुपयांची जी तफावत आहे ती भरुन काढावी अशी विनंती आहे. आपण हा निधी दिल्यास पुरोगामी महाराष्ट्रास साजेसा असा संतुलित अर्थसंकल्प होईल.

सभापती महोदय, जो राखीव निधी ठेवलेला आहे तो अन्य विभागाकडे वळविता कामा नये. देशातील महाराष्ट्र राज्य हे असे एकमेव राज्य आहे की, जे निधीचे प्रमाण ठरविते त्याप्रमाणे वाटप करते. हा राखीव निधी कोणत्या विभागाला किती देणार याचे विवरण माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावे अशी माझी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण...

सभापती महोदय, काँग्रेस पक्ष हे वर्ष "सामाजिक वर्ष" म्हणून साजरे करीत आहे. हे औचित्य साधून काँग्रेस पक्षाने मागण्यांची 101 पानांची श्वेतपत्रिका जाहीर केलेली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने त्यांचा "सलग जाहीरनामा" जाहीर केलेला आहे. तेव्हा या साठी लागणाऱ्या निधीची घोषणा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी आपल्या भाषणात करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, इंदू मिल येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे प्राधिकरण करण्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद केलेली नाही. तेव्हा डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासाठी किती निधी देणार याची घोषणा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, मागासवर्गीय महामंडळावरील कर्ज अजून माफ केलेले नाही. महामंडळास कोणत्याही प्रकारचे भागभांडवल दिले गेले नाही. पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळास एकही पैसा दिलेला नाही. संत रोहिदास चर्मोद्योग विकास महामंडळाच्या भागभांडवलात 100 कोटी रुपयांची वाढ करावी अशी घोषणा माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पर्यटनासाठी 228 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. कोकणातील पर्यटनासाठी चालना देण्यासाठी कोकणासाठी एक स्वतंत्र पॅकेज विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी जाहीर करावे अशी माझी विनंती आहे. कारण कोकणाच्या बाजूला गोवा राज्य आहे. त्या ठिकाणी पर्यटकांची मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असते. परंतु गोव्यापेक्षा आपल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात अनेक सुंदर व रमणीय असे समुद्र किनारे आहेत. तेव्हा कोकणातील पर्यटनास चालना देण्यासाठी सरकारने पॅकेज जाहीर करावे अशी पुन्हा एकदा विनंती करतो.

सभापती महोदय, कोकणामध्ये "सीवर्ल्ड" करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये तरतूद करण्यात आलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे "सीवर्ल्ड" होत आहे. हे देशातील एकमेव उदाहरण आहे. "सीवर्ल्ड"साठी माननीय उद्योग मंत्री श्री.नारायण राणे यांनी भरपूर पाठपुरावा केला. जगात फक्त लंडन आणि सिंगापूर येथे सीवर्ल्ड आहे. तेव्हा आपण या प्रोजेक्टवर फोकस करावा व त्यासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे. कारण यामुळे कोकणातील पर्यटन वाढणार असून लाखो लोकांना रोजगार मिळणार आहे.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात अतिशय सुंदर असा धामापूर तलाव आहे.

यानंतर कु.थोरात..

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी पंधरा कोटी रुपये विशेष निधी शिवकालीन कालवे पुनरुज्जीवित करण्यासाठी दिलेला आहे. त्याचा 100 कोटी रुपयांचा आराखडा तयार आहे. तो अतिशय सुंदर असा तलाव आहे. माझा जन्म तेथे झाला आहे. या तलावासाठी 100 कोटी रुपये मिळणार आहेत आणि महाराष्ट्र राज्य शासनाने पर्यटन विभागामार्फत भारत सरकारकडे या संबंधीचे निवेदन केलेले आहे. धामापुरी ही श्री. पु.ल. देशपांडे यांची सासुरवाडी आहे. श्री. पु.ल. देशपांडे यांना एकदा एक स्वप्न पडले. स्वप्नात निसर्ग खुश झाला आणि निसर्गाला कोणी खुश केले असेल तर ते धामापूर तलावाने खुश केलेले आहे. धामापूर तलाव हा सुंदर तलाव आहे अशा आशयाचे त्यांना स्वप्न पडले होते. कोकणातून सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली निवडून आलेले आहेत. सीवर्ल्डची मागणी करण्याचा जास्तीत जास्त वाटा हा सन्माननीय मंत्री महोदय, श्री. नारायण राणे यांचा आहे, ही अतिशय अभिनंदनीय बाब बाहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आंतरराष्ट्रीय अरबी समुद्रातील स्मारकाच्या मुद्यावर असंतोष पसरलेला आहे, त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही तेव्हा यासाठी तरतूद करण्यात यावी अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्याकडे वीज खाते आल्यापासून त्यांनी वीज उत्पादनात 22 टक्क्याने नेत्रदीपक अशी वाढ केलेली आहे. ऊर्जा विभागासाठी यावेळी कधी नव्हे एवढ्या निधीची म्हणजे 3062.64 कोटी रुपयांची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. राज्य भारनियमन मुक्त करण्यासाठी खाजगी प्रकल्पांसाठी व उद्योजकांसाठी आज हजारो कोटी रुपये या राज्यात येत आहेत. टप्प्या-टप्प्याने वीज पुरवठयातील तूट राज्य शासन भरुन काढील असा आत्मविश्वास वीज मंत्र्यांनी जनतेला दिलेला आहे. वीज निर्मितीचे मोठे प्रकल्प महाराष्ट्रात येत आहेत. त्याला विरोधी पक्षानेही साथ दिली पाहिजे.

सभापती महोदय, आपल्याला माहीत आहे की, मध्यंतरीच्या काळात कोळसा मिळत नव्हता त्यामुळे मुंबई अंधारात आली होती. माननीय उप मुख्यमंत्री तातडीने दिल्लीत गेले. दिल्लीमध्ये या राज्याचे माजी मुख्यमंत्री आहेत त्यामुळे मुंबई उजेडात आली त्यामुळे हे श्रेय माननीय अजित पवार यांना आहे. त्यांच्याकडे हे ऊर्जा खाते असल्यामुळेच महाराष्ट्रात मोठे प्रकल्प येत आहेत.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण....

एनटीपीसी सारखा 1320 मे.वॅटचा प्रकल्प महाराष्ट्रात येत आहे. माननीय उप मुख्यमंत्री या सगळया गोष्टीचा पाठपुरावा करीत आहेत. वीज खाते विरोधी पक्षाकडेही होते त्यावेळी आपण किती वीज आणली? त्यावेळी जर वीज पुरवठा केला असता तर काही प्रमाणात आपल्याला वीज मिळाली असती. पण त्यावेळी काहीही केले नाही. भारत सरकारचे वीज खाते महाराष्ट्राकडे आल्यापासून व माननीय श्री. अजित पवार यांनी वीज खात्याची सूत्रे हाती घेतल्यापासून 1 लाख 23 हजार मे.वॅट वीज निर्मिती होत आहे. तीन वर्षात ही वीज निर्मिती संपुष्टात येईल अशी आपल्याला आशा आहे.

सभापती महोदय, राज्याचे उद्योग मंत्री श्री. नारायण राणे हे आहेत. राज्यात औद्योगिक विकास साठी चालू वर्षात 13851 प्रस्ताव आले असून त्यातून 1 लाख 86 हजार रोजगार निर्मिती होणार आहे. जोपर्यंत औद्योगिक क्रांती होत नाही तोपर्यंत जातीयता आणि विषमता नष्ट होणार नाही. एवढया बलाढय माणसाकडे औद्योगिक विभाग असल्यामुळे आपण श्रीमंत झालो पाहिजे. आम्ही यापूर्वी बोटीतून प्रवास करीत होतो, एस.टी.मधून प्रवास करीत होतो पण आज मोठया गाड्यांमधून प्रवास करीत आहोत. सभापती महोदय, पिढयानपिढया ज्या उपेक्षित समाजाला समाजाच्या मुख्य प्रवाहात येता आले नाही. शासनाच्या कोणत्याही सवलतीचा फायदा झाला नाही अशा समाजाचा विचार करण्यासाठी स्व. यशवंराव चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्षे साजरे करण्यात येत आहे. महाराष्ट्राचे महाराज्य बनविण्याचा वित्त मंत्र्यांनी निर्धार केलेला आहे, संकल्प केला आहे. माननीय मुख्यमंत्री हे कऱ्हाडचे सुपुत्र आहेत आणि माननीय उप मुख्यमंत्री हे पश्चिम महाराष्ट्राचे सुपुत्र आहेत. निर्णय घेणारे अर्थमंत्री आहात.

यानंतर श्री. बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

तिजोरीच्या चाव्या तुमच्या हातामध्ये आहेत. सत्ता तुमच्या हातात आहे. जसे स्व. यशवंतरावजी चव्हाण जे मनात घेत होते ते करीत होते त्याप्रमाणे आपण सुध्दा मनात घ्याल ते कराल अशी अपेक्षा व्यक्त करतो. शेवटी कवी संजीव यांच्या दोन पंक्ती सांगून मी माझे भाषण संपवितो.

"देव पंचावन कोटी, देव दगडांचे किती
मानसातील देव जेथे, त्या घरी राहू चला"

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-2013 चा राज्यातील जनतेसाठी अतिशय आवश्यक असा, राज्यातील शेतकरी, कष्टकरी, औद्योगिक क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र आणि इतर सर्व क्षेत्रातील जनतेच्या दृष्टीने आकर्षक व राज्याच्या विकासाला नवीन दिशा देणारा असा अर्थसंकल्प सादर केल्याबद्दल राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री व अर्थमंत्री सन्माननीय श्री. अजितदादा पवार साहेब यांचे मी सुरुवातीलाच हार्दिक अभिनंदन करतो व या अर्थसंकल्पाचे स्वागत करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या कृषी, सहकार, उद्योग, स्थानिक स्वराज्य संस्था, पायाभूत सुविधा, शिक्षण, साहित्य, कला, संस्थात्मक उभारणी या सर्वच क्षेत्रात आपल्या नेतृत्वाने महाराष्ट्राला विकासाची नवी दिशा देणाऱ्या स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष साजरे करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 100 कोटी रुपयांचे नियोजन केल्याबद्दल मी सर्वप्रथम हार्दिक अभिनंदन करतो. या राज्याची बहुसंख्य जनता शेतीवर अवलंबून आहे आणि राज्य शासनातर्फे कोरडवाहू शेतीसाठी खते, बी-बियाणे, पीक कर्ज, पिकावरील रक्कम, पीक विमा, यासाठी विविध प्रयत्न होत आहे, ही अभिनंदनीय बाब आहे. खतांचा संरक्षित साठा करण्यासाठी 20 कोटी रुपयांचा नियतव्यय ठेवलेला आहे, त्याबद्दल पुन्हा एकदा मी शासनाचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, 2012-2013 साठी 1 लाख 50 हजार कृषी पंपांचे विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट ठेवलेले आहे, ही अतिशय अभिनंदनीय बाब आहे. त्यासाठी जवळजवळ 185 कोटी रुपयांचा नियतव्यय ठेवलेला आहे. हे सांगत असताना मला मुद्दाम विनंती करावयाची आहे की, महाराष्ट्रातील काही ग्रामीण भागामध्ये टंचाई जाहीर झालेली आहे आणि त्या टंचाईग्रस्त गावांमध्ये थकीत बिले भरण्यासाठी शासनाने 30 टक्के सवलत योजना जाहीर केलेली आहे. पण आज या टंचाईग्रस्त गावांमध्ये ही 30 टक्के सवलत दिलेली थकीत बिले जर 31 मार्चपर्यंत भरली नाही तर विहिरींवरील विद्युत कनेक्शन तोडण्यात येतील अशी घोषणा गाड्यांवर स्पीकर लावून खेडोपाडी पुकारली जात आहे, लोकांना, शेतकऱ्यांना सांगितले जात आहे. माझी विनंती आहे की, ज्या ठिकाणी टंचाई जाहीर झालेली आहे अशा ठिकाणी शेतकऱ्यांना या बाबतीत सुध्दा थोडी मुदतवाढ दिली पाहिजे. कवठेमहांकाळ तालुक्यामध्ये गाड्यांवर स्पीकर लावून माईकवरुन पुकारुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

सांगतात. माझी माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्या बाबतीत अजून मुदतवाढ द्यावी. कारण त्या ठिकाणी टंचाई जाहीर झालेली आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आहे. त्या ठिकाणी शेतीला पाणी नाही. सभापती महोदय, माझी आपल्या मार्फत माननीय उप मुख्यमंत्र्यांना विनंती राहील की, त्या ठिकाणी बिलाच्या बाबतीत मुदतवाढ द्यावी.

सभापती महोदय, पंचायती राज संस्थांमार्फत प्रगतिपथावर असलेली लघु पाटबंधारे प्रकल्पांची कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी 80 कोटी रुपयांचा नियतव्यय दिलेला आहे. या मार्फत जवळजवळ 16 हजार 640 हेक्टर सिंचन क्षेत्र वापरात येणार आहे. यामधून शेतकऱ्यांना फार मोठा दिलासा मिळणार आहे. एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रम केंद्र व राज्य शासन यांच्या मार्फत 90:10 या प्रमाणात राबविण्यात येणार असून जवळजवळ 35 लाख 56 हजार हेक्टर क्षेत्रावर मृद संधारणाच्या विविध योजनांना केंद्र शासनाची मंजुरी मिळालेली आहे. जवळजवळ 4 हजार 473 कोटी रुपयांबाबत केंद्र शासनाची मंजुरी मिळाली आणि त्यापैकी जवळजवळ 727 कोटी 31 लाख रुपये आपल्याकडे जमा सुध्दा झालेले आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार कार्यक्रमांतर्गत शेती विषयक सुधारणा, शेततळी घेण्याचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर राबविला जाणार आहे. 2012-2013 या वर्षासाठी 3 हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट ठरविण्यात आलेले आहे. ही शेततळी साकारत असताना खऱ्या अर्थाने मागासलेल्या समाजातील, दारिद्र्य रेषेखाली असलेले शेतकरी त्याचप्रमाणे इंदिरा आवास योजनांचे लाभार्थी, अल्पभूधारक शेतकरी यांचा विचार प्रामुख्याने होणार आहे, ही अभिनंदनीय बाब आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

सन 2012-13 मध्ये 18 हजार विहिरी वैयक्तिक लाभार्थ्यांना दिल्या जाणार आहेत. सन 2011-12 मध्ये नरेगा अंतर्गत राज्यात 4,990 कामे झाली आहेत. त्यासाठी मागील वर्षी 1947 कोटी 28 लाख रुपये खर्च करण्यात आला आहे ही अभिनंदनीय बाब आहे.

राष्ट्रीय कृषी योजनेंतर्गत वैरण विकास, कडधान्य विकास, कापूस, सोयाबीन पिकावरील कीड व रोग सर्वेक्षण कार्यक्रम घेण्यात आलेला आहे. तसेच शेततळे योजनेच्या माध्यमातून सुमारे 85 हजार 386 हेक्टर क्षेत्रासाठी संरक्षित सिंचन व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. राज्यातील 100 कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये कार्यक्षमता व पारदर्शकता वाढविण्यासाठी संगणकीय लिलाव पध्दती सुरु करण्यासाठी 415 कोटींची तरतूद केलेली आहे. हा खरोखरच ऐतिहासिक व क्रांतिकारक निर्णय झालेला आहे. कारण दलालांमार्फतच शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक होत आहे. संगणकीय लिलाव पध्दतीने लिलाव झाला व शेतकऱ्यांना चांगला दर मिळाल्यास त्यांचा त्यांना चांगला फायदा होणार आहे.

सभापती महोदय, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राज्याला मिळणाऱ्या निधीचे वाटप करीत असताना किंवा त्याचे विनियोजन करीत असताना प्रशासनामार्फत वेळेत विनियोजन होणे आवश्यक आहे. ब-याच वेळा निधी येतो, परंतु त्याबाबत गाईड लाईन्स न आल्यामुळे अधिकाऱ्यांना किंवा पदाधिकाऱ्यांना अडचणीचे होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळाला देशाचे माननीय कृषी मंत्री श्री.शरदराव पवार यांनी आर.के.वाय.च्या माध्यमातून 10 कोटींचा निधी मार्च-एप्रिल महिन्यामध्ये दिला होता. परंतु राज्याच्या पशुसंवर्धन खात्याकडून डिसेंबर-जानेवारी महिन्यामध्ये गाईड लाईन्स खालच्या स्तरावर गेल्यामुळे 10 कोटी रुपयांपैकी फक्त 1 कोटी रुपये देण्यात आले आणि उर्वरित 9 कोटी रुपये परत काढून इतरत्र वळविण्यात आले. तसेच 1 कोटी रुपये एका महिन्यात खर्च केले पाहिजेत अशी अट घालण्यात आली आहे. आर.के.वाय.मार्फत राज्य सरकार भरीव निधी आणते, परंतु त्या निधीचे व्यवस्थित विनियोजन योग्य वेळी न केल्यामुळे शेतकऱ्यांना किंवा लाभार्थ्यांना त्याचा उपयोग होत नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे....

सभापती महोदय, माननीय अर्थ मंत्र्यांनी कोरडवाहू शेती विकासासाठी 200 कोटी रुपयांचे नियोजन करण्यात आलेले आहे. माझी या निमित्ताने माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती आहे. या राज्यात कायम दुष्काळी भाग आहे, त्याकडे लक्ष दिले तर बरे होईल. कारण या दुष्काळी तालुक्यातील गावांना 7-8 महिने पिण्याच्या पाण्यासाठी टँकरने पुरवठा करावा लागतो, शेतीच्या पाण्यासाठी शेतकऱ्यांना वणवण भटकावे लागत आहे.

महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी शासनाने 850 कोटी रुपयांचे नियोजन केल्यामुळे मी शासनाला धन्यवाद देतो. त्याचप्रमाणे दुधाळ जनावरांच्या वाटपासाठी 35 कोटी 65 लाख रुपयांची तरतूद प्रस्तावित केलेली आहे. परंतु या निधीचे पशुसंवर्धन खात्यामार्फत वाटप होईल. गोरगरीब, अल्पभूधारक शेतकऱ्यांना या निधीचे वाटप होत असताना चांगल्या प्रकारचे अनुदान व सबसिडीही या खात्यामार्फत दिली जाणार आहे. राज्यामध्ये कार्यरत असलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळामार्फतच दुधाळ जनावरांचे वाटप व्हावे अशी विनंती मी शासनाला करणार आहे.

सभापती महोदय, वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमांतर्गत केंद्र सरकारकडून आतापर्यंत 9 हजार 422 कोटी रुपयांचे सहाय्य प्राप्त झाले आहे. त्याचप्रमाणे सन 2012-13 या वर्षासाठी 2 हजार 129 कोटी 13 लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे. या माध्यमातून काम करीत असताना मी माननीय उप मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो. दुष्काळी भागातील म्हैसाळ योजना असेल, ताकारी योजना असेल, टेंभू योजना असेल त्यासाठी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. परंतु त्यासाठी आवश्यक असलेला निधी केंद्राकडून येणाऱ्या निधीतून अधिकचा द्यावा आणि शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवावा ही विनंती करीत आहे.

सभापती महोदय, राजीव गांधी जीवनदायी योजनेंतर्गत या वर्षासाठी 324 कोटी रुपयांचे नियतव्यय प्रस्तावित केलेला आहे. त्यामुळे राज्यातील गोरगरीब जनतेला वैद्यकीय सुविधा मिळणे सुकर होणार आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.....

सभापती महोदय, जे.जे.समूह रुग्णालय, मुंबई येथे 630 कोटी रुपये खर्च करुन हायराईज्ड सुपर स्पेशालिटी रुग्णालय बांधण्याचा मनोदय व्यक्त करण्यात आला आहे. ही अभिनंदनीय बाब आहे.

शालेय पोषण आहारासाठी या वर्षासाठी 1534 कोटी 50 लाख रुपयांचे नियोजन केलेले आहे. पण हा आहार देत असताना या आहाराचा दर्जा चांगला ठेवला पाहिजे, ही सुध्दा खबरदारी घेणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, कर्मवीर भाऊराव पाटील अध्यासन, मराठी भाषा विकास विभाग, हुतात्मा भाई कोतवाल स्मारक, सेवाग्राम आश्रम, भारतरत्न पं.भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत प्रोत्साहन योजना इत्यादींसाठी शासनाने तरतूद केल्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो.

यानंतर श्री.शिगम.....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

पर्यटनासाठी 258 कोटीचे नियोजन केलेले आहे. त्याद्वारे प्रामुख्याने लोणार सरोवराचे जतन व संवर्धन, कास पठार विकास तसेच कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात सीवर्ल्ड व थीमपार्क पर्यटन प्रकल्प करण्यात येणार आहेत. मी या निमित्ताने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या स्मारकासाठी 2 कोटी रुपये निधी द्यावा अशी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करीत आहे. जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत राज्यातील नागरी पायाभूत सुविधा निर्मितीचे रुपये 12 हजार 365 कोटींचे 94 प्रकल्प मंजूर केले आहेत. या माध्यमातून काम करीत असताना मुंबई नागरी परिवहन प्रकल्प टप्पा 1 पूर्णत्वास आलेला असून टप्पा क्रमांक 2 मधील कामांसाठी जागतिक बँकेने रुपये 1 हजार 910 कोटीचे कर्जसहाय्य मंजूर केले आहे.

सभापती महोदय, मुंबई ही देशाची आणि राज्याची आर्थिक राजधानी आहे. या मुंबईकडे विशेष लक्ष देण्याची आवश्यकता आहे. आज वृत्तपत्रातून आपण वाचले असेल की, जो जागतिक सर्व्हेक्षण अहवाल आलेला आहे त्यामध्ये 2050 मध्ये भारत ही सर्वात मोठी आर्थिक सत्ता होणार असल्याचे नमूद केलेले आहे. आज जगातील शहरांमध्ये मुंबई शहर हे 16व्या कग्रमांकावर आहे. आज मुंबईचा विकास ज्यांच्या हातामध्ये दिलेला आहे त्यांनी विकासाकडे दुर्लक्ष केलेले असले तरी आपणास या मुंबईच्या विकासासाठी चांगले प्रकल्प राबवून मुंबईची शान आणि दर्जा वाढवावा लागणार आहे. या मुंबई शहरामध्ये वाहनांची संख्या प्रचंड वाढत आहे. आपण वाहतुकीचे प्रकल्प राबवित आहोत ही अभिनंदनीय बाब आहे. 1 कि.मी. रस्त्यावर 674 वाहने असे रस्त्यावरील वाहनांचे प्रमाण आहे. इतकी वाहने रस्त्यावर असणे ही अतिशय चिंतेची बाब आहे. याकडे आपणास दुर्लक्ष करुन चालणार नाही.

सभापती महोदय, वनाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, आपण वन व्यवस्थापन कार्यक्रम राबवित आहोत. त्यासाठी आपण वन संरक्षण समित्या स्थापन केलेल्या आहेत. गावपातळीवर अशा प्रकारच्या 12 हजार वन संरक्षण समित्या स्थापन केलेल्या आहेत. या समित्या काय करत असतील तर ते मेंढपाळाच्या जंगलामध्ये चरण्यासाठी गेलेल्या एक-दोन मेंढया पकडून त्या वन अधिका-याकडे नेतात आणि मेंढपाळाला दमदाटी करुन त्यांच्याकडून पैसे घेऊन त्या परत केल्या जातात. अशा प्रकारचे काम या ग्रामस्तरावरील वन संरक्षण समित्यांच्या सदस्यामार्फत केले जात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

आहे. तेव्हा याबाबतीत मेंढपाळ बांधवांना संरक्षण द्यावे अशी माझी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये छत्रपती शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराने काम करीत असताना महामंडळांना मोठ्या प्रमाणावर निधी देऊन मदत केलेली आहे. गेल्या वेळेला 1100 कोटी रुपयाची कर्जमाफी या महामंडळाच्या माध्यमातून दिलेली आहे. आता महामंडळाकडे असलेल्या योजना जुन्या आहेत. आताचे युग हे माहिती आणि तंत्रज्ञानाचे युग आहे. त्यामुळे या महामंडळांच्या योजनांमध्येही बदल करण्याची आवश्यकता आहे. मागासवर्गीय, बहुजन समाज, अल्पसंख्याक समाज, विमुक्त जाती आणि भटक्या समाजातील लोकांना त्या योजनांचा लाभ द्यावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, आदरणीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे हे भाषण करीत होते. पहिल्यांदा विरोधी पक्षनेता म्हणून आलेल्या श्री. विनोद तावडे साहेबांच्या भाषणाकडे सर्वांचे लक्ष लागले होते. परंतु त्यांचे भाषण ऐकून आम्हाला अतिशय वाईट वाटले. आम्ही देखील प्रथमच त्यांचे भाषण ऐकण्यासाठी फार उत्सुक होतो. त्यांचे भाषण ऐकल्यानंतर ते भाषण त्यांचे नसून त्यांच्या कुणा एका पी.ए.ने किंवा क्लार्कने केलेले भाषण आहे की काय असे वाटले. त्यांनी आपल्या भाषणामध्ये माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांच्या बद्दल शंका व्यक्त केली. त्यांनी सांगितले की, दादा तुम्हाला राज्याचा मुख्यमंत्री व्हायचे आहे. मग असा अर्थसंकल्प मांडून तुम्ही मुख्यमंत्री कसे होणार. सभापती महोदय, 1999 च्या निवडणुका असतील, 2004च्या निवडणुका असतील किंवा 2009च्या निवडणुका असतील या सर्व निवडणुकांमध्ये माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे आणि अन्य विरोधी पक्षातील नेत्यांनी सत्तेची जी काही स्वप्ने बघितली होती ती त्यांची स्वप्ने खोटी ठरली. पण माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी जी काही स्वप्ने पाहिली ती त्यांची स्वप्ने खरी ठरलेली आहेत. तेव्हा माझी माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे यांना विनंती आहे की त्यांनी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांची चिंता न करता त्यांना जे काही आता स्थान लाभलेले आहे त्या स्थानाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील जनतेला कशा प्रकारे न्याय देता येईल हे पहावे आणि आपले स्थान बळकट करावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री.भोगले..

अशोधित मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांचे भाषण सुरु असल्यामुळे मी त्यांच्या भाषणात व्यत्यय आणू इच्छित नव्हतो. मी स्वप्न बघणारा माणूस नाही. परंतु माननीय उप मुख्यमंत्री यांच्या संदर्भात किती बोलावे हा त्यांचा अधिकार आहे. मुंबई महापालिकेत सत्ता मिळविण्याचे जे स्वप्न तुम्ही बघितले होते त्या संदर्भात मुंबईच्या लोकांनी तुम्हाला जागा दाखवून दिली. पुन्हा मुंबई महापालिकेची सत्ता आमच्या ताब्यात दिली आहे. तुम्हाला घरी पाठविले आहे. जे स्वप्न बघितले होते त्याचे काय झाले हे तुम्हाला कळले. ग्रामीण भागात सुध्दा स्वप्नवत वाटावे अशी परिस्थिती निर्माण झाली. ग्रामीण भाग ताब्यात घेण्याचे स्वप्न बघणाऱ्यांना भगवा सोबत घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही अशी स्थिती आहे. एका बाजूला राष्ट्रवादी काँग्रेस आणि दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हे एकमेकाला म्हणतात, तुम्ही कडेवर का? हेच मला निदर्शनास आणावयाचे होते. धन्यवाद.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-13 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण एका बाजूला सत्ता आणि सत्तेतून पैसा याचे स्वप्न न पाहणारे आणि उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी पुढील 25 वर्षे राजकारण करता येईल इतकी त्यांची व्यवस्था झाल्यामुळे त्यांनी आता या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून इतर मंत्र्याप्रमाणे केवळ आपण अधिकाधिक काळ मंत्री रहावे याचा विचार न करता एकूण राज्याच्या विकास योजनांसाठी पैसा खर्च करावयाचा आणि तो पैसा कुठून आणता येईल याचा विचार केला पाहिजे असे मला वाटते. 100 रुपये उत्पन्न आणि 200 रुपये खर्च अशी परिस्थिती फार काळ चालत नाही. 100 रुपये उत्पन्न असल्यामुळे खर्च कमी करणे हे उत्तर नसते. खर्च करण्यासाठी लागणारा पैसा उभा करणे हा त्यावरील उपाय असतो. कशा पध्दतीने आपण पैसा उभा करु शकतो याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, प्रामुख्याने ज्या वेगवेगळ्या महामंडळांमध्ये शासनाचे पैसे गुंतविले आहेत, त्या बदल्यात मिळणारा परतावा पाहिला तर 100 रुपयाच्या बदल्यात केवळ 6 पैसे परतावा मिळतो. कोणताही उद्योजक 100 रुपये गुंतवणुकीच्या बदल्यात 6 पैसे परताव्यावर धंदा करणार नाही. आपल्यापैकी अनेकजण शेतीवर आधारित उद्योग करतात. 10 ते 30 टक्के प्रॉफिट मार्जिनशिवाय कोणी धंदा करीत नाही. सन 2010-11 मध्ये शासनाने विविध महामंडळांमध्ये 74329 कोटी रुपयांची गुंतवणूक केली होती. त्या बदल्यात शासनाला 44.82 कोटी रुपये व्याजाच्या रुपाने उत्पन्न मिळाले. हे प्रमाण 0.6 टक्के इतके आहे. खर्च वाढत असेल तर कर्ज काढणे हे त्यावरील उत्तर नाही. अशा काही बाबींकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे. शासनाने वेगवेगळ्या महामंडळांमध्ये 74329 कोटी रुपये गुंतवणूक केली होती. त्या बदल्यात लाभांशाच्या रुपाने 44.82 कोटी रुपये शासनाला प्राप्त झाले. हे उत्पन्न कसे वाढेल याचा विचार केला पाहिजे.

सभापती महोदय, 2008-09 या एका वर्षात साधारणत: रोख शिल्लक सरकारकडे 21626 कोटी रुपये इतकी होती. 2009-2010 या वर्षात कमी रोख रक्कम ठेवण्याऐवजी 25559 कोटी रुपये एवढी त्यात वाढ झाली. वास्तविक हा आतबट्टयाचा व्यवहार आहे. आपण जे कर्ज घेतो त्यावर द्यावे लागणारे व्याज हे 7.29 टक्के म्हणजे साडेसात टक्के इतके असते. तसेच जो पैसा

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील.....

पेटी कॅश म्हणून शिल्लक ठेवतो त्यावर केवळ 5 टक्के व्याज मिळते. अनावश्यक रोख रक्कम जवळ ठेवल्यामुळे 2.5 टक्के नुकसान होते. 13 व्या वित्त आयोगाने आर्थिक बेशिस्तीबद्दल रिमार्क्स पास केल्यानंतरही हातातील रोख रक्कम ठेवण्याचे प्रमाण कमी केले जात नाही.

सभापती महोदय, शासनाला 27777.63 कोटी रुपये इतकी रक्कम वसूल करणे शक्य आहे त्यातील 9684 कोटी रुपये इतकी रक्कम नक्की वसूल केली पाहिजे, परंतु ती वसूल केली जात नाही. उत्पन्न वाढविले तर विकास योजनांसाठी पैसा उपलब्ध होऊ शकतो. कर्ज काढून विकास योजना राबवावयास लागलो तर व्याज देण्यामध्येच सरकारचे कंबरडे मोडणार आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

आणखी एक मुद्दा मांडून मी हा चॅप्टर पूर्ण करणार आहे. तो म्हणजे राज्याच्या तिजोरीवर वेगवेगळ्या प्रकारच्या बँक गॅरंटीज यांचा 15040 कोटीचा भार आहे. ज्यावेळेस आपण बँक गॅरंटी देत असतो तेव्हा सूत गिरणी अथवा साखर कारखान्याला कर्ज मिळावे म्हणून देत असतो त्यावेळेस त्यांच्याकडून हमी फी पोटी 1170 कोटी रुपये घेणे अपेक्षित असताना शासनाने मात्र अशी हमी फी 551.18 कोटी एवढीच रक्कम घेतली. वास्तविक अशी हमी देत असताना संबंधित सूत गिरणी किंवा साखर कारखाना अडचणीत असतो आणि त्याला शासनाने हमी दिल्याशिवाय कर्ज मंजूर होणार नसते पण त्यापोटी नियमानुसार हमी फीची रक्कम कमी घेतलेली आहे. अशा प्रकारे तीन चार मुद्यांच्या माध्यमातून लक्षात येते की, एका बाजूला वेगवेगळ्या महामंडळानी शासनाकडून घेतलेले पैसे आणि त्यातून शासनाला मिळालेले रिटर्न्स, तसेच आपल्या हातात अनावश्यक असलेली रोख रक्कम प्रामुख्याने जी वसूल व्हायला पाहिजे ती आणि हमी अशा प्रकारचे चार मुद्दे पाहिले तर काही हजारो कोटीचा महसूल वाढू शकतो याचाही शासनाने विचार करावा अशी मी सूचना करतो.

महोदय, एक मुद्दा आणखी असा आहे की, सगळे विरोधकांनी मोठ्या प्रमाणात हल्लाबोल करुन देखील यावर्षी शासनाने 4806 कोटीची ठोक तरतूद बजेटमध्ये केली आहे. या ठोक तरतुदीसाठी कोणत्याही प्रकारे विधान मंडळाची परवानगी घ्यावी लागत नाही. शासन कधी 1.50 लाख कोटी तर कधी 1.52 लाख कोटी म्हणजे त्या त्या वेळच्या महसुलाप्रमाणे बजेट सादर करीत असते. तसेच दरवर्षी जवळपास 14 हजार कोटीच्या पुरवणी मागण्याही मंजूर केल्या जातात. तरी देखील विधान मंडळाची परवानगी न घेता अशा प्रकारे 4806 कोटीची ठोक तरतूद करणे ही एका अर्थाने आर्थिक नियोजनाचा अभाव असल्याचेच लक्षण म्हणता येईल.

राज्याच्या तिजोरीत एका बाजूला महसूल वाढला पाहिजे असे म्हणत असताना तसे दुसऱ्या बाजूला महसूल न वाढविता अव्यवहार्य अशा योजना देखील अर्थसंकल्पात घोषित करण्यात आलेल्या आहेत. त्यात एक योजना म्हणजे पाळणा घर योजना असून त्यासंबंधीचे डिटेल्स अर्थसंकल्पात असल्याने मी ते देणार नाही. पण ग्राम पंचायतीला ही योजना चालविण्यास देत असताना जी रक्कम त्यासाठी देऊ केली आहे ती अगदीच नगण्य अशी आहे. शासनाने या

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील.....

योजनेसाठी फक्त 700 रुपये अनुदान देण्याचे घोषित केले असून तेवढ्यात जागेचे भाडे, देखभाल-दुरुस्ती, सफाई, शौचालय आणि पाणी पुरवठा अशा सर्व गोष्टीवर खर्च करावयाचा आहे. एवढ्या कमी रकमेत कोणती ग्रामपंचायत किंवा एनजीओ ही योजना चालविणार आहे याचा विचार शासनाने करणे आवश्यक आहे.

त्याचबरोबर आणखी दोन गोष्टी व्यापाऱ्यांच्या दृष्टीने करणे आवश्यक होते. ज्याप्रमाणे शेती जगायला पाहिजे त्याशिवाय राज्य आणि देश जगणार नाही त्याचप्रमाणे शहरीकरणात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने व्यापाऱ्याशिवाय देखील राज्य चालू शकणार नाही. या व्यापाऱ्यांच्या बाबतीत शासनाने एलबीटी जकातीला पर्याय म्हणून आकारण्याचा निर्णय घेतला त्यासंदर्भात कोल्हापूर शहरात 10 दिवस मार्केट बंद ठेवले होते. हा कर व्यापाऱ्यांच्या दृष्टीने त्रासदायक आहे. त्यांना शासनाने आश्वासन दिले होते आणि येत्या बजेटमध्ये यासंदर्भात काही तरी घोषणा होईल अशी अपेक्षा होती. व्यापाऱ्यांचा कर भरण्यास विरोध नाही, त्याशिवाय मार्ग नाही हे देखील त्यांना समजते पण फक्त त्यात सोपेपणा कसा आणावा अशी त्यांची मागणी आहे. यासंदर्भात शासनाने एक समिती देखील नेमली होती पण त्यात देखील हा मुद्दा आला नाही, याबाबत शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

महोदय, आमदार निधीच्या संदर्भात आमची अशी मागणी आहे की, सध्या जो 2 कोटीचा विकास निधी मिळतो तो शासनाने डीएसआरचे रेट वाढविल्यामुळे एका रस्त्यासाठी पाच लाख लागत असतील तर तेथे नऊ लाख खर्च येतो. पदवीधर मतदारसंघासाठी पाच जिल्ह्यांमध्ये चॉकलेट वाटायचे म्हटले तरी हे दोन कोटी पुरणार नाहीत. माझी या निमित्ताने अशी मागणी आहे की, पदवीधर आणि शिक्षक आमदारांचे क्षेत्र हे विस्तीर्ण असल्याने त्यांच्यासाठी जो सध्या 2 कोटी इतका निधी दिला जातो त्यात वाढ करावी तसेच या सर्व बजेटमध्ये खर्चाच्या बरोबरीने आवक कशी वाढविता येईल याचाही विचार करावा अशी आग्रहाची मागणी करतो आणि माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, देशात ख-या अर्थाने आर्थिक मंदीचे सावट असतांना या सभागृहाचे नेते माननीय अजितदादा पवार यांनी महसुली तूट पूर्णपणे भरुन काढून 152.49 कोटी रुपयांचा शिलकी अर्थसंकल्प सादर केल्यामुळे मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो. दोन्ही बाजूच्या सहकाऱ्यांनी अनेक विषयावर आपली मते मांडलेली आहेत.

सभापती महोदय, उद्योग विभाग, कामगार विभाग, गृह विभाग तसेच नगरविकास विभागाच्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजनेसाठी 450 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. विद्युतीकरणासाठी 2.5 हजार कोटी रुपयांची तसेच ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी 850 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. या सभागृहात रोजगार हमी योजना बंद आहे की, सुरु आहे असे बोलले गेले होते त्यामुळे या योजनेसाठी जी तरतूद केलेली आहे ती त्या प्रश्नाचे उत्तर आहे असे मला वाटते. 850 कोटी रुपये ही काही छोटी रक्कम नाही. महात्मा गांधी रुरल एम्पलॉयमेंट गॅरंटी स्कीम ही केंद्रशासनाची स्कीम आहे. केंद्र शासनाची ही योजना आपल्या राज्यातील काही जिल्हयांमध्ये सुरु आहे. ज्या योजनेच्या संदर्भात सगळयांच्या मनामध्ये अनिश्चितता होती त्या रोजगार हमी योजनेसाठी जो निधी उपलब्ध करुन दिलेला आहे त्यामुळे सर्वांच्या मनातील अनिश्चितता नक्कीच दूर झाली असेल असे मला वाटते.

सभापती महोदय, एक गोष्ट मला मुद्दाम सांगावीसी वाटते की, उद्योग हा विकासाचा गाभा आहे. शेती आणि उद्योगाच्या कोणत्याही राज्यात किंवा कोणत्याही देशाच्या अर्थकारणावर व अर्थसंकल्पावर प्रभाव मोठया प्रमाणात प्रभाव पाडत असतात. आपले राज्य शेती प्रधान असून जेवढया प्रमाणात शेतीचा आपल्या अर्थकारणात वाटा असावयास पाहिजे होता तेवढया प्रमाणात तो दुर्दैवाने दिसत नाही. शेतीच्या संदर्भात आपण मागे चालल्याचे चित्र दिसून येत आहे. त्यामुळे शेतीच्या संदर्भात आपली जी वाटचाल आहे ती आपल्या राज्यासाठी चांगली नाही एवढे मला या निमित्ताने माननीय अर्थमंत्र्यांना सांगावयाचे आहे. आपले राज्य शेतीप्रधान राज्य असल्यामुळे आपल्या समोर ब-याच अडचणी आहेत व त्या अडचणींची आम्हा सर्वांना जाणीव आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप....

त्यामुळे ख-या अर्थाने आपल्याला शेती उद्योगाला चालना द्यावी लागणार आहे व त्यासाठी काही धाडसी पावले उचलावयास लागली तरी ती उचलली गेली पाहिजेत. काम करीत असतांना टीका होत असते. कृषी विकासाचा दर यावेळेस निगेटीव्ह आलेला आहे ते चिन्ह राज्याच्या दृष्टीने चांगले नाही. त्यामुळे येणा-या काळात शेती उद्योगावर जास्तीतजास्त फोकस अर्थमंत्र्याचा असला पाहिजे.

सभापती महोदय, औद्योगिक क्षेत्राच्या प्रोत्साहनासाठी 1480 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे व त्या माध्यमातून 1.86 लक्ष नोक-या उपलब्ध होतील असे अपेक्षित असून ही चांगली गोष्ट आहे. राज्याचे औद्योगीक धोरण लवकरच जाहीर होणार आहे असे अर्थसंकल्पात म्हटले गेलेले आहे परंतु या दोन्ही गोष्टीत विसंगती आहे असे मला वाटते. राज्याचे औद्योगिक धोरण नेमके काय राहणार आहे याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. राज्यातील लघु उद्योग आज उपेक्षित आहे. लघु उद्योगामुळे जास्तीतजास्त प्रमाणात रोजगार उपलब्ध होत असतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

दुर्दैवाने ही जी तरतूद केली आहेत त्यामध्ये स्पष्टता आली पाहिजे अशी माझी विनंती आहे. उद्योगाला अनुदान देण्यासाठी 1480 कोटींची तरतूद केली आहे. मोठे उद्योग दिवाळखोरीत गेल्याचे भासवून मोठ्या प्रमाणावर टॅक्स चुकवतात. यात सगळ्यात जास्त नुकसान कष्टकरी कामगारांचे व राज्याचे देखील होते. त्यांना जीवित करण्यासाठी अनुदान देणार असाल तर त्या सर्व उद्योजकांचा गेल्या 20-25 वर्षाचा ट्रॅक रेकॉर्ड पाहून घ्यावा. कित्येक वेळा असे होते की, मोठे नाव आपल्या लक्षात असते. त्याची फॅक्टरी अडचणीत आलेली असते. त्यास आपण मदत करायला लागलो तर लहान उद्योजक उपेक्षित राहतील. म्हणून माझी वित्त मंत्र्यांना विनंती आहे की, याचा जास्तीत जास्त उपयोग लघु उद्योग पुनरूज्जीवित करण्यासाठी केला पाहिजे. आपल्या राज्यामध्ये लघु उद्योजक मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यामुळे त्यांना नेहमीच मदत करण्याची भूमिका राज्य शासनाची राहिलेली आहे. त्यामुळे येथे जी तरतूद करण्यात आली आहे त्यात लघु उद्योजकांना जास्तीत जास्त प्रमाणात सामावून घ्यावे अशी मी विनंती करणार आहे.

सभापती महोदय, आपण कुठल्याही वर्षाचा अर्थसंकल्प पहावा. कामगारांचा विषय हा फक्त चार ओळीमध्ये लिहिलेला असतो. मला मोठे आश्चर्य वाटते. कामगार तुमचा आमचा मतदार आहे. मलबार हिल येथे राहणारा उच्चभ्रू मतदानासाठी कधीच उतरत नाही. ते फक्त कँडल मार्चमध्ये असतात. मतदानासाठी आलेले मला तरी माहीत नाही. यावेळचे मलबार हिलचे मतदान 22 ते 27 टक्के होते. उपनगरात झोपडपट्टीत किंवा चाळीत राहणारे कामगार आहेत त्यांचे मतदान 62 टक्के होते. आज कामगारांच्या बाबतीत कसली तरतूद आहे? उद्योग आणि कामगारांची सांगड घालण्यास काहीही हरकत नाही. त्यासाठी माझी तयारी आहे. कामगारांसाठी कुठलीही तरतूद कुठल्याही अर्थसंकल्पामध्ये नसते. मी खालच्या सभागृहाचा पाच वर्ष सदस्य होतो, तर या सभागृहाचा दोन-अडीच वर्ष सदस्य आहे. कुठल्याही अर्थसंकल्पामध्ये कामगारांना प्राधान्य दिलेले नाही. या बाबतीत माझी तक्रार आहे. त्याची आपण नोंद घ्यावी.

आपण कामगार कल्याण केंद्र सुरू केली. आज कामगार कल्याण केंद्राची स्थिती काय आहे? मी मुंबईतील कामगार कल्याण केंद्राची स्थिती सांगतो. कामगाराचा मुलगा खेळाडू असेल, त्याला अभ्यासिकेची गरज असेल तर त्यासाठी त्याला कामगार कल्याण केंद्राची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप....

माननीय कामगार मंत्री हे आमच्या बाजूला बसले आहेत. ते आमच्या बरोबर भांडत असतात हे बरोबर आहे. आमच्या कामगारांचे 31 कोटी रूपये येणे आहे. ते अजून आलेले नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण यांनी कामगारांच्या एका कार्यक्रमामध्ये 5 कोटी रूपये देतो असे सांगितले. अधिकारी कशी दिशाभूल करतात हे मला येथे मुद्दाम सांगितले पाहिजे. 5 कोटी रूपये देण्याचे जाहीर करून देखील एकही पैसा अद्याप पर्यंत मिळालेला नाही. त्यामुळे या बाबत जी उदासिनता दिसते ती दूर केली पाहिजे.

माझी माननीय वित्त मंत्र्यांना विनंती आहे की, ट्राय पार्टी अंशदानाचा विषय आहे. तो अतिशय महत्त्वाचा आहे. आम्ही कायद्याच्या कक्षेत राहून कामगारांच्या हक्काची गोष्ट वर्षानुवर्षे मागत आहोत. तरी देखील आपण निर्णय घेत नाही. याचा जर निर्णय झाला तर आम्हाला शासनाकडे येण्याची गरजच भासणार नाही. हे मी कायद्याच्या कक्षेत राहून सांगत आहे. माझ्या सारखा कामगार नेता असेल, खालच्या सभागृहातील सन्माननीय सदस्य श्री.शशिकांत शिंदे असतील किंवा आता मंत्री असलेले श्री.सचिनभाऊ अहीर असतील यांनी अनेक वेळा पत्रे दिली असतील. दुर्दैवाने त्या बाबतीतील कसलीही तरतूद दिसत नाही. आम्ही कामगारांच्या बाबतीत नेहमीच उपेक्षित राहतो आहोत.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची वेळ पाच मिनिटे वाढविण्यात येत आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला कामगारांच्या बाबतीत विनंती करावीशी वाटते की, आमचा अंशदानाच्या बाबतीत म्हणजे ट्रायपार्टी कॉन्ट्रीब्युशनचा जो पेंडींग इश्यु आहे, त्याबाबत त्यांनी त्वरित निर्णय घ्यावा. कारण ही सर्व अर्थ खात्याचीच अडचण आहे. अर्थ खात्याकडून असे लिहून येते की, हे योग्य नाही, व्हाएबल नाही. म्हणून आपण याबाबतीत देखील प्राधान्य द्यावे.

सभापती महोदय, मी गृह विभागाच्या बाबतीत सांगू इच्छितो. याविषयी माझे अनेक सहकारी बोलले असतील. परंतु आपण मला मुंबईच्या संबंधात बोलण्यासाठी वेळ दिला तर बरे होईल. मला गृह विभागाच्या बाबतीत मुद्दाम सांगावयाचे आहे आणि त्याबाबत माझी माननीय अर्थमंत्र्यांना देखील विनंती आहे. मी हे पाहिले की, अर्थसंकल्पामध्ये गृह विभागासाठी 156 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. ही तरतूद किती असावी याबाबतीत मी फारस वक्तव्य करणार नाही आणि ही तरतूद जास्त असावयास पाहिजे याबद्दल दुमत नाही.याचे कारण आज संपूर्ण देशामध्ये विशेषत: महाराष्ट्राच्या विविध भागामध्ये, मुंबईमध्ये जी परिस्थिती निर्माण झालली आहे,ज्याप्रकारे पोलिसांची एक प्रकारे पिछेहाट होत आहे याचा आम्ही कधीतरी विचार करणार आहोत की नाही? आपण पोलिसांची भरती सुरु केली पण ती आपण पूर्णत्वास नेऊ शकलो नाही. त्यामुळे कायदा आणि सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झालेले आहेत. हे होत असताना आपण ज्या विविध गोष्टी जाहीर करतो, त्यामध्येही एकसूत्रीपणा दिसत नाही.

सभापती महोदय, मला याठिकाणी मुद्दाम उल्लेख करावयाचा आहे की,या सदनामध्ये आम्ही सगळयांनी भावना व्यक्त केल्या आणि शासनाने त्या बाबत निर्णय घेतला त्याबद्दल आम्ही अभिनंदन देखील केले. 26/11 च्या घटनेमध्ये जे शहीद झाले त्यांना आपण आदरांजली वाहिली आणि शासनाने त्यांच्या कुटुंबीयांना मदत देखील केली. हे करीत असताना आपण त्यावेळी एक सूत्र विचारात घेतले होते, जे मी मांडले होते आणि माझ्या अनेक सहकाऱ्यांनी देखील मांडले होते की, ते शहीद झालेले आहेत तसेच नक्षलवाद्यांनी देखील ज्या 12 जणांना मारले ते देखील शहीदच झालेले आहेत. ते जवान तुमचे-आमचे रक्षण करण्यासाठी नक्षलग्रस्त भागामध्ये जात आहेत. अशा वेळी त्यांना ठार मारण्यात आल्यानंतर त्यांच्या कुटुंबा मध्ये जी परिस्थिती निर्माण झालेली आहे, त्यांचा आम्ही कधीतरी विचार करणार आहोत की नाही? म्हणून माझी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती आहे की,नक्षलवाद्यांनी ज्या 12 जणांना मारले ते देखील शहीदच आहेत.त्यामुळे इतर शहीद कुटुंबीयांना जी शासकीय मदत दिली जाते, त्याच प्रमाणे आपले रक्षण करणाऱ्या .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जवानांना नक्षलवाद्यांनी ठार मारले आहे, तेव्हा त्यांच्या कुटुंबीयांना देखील अशाच प्रकारची मदत करावयास पाहिजे अशी माझी विनंती आहे आणि ही गोष्ट मी यापूर्वी देखील सांगितलेली आहे. पण त्याबाबत काहीही घडले नाही.पण आता मात्र ज्याला आपण म्हणतो की, "We will have to take call on this " त्यामुळे आपल्याला याबाबत नक्कीच गांभीर्याने विचार करावा लागेल आणि यासाठी तरतूद करावी लागेल.

सभापती महोदय, आपण झोपडपट्टीच्या बाबतीत बोलतो आणि तसे ते बोलले पाहिजे. कारण तेथे रहाणारा नागरीक हा आपल्या देशाचा आहे, राज्याचा आहे, मुंबईकर आहे आणि तो आपला आहे. परंतु आपण पोलिसांच्या बाबतीत कधीतरी असा विचार केला काय? याठिकाणी पोलिसांच्या घराच्या बाबतीत नगण्य तरतूद केलेली आहे. मी स्वत: पोलीस लाईनमध्ये राहिलो आहे. माझ्या वडिलांनी जवळजवळ 40 वर्षे पोलीसमध्ये नोकरी केलेली आहे. परंतु आज जर आपण पाहिले तर झोपडपट्टीपेक्षा वाईट परिस्थिती पोलिसांच्या घराची आहे. जर अशी स्थिती मुंबई मध्ये असेल तर गावखेड्यामध्ये काय स्थिती असेल याची कल्पना सुध्दा करता येत नाही. आज तेथे अधिकारी सुध्दा रहात आहेत. त्यांच्या घराचे छत गळत आहे अशा वेळी त्यांनी काय करावयाचे? आपण बाकी सगळया गोष्टींची चर्चा करीत असताना वारंवार ही गोष्ट मांडलेली आहे. मी असे म्हटले नाही किंवा कोणत्याही पोलिसांनी म्हटले नाही की, आम्हाला फुकट घरे द्यावीत. पण त्याच्या नोकरीच्या काळामध्ये त्याचा जो एच.आर.ए.बुडतो, त्या अनुषंगाने त्यांना जागा दिल्या पाहिजेत. हे आपल्याला करावयास पाहिजे. ते आपले कर्तव्य आहे. जिल्ह्याच्या ठिकाणी तसे करावयास काय हरकत आहे?

सभापती महोदय, ज्यावेळेला पोलिसांच्या घराचा प्रश्न येतो, त्याच्या सुविधेचा प्रश्न येतो. त्यावेळी याठिकाणी मामुली तरतूद केलेली आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती राहील की, पोलिसांची घरे असोत किंवा पोलिसांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असो याकडे गांभीर्याने पाहिले पाहिजे. कारण तो पोलीस आपली ड्युटी करणार आहे, आपले संरक्षण करणार आहे.जर कुठे चोरी झाली किंवा कोणावर बलात्कार झाला तर त्याबाबत त्यानेच लक्ष द्यावयाचे किंवा खून झाले तर त्यानेच पहावयाचे आणि त्याच्या घरामध्ये काय परिस्थिती आहे, काय चालले आहे हे आम्ही शासन म्हणून पहावयाचे नाही काय? म्हणून माझी विनंती राहील की, याबाबतीत पोलिसांची जी....

. . . .एम-3

APR/MMP 11:00

श्री.भाई जगताप . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

घरे असतील किंवा त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न असेल तर त्यासाठी विशेष तरतूद झाली पाहिजे अशा प्रकारची मी येथे विनंती करतो. खरेतर मला अनेक विषयांबाबत बोलावयाचे होते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भाई जगताप...

आपण मला वेळ वाढवून दिला त्याबद्दल मी आपला आभारी आहे. खालच्या सभागृहात विभाग निहाय चर्चा होते. परंतु या सभागृहात विभागनिहाय चर्चा होत नाही. परंतु माझ्या अनेक सन्माननीय सहकाऱ्यांनी येथे विचार मांडलेले आहेत. मी या ठिकाणी ज्या काही सूचना केलेल्या आहेत त्याचा गांभीर्याने विचार करावा व माननीय उपमुख्यमंत्री महोदय त्याप्रमाणे तरतूद करतील अशी आशा व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.15 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.05 मिनिटांनी सकाळी 11.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

सभापतीस्थानी माननीय सभापती

प्रश्नोत्तरे

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा, काजू पीक विमा संरक्षण योजना सुधारित करणेबाबत

(१) * २६५०३ *श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , प्रा.सुरेश नवले* : सन्माननीय ***फलोत्पादन मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आंबा, काजू पीक विमा संरक्षण योजनेसंदर्भात काढण्यात आलेल्या शासन निर्णयात, आंब्याच्या बाबतीत फक्त पाऊस हाच मुख्य निकष मानून ढगाळ हवामानामुळे आंबा पिकांचे मोठे नुकसान होते याचा विचार करण्यात आलेला नाही व काजू पिकासाठी संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्हा न धरता मालवण व कुडाळ ह्या दोनच तालुक्यांचा समावेश करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच विमा नुकसान निश्चितीसाठी शासनाची वेंगुर्ले, मुळदे व देवगड येथे विद्यापीठाची केंद्रे असून तेथे हवामानाचा तपशील उपलब्ध असतो असे असताना "सर्कल" ऐवजी हा तपशील गृहीत धरणे अधिक योग्य ठरु शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रायोगिक तत्वावर असलेली ही योजना सुधारित करताना उक्त प्रश्न भाग १ व २ यांचा विचार करण्यात येणार आहे काय,

(४) सदर योजना सुधारित करताना कोणत्या बाबी विचारधीन आहेत किंवा विचारात घेण्यात येणार आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : (१) पथदर्शक फळपीक विमा योजना २०११ मध्ये आंबा फळपिकांच्या बाबतीत अवेळी/जास्त पाऊस व जास्त तापमान हे धोके विमा योजनेत समाविष्ट केलेले आहेत. तर काजू पिकांसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण व कुडाळ या दोन तालुक्याचा अंतर्भाव प्रायोगिक तत्वावर करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही. केंद्रिय ॲग्रीकल्चर इन्श्यूरन्स कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड यांनी नुकसान भरपाई ठरविण्याच्या पद्धतीनुसार संदर्भ हवामान केंद्र हे नोंदणीकृत त्रयस्थ संस्थेमार्फत स्थापित केलेले हवामान केंद्र राहणार आहे.

(३) व (४) राज्यात सन २०११-१२ या आर्थिक वर्षात प्रायोगिक तत्वावर हवामानावर आधारित फळपिक विमा योजनेची फलनिष्पत्ती तपासून व प्राप्त झालेल्या सूचनांचा विचार करून सदर योजना पुढील वर्षासाठी राज्यात अन्यत्र लागू करण्याबाबत विचार करण्यात येणार आहे.

श्री. राजन तेली :सभापती महोदय, पथदर्शक फळपीक विमा योजना आंबा आणि काजूसाठी लागू केलेली आहे. यामध्ये अडचणीचा भाग असा आहे की, ती ऐनवेळी लागू करण्यात आलेली आहे. त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना या याजनेमध्ये सहभाग घेता आला नाही. कृषी खात्यामार्फत या योजनेच्या बाबतीत जेवढे प्रबोधन व्हावयस पाहिजे होते तेवढे झाले नाही. चालू वर्षी अतिशय वाईट

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

ता.प्र.क्र.26503

परिस्थिती आहे. काल रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्हयातील बागायतदारांचे शिष्टमंडळ माननीय मंत्री महोदयांना, माननीय उप मुख्यमंत्र्यांना आणि मुख्यमंत्र्यांना भेटले आहे. ही जी आंबा, काजू पीक विमा संरक्षण योजना राबविण्यात आली आहे त्यामध्ये फार मोठे बदल करावे लागतील. जी हवामान यंत्रे बसविण्यात आली आहेत ती ठराविक ठिकाणीच बसविण्यात आली आहेत असे सांगण्यात आलेले आहे. एका तालुक्यात जे हवामान असते ते दुसऱ्या तालुक्यात असत नाही. प्रत्येक तालुक्यातील हवामान वेगवेगळे आहे. या ठिकाणी अवेळी पाऊस होतो तसेच येथे शेवटपर्यंत थंडी होती. पण गेले तीन दिवस येथील तापमान हे 40 ते 41 से. अंशावर गेलेले आहे. फळ प्रक्रिया योजनेत कमाल तापमानाचा उल्लेख आहे पण किमान तापमानाचा उल्लेख नाही. माझा प्रश्न असा आहे की, म्हणून या योजनेमध्ये सर्वकष फेरबदल करुन सर्व शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होईल या दृष्टिकोनातून प्रयत्न करण्यात येणार आहेत का? काजूच्या पिकाचे फक्त दोन तालुके घेतलेले आहेत म्हणून संपूर्ण कोकणातील सर्व तालुक्यांचा या विमा योजनेमध्ये समावेश करुन सर्वसामान्य शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा देण्यात येणार आहे का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, फळ पीक योजना प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली आहे. मधल्या काळामध्ये नगरपरिषदेच्या निवडणुका लागल्या त्यामुळे त्यांच्या कडून परवानगी घेत असताना वर्तमान पत्रात जाहिराती द्यावयाच्या नाहीत असे त्यांनी सांगितले होते. त्यामुळे पाहिजे त्या प्रमाणात लोकांमध्ये या फळ पीक विमा योजनेची जागृती होऊ शकलेली नाही. तरी देखील आंब्यांसाठी मोठया प्रमाणात लोक सहभागी झाले होते. ही योजना राबवत असताना केंद्र शासनाचे धोरण असे आहे की, प्रिमियम साडे बारा टक्क्याच्या वर जाता कामा कामा नये. या योजनेच्या संदर्भातील जे ट्रिगर्स होते त्याप्रमाणे त्या ठिकाणी हमी दिली असेल, तापमान कमी असेल या गोष्टी यामध्ये बसवत असताना प्रिमियम 64 टक्क्यापर्यंत जात होता पण हा प्रिमियम 12 टक्क्यामध्ये बसवावयाचा होता त्यामुळे त्या काळामध्ये फळ पिकांवर किंवा फळधारणेवर ज्याचा जास्त परिणाम होतो याचा विचार करण्यात आला व अवेळी पाऊस किंवा जास्त पाऊस अशा प्रकारचा एक ट्रिगर ठरविण्यात आला. दुसरा ट्रिगर तापमानाचा ठरविण्यात आला. त्या ठिकाणचे तापमान मोठया प्रमाणात बदलत आहे त्यामुळे या विमा योजनेचा लाभार्थ्यांना फार मोठया प्रमाणात

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26503

डॉ. विजयकुमार गावित. . .

फायदा झालेला आहे. त्याचबरोबर प्रत्येक सर्कलमध्ये एक हवामान यंत्र बसविण्यात येत आहे. ही हवामान यंत्रे काही ठराविक ठिकाणी बसविण्यात येतात त्यामुळे दुसऱ्या ठिकाणचे तापमान नोटिफाय होत नाही असे घडलेले नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, हा पथदर्शक कार्यक्रम आहे असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे. पण या बाबतीत लोकांना, शेतकऱ्यांना किंवा बागायतदारांना विश्वासात घेणे अत्यंत आवश्यक होते त्याप्रमाणे त्यांना विश्वासात घेतले नाही अशी त्यांची तक्रार आहे. या पीक विमा योजनेचा जो बृहत आराखडा तयार केलेला आहे त्याच्याबाबतीत काही सूचना आहेत त्या इनकॉर्पोरेट करुन घेण्यात येतील का ? येणाऱ्या हंगामात म्हणजे मे महिन्यात आंब्याचे उत्पादन कमी होणार आहे. आंब्यावर रोग पडलेला आहे. तेव्हा दापोली येथील कृषी विद्यापीठातील या विषयातील तंत्रज्ञांच्या माध्यमातून ताबडतोब या विषयी संशोधन करुन जी कीड पडणार आहे त्यावर उपाययोजना करणार का, गेल्या वेळी या संदर्भात जे संशोधन करण्यात आले होते त्याचा अहवाल जुलै महिन्यात आला होता म्हणून यावेळी बिफोर हॅण्ड या गोष्टी करण्यात येतील का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, दापोली विद्यापीठामध्ये सर्व प्रकारचे संशोधन करण्यात येते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / शोधनीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26503.... डॉ. विजयकुमार गावित....

सन्माननीय सदस्यांनी त्या ठिकाणी रोगराई पसरलेली आहे असे सांगितले. त्या बाबतीत निश्चितपणे संशोधन करुन त्यामधून मार्ग काढण्यासाठी त्यांना सांगण्यात येईल. त्याचबरोबर जी रोगराई येते त्याबद्दल दूरदर्शनवरुन, रेडियोवरुन तसेच वर्तमानपत्राच्या माध्यमातून ते मार्गदर्शन करतात. फळ पिकांच्या विम्याबद्दल आपण ट्रिगर्स ठरवित असताना प्रामुख्याने त्या भागातील त्या फळांचे संघ, शास्त्रज्ञ आणि त्या भागातील मुख्य शेतकरी यांना समाविष्ट करुनच हे ट्रिगर्स ठरविलेले होते. त्या बाबतीत अजून काही सूचना असतील तर त्या सूचनांचा सुध्दा निश्चितपणे विचार केला जाईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, खरोखरच ही एक अतिशय चांगली आणि पथदर्शक योजना आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितल्याप्रमाणे प्रायोगिक तत्वावर ही योजना आहे हे खरे आहे. परंतु प्रायोगिक तत्वावर योजना असतानाच आपल्याला अनेक अनुभव येतील आणि त्यामध्ये बदल करावे लागतील. त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली तसेच सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी केला. सध्या ही योजना सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यापुरती मर्यादित आहे. ही पथदर्शक विमा योजना आपण कोकणातील सर्व जिल्ह्यातील तालुक्यांकरिता आणि गावांकरिता लागू करणार का ? माननीय मंत्री महोदयांनी कृषी विद्यापीठाचा उल्लेख करुन काही वक्तव्ये केलेली आहे. मी आपल्या आणि सगळ्यांच्या माहितीकरिता सांगू इच्छितो की, या कोकण कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून अतिशय चांगले काम होते. दुर्दैवाने तेथील संशोधन त्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही ही अडचण आहे. अशी विमा योजना असेल किंवा असे संशोधन असेल, ते त्यांच्यापर्यंत पोहोचविण्यासाठी शासन काही विशिष्ट कार्यक्रम हातामध्ये घेणार आहे का जेणेकरुन याची माहिती त्या बागायतदारांपर्यंत पोहोचेल ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, यामध्ये आपण कोकणातील चारही जिल्हे घेतले होते पण त्यामधून काही ठराविक तालुके निवडले होते. आता याची एकंदर फलनिष्पत्ती काय आहे, फायदा किती होतो, काय बदल करण्याची गरज आहे, या बाबतीत एकंदरीत सर्व विचार करुन पुढे ज्यावेळी ही योजना राबविण्यास सुरुवात करण्यात येईल त्यावेळी त्या भागातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्ह्यातील सर्व तालुके निश्चितपणे त्यामध्ये समाविष्ट करु. त्याचबरोबर ही गोष्ट खरी आहे की, मी सांगितल्याप्रमाणे निवडणुकीच्या काळामध्ये हे झाल्यामुळे त्या भागामध्ये बरोबर प्रचार होऊ शकला नाही. फळपीक विमा योजना असेल किंवा इतर योजना असतील त्यांचा त्या भागामध्ये मोठ्या प्रमाणात प्रसार होऊन लाभार्थ्यांना कसा फायदा व्हावा या दृष्टीने प्रयत्न केले जातील.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, ही योजना अगदी शेवटच्या टप्प्यामध्ये अधिकाऱ्यांना प्राप्त झाल्यामुळे या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळालेला नाही. त्या ठिकाणी बिगर कर्जदार 128 शेतकऱ्यांनी विमा उतरविला आणि फक्त 4 कर्जदार शेतकऱ्यांनी विमा उतरविला. त्यामुळे खऱ्या अर्थाने या योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळालेला नाही. ही योजना प्रायोगिक तत्वावर आहे. या वर्षी सुध्दा ही योजना प्रायोगिक तत्वावर घेऊन त्यामध्ये संपूर्ण तालुक्यातील आंबा आणि काजूचा समावेश करणार का ? मागच्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले होते की, ही यंत्रे सर्व ठिकाणी बसविलेली आहे. या ठिकाणी आपण असे उत्तर देत आहात की, ही यंत्रे बसविणार आहोत. यामध्ये नेमके काय खरे आहे ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ज्या ठिकाणी आपण फळपीक विमा योजना लागू केली आहे त्या सर्व सर्कलमध्ये ही यंत्रे बसविलेली आहेत. आंब्याच्या बाबतीत त्या ठिकाणी बरेच नुकसान झालेले आहे. आता तपमान वाढल्यामुळे निश्चितपणे शेतकऱ्यांना फायदा झालेला आहे. ही योजना जेव्हा पुढच्या वर्षी राबवू त्यावेळी सर्वांचा समावेश करण्यात येईल.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, मी सुध्दा आंब्याचा व्यापारी आहे. मालवण तालुक्यामध्ये माझी आंब्याची बाग आहे. माझ्याकडे आंब्याची 1 हजार झाडे होती. माझ्या 457 आंब्याच्या झाडांना कोणी तरी आग लावली त्यामुळे आंब्याची संपूर्ण झाडे खाक झाली. मागच्या वेळी त्या बाबतचा प्रश्न मी उपस्थित केला होता. माझा वेगळा प्रश्न असा आहे की, राज्य शासन केंद्र शासनाकडे, केंद्रीय ॲग्रीकल्चरल इन्शुरन्स कंपनीकडे, आग लागल्यानंतर विमा आग बचाव योजनेसाठी शिफारस करणार का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26503... श्री.सुभाष चव्हाण....

ज्या भागातील आंब्याच्या बागांना आगी लागतात त्याची नुकसान भरपाई दिली जाते. म्हणून महाराष्ट्र शासन केंद्र सरकारमार्फत केंद्रीय ॲग्रीकल्चर इन्श्यूरन्स कंपनीकडे नुकसान भरपाई मिळण्याबाबतचा प्रस्ताव पाठविणार आहे काय, पाठविला नसल्यास केव्हा पाठविणार आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, ही बाब तपासून योग्य तो निर्णय केला जाईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, परवा तापमानामध्ये बदल घडल्यामुळे उष्णतेमध्ये वाढ होऊन 39 अंशापर्यंत तापमान गेले. परिणामत: आंब्याच्या देठातील बळ कमी झाल्यामुळे आंबे गळून पडले आहेत. त्यामुळे आंबा उत्पादकांना शासन नुकसान भरपाई देणार आहे काय ?

डॉ.विजयकुमार गावित : मी मघाशी विम्याचे फिगर्स दिलेले आहेत. हवामानातील बदलामुळे जेथे जेथे पिकांचे नुकसान झालेले आहे त्या भागातील शेतकऱ्यांना 45 दिवसांच्या आत नुकसान भरपाई दिली जाईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे मी मघापासून उत्तर ऐकत आहे. शासनाने दोनच ठिकाणी ही योजना राबविली आहे, बाकीच्या ठिकाणी राबवावयाची आहे. फक्त सिंधुदुर्ग जिल्ह्याला सापत्न भावाची वागणूक देऊन उत्तरे देणार आहात की, बाकीच्या जिल्ह्यांच्या बाबतीत सुध्दा अशीच उत्तरे दिली जाणार आहेत असा माझा मंत्री महोदयांना प्रश्न आहे.

डॉ.विजयकुमार गावित : मी सर्व सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ही योजना राबविलेली नाही तर ठाणे, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यात आंब्यासाठी व काजूसाठी कोल्हापूर, रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग या जिल्ह्यासाठी योजना राबविलेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

चंद्रपूर येथील वीज निर्मिती केंद्रातील संचाच्या दुरुस्ती खर्चात वाढ होत असल्याबाबत

(2) * 26297 श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.जयप्रकाश छाजेड , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विजेची प्रमुख गरज भागविण्याची क्षमता असलेल्या चंद्रपूर वीज निर्मिती केंद्रातील संच अनेकदा बंद पडत असून त्यांची दुरुस्ती खाजगी कंपनीकडे देण्यात येत असल्याने दुरुस्ती खर्चही मोठया प्रमाणात वाढत असल्यामुळे येथील वीज निर्मिती फारच कमी झाली असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, वीज निर्मिती संचावर वाढत असलेल्या खर्चाला आळा घालण्याबाबत तसेच संचाची योग्य व कायमस्वरुपी दुरुस्ती होण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्रामध्ये संचाच्या वार्षिक देखभालीचे काम मे. भेला या मुळ उत्पादक कंपनीला देण्यात येते. तसेच संच दुरुस्तीची कामे करण्याकरिता इ-निविदेद्वारे निविदा काढून सक्षम कंत्राटदाराची निवड करण्यात येते.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, हा प्रश्न चंद्रपूर महाऔष्णिक वीज केंद्राबाबतचा आहे. महाराष्ट्रामध्ये विजेची टंचाई निर्माण झाल्यावर 1980 मध्ये या वीज केंद्राची स्थापना करण्यात आली. या वीज केंद्रातून 2340 मेगावॉट इतकी विजेची निर्मिती होते. परंतु स्थापित क्षमतेपेक्षा जास्त वीज निर्माण होत नाही असा अनुभव येत आहे. विजेचे उत्पादन पूर्ण क्षमतेने व्हावे यासाठी शासन प्रयत्नशील आहे हे शासनाने मान्य केलेले आहे. पण या वीज केंद्राबाबत सातत्याने मेंटेनन्सच्या बाबतीत तक्रारी केल्या जातात. या वीज केंद्रातील सर्व संचांची ठेकेदारांमार्फत देखभाल व दुरुस्ती केली जाते हे खरे आहे काय, ती योग्य तऱ्हेने होत नसल्यामुळे शासन देखभाल करणाऱ्या ठेकेदाराविरुध्द कारवाई करणार आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या औष्णिक वीज केंद्राची स्थापित क्षमता 2340 मेगावॉट इतकी आहे. त्या ठिकाणी एकूण 7 संच आहेत. त्यातील पहिला संच 28 वर्ष इतका जुना आहे, दुसरा 27 वर्ष, तिसरा 27 वर्ष, चौथा 26 वर्ष पाचवा 21 वर्ष, सहावा 20 वर्ष व सातवा 14 वर्षांपूर्वीचा आहे. हे संच वर्षभर चालू असतात त्यांची नियमितपणे देखभाल व दुरुस्ती

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केली जाते. केंद्र शासनाच्या भेल या कंपनीकडून हे काम केले जाते. कारण या कंपनीनेच मूळ इरेक्शनचे काम केलेले आहे. त्यांच्याकडून ओव्हरहॉलिंगचे काम केले जाते. इतर छोट्या स्वरुपाचे कामे ई-निविदेमार्फत केली जातात.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मध्यंतरी महावितरण कंपनीने एक अहवाल जाहीर केला होता. त्या अहवालामध्ये या औष्णिक विद्युत केंद्रामधून 2011 मध्ये 2340 मेगावॉटपेक्षा कमी वीज निर्माण झाल्याचे मान्य केलेले आहे हे खरे आहे काय, या केंद्रातील चार संच खूप जुने व कमी क्षमतेचे आहेत. सातवा संच नवीन आहे तो नवीन पॅटर्नचा आहे. ज्या ज्यावेळी भेल कंपनी या संचांची दुरुस्ती करते त्यानंतरच्या 2-3 महिन्यामध्ये हे संच पुन्हा बंद पडतात असा अनुभव येतो. त्यामुळे या भेल कंपनीला दुरुस्तीच्या कामानंतर ठराविक कालावधीत हे संच बंद पडता कामा नयेत अशी अट घालण्यात येईल काय ?

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक : आपण जेव्हा संचाचे इरेक्शन करतो त्यावेळी ओव्हरहॉलिंग पिरिअड ठरलेला असतो. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफिक प्रश्न विचारलेला आहे. त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, भेल ही केन्द्र शासनाची कंपनी आहे. अनेक वर्षापासून देखभालीचे काम या भेल कंपनीच्या माध्यमातून केले जाते. जेव्हा अशा प्रकारचे बिघाड होतात त्यावेळी ते तातडीने भेलच्या माध्यमातून दुरुस्त केले जातात. परंतु यानुषंगाने काही घटनाक्रम घडला असेल तर त्याची माहिती घेऊन भेल कंपनीला तसे कळविण्यात येईल.

श्री. अरुण गुजराथी : चंद्रपूर येथील वीज निर्मिती केंद्रातील संच कोणत्या वर्षी कार्यान्वित करण्यात आले, किती वर्षे ते संच काम करणे अपेक्षित होते, त्या संचांचा कालावधी संपलेला आहे काय, असल्यास, कितीही दुरुस्ती केली तरी आवश्यक तेवढा परिणाम मिळू शकणार नाही. तेव्हा याबाबतीत मंत्री महोदय माहिती देतील काय ?

श्री. अजित पवार : माननीय राज्यमंत्री महोदयांनी त्यांच्या उत्तरामध्ये सांगितलेले आहे की, चंद्रपूर येथील वीज निर्मिती केंद्रामध्ये 7 संच आहेत. एका संचाचे वयोमान 28 वर्षे, दुस-या संचाचे, 27 वर्षे, तिस-या संचाचे 27 वर्षे, चौथ्या संचाचे 26 वर्षे, पाचव्या संचाचे 25 वर्षे, सहाव्या संचाचे 20 वर्षे आणि सातव्या संचाचे 14 वर्षे असे वयोमान आहे. मागे काय झाले, असे माननीय सदस्यांनी विचारले. सन 2010-11 मध्ये चंद्रपूर औष्णिक वीज केन्द्रामध्ये देखभालीचा खर्च वाढला होता. याचे कारण म्हणजे इरई धरणातील जलसाठा संपला होता. त्यावेळी चंद्रपूर शहराला प्रथम पिण्यासाठी पाणी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे संच बंद ठेवण्यात आले. नंतर इरई धरणाची उंची वाढविण्यात आली. संच बंद असल्यामुळे ओव्हरहॉलिंगचे काम करुन घेतले. जेव्हा साखर कारखाना बंद असतो आणि तो पुन्हा सुरु करावयाचा असतो त्यावेळी त्याचे ओव्हरहॉलिंग करुन घेतले की सिझन चांगला जातो असा अनुभव आहे. त्याप्रमाणे सन 2010-11मध्ये भेल कंपनीच्या माध्यमातून देखभालीचे काम केले. त्यानंतर 500 मेगावॉट संचाची भेल कंपनीकडून वार्षिक देखभाल दुरुस्ती करुन घेतली. 7 संचांची क्षमता 2340 मेगावॉट इतकी आहे. 29 मार्चला 1912 मेगावॉट वीज मिळाली. एकूण 7 संच आहेत. 500 मेगावॉट क्षमतेच्या संचातून 475, 455 अशी वीज निर्मिती झाली. आजचे 29 तारखचे आकडेही मी घेतलेले आहेत. या सर्वांचा पीएलएफ 90 टक्के आहे. विजेची मागणी लक्षात घेता पूर्ण क्षमतेने हे संच चालावेत, पीएलएफ चांगला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मिळावा असे आमचे प्रयत्न आहेत. आम्ही टेंडर देखील अतिशय पारदर्शक पध्दतीने काढतो.ई-टेंडर आम्ही काढतो. त्यामुळे कोणी एक सांगतो म्हणून त्याला टेंडर मिळते असे होत नाही. भेल ही केंद्र सरकारच्या अखत्यारितील कंपनी आहे. बाकीची कामे ही ई-टेंडरिंगच्या माध्यमातून केली जातात. आकस्मिक कोणते काम निघाले तर ते भेल आणि एनटीपीसी कंपनीच्या तज्ज्ञांना बोलवून करुन घेतले जाते.

श्री. प्रकाश बिनसाळे : या संचांना 26-27 वर्षे झालेली आहेत. एका संचाला 14 वर्षे झालेली आहेत. किती वर्षानंतर हे संच बदलणे आवश्यक आहे. हे संच टप्प्याटप्प्याने बदलण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे काय ?

श्री. अजित पवार : अशा प्रकारचा कार्यक्रम ऊर्जा विभागाने हाती घेतलेला आहे. 40 वर्षाचे काही संच स्क्रॅपमध्ये काढलेले आहेत. अधिक वर्षे झालेले जुने संच बदलण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला असतो. खापरखेडा, पारस, एकलहरे,भुसावळ येथील वीज निर्मिती केन्द्रातील 40 वर्षाचे जुने झालेले संच काढलेले आहेत आणि तसे आमचे नियोजन असते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.26297..... श्री.अजित पवार.....

सभापती महोदय, विधानसभा सदस्य श्री.चंद्रशेखर बावनकुळे यांच्या कामठी मतदारसंघातील कोराडी औष्णिक वीज केंद्रातील काही संच आम्हाला बंद करायचे आहेत, परंतु त्यांनी मागणी केली की, हे संच बंद केल्यानंतर आम्हाला नवीन संच उपलब्ध करुन द्यावेत. तसा विचार ऊर्जा विभाग करीत आहे.

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, माननीय उप मुख्यमंत्री ने इस प्रश्न का उत्तर बहुत विस्तार से दिया है. उन्होंने बताया है कि चंद्रपुर के इस संच का पी.एल.एफ कल 90 प्रतिशत हुआ है. यह कोयले पर आधारित थर्मल पावर है. कोयले का सप्लाय वेस्टर्न कोल फील्ड से किया जाता है. जून-जुलाई 2011 से वेस्टर्न कोल फील्ड से कोयले की सप्लाय बंद करके विदेश से कोयला लेने की बात हो रही है, क्योंकि वेस्टर्न कोल फील्ड कोल वाशरी के द्वारा कोयला देती थी. क्या इससे पी.एल.एफ बढ़ सकता है ? मेरा प्रश्न यह है कि वेस्टर्न कोल फील्ड का कोयला बंद करके विदेशी कोयला लेने की वजह से ब्रेक डाउन के ऊपर क्या फर्क पड़ा है ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, विदेशी कोळसा घेतल्यानंतर तो कोळसा महाग असला तरी त्याचे रिझल्ट चांगले मिळतात. हा अनुभव आजपर्यंत सगळ्याच संचाबाबत आम्हाला आलेला आहे. वेस्टर्न कोल्ड फिल्ड कंपनीकडून कोळसा घेत असताना काही प्रश्न मध्यंतरी निर्माण झाले होते. तेथील सप्लायर्सबाबत अनेक अडचणी निर्माण झाल्या. म्हणून महाजनको कंपनीला याबद्दल क्लिअर सूचना ऊर्जा विभागाने दिलेल्या आहेत. कोणत्याही परिस्थितीत असे घडता कामा नये की, आपल्याला प्लँट चालू ठेवावयाचे आहेत, परंतु विदेशी कोळसा आपल्याकडे नाही आणि डब्ल्यूसीएलचा देखील कोळसा नाही. यामध्ये कटाक्षाने प्रयत्न सुरु आहेत. गरज भासली तर केंद्रीय ऊर्जामंत्री श्री.सुशीलकुमार शिंदे यांच्याशी दिल्लीमध्ये जाऊन चर्चा केली जाते. केंद्रीय कोळसा मंत्रालयाशी चर्चा केली जाते. कधी मुख्यमंत्र्यांचे पत्र देखील पाठविले जाते. यामधून आपल्या वीज निर्मितीवर परिणाम होणार नाही याची खबरदारी घेण्याचे काम सुरु असते.

सभापती महोदय, ज्यावेळी आम्ही बाहेरचा कोळसा आणतो त्यावेळी असाही आरोप केला जातो की, बाहेरचा कोळसा आणताना त्या माध्यमातून मलिदा मिळतो म्हणून बाहेरचा कोळसा घेतला जातो. वास्तविक तसे घडत नाही. आपल्याला देखील कल्पना आहे की, देश पातळीवर

. . .S-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असणा-या ज्या कोळसा खाणी आहेत त्या दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत. पर्यावरणाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे काही माईन्स अलॉट झाल्या, परंतु तेथे पर्यावरण विभाग म्हणतो की, कोळसा काढू नका. एनटीपीसी कंपनी देश पातळीवर जेवढा कोळसा लागतो तो कोळसा परदेशातून खरेदी करीत असते. परदेशातील कोळसा केंद्र सरकारने किंवा कोळसा मंत्रालयाने एकत्र येऊन खरेदी करावा आणि ज्या ज्या ठिकाणी कोळसा लागेल त्यांना पुरवठा करण्यासाठी तेथील बंदरात उपलब्ध करुन द्यावा किंवा रेल्वे वॅगन्समधून पाठवावा. अशा पध्दतीने त्यामध्ये पारदर्शकता असावी, जेणेकरुन त्याबाबत कोणतेही ॲलिगेशन होऊ नयेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी कोळशाबाबत विस्तृत विवेचन केले आहे. आपल्या राज्यात कोल वॉशरी होती त्याबद्दल अनेकदा चर्चा झालेली आहे. कोल वॉशरी बंद केल्यापासून वीज निर्मितीमध्ये वाढ झाली असे आमच्या निदर्शनास आले आहे. आम्ही अनेक वीज प्रकल्पांची पाहणी करुन आलो आहोत. कोल वॉशरी बंद केल्यापासून भ्रष्टाचार बंद झाला आणि वीज निर्मिती वाढली ही परिस्थिती सत्य आहे काय?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी सांगितले की, कोल वॉशरी बंद केली हे चांगले झाले. काहींचे म्हणणे आहे की, कोल वॉशरी सुरु ठेवावी. वेगवेगळया प्रकारे जेवढे खोलामध्ये जाऊ तेवढे तो कोळसा कितीही उगाळला तरी काळाच निघणार आहे ही वस्तुस्थिती आहे. यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे. त्या पध्दतीने आम्हाला थोडा बहुत अनुभव आला आहे. महाजनको कंपनीचा आणि राज्याचा फायदा ज्यामध्ये असेल तशाच प्रकारचा निर्णय ऊर्जा विभागामार्फत निश्चितपणे घेतला जाईल.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईमध्ये टीडीआर टीबीने तीन जणांचा मृत्यु झाल्याबाबत

(3) * 25543 श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.उल्हास पवार, श्री.मोहन जोशी, श्री. एस. क्यू. ज़मा, श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुभाष चव्हाण : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मुंबईत टीडीआर टीबीने आतापर्यंत तीन रुग्णांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक 17 जानेवारी, 2011 रोजी वा त्या सुमारास घडली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने सदर आजार तातडीने रोखण्यासाठी व पुढे भविष्यात अशा घटना घडू नयेत म्हणून खबरदारी घेण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, याप्रकरणी होत असलेल्या दिरंगाईची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (1) मुंबईमध्ये टी.डी.आर. टी.बी.चे रुग्ण आढळले नसून एक्स.डी.आर.टी.बी. चे 12 रुग्ण आढळले आहेत व त्यापैकी तीन रुग्णांचा मृत्यू झाला, हे खरे आहे.

(2) होय.

(3) तीनही रुग्णांचा मृत्यू एक्स.डी.आर.टी.बी.ने झालेला आहे. हे तिनही रुग्ण टी.बी.चा उपचार दोन वर्षापासून खाजगी डॉक्टर्सकडे घेत होते. सदरचे रुग्ण अनियमित औषधे घेत होते.

मुंबईतील हिंदूजा रुग्णालयास व शिवडी टी.बी. रुग्णालयास केंद्रशासनाच्या पथकाने भेट देऊन सर्व बाबींचा आढावा घेतला व हिंदूजा रुग्णालयातील 12 रुग्ण टी.डी.आर.टी.बी.चे नसून एक्स.डी.आर.टी.बी.चे असल्याचे स्पष्ट केले. सदर पथकाने लेखी अहवाल दिला नाही, मात्र या पथकाने खालील प्रमाणे कार्यवाही करण्याच्या तोंडी सूचना दिल्या आहेत.

- मुंबई शहरात सध्या क्षयरुग्णांसाठी 6 विभाग कार्यरत आहेत. त्याऐवजी प्रत्येक वार्डात 1 क्षयरोग अधिकारी नेमून 24 स्वतंत्र रिपोर्टिंग युनिटस् कार्यरत करावेत.
- या प्रत्येक युनिटमध्ये स्वतंत्र कार्यालय, स्वतंत्र औषधभांडार व अतिरिक्त कर्मचारी वर्ग द्यावा.
- मुंबई शहरात सध्या 27 टी.यू.कार्यरत आहेत त्याऐवजी एकूण 62 टी.यू.प्रस्तावित करावेत.
- क्षयरोग नियंत्रणासाठी उप कार्यकारी आरोग्य अधिकारी (Dy.Executive Health Officer) या संवर्गाचा 1 अधिकारी मुंबई क्षयरोग अधिकारी म्हणून नियुक्त करावा.
- मुंबई शहरातील क्षय रुग्णांसाठी टी.बी.हॉस्पीटल शिवडी मुंबई येथे आहे. त्यामध्ये सद्य:स्थितीत फक्त 44 खाटांची सुविधा आहे. या खाटांमध्ये वाढ करण्यात यावी,

केंद्रीय पथकाने दिलेल्या वरील सुचनांनुसार कार्यवाही सुरू आहे. याशिवाय राज्यशासनाने एक्स.डी.आर.औषधोपचार खरेदीसाठी रूपये 146.00 लक्ष व मुंबई येथील जनतेसाठी आरोग्य शिक्षणाचा विशेष कार्यक्रम राबविण्यासाठी रूपये 80.00 लक्ष निधी असा एकूण 226.00 लक्ष निधी मंजूर केला आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25543.....

श्री. जयप्रकाश छाजेड : महोदय, गेल्या काही दिवसांपासून राज्यात विशेषत: मुंबईत टीडीआर टीबी या आजाराचे रुग्ण सापडल्याची बातमी आल्यामुळे संपूर्ण राज्य तसेच देश पातळीवर खळबळ माजली आहे. या आजारामुळे मुंबईत तीन जण दगावले असून अशा प्रकारचा आजार आपल्या राज्यात असणे ही गंभीर बाब आहे. यासंदर्भात केंद्रीय पथक राज्यात आले व त्यांनी वेगवेगळ्या उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शिवडी येथे एक टी.बी. चे रुग्णालय आहे. हे रुग्णालय एका देणगीदाराने जागा देऊन टी.बी. रुग्णांसाठी रुग्णालय निर्माण केले आहे. या केंद्रीय समितीने सांगितले की, या रुग्णालयात आणखी खाटा वाढविल्या पाहिजे. त्या माध्यमातून एका खाजगी विकासकाला ट्रान्झिट कॅम्प बांधण्यास परवानगी दिली व त्यानुसार ते बांधकाम केले आहे. मागील अधिवेशनात सुध्दा हा प्रश्न विचारला होता की या ट्रान्झिट कॅम्पची मुदत रद्द करावी. यासंदर्भात कोर्टात सुध्दा प्रकरण गेले होते. ही मुदत मे 2012 पर्यंत संपत आहे. मी शासनाला अशी विनंती करतो की, महापालिकेने या ट्रान्झिट कॅम्पला मुदतवाढ न देता ती रद्द करावी असे आदेश शासन महापालिकेला देणार काय, आणि यासाठी ज्या ज्या उपाययोजना केंद्रीय समितीने सुचविल्या त्यासाठी शासन तरतूद करणार आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत महत्वाचा प्रश्न उपस्थित केला असून मुंबईत जो आजार आढळून आला त्यानुसार मी असे सांगू इच्छिते की, टीडीआर टीबी नावाचा असा कोणताही आजार आढळून आला नसल्याचे डब्ल्यूएचओ ने प्रमाणित केले आहे. त्याऐवजी एक्स्ट्रीम ड्रग्ज रेजिस्टन्समुळे अशा प्रकारचा स्ट्रेन माणसावर येतो आणि त्याच आजाराचे हे 12 रुग्ण आढळून आले आहेत. त्यातील तीन रुग्ण दगावले असून 7 रुग्णांवर उपचार सुरु आहे. ही बातमी वर्तमान पत्रातून दि. 16 जानेवारी, 2012 रोजी प्रसिध्द झाल्यानंतर तीन चार दिवसात लगेच केंद्रीय पथक पाहणीसाठी आले. हिंदुजा आणि जी.टी. हॉस्पिटलमध्ये या पथकाने भेटी दिल्या व यासाठी नवीन कोणकोणत्या उपाययोजना करता येतील अशा सूचना देखील या पथकाने दिल्या. या सूचनांची अंमलबजावणी शासनाने केली आहे. त्याचबरोबर जी.टी. हॉस्पिटलच्य बाबतीत त्यांनी काही सूचना केल्या. शिवडी येथे टी.बी. च्या रुग्णांवर उपचार होत असून हे हॉस्पिटल 1000 खाटांचे आहे, त्यात 200 खाटांची वाढ करावी असेही प्रस्तावित असून

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याचे एस्टीमेट आणि प्लॅन तयार आहेत. शासनाने या कामासाठी पैसेही दिलेले आहेत व हे काम लवकरात लवकर सुरु होईल, इतकेच मला सांगावयाचे आहे. त्याचबरोबर एक्सडीआर टी.बी. ची चाचणी करण्यासाठी आपण बंगळुरु येथे नमुने पाठविले. देशात अशा चाचण्या बंगळुरु, चेन्नई आणि दिल्ली येथे केल्या जातात. त्यानुसार आपण हे नमुने तपासणी करण्यासाठी पाठविले असून जे 12 रुग्ण आढळून आले त्यापैकी 3 दगावले असून उर्वरित रुग्णांवर मोफत उपचार सुरु आहेत.

डॉ. दीपक सावंत : महोदय, मंत्री महोदय डॉ. विजयकुमार गावित हे स्वत: डॉक्टर असल्याने त्यांनी या प्रश्नाकडे जास्त लक्ष दिले तर अधिकची मदत होईल असे मला सुचवावेसे वाटते. मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, टोटल ड्रग्ज रेजिस्टन्स नावाचा टीबीचा प्रकार नसून एक्स्ट्रीम ड्रग्ज रेजिस्टन्स नावाचा आजार आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25543 .....

डॉ. दीपक सावंत ....

यामध्ये लाईन ऑफ डिमार्केशन ही थीम आहे असे मी सांगतो. त्यामुळे टोटल ड्रग रेजिस्टन्स टीबी नाही यामध्ये आनंद वाटून घेण्याचे काहीही कारण नाही. टी.बी. संसर्ग जन्य रोग असून यासंदर्भात स्वत:ची तपासणी करण्यासाठी लोक तयार नसतात. आपल्याला टीबी झालेली आहे हे जर लोकांना समजले तर लोक आपल्याला वाळीत टाकतील अशी लोकांची भावना असते. त्यामुळे माझा पहिला प्रश्न असा आहे की, टीबीची औषधे राज्य शासन स्वस्त दरात उपलब्ध करुन देणार आहेत काय ? दुसरा प्रश्न असा आहे की, या रुग्णांना आयसोलेशनची गरज लागत असते. त्यामुळे या रुग्णांचे आयसोलेशन आपण कोठे करणार आहात ? आपल्याकडे औंधच्या हॉस्पिटलमध्ये यासंदर्भात उपचार केले जातात परंतु हे हॉस्पिटल बंद पडलेले आहे. मुंबईमध्ये अनेक ठिकाणी मुंबई महानगरपालिकेची हेल्थ टीबी क्लिनिकस आहेत. जसे आपण स्वाईन फ्ल्यूसाठी आयसोलेशन वॉर्ड तयार करतो तसेच वॉर्ड मुंबईमध्ये तयार केले जाणार आहेत काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, टीडीआर टीबीची तपासणी चेन्नई आणि बंगरुळू मध्ये केली जाते तशी तपासणी मुंबईत करण्यासाठी प्रयत्न केले जाणार काय?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी जे प्रश्न उपस्थित केले आहेत त्यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, टीडीआर टीबीचे उपचार खूप महाग आहेत. जर एमडीआरची ट्रिटमेंट करावयाची असेल तर त्यासाठी 2 लाख रुपये खर्च लागतो व एचडीआरच्या ट्रिटमेंटसाठी 5 लक्ष रुपये खर्च लागत असतो. यासंदर्भातील उपचार महाग असल्यामुळेच या रोगावर उपचार केले जात नाहीत. औषधांच्या किंमती कमी करण्याच्या संदर्भात शासनाची काही योजना नाही परंतु जेथे जेथे अशा प्रकारचे रुग्ण आढळून येतील त्यांच्यावर शासनामार्फत मोफत उपचार करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. मुंबईमध्ये यासंदर्भात वित्त विभागाने 1.43 कोटी रुपये औषधांसाठी व मास्कसाठी व 80 लक्ष रुपये या रोगाच्या प्रसार व प्रसारासाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.

सभापती महोदय, आयसोलेशन वॉर्डच्या संदर्भात मी सांगू इच्छिते की, ॲक्यूट रुग्णांसाठी आयसोलेशन वॉर्ड असतो. मुंबईमध्ये आयसोलेशन आहे परंतु जेथे आयसोलेशन वॉर्ड नसेल व त्या ठिकाणी अशा प्रकारचे रुग्ण आढळले तर त्यासंदर्भात निश्चितपणे विचार होईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छिते. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड व सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या प्रश्नाच्या संदर्भात मूलभूत मुद्दे उपस्थित केलेले आहेत. ट्रान्झीट कॅम्पला 1 मे पर्यंत मुदत देण्यात आली होती त्यामुळे ट्रान्झीट कॅम्पची 1 मे ची मुदत रद्द होणार आहे काय यासंदर्भात जो प्रश्न उपस्थित करण्यात आला होता त्याला उत्तर दिले गेले नाही त्यामुळे यासंदर्भात माननीय मंत्रीमहोदयांनी माहिती द्यावी अशी विनंती आहे. मला असे विचारावयाचे आहे की, केंद्रीय पथकाने तोंडी सूचना दिल्या होत्या त्यामुळे त्यांच्याकडून लेखी सूचना का घेतल्या गेल्या नाहीत ? केंद्रीय पथकाच्या तोंडी सूचनेवरून नवीन टीबीच्या संदर्भात जी काही कार्यवाही करण्यात आलेली आहे त्याचा उल्लेख करण्यात आलेला आहे त्यामुळे या संदर्भात केंद्रीय पथकाचे लेखी मार्गदर्शन का आले नाही ? केंद्रीय पथकाच्या तोंडी सूचनेमुळे लोकांच्या मनात शंका बळावते त्यामुळे यासंदर्भात शासनाची नेमकी काय भूमिका आहे ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, खाटा वाढविण्या संबंधीच्या प्रस्तावाचा उल्लेख मी पूर्वीच केला आहे. त्या ब्लॉकमध्येच काम आहे. ते काम लगेच सुरू होईल. असे मी अगोदरच सांगितले आहे. त्यासाठी जे काही करावे लागेल ते शासन करेल. दुसरा प्रश्न तोंडी आदेश दिले पण लेखी दिले नाहीत असा आहे. आदेश तोंडी असो वा लेखी त्यावर कारवाई केली आहे. ते केंद्र शासनाचे पथक आहे. त्यांनी काय केले,काय केले नाही हे मी सांगू शकत नाही. पण राज्य शासनाने काय उपाययोजना केली ते मी येथे सांगत आहे. मुंबईतील सहा वॉर्डमध्ये सहा विभाग होते ते 24 करण्यात आले. तसेच 24 टी.बी.ऑफिसर्स नेमण्यात आले. 24 रिपोर्टींग युनिटस् करण्यात आले. 27 ट्रीटमेंट युनिट आहेत ते 62 करण्याची प्रक्रिया सुरू आहे. टी.बी.निर्मूलनासाठी मुंबईत डेप्युटी हेल्थ एक्झिक्युटीव्ह ऑफिसर नेमण्यात आला आहे. मला येथे उपाययोजना सांगावीच लागेल. यात अजिबात संदिग्धता नाही.

सभापती : हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. या प्रश्नाला जे उत्तर अपेक्षित होते ते माननीय राज्यमंत्र्यांकडून आलेले नाही, अशी सन्माननीय सदस्यांची भावना आहे. त्यामुळे हा प्रश्न राखून न ठेवता माननीय मंत्र्यांच्या दालनात या प्रश्नासंबंधी चर्चा सविस्तर करण्यासंबंधीची सूचना मी करीत आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांकडे माहिती नाही. केंद्र सरकारच्या हेल्थ डिपार्टमेंटच्या वेब साईटवर अशी माहिती आहे की, "Central team submits Report on Drug Resistant Tuberculosis cases of Mumbai." या संबंधीचा रिपोर्ट आहे. तो संपूर्ण रिपोर्ट माझ्याकडे आहे. तो आपल्याकडे कसा नाही ? राज्य सरकारने काय काय केले पाहिजेत या संबंधातील 25 मुद्दे आहेत. असे असताना माननीय राज्य मंत्री माहिती नाही असे म्हणत आहेत.

(दोन्ही बाजूकडील माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : माननीय राज्य मंत्री महोदया आपण उत्तर द्यावे.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मला विभागाने दिलेल्या माहिती नुसार अहवाल प्राप्त झालेला नाही. तो केंद्र शासनाकडून मागविण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : मी सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, आपण सन्माननीय सदस्य असताना ज्या पद्धतीने माझ्याकडे पत्रे देत होतात तशीच पत्रे आता विरोधी पक्ष नेता या नात्याने मला द्यावीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्याकडे कागदपत्र दिलेली आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय राज्य मंत्री सभागृहाची दिशाभूल करीत आहेत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी सर्व कागदपत्रे आपल्याकडे दिलेली आहेत.

सभापती : मी या बाबतीत निर्णय घेतलेला आहे. सामान्य माणसाच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आहे. तो टी.बी.या आजाराशी संबंधित आहे. आपण सर्वजण पोटतिडिकीने या प्रश्नाला उत्तर कसे मिळेल यासाठी प्रयत्न करीत आहात. मी अशी सूचना केली की, या बाबतीत माननीय आरोग्य मंत्र्यांनी त्यांच्या दालनात आपल्या सर्वांची एक बैठक घ्यावी. त्यामध्ये यावर सविस्तर चर्चा होईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या संबंधातील जी कागदपत्रे माझ्याकडे दिलेली आहेत ती देखील मी माननीय आरोग्य मंत्र्यांकडे पाठवितो व त्या संबंधातील अहवाल देखील घेतो.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती . . . .

आता आजच्या प्रश्नपत्रिकेतील अनु.क्र.4 वरील ता.प्र.क्र. 25067 चर्चेसाठी घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मघाशी माझ्या नावाचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे मला एक मिनिट बोलावयास द्यावे.

सभापती : मी आता पुढील प्रश्न पुकारलेला आहे. प्लीज.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी नम्रपणे एवढेच सांगू इच्छितो की, अगोदर जी सर्व प्रश्नोत्तरे सुरु होती, त्यावेळी मी काहीही बोललो नाही. कारण मी काय चालले आहे ते सगळे पहात होतो. पण जेव्हा माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, आमच्याकडे रिपोर्ट नाही आणि असला काय किंवा नसला काय, त्याने फरक काय पडतो ? मग मी चिडलो.

सभापती : मी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, असे चिडावयाचे नसते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याठिकाणी सरकार एवढ्या बेजबाबदारपणे, उत्तर कसे देत आहे ? हे सरकार हलगर्जी आहे म्हणून आम्ही याचा निषेध करुन सभात्याग करतो.

सभापती : आता सन्माननीय विरोधी पक्षनेते त्यांच्या वक्तव्यामध्ये "हलगर्जी" शब्दाचा उल्लेख झाला असून, मी "हलगर्जी" हा शब्द सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकत आहे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

सभापती : जर दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागले तर . . ..

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सरकार या विषयाच्या बाबतीत निष्काळजी आहे याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करतो.

(यानंतर विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य सभात्याग करतात.)

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते की, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांकडून आमच्या वेगळया अपेक्षा आहेत, त्यांनी या सदनामध्ये खऱ्या अर्थाने मार्गदर्शन करावयास पाहिजे. पण मला राग कसा आला यावरच ते सर्व रामायण घडवित आहेत. सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय तसे काही म्हणाल्या नाहीत, तुम्ही रेकॉर्ड तपासून पहावे. त्यांनी असे सांगितले की, ही बाब गंभीर आहे आणि जरी तोंडी सूचना आल्या तरी सुध्दा शासनाने त्यावर कार्यवाही केलेली आहे.परंतु त्याचा वेगळा अर्थ लावून जर अशा पध्दतीने सदनाचे कामकाज थांबत असेल तर ते योग्य नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25543 . . . .

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, मुंबई शहर में इन्फेक्शन के बारे में यह बहुत सेन्सिटिव और रेअर इश्यू है. माननीय मंत्री महोदया इस बारे में विस्तार से बता रहीं थीं. मेरा पॉइन्ट ऑफ ऑर्डर यह है कि जब शासन की ओर से मंत्री जी बोल रहीं हैं, उन्होंने अपना उत्तर पूरा नहीं किया है. उन्होंने इस बात से मना नहीं किया कि उनके पास इन्फोर्मेशन नहीं है. मंत्री महोदया की पूरी बात सुने बिना माननीय विरोधी पक्ष नेता बीच में खड़े हो गए. केन्द्रीय सरकार के इन्सट्रक्शन के बारे में उन्होंने कुछ डेटा निकाला है और वह डेटा काम का हो सकता है. लेकिन मेरा कहना यह है कि जब तक मंत्री जी का जबाब पूरा नहीं हो जाता है, तब तक माननीय विरोधी पक्ष के नेता द्वारा बीच में खड़े होकर रिएक्ट करने अथवा मंत्री महोदया को बोलने से रोकने की प्रथा नहीं होनी चाहिए.

सभापती : ठीक आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, ...

सभापती : मी आता कोणालाही बोलण्यासाठी परवानगी देणार नाही.

. . . .डब्ल्यू-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोल्हापूर शहरातील सी.पी.आर. रुग्णालयात होत असलेल्या गैरकारभाराबाबत

(4) *25067 श्री.भगवान साळुंखे,श्री.चंद्रकांत पाटील,श्री.रामनाथ मोते, श्री.नागो पुंडलिक गाणार डॉ.रणजित पाटील,श्री.मोहन जोशी,श्री.राजन तेली,श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.एम.एम.शेख : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोल्हापूर शहरातील सी.पी.आर. रुग्णालयात मृतदेहाची आदलाबदल करणे, पोस्टमॉर्टम करणे, मृतदेह ताब्यात देणे यासाठी पैशाची मागणी करणे, प्रसुती गृहात नवजात अर्भकाची अदलाबदल करणे, अर्भक गायब केले जाणे, गर्भतपासणीची कागदपत्रे गायब करणे, श्रीमती सुरेखा राऊत या गरीब गर्भवतीचा प्रसूती गृहाच्या शौचालयात मृतदेह सापडणे या आणि अशा अनेक घटनांनी सी.पी.आर रुग्णालयाबाबत जनतेत असंतोष निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर रुग्णालयातील कर्मचाऱ्यांची कसून चौकशी केली आहे काय, असल्यास त्यात काय आढळून आले,

(3) असल्यास, शासनाने वरील प्रकरणी दोषीं असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : (1) श्रीमती सुरेखा राऊत, ही महिला रुग्ण प्रसुती कक्ष विभागातील शौचालयात मृत अवस्थेत आढळून आली हे खरे असले तरी अन्य बाबींच्या घटना निदर्शनास आल्या नाहीत.

(2) व (3) घडलेल्या प्रकरणाबाबत रुग्णालय प्रशासनामार्फत चौकशी करण्यात आली असून, सदर रुग्णाचा मृत्यू प्लिहा फुटल्यामुळे पोटात रक्तस्त्राव होवून (Haemarragic shock due to spleenic rupture) झाला असे चौकशी मध्ये आढळून आले आहे. सदर मृत्यू अपघाती असल्यामुळे कोणावरही कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, कोल्हापूर शहरातील सी.पी.आर.हॉस्पिटलमध्ये 10 वर्षापूर्वी मिळणारी सेवा चांगली होती. पण त्यानंतर गेल्या 10 वर्षामध्ये या सेवेची गुणवत्ता एवढी ढासळलेली आहे की तेथे येणाऱ्या रुग्णांना मोफत सेवा देणे सोडूनच द्या पण प्रत्येक ठिकाणी एन-कॅशमेंट कशी करावयाची हे पाहिले जाते. उदाहरण द्यावयाचे तर एखादी डेड बॉडी ताब्यात द्यावयाची असेल किंवा पोस्टमार्टम करावयाचे असेल किंवा एखाद्या मेडिकलच्या बिलावर सही करावयाची असली तरी एन-कॅशमेंट असा प्रकार सुरु आहे. तसेच त्या हॉस्पिटलमध्ये जी उपकरणे आहेत, त्यापैकी फार थोडी उपकरणे चालू स्थितीत आहेत परंतु ती सुध्दा चांगल्या प्रकारे चालत नाहीत. त्याचप्रमाणे जी उपकरणे बंद पडलेली आहेत ती पुन्हा नव्याने सुरु करण्याकडे संबंधितांचा कल नाही. तेथे जे डॉक्टर्स् आहेत ते स्वत:च्या प्रायव्हेट प्रॅक्टीसमध्येच गुंतलेले आहेत. तसेच त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे . . .

ठिकाणी असलेला कर्मचारी वर्ग तेथे येणाऱ्या लोकांशी अत्यंत उर्मटपणे वागत आहे.त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी थोडक्यात प्रश्न विचारावा.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, या रुग्णालयामध्ये आलेल्या एका गर्भवती महिलेचा शौचालयामध्ये मृत्यू झाल्यानंतर त्याची जी चौकशी करण्यात आल्यानंतर त्यासंबंधात याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी लेखी स्वरुपामध्ये असे उत्तर दिलेले आहे की,"सदर रुग्णाचा मृत्यू प्लिहा फुटल्यामुळे पोटात रक्तस्त्राव होऊन झाला." याबाबत असा प्रश्न आहे की, याबाबतीत बाहेरील यंत्रणेकडून चौकशी केली जाणार आहे काय, तसेच तेथील उपकरणांची गुणवत्ता ढासळली असून तेथे गैरप्रकार सुरु आहेत त्याचीही बाह्य यंत्रणेमार्फत चौकशी केली जाणार आहे काय आणि संबंधित दोषींवर कारवाई केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या गोष्टींचा उल्लेख केला त्या बाबत आमच्याकडे तोंडी वा लेखी तक्रारी आलेल्या नाहीत. सन्माननीय सदस्यांनी स्पेसिफीक तक्रार दिल्यास त्या बाबत चौकशी करण्यात येईल. ज्या गभर्वती महिलेचा शौचालयात पडून मृत्यू झाला होता त्या घटनेची चौकशी विभागाच्या प्रमुखांनी केलेली आहे. सन्माननीय सदस्यांची मागणी असेल तर बाहेरील अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा गंभीर प्रश्न आहे. पोस्टमार्टेमसाठी पैसे घेतले असे कोण कबूल करेल ? सदरहू रुग्णालयात लहान बालकाची अदलाबदल केली गेली अशा केसेस घडल्या आहेत. या घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत. ही घटना फक्त एकच वेळ घडली असे नाही. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला आणि मंत्री महोदयांनी फक्त विभागाने दिलेले उत्तर द्यायचे असे होऊ नये. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची बाहेरील अधिका-यामार्फत चौकशी करुन जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, रुग्णालयात लहान बालके बदलली गेली अशा तक्रारी असतील तर त्याची निश्चितपणे चौकशी करण्यात येऊन त्यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. सन्माननीय सदस्य सर्वश्री.भगवान साळुंखे व भाई जगताप यांनी सांगितल्याप्रमाणे अन्य डॉक्टरांमार्फत चौकशी केली जाईल आणि या मध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आमच्याकडे तक्रारी आल्या नाहीत. मी आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्या ठिकाणी गभर्वती महिलेचा मृत्यू होण्यापूर्वी एक महिना अगोदर एका महिलेचा लिफ्टमध्ये मृतदेह सापडला होता. याचा अर्थ आम्ही जे प्रश्न विचारतो त्या बाबतच सरकार उत्तर देते. अन्य माहिती देत नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाकडून हा विभाग आता वैद्यकीय शिक्षण विभागाकडे आल्यानंतर त्याची दूरवस्था झालेली आहे. ज्या तरतुदी करणे आवश्यक होत्या त्या तरतूदी करण्यात आलेल्या नाहीत. प्रसृती कक्षासाठी आवश्यक असलेला स्टाफ तेथे नाही. या रुग्णालयास आवश्यक तो कर्मचारी वर्ग न दिल्यामुळे असे प्रश्न निर्माण होत आहेत काय, असल्यास तेथील कर्मचारी वर्ग वाढविणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25067....

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, त्या ठिकाणी मेडिकल कॉलेज सुरु करीत असताना काही विभागांना मंजुरी नसताना ते विभाग सुरु आहेत. मेडिकल कौन्सिल ऑफ इंडिया आणि नर्सिक कौन्सिल प्रमाणे पदे निर्माण झालेली नव्हती. परंतु आता ती पदे निर्माण केलेली आहेत. ही पदे निश्चितपणे भरली जातील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, कोल्हापूर येथील सी.आर.पी रुग्णायात एका गर्भवती महिलेचा शौचालयात मृतदेह सापडल्यानंतर मी त्या ठिकाणी स्वत: भेट देण्यास गेलो होतो. सदरहू रुग्णालय हे 665 बेडस्चे आहे. परंतु त्या प्रमाणात त्यांच्याकडे कर्मचारी वर्ग नाही आणि जी मंजूर पदे आहेत ती भरलेली नाहीत. त्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांची बाजू वाजवी आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रात कोणाही रुग्णास दाखल करुन घेतले जात नाही, त्यामुळे सर्व भार हा शहरातील रुग्णालयांवर येत आहे हा खरा प्रश्न आहे. आपण कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र नीट करीत नाहीत तोपर्यंत हा भार कमी होणार नाही. कारण गावात सर्पदंश झाल्यास त्याला प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये न नेता शहरातील रुग्णालयात आणले जाते. अशा प्रकारांमुळे शहरातील रुग्णालयावर भार येत आहे आणि त्या ठिकाणी आवश्यक तेवढा स्टाफ नाही. आमच्याकडे पुरेसा स्टाफ नाही असे निवेदन तेथील कर्मचाऱ्यांनी विभाग प्रमुखांना आणि माननीय मंत्री महोदयांना चार वेळा दिलेले आहे. त्या निवेदनाच्या प्रती माझ्याजवळ आहेत.

सभापती महोदय, या ठिकाणी दोन गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. पहिली गोष्ट म्हणजे त्या रुग्णालयात आता किती स्टाफ कार्यरत आहे आणि अजून किती स्टाफची आवश्यकता आहे याचा सर्व्हे केला जाईल काय ? दुसरी बाब म्हणजे त्या गरोदर महिलेचा शौचालयात पडून मृत्यू झाला. त्या बाबत तेथील कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की, आमच्याकडे इतका कमी स्टाफ आहे की, आम्ही प्रत्येक रुग्णा सोबत जाऊ शकत नाही. आमच्याकडे वॉडबॉय आणि आया नाहीत. तेव्हा आम्ही रुग्णाच्या नातेवाईकांना त्यांच्या सोबत जाण्यास सांगतो. त्या महिलेचा नवरा काही आणण्याकरिता रुग्णालयाच्या बाहेर गेला होता आणि त्याच वेळी ती महिला एकटी शौचालयात गेली आणि ती दुर्दैवी घटना घडली. तेव्हा तेथे आवश्यक स्टाफ भरणार काय ? दुसरे म्हणजे या ठिक्राणी सन्माननीय सदस्य सर्वश्री भगवान साळुंखे आणि भाई जगताप यांनी सांगितल्या प्रमाणे

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25067....

श्री.विनोद तावडे.....

तेथील काही कर्मचाऱ्यांमध्ये पैसे खाण्याची वृत्ती आहे तेव्हा याबाबत तेथील विभाग प्रमुखांना जबाबदार धरणार काय आणि या संदर्भात तक्रार करण्यासाठी कोणती व्यवस्था निर्माण करणार आहात ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, मी सुरुवातीला सांगितले की, त्या रुग्णालयात टिचिंग स्टाफसाठी जी पदे निर्माण करायची होती त्याला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर ती पदे भरण्यात येतील. अन्य पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत, त्याची प्रक्रिया सुरु आहे.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25067... . .

डॉ. विजयकुमार गावित....

तसेच बाकीची प्रमोशनने पदे भरावयाची आहेत ती प्रक्रिया चालू आहे त्याप्रमाणे ती पदे भरण्यात येतील. बाकीची पदे एमपीएससीमार्फत भरावयाची आहेत. त्यामुळे ॲडहॉक बेसिसवर पदे देण्याची व्यवस्था करण्यात येईल. त्याचबरोबर नर्सिंगची जी पदे भरावयाची आहेत ती सर्व पदे एक ते दीड महिन्यात भरण्यात येतील. अशा पध्दतीने त्या ठिकाणी स्टाफ उपलब्ध करुन देण्यात येईल. ही गोष्ट खरी आहे की, त्या ठिकाणी मोठया प्रमाणात आजूबाजूचे लोक येतात. त्यामुळे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या मंत्री महादयांना विनंती करण्यात येईल आणि आजूबाजूला ग्रामीण रुग्णालये असतील तर त्या ठिकाणी तशा पध्दतीची व्यवस्था करण्यात येईल जेणेकरुन गैरसोय होणार नाही याची काळजी निश्चितपणाने घेतली जाईल. या ठिकाणी बरेचसे गंभीर आरोप करण्यात आलेले आहेत त्या संदर्भात चौकशी करण्यात येईल आणि दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. सभापती महोदय, एक गोष्ट खरी आहे की, वॉर्डमध्ये रुग्ण आल्यानंतर सर्वसाधारणपणे जे रुग्ण सीरियस असतात त्या सीरियस रुग्णांना घेऊन जाणे वगैरे बाकीच्या गोष्टी तेथील स्टाफ करीत असतो. ज्या रुग्णाला मदतीची गरज आहे त्यांनी तसे सांगितले तर त्यांना मदत करण्यात येते. पण दुर्दैवाने या ठिकाणी सदर गर्भवती महिला स्वत: गेली आणि पडली त्यामुळे ही दुर्दैवी घटना घडलेली आहे.

श्री. संजय पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी जो प्रश्न विचारलला आहे तो अतिशय महत्वाचा प्रश्न आहे. समाजाच्या दृष्टीने ज्या अडचणी उभ्या राहिलेल्या आहेत त्या संदर्भातील हा प्रश्न आहे. सुदैवाने माननीय मंत्री महोदय, स्वत: उच्च शिक्षित डॉक्टर आहेत, त्यांनी सांगली या गावामध्ये काही दिवस सर्व्हिस केलेली आहे. मूळ प्रश्न असा आहे की, भ्रष्टाचार करण्याची भूमिका कुठल्या ठिकाणी निर्माण होते? सांगली शहरातील सिव्हिल रुग्णालयासारख्या ठिकाणी बऱ्याचवेळा असे प्रसंग घडलेले आहेत त्या संदर्भात अनेक तक्रारी आलेल्या आहेत. माझा प्रश्न असा आहे की, कटिंग प्रॅक्टिस ज्याला आपण म्हणतो हा समाजाच्या दृष्टीने महत्वाचा प्रश्न आहे. या बाबतीत सार्वजनिक आरोग्य विभागाने व वैद्यकीय शिक्षण विभागाने महत्वाची भूमिका घेण्याची गरज आहे. या सर्व भूमिकेवर नियंत्रण ठेवण्यासाठी किंवा त्यांनी केलेल्या चुका किंवा भ्रष्टाचार असेल तर या संदर्भात लवकरात लवकर कारवाई केली पाहिजे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25067....

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ॲडमिनिस्ट्रेशनच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. म्हणून ॲडमिनिस्ट्रेशनचा वेगळा विभाग सुरु करण्यात येत आहे. त्यामुळे निश्चितपणाने अशा प्रकारे काही कमी-जास्त झाले तर संबंधितांना जबाबदार धरता येईल. हे सर्व व्यवस्थित व्हावे म्हणूनच ॲडमिनिस्ट्रेशनचा वेगळा विभाग सुरु करण्यात येत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने लोकांची फार मोठी समस्या ऐरणीवर आलेली आहे. कोल्हापूरच्या सी.पी.आर. रुग्णालयात जे घडले ते एका चॅनलवर काही दिवसांपूर्वी दाखविण्यात आले होते त्याचबरोबर या रुग्णालयाची कशी दुर्दशा आहे हे देखील दाखविण्यात आले होते. सभापती महोदय, या निमित्ताने मला आणखी एका महत्वाच्या प्रश्नाकडे लक्ष वेधावयाचे आहे. मुंबई महानगरपालिकेच्या तसेच शासकीय रुग्णालयात मृतदेह पोस्टमॉर्टेमसाठी येतात तेव्हा ते मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यासाठी नातेवाईकांकडे पैसे मागितले जातात. या मृतदेहांची दुर्दशा अशी असते की, काही वेळा हे मृतदेह घुशींनी उंदरांनी खाल्लेल्या अवस्थेत असतात. नातेवाईक खूप दु:खात असतात तरी देखील त्यांना मृतदेह वेळेवर ताब्यात मिळत नाहीत त्यांच्याकडे पैसे मागितले जातात. ही दुर्दशा या ठिकाणी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. या रुग्णालयात यासंबंधात जो संबंधित स्टाफ आहे त्यांच्यावर अंकुश ठेवण्यात येणार आहे का आणि ही दुर्दशा बदलणार आहे का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, पोस्टमॉर्टेम झाल्याबरोबर नातेवाईकांना लगेच मृतदेह दिले जातील आणि अशा पध्दतीने कोणी पैसे मागत असतील तर त्याची गंभीर दखल घेऊन त्यांच्यावर कारवाई केली जाईल.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

राज्याच्या ग्रामीण भागातील मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असल्याबाबत

(५) * २५२०३ *श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , डॉ.रणजित पाटील* : सन्माननीय ***सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या ग्रामीण भागातील मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असल्याचे सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पाहणीत दिनांक १९ सप्टेंबर, २०११ रोजी स्पष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उस्मानाबाद, कोल्हापूर, सातारा या महत्त्वाच्या जिल्ह्यांमध्ये मुलींमध्ये ७ ग्रॅमपेक्षा कमी हिमोग्लोबीनचे प्रमाण आढळले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलींमध्ये १० ते ११ ग्रॅम हिमोग्लोबीनचे प्रमाण असावे यासाठी शासनाने आरोग्य विभागामार्फत मोहिम आखली होती, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, हिमोग्लोबीनचे घटते प्रमाण चिंतेची बाब असून या मोहिमेद्वारे कोणते निष्कर्ष समोर आले व त्याकरीता शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.सुरेश शेट्टी यांच्याकरिता : (१) हे अंशत: खरे आहे.

राज्यातील ग्रामीण भागातील एकूण तपासणी केलेल्या काही मुलींमधील हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असल्याचे माहे सप्टेंबर अखेर केलेल्या पाहणीत स्पष्ट झाले आहे.

(२) हे अशंत: खरे आहे.

उस्मानाबाद, कोल्हापूर, सातारा या जिल्ह्यातील ग्रामीण भागातील माहे सप्टेंबर, २०११ अखेर केलेल्या तपासणीत ३.८३% मुलींमध्ये हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले आहे.

(३) होय.

(४) आहाराविषयी अज्ञान, समतोल व सकस आहाराचा अभाव, आहारामध्ये लोहयुक्त अन्न घटकाची कमतरता, नव्याने सुरु झालेल्या मासिक पाळीमध्ये होणारा रक्तस्त्राव, वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव ही मुलींच्या हिमोग्लोबीनमध्ये घट होण्याची सर्वसाधारण कारणे आहेत.

राज्यातील सर्व शासकीय दवाखान्यामध्ये व ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या कार्यक्षेत्रामध्ये तपासणीत हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळलेल्या मुलींना केंद्र पुरस्कृत सबला (राजीव गांधी किशोरवयीन मुलींचे सक्षमीकरण) योजने अंतर्गत किशोरवयीन मुलींना जंतनाशक औषध व लोहयुक्त गोळ्या देऊन उपचार करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, हा किशोरवयीन मुलींच्या सबलीकरणासंबंधीचा खूप महत्वाचा प्रश्न आहे. प्रामुख्याने महाराष्ट्रामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाने शाळा आणि कॉलेजेसमधून मुलींचा जो काही सर्व्हे केला त्यावेळी असे लक्षात आले की, 10 ते 11 ग्रॅम हिमोग्लोबीन असले पाहिजे पण बऱ्याच जिल्ह्यात काही हजार मुलींमध्ये 7 ग्रॅम पेक्षा कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हिमोग्लोबीन असल्याचे दिसून आले. या संदर्भात प्रश्नाला उत्तर देताना 'हे अंशत: खरे आहे' असे उत्तर दिलेले आहे. 3.83 टक्के मुलींमध्ये हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असल्याचे आढळून आले असे म्हटले आहे. त्या संदर्भात जी उपाययोजना केली जाते त्या बाबतीत मला दोन प्रश्न विचारावयाचे आहेत. अशा मुलींचे प्रमाण खूप मोठे आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर असलेल्या अशा मुलींनी शासनाच्या एखाद्या हॉस्पिटलमध्ये जाऊन ट्रिटमेंट घेणे याला मर्यादा आहेत. त्यामुळे मध्यान्ह भोजनासाखी त्या त्या शाळेमध्ये अशा प्रकारच्या ट्रिटमेंटची व्यवस्था करणार का ? हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असणाऱ्या ज्या काही हजार मुली लक्षात आलेल्या आहेत त्यांना जी ट्रिटमेंट देतो त्यातून हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढत आहे याचे मॉनिटरींग करण्याची व्यवस्था आहे का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, जर हिमोग्लोबीन कमी आहे असे वाटले तर राज्यामध्ये आपली जी जिल्हा, उपजिल्हा आणि ग्रामीण रुग्णालये आहेत त्या प्रत्येक ठिकाणी त्याची चाचणी करण्यात येते आणि त्यांना लोहयुक्त गोळ्या आणि डीवर्मीन्गसाठी गोळ्या देण्यात येतात. 1 एप्रिल, 2010 ते 31 मार्च, 2011 या कालावधीत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागामध्ये मुलींच्या हिमोग्लोबीनची चाचणी करण्यात आली. त्यामध्ये 31 लाख 79 हजार 329 मुलींची चाचणी करण्यात आली. त्यातील 2 लाख 33 हजार 744 म्हणजे साडेसात टक्के मुलींमध्ये 7 ग्रॅम पेक्षा कमी हिमोग्लोबीन आढळून आले. तसेच 16 लाख 48 हजार 76 म्हणजे 51 टक्के मुलींमध्ये 7 ते 10 ग्रॅम हिमोग्लोबीन आढळून आले. त्यानंतर 1 एप्रिल, 2011 ते 31 ऑगस्ट, 2011 या कालावधीत चाचणी घेण्यात आली. त्यामध्ये 12 लाख 3 हजार 880 मुलींची चाचणी घेण्यात आली. त्यापैकी 71 हजार 407 म्हणजे 5.9 टक्के मुलींमध्ये 7 ग्रॅमपेक्षा कमी हिमोग्लोबीन आढळून आले. तसेच 6 लाख 97 हजार 391 मुलींमध्ये 7 ते 10 ग्रॅम हिलोग्लोबीन आढळून आले. हे प्रमाण 53.4 टक्के आहे. ज्यांचे हिमोग्लोबीन 7 ग्रॅमपेक्षा कमी आहे त्या सर्व मुलींना आठवड्यातून दोन वेळा लोहयुक्त गोळ्या आणि डीवर्मीन्गच्या गोळ्या अशा पध्दतीने एक वर्षाची ट्रिटमेंट देत आहोत आणि ज्या मुलींमध्ये 7 ते 10 ग्रॅम हिमोग्लोबीन असेल तर त्यांना एक वर्षासाठी आठवड्यातून एकदा याच पध्दतीची ट्रिटमेंट देण्यात येते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ता. प्र. क्र. 25203 .....

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हा हिमोग्लोबीनचा प्रश्न महत्वाचा आहे. ही चाचणी आरोग्य केंद्रात जाऊनच केली पाहिजे त्या ऐवजी शाळांमधील आरोग्य तपासणीमध्ये जर त्याचा अंतर्भाव केला गेला आणि शाळांमध्ये तपासणी झाल्यानंतर ज्याला आपण पॅरामेडिकल म्हणतो अशा प्रकारच्या प्रशिक्षित पॅरॉमेडिकल लोकांकडून शाळांमध्ये या बाबतीत वारंवार जाऊन तपासणी केली पाहिजे. कारण वर्षातून एकदा जाऊन तपासणी करुन हा प्रश्न सुटणार नाही. वारंवार त्यामध्ये काय प्रगती होते याचा फॉलोअप घेणे अशा पध्दतीची जर रचना आपण केली तर ते योग्य होईल. आरोग्य खात्यामार्फत ते निश्चित करता येऊ शकते. शाळेचे जे कोणी संचालक किंवा मुख्याध्यापक असतील त्यांना विश्वासात घेऊन हे करता येईल. हा प्रश्न खरोखरच सोडवावयाचा असेल तर आपण करीत असलेल्या उपाययोजनांमध्ये अधिकची काही तरी भर घालण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शासन प्रयत्न करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, शासनाच्या शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते. त्यामध्ये ही तपासणी सुध्दा करण्यात येत आहे. यासाठी केंद्राच्या महिला व बालकल्याण विभागाच्या माध्यमातून 'सबला योजना' ही नवीन योजना 11 जिल्ह्यांकरिता सुरु करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25203..... प्रा.फौजिया खान....

जेथे किशोरवयीन मुली आहेत त्यांच्या आहारासाठी, त्यांचे पूर्ण सक्षमीकरण करण्यासाठी ही योजना राज्यात नव्याने सुरु करण्यात आलेली आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मुळामध्ये शाळांमध्ये मुलींच्या तपासण्या झाल्या त्यावेळी त्या मुलींपैकी अनेक मुलींना रक्तक्षय झाल्याचे आढळून आलेले आहे. ही संख्या खूप मोठी आहे. शाळांमध्ये तपासलेल्या मुलींचे हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासनाने विशेष कार्यक्रम राबविलेला नाही. प्राथमिक शाळा असेल, माध्यमिक शाळा असेल त्या ठिकाणी डॉक्टरांनी तपासणी केल्यानंतर रक्तक्षय असलेली मुले व मुली आढळतात. म्हणून या मुलांमधील रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासाठी शासन शाळांमधून विशेष कार्यक्रम राबविणार आहे काय आणि त्यांना योग्य त्या गोळ्या दिल्या जातील काय ? प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये मुली रक्त तपासणीसाठी जात नाहीत.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, मी या प्रश्नाचे आताच उत्तर दिलेले आहे. स्कूल हेल्थ प्रोग्रॅमच्या माध्यमातून मुलींची आरोग्य तपासणी करुन औषधोपचारही केले जातात.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आताच सांगितले की, स्कूल हेल्थ प्रोग्रॅमद्वारे मुलींची आरोग्य तपासणी केली जाते. परंतु माझी अशी माहिती आहे की, हा कार्यक्रम फक्त हेल्थ सेंटरवरच आयोजित केला जातो. शाळेतील किंवा वस्तीतील मुली या केंद्रांमध्ये तपासणीसाठी जात नाहीत. म्हणून दर 3 महिन्यांनी मुला-मुलींच्या चाचण्या केल्या जाणार आहेत काय, कारण ते सहज शक्य आहे. प्रत्येक माणसाला 11 टक्के हिमोग्लोबनची आवश्यकता असते. त्यापेक्षा हिमोग्लोबीन कमी असलेली मुले व मुलींसाठी शाळांच्या माध्यमातून हिमोग्लोबीन वाढविण्यासाठी औषधोपचार केला जाणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शालेय पोषण आहार योजनेंतर्गत मुला-मुलींच्या तपासण्या केल्या जातात. त्यांच्यामध्ये जर हिमोग्लोबीन कमी आढळून आले तर त्यांना आवश्यक त्या गोळ्या दिल्या जातात.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

<u>नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनांसंबंधी</u>

सभापती : आज माझ्याकडे एकूण 2 नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचना आलेल्या आहेत. त्यापैकी सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, डॉ.दीपक सावंत, डॉ.नीलम गोऱ्हे, श्री.परशुराम उपरकर यांनी प्रतापगडावरील अफझलखानाच्या समाधीच्या परिसरातील अनधिकृत बांधकाम तोडून टाकण्याचे मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असतानाही या समाधीच्या दुरुस्ती व डागडुजीचे काम सुरु केल्याबाबत पहिली सूचना दिली आहे. त्याचप्रमाणे सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, प्रीतमकुमार शेगांवकर, श्री.चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील यांनी याच विषयाबाबत दुसरी सूचना दिलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी सदर विषय नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या निकषामध्ये कसा बसतो हे सांगण्यासाठी 2-2 मिनिटांमध्ये आपले म्हणणे मांडावे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्याचा अवमान करणारी घटना सरकारकडून घडत असल्यामुळे सभागृहासमोरील कामकाज बाजूला ठेवून या विषयावर चर्चा घेण्यासाठी आम्ही तातडीने हा विषय मांडत आहोत. छत्रपती शिवाजी महाराजांनी अतुलनीय शौर्य गाजवून अफजलखानाचा कोथळा बाहेर काढला होता. जेथे त्याचा कोथळा काढण्यात आला त्या ठिकाणी अफझलखानाला गाडण्यात आले. त्या ठिकाणी थडगे बांधण्यात आले. या राज्यावर चालून आलेल्या शत्रूचे ते थडगे आहे. त्याचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न शासनाच्या माध्यमातून अनेकदा करण्यात आला आहे. अफझलखान हा महान संत होता असा देखावा निर्माण करुन संबंधितांनी त्याला दैवत्व देण्याचा प्रयत्न केला. या स्वराज्यावर चालून आलेल्या शत्रूवर शौर्य गाजवून छत्रपतींनी अफझलखानाचा जेथे कोथळा बाहेर काढला तेथेच त्याला गाडले आहे त्याचे उदात्तीकरण करण्याचा प्रयत्न होत आहे. त्यानंतर प्रतापगड उत्सव समितीचे कार्याध्यक्ष श्री.मिलिंद एकबोटे व इतर सर्वजण न्यायालयामध्ये गेले होते.

अशुद्धलिखित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

श्री. दिवाकर रावते...

तेथील बेकायदेशीर बांधकाम पाडून टाका असे न्यायालयाने सरकारला आदेश दिलेले आहेत. ज्यांच्या नावाने हे राज्य चालविता त्या छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्याचा कोथळा बाहेर काढला त्या अफझलखानाची भीती राज्यकर्त्यांना का वाटते ? शासन न्यायालयाच्या निर्देशाचेही पालन करीत नाही.

तेथील बांधकामाबाबत श्री. एकबोटे यांनी जिल्हाधिका-यांना निवेदन देऊन सांगितले की, न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान होत आहे. तेथील काम त्वरित थांबवावे. ही बाब अतिशय गंभीर आहे. या सदनामध्ये या बेकायदेशीर बांधकामाबात 7-8 वेळा चर्चा झालेली आहे. या सदनाचे माजी सन्माननीय सदस्य डॉ. अशोक मोडक देखील हा विषय येथे वारंवार मांडत होते. त्याबाबतीत शासना तर्फे त्यांना शब्द दिला जात होता. परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. ही अतिशय गंभीर बाब असून ज्याचा छत्रपती शिवाजी महाराजांनी कोतळा काढला त्या अफझलखानाच्या थडग्याच्या संदर्भात शासन काय करीत आहे हे महाराष्ट्रातील जनतेला समजावे म्हणून सभागृहाचे कामकाज थांबवून या विषयावर चर्चा करावी आणि थडग्याचे उदात्तीकरण थांबवावे यासाठी मी नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, आजचे सभागृहासमोरील कामकाज थांबवून एका गंभीर विषयाबाबत या सभागृहामध्ये चर्चा करण्यासाठी नियम 289च्या प्रस्तावाची जी सूचना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी दिलेली आहे तिचे समर्थन करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, अफझलखान या विषयावरुन महाराष्ट्रामध्ये अनेक वेळा वाद निर्माण झालेले आहेत, दंगली निर्माण झालेल्या आहेत. मुस्लिम बांधव देखील या अफझलखानाला नेता किंवा आदर्श व्यक्ती म्हणून मानत नाहीत. तरीही माणूस मेल्यानंतर भारतीय संस्कृतीनुसार त्याचे थडगे त्या ठिकाणी बांधण्यात आले. तेथील बांधकाम बेकायदेशीर आहे असा उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला आहे. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने देखील उच्च न्यायालयाचा आदेश कायम केला. आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करुन तेथे बांधकाम सुरु झालेले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. तेव्हा सभागृहापुढील सर्व कामकाज थांबवून या गंभीर विषयावर चर्चा करण्यासाठी आणि शासनाने याबाबतीत आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी मी नियम 289च्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : माझ्याकडे नियम 289अन्वये येणा-या प्रस्तावाच्या दोन सूचना आलेल्या आहेत. आजच्या कामकाजपत्रिकेमध्ये अशा पध्दतीचा कोणताही विषय नसल्यामुळे मी औपचारिकदृष्ट्या दोन्ही सूचना नाकारीत आहे. तथापि, या बाबतीत निवेदन करावे किंवा चर्चा करावी यासंदर्भातील माझा निर्णय मी राखून ठेवीत आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>सभागृहापुढील कामकाजासंबधी</u>

सभापती : काल आपण जो कार्यक्रम ठरविला त्याप्रमाणे अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चा आता पुढे सुरु करणार आहोत. आता दुपारी 12 वाजून 23 मिनिटे झालेली आहेत. मध्यंतराची सुट्टी न घेता कोणत्याही परिस्थितीत बरोबर दुपारी 2.30 वाजता ही चर्चा पूर्ण करावयाची आहे. दुपारी 2.30 नंतर माननीय उप मुख्यमंत्री चर्चेला उत्तर देतील. ही चर्चा संपल्यानंतर उर्वरित कामकाज घेण्यात येईल.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना मी अपवादात्मक परिस्थितीत औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी देत आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. आपण मला विशेष बाब म्हणून औचित्याचा मुद्दा मांडण्याची संधी दिली त्याबद्दल धन्यवाद.

सभापती महोदय, बेळगाव कारवारच्या महापौरांनी महाराष्ट्रामध्ये सामील होण्याकरिता त्या भागात जो काळा दिन पाळण्यात आला त्यामध्ये सहभाग घेतल्याबद्दल त्यांच्यावर कर्नाटक सरकारने राज्यद्रोहाचा खटला दाखल केला आहे. त्या राज्यामध्ये राहून त्यांनी महाराष्ट्राबद्दल कडवटपणा दाखविला, तेथे भाषेची गळचेपी केली जाते, राजनिती दाखविली जाते त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कर्नाटकव्याप्त महाराष्ट्राचा भूभाग महाराष्ट्रात सामील झाला पाहिजे यासाठी सीमा बांधवांनी "काळा दिन" पाळला होता. आम्ही हजर राहिलो होतो. आपण या सभागृहात या विषयावर चर्चा केली होती. आपल्या प्रांताबद्दल सीमा भागातील बांधवांकडून एवढी अस्मिता दाखविली जाते. हा महाराष्ट्र 105 हुतात्म्यांची आहुती दिल्यानंतर निर्माण झाला. आपण सीमा प्रश्नाबाबत वारंवार या सभागृहात चर्चा करतो. त्यांच्या पुण्याईवर, त्यांच्या संघर्षावर आपण या सभागृहात उभे आहोत. महाराष्ट्र निर्माण झाला म्हणून विधिमंडळामध्ये आम्ही बसलो आहोत. हा महाराष्ट्र महाराष्ट्रच आहे.

सभापती महोदय, एका गोष्टीबद्दल मला रोज वेदना होत असते. कधीतरी ती व्यक्त करावी असे सतत मला वाटत होते. सदनामध्ये आल्यानंतर आम्ही आपल्याला उद्देशून "जय महाराष्ट्र" करतो आणि महाराष्ट्राच्या विधिमंडळामध्ये आपले अभिनंदन करतो. परंतु या ठिकाणी काही सन्माननीय सदस्य "जय विदर्भ" म्हणतात, याबद्दल आम्हाला वेदना होतात. आज एका सन्माननीय सदस्यानी उभे राहून "जय कोकण" म्हटले. उद्या काही सन्माननीय सदस्य "जय सातारा" म्हणतील, "जय सांगली" म्हणतील. ही पध्दत या सदनामध्ये सुरु झालेली आहे, ही पध्दत अयोग्य आहे. ही राज्य द्रोहाची पध्दत आहे. आपल्या माध्यमातून मला एवढीच विनंती करावयाची आहे की, प्रत्येकाला आपल्या प्रांताबद्दल भावना दाखवावी असे मनापासून वाटते, परंतु सदनामध्ये आल्यानंतर हे महाराष्ट्राचे सदन असल्यामुळे जय विदर्भ, जय कोकण असे म्हणून चालणार नाही. त्याला माझा सक्त विरोध आहे. अशा सन्माननीय सदस्यांनी पाहिजे असल्यास

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

खुशाल सदस्यत्वाचा राजीनामा देऊन जावे आणि आपल्या प्रांताबद्दल भांडावे. महाराष्ट्र बघून घेईल काय करायचे ते. यापुढे अशी कोणी घोषणा केल्यास आपल्या माध्यमातून त्यांना योग्य ती समज द्यावी आणि त्यांच्याविरुध्द योग्य ती कारवाई करावी अशी औचित्याच्या मुद्याद्वारे मी मागणी करीत आहे. महाराष्ट्र राज्याच्या अस्मितेचा, अस्तित्वाचा हा विषय असल्यामुळे विनम्रपणे मी ही बाब आपल्या निदर्शनास आणू इच्छितो.

सभापती : सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य सातत्याने महाराष्ट्र राज्याचा अभिमान वाटावा या पध्दतीने वागत असतात. काही वेळेला माननीय सदस्यांकडून "जय हिंद, जय महाराष्ट्र" म्हटले जाते, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते हे "जय महाराष्ट्र"म्हणतात. अशा वेगवेगळ्या पध्दतीने उल्लेख केला जातो. या अनुषंगाने माननीय मंत्री श्री.राधाकृष्ण विखे-पाटील सभागृहात उपस्थित आहेत, त्यांनी या ठिकाणी राज्यद्रोह या दृष्टीने उल्लेख झाले असतील तर जरुर दखल घ्यावी आणि काय करता येईल ते जरुर पहावे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, "जय विदर्भ" असा उल्लेख केल्यास राज्यद्रोह म्हणता येणार नाही. आमच्या भावना सभागृहात मांडण्याचा आमचा प्रयत्न असतो. त्या भावना मांडणे हा गुन्हा होऊ शकत नाही.

सभापती : ठीक आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, हा सगळ्यांच्या भावनेचा प्रश्न आहे. आपण महाराष्ट्रामध्ये आहोत म्हणून जय महाराष्ट्र म्हणतो, सगळेच म्हणतात. ज्या वेळेला आपल्याला आपल्या प्रांताचा अभिमान वाटत असतो तो अभिमान व्यक्त करण्याचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य तुम्हा आम्हा सगळ्यांना आहे. आम्ही "जय कोकण, जय महाराष्ट्र" म्हणतो. यामध्ये अडचण काय आहे हे मला कळले नाही. ते म्हणताना म्हणाले की, "जय विदर्भ, जय महाराष्ट्र". त्यामध्ये अडचण असण्याचे काही कारण नाही. यामध्ये राज्य द्रोह कसा होतो हे आम्हाला कळले तर आमच्या ज्ञानात भर पडेल. राज्य द्रोह कसा होतो हे कळले तर आम्ही तो टाळण्याचा प्रयत्न करु. महाराष्ट्राचे आहोत, महाराष्ट्राच्या मातीतील आहोत, छत्रपतींच्या मातीतील आहोत. जय महाराष्ट्र हा आमचा नारा आहे. तो महाराष्ट्राचा नारा आहे, त्याबद्दल आम्हाला अभिमान आहे.

नंतर श्री.खर्चे....

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी व्यक्त केलेल्या भावनेशी मी सहमत आहे. या निमित्ताने मी एक उदाहरण देऊ इच्छितो की, विनोबाजी भावे हे नेहमी "जय जगत" असे म्हणूनच भाषण संपवित होते. कोल्हापूर येथील बिंदू चौकात त्यांच्यावर दगडफेक करुन सांगितले की, "जय हिंद" असे म्हणावे. तरी देखील ते म्हणाले की मी "जय जगत" असेच म्हणेल. याचा अर्थ त्यांचे भारतावर प्रेम नव्हते असे नाही. या निमित्ताने मला हेच सांगावयाचे आहे की, सभागृहात एखादा सदस्य "जय मराठवाडा", "जय विदर्भ" किंवा "जय कोकण" असे जरी म्हणत असले तरी त्यांच्या भावनेकडे अशा दृष्टीकोनातून पाहणे योग्य नाही कारण ते जरी आपापल्या प्रांताचे नाव घेत असले तरी त्यांचा "जय महाराष्ट्र" या भावनेला विरोध नाही.

श्री. दिवाकर रावते : मग त्यांनी "जय महाराष्ट्र" असे म्हणावे, त्याला हरकत असणार नाही.

श्री. हेमंत टकले : महोदय, महाराष्ट्रासारख्या एकसंध राज्यात या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी एकत्रित महाराष्ट्राचीच संकल्पना जोपासली आहे. आपण त्याबद्दल आग्रह धरला पाहिजे की सर्वांनी या भावनेला समर्थन दिले पाहिजे. प्रादेशिक असमतोल व त्याबद्दल आपापल्या भागाबद्दलच्या भावनाही असतात पण आपण या सभागृहात संपूर्ण राज्याचे सदस्य म्हणून येत असताना प्रादेशिक भावनांना थोडा आवर घालण्यास देखील शिकले पाहिजे आणि जसे सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, "जय विदर्भ" नंतर "जय महाराष्ट्र" म्हणा पण तो क्रम तसा नसून अगोदर "जय महाराष्ट्र" नंतर "जय विदर्भ" असा आहे. आपल्या एकसंधतेच्या भावनेतूनच बेळगांवसारखा प्रदेश आपल्याकडे यावा म्हणून सीमा भागातील लोकांच्या बरोबरीने लढा देण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. त्यांना सुध्दा हीच भावना कळली पाहिजे की महाराष्ट्रातील सर्व लोक आमच्या पाठीशी उभे आहेत आणि हीच भावना महत्वाची आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या सूचनेचे स्वागत करतो व असे बंधन सन्माननीय सदस्यांनी स्वत:वर घालून घेतले पाहिजे अशी मी विनंती करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय सदस्य श्री दिवाकर रावते साहब, माननीय सदस्य श्री टकले साहब और माननीय सदस्य श्री उल्हास पवार जी ने अपनी जो भावना यहां पर व्यक्त की हैं, मैं उनकी भावनाओं से बिल्कुल असहमत हूं.

मेरा कहना है कि संयुक्त महाराष्ट्र के आंदोलन में विदर्भ के लोगों ने भी बढ-चढ़कर हिस्सा लिया था. यह बात सही है कि हमें "जय महाराष्ट्र" बोलना चाहिए और हम "जय महाराष्ट्र" बोलेंगे और अभी भी हम "जय महाराष्ट्र" बोलते हैं. विदर्भ के लोग "जय महाराष्ट्र" नहीं बोलते, ऐसी बात बिल्कुल नहीं है. लेकिन "जय हिंद" और "जय महाराष्ट्र" बोलने के बाद "जय विदर्भ" या "जय कोंकण" बोलने पर किसी को कोई आपत्ति यहां पर नहीं होनी चाहिए.

सभापति महोदय, विदर्भ की मांग एक ऐतिहासिक मांग है. "संयुक्त महाराष्ट्र" की लढ़ाई से पहले से ही हमारी यह मांग है. इसलिए हमारी इस बात पर किसी को रोक नहीं लगानी चाहिए. हमारे "जय विदर्भ" बोलने का मतलब यह नहीं है कि हम "जय हिंद" या "जय महाराष्ट्र" नहीं बोलेंगे या "जय हिंद" और "जय महाराष्ट्र" बोलना नहीं चाहते. हम महाराष्ट्रियन हैं, इसलिए किसी को भी इस बात की शंका नहीं होनी चाहिए कि हम "जय हिंद" या "जय महाराष्ट्र" बोलना नहीं चाहते. लेकिन हमें अपनी प्रादेशिक भावना व्यक्त करने के संबंध में किसी के द्वारा भी रुकावट नहीं डाली जानी चाहिए, इतना ही मुझे कहना है.

श्री. दिवाकर रावते : महोदय, कर्नाटकचे राजद्रोहाचे उदाहरण मी दिले आहे. त्या राज्यात मराठी बांधव "जय महाराष्ट्र" बोलतात म्हणून त्यांच्यावर ही वेळ आली. म्हणून सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावे की, "जय विदर्भ" असे ज्यावेळेस म्हणतो तेव्हा केवळ प्रादेशिक अभिमानाच्या दृष्टीने बोलत नसून त्यातून वेगळ्या विदर्भाचा आग्रह जाणवतो. तसेच त्यांची मूळ भावना अशी आहे की, त्यांना या राज्यात रहावयाचे नाही म्हणून हट्टाने "जय विदर्भ" असे बोलतात. याबाबत सन्माननीय सदस्यांना समज दिली पाहिजे की, हे महाराष्ट्राचे सदन आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

मी असे म्हणालो होतो की, बाहेर गेल्यावर तुम्हाला पाहिजे ते म्हणा, तुमचा तो अधिकार आहे. परंतु सभागृहात आल्यानंतर घटनात्मक दृष्टया हा महाराष्ट्र असून या सभागृहात महाराष्ट्राचाच उदो-उदो झाला पाहिजे. या सभागृहात कोण कोकण म्हणेल, कोण सातारा म्हणेल, कोण सांगली म्हणेल त्यामुळे हे सर्व आपण या सदनात ऐकणार आहोत काय ? या सदनात फक्त "जय महाराष्ट्र" ही एकच घोषणा घुमली पाहिजे, दुसरी घोषणा कौतुकाने सुध्दा घुमता कामा नये. त्यांच्या "जय विदर्भ" या घोषणेच्या मागे विदर्भ वेगळा करण्याची भूमिका असते, विदर्भाच्या प्रादेशिकतेचा स्वाभिमान या सभागृहात वेगळया पध्दतीने व्यक्त करतात. महाराष्ट्र फुटीची जी काही पध्दती असेल ती आम्ही या सभागृहात सहन करु शकत नाही ही भावना व्यक्त करण्यापाठीमागची भूमिका आहे. त्यामुळे या सदनात केवळ "जय हिंद", "जय भारत" व "जय महाराष्ट्र" याच घोषणा असल्या पाहिजेत अशी माझी आग्रही भूमिका आहे.

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील : सभापती महोदय, सभागृहात सन्माननीय सदस्य राज्याच्या आणि प्रादेशिक भावना व्यक्त करीत असतात. या विषयावर आपण जे मत व्यक्त केलेले आहे त्यासंदर्भात राज्य सरकार निश्चितपणे पाऊले उचलील परंतु आज सभागृहापुढे बरेच कामकाज शिल्लक आहे त्यामुळे आता पुढील कामकाजाला सुरुवात करावी अशी माझी सभागृहाच्या वतीने आपल्याला विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, महाराष्ट्राची अस्मिता बाजूला ठेवून पुढील कामकाज सुरु करा असे मंत्री महोदय सांगत असतील तर ती दुर्दैवाची बाब आहे. या विषयाच्या संदर्भात माननीय सभापती महोदय निर्णय घेण्यास सक्षम आहे, त्यांनाही या विषयाच्या संदर्भात काळजी आहेच.

सभापती : या बाबतीत मी मघाशीच निर्णय दिलेला आहे. महाराष्ट्राचा गौरव होण्यासाठी मी माझा निर्णय दिला असून त्यामध्ये "जय हिंद, जय महाराष्ट्र" अशी आपण घोषणा दिली तर तो ख-या अर्थाने महाराष्ट्राचा गौरव होईल. समजा एखाद्या सन्माननीय सदस्यानी "जय हिंद, जय महाराष्ट्र" म्हटल्यानंतर त्यानी जर या ठिकाणी भावना व्यक्त करावयाची इच्छा झाली तर त्यावर आपण बंधन घालणे योग्य होणार नाही.

------- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांचा एक औचित्याचा मुद्दा असून त्यांनी तो मांडावा.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालयाचे मी खास आभार मानते. एक अतिशय गंभीर अशी बाब निदर्शनास आलेली आहे. काही अर्धा तास चर्चेच्या सूचना माझ्या सहीने विधान मंडळास सादर करण्यात आल्या होत्या. परंतु माझ्या नावाने ज्या सहया करण्यात आलेल्या आहेत त्या खोटया आहेत असे विधान मंडळ सचिवालयाच्या निदर्शनास आल्यामुळे त्यांनी यासंदर्भात माझ्याकडे विचारणा केली व त्यास मी सुध्दा दुजोरा दिला. ठाणे जिल्हा व मुंबईच्या संदर्भात मी अर्धा तास चर्चा दिलेल्याच नाही. या अर्धा तास चर्चेवर माझ्या खोटया सहया केलेल्या आहेत. इतकेच नव्हेतर सन्माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर व किरण पावसकर यांची नावे सूचक व अनुमोदक म्हणून दिलेली आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांचे सुध्दा नाव सूचक व अनुमोदक म्हणून दिले आहे व त्यांच्याही खोटया सहया करुन माझ्या नावाने विधान मंडळात दोन अर्धा तास चर्चा सादर करण्यात आल्या होत्या. यासंदर्भात विधान मंडळ सचिवालयाला शंका आल्यामुळे त्यांनी आमच्या पक्ष कार्यालयात विचारणा केल्यानंतर मी यासंदर्भात उत्तर सुध्दा दिलेले असून मी अर्धा तास चर्चेच्या फॉरमॅटवर अर्धा तास चर्चा देत नाही. आमच्या पक्ष कार्यालयातून वेगळया प्रकारे टाईप करुन देत असते. तसेच लेटर हेडवर लक्षवेधी सूचना देण्यात याव्यात अशी सूचना केल्यानंतर त्याप्रमाणे मी अंमलबजावणी केली परंतु विधान परिषदेच्या सदस्यांच्या खोटया सहया करुन सभागृहाला सादर केल्या जातात ही अतिशय गंभीर बाब आहे. विधान मंडळ सचिवालय यासंदर्भात जागरुक नसते तर या अर्धा तास चर्चा चर्चेला सुध्दा आल्या असत्या. त्यामुळे सुरक्षिततेच्या संदर्भात आपण स्वत: काही उपाययोजना कराव्यात अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे सभागृहाचे लक्ष वेधत आहे.

श्री. रामदास कदम : सभापती महोदय, ही बाब अतिशय गंभीर आहे. यासंदर्भातील जो काही प्रकार आहे तो विधान मंडळ सचिवालयाकडून आमच्या निदर्शनास आणून दिला गेला त्यामुळे या विषयाच्या संदर्भात तत्काळ सीआयडी चौकशी करण्यात यावी म्हणून मी तत्काळ पत्र दिलेले आहे. केवळ अर्धा तास चर्चाच नाही तर काही लक्षवेधी सूचना देखील आमच्या सहयाचे फॉर्मेट विधान मंडळ सचिवालयाला दिलेले आहे. तसेच आमच्या नावाने खोटया सहया करणारे हे नेमके कोण आहेत याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. ----

यानंतर श्री. भारवि...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मी सभागृहात आहे. माझे नाव घेण्यात आल्यामुळे मी बोलत आहे. यापूर्वी वृत्तपत्रातून अनेक वेळा लिहून आले की, काही प्रश्न विचारले जातात व बाहेर तडजोडी केल्या जातात किंवा त्या दिवशी सदस्य सदनात उपस्थित रहात नाहीत. आता नवीन पॅटर्न सुरू झाला आहे. त्यात वेगवेगळी नावे टाकली जात आहेत. त्यातून अर्ध्या तासाच्या चर्चेची सूचना दिली जात आहे. मागच्या नागपूरच्या अधिवेशनात देखील एक बाब निदर्शनास आली होती. सरकारी कर्मचाऱ्यांचे काही प्रश्न होते. ते प्रश्न सोडविण्यासाठी त्याच कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेऊन काहींची नावे दिली होती. त्याही वेळी आम्ही शाखेमध्ये जाऊन सांगितले होते की, याच्याशी आमचा काहीही संबंध नाही. पण जो कोणी चुकीच्या मार्गाने अशा प्रकारे सह्या करत असेल ते योग्य नाही. या सदनातील कोणीही सन्माननीय सदस्य अशा प्रकारे सह्या करीत असतील मला वाटत नाही. एवढी विश्वासार्हता आणि गांभीर्यता लक्षात घेण्या सारखी आहे. सदस्य हे करत नसतील आणि कर्मचाऱ्यांकडून होत असेल तर ती बाब गांभीर्याने घेतली पाहिजे. येथे वेगवेगळ्या पक्षाचे सदस्य बसलेले असतात. पक्ष म्हणून त्यांची भावना वेगळी असेल. माझ्या पक्षाचे विचार वेगळे असतील. आपण केलेला विचार दुसऱ्या पक्षाने कसा मान्य केला, एवढी गंभीरता निर्माण होऊ शकेल. झालेला प्रकार हा नुसता निंदनीय नाही तर त्यासंबंधी सर्वोतोपरी चौकशी होऊन अशी चूक पुन्हा भविष्यामध्ये होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. तसेच ज्याने कोणी हा प्रकार केला आहे त्याच्यावर कठोर शासन होणे गरजेचे आहे.

सभापती : विधान मंडळ सचिवालयाने जागरूकतेने ह्या काही बाबी माझ्या निदर्शनास आणल्या. गेल्या अधिवेशनामध्ये अशा जवळ जवळ 24-25 बाबी होत्या. त्या लक्षवेधी सूचने संबंधातील होत्या. त्या सगळ्या बाबी आम्ही बाजूला काढल्या. सभागृहाचे सन्माननीय नेते, सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांच्या नजरेस त्यावेळी देखील ही बाब आणली होती आणि आज देखील आणली असून त्या संबंधात आज चर्चा देखील झाली. या बाबतीत मी कठोर निर्णय घेण्याचे ठरविले आहे. या प्रकाराची 100 टक्के चौकशी सी.आय.डी.मार्फत केली जाईल. माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, काहीही झाले तरी लक्षवेधी सूचना, प्रश्न, अर्धा तास चर्चेची सूचना आपण वाचत नाही तो पर्यंत कुठल्याही कागदावर आपण सही करू नये. आपली सही नाही, आपला काही रेकॉर्ड नाही. त्यामुळे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय सभापती....

याची चौकशी मी सी.आय.डी.कडे देत आहे. अशा प्रकारे मी कठोर कारवाई करण्याचे ठरविले आहे. परवा मी एक सूचना केली होती. परंतु, ती लगेच सोयीस्कर वाटली नाही. मी अशी सूचना दिली होती की, सन्माननीय सदस्यांनी आपल्या लेटर पॅडवर सूचना द्याव्यात. मी लगेच सूचना दिल्या मुळे त्यावेळी सन्माननीय सदस्यांकडे देखील वेळ नव्हता. पण या पुढे आता सन्माननीय सदस्यांना आपल्या लेटर पॅडवरच सूचना द्याव्या लागतील. मी याची गांभीर्याने दखल घेतली आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, धन्यवाद.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी : सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (चर्चा पुढे सुरु)

सभापती : आज सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर आपले विचार मांडण्यासाठी ज्या सन्माननीय सदस्यांनी नावे दिलेली आहेत, ती मी वाचून दाखवितो. मी ज्या सन्माननीय सदस्यांची नावे पुकारणार आहे ते जर सभागृहात उपस्थित नसतील तर त्यांना याठिकाणी भाषण करता येणार नाही हे मी सर्वांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी मघाशीच सांगितलेले आहे की, ही चर्चा दोन तासामध्ये पूर्ण व्हावयास पाहिजे.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

याठिकाणी ज्या सन्माननीय सदस्यांनी बोलण्यासाठी नावे वाचून दिलेली आहेत, ती नावे मी आता वाचून दाखवितो. सर्वश्री. राजन तेली, उल्हास पवार, जैनुद्दीन जव्हेरी, मनीष जैन, श्रीमती अलका देसाई, श्री.मोहन जोशी, श्री.विनायक मेटे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री. प्रकाश बिनसाळे, राजेंद्र जैन, गोपीकिसन बाजोरिया, जयवंतराव जाधव, नागो पुंडलिक गाणार, धनंजय मुंडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, एस.क्यू.जमा अशी नावे आहेत. तसेच शिवसेना पक्षाकडून सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांच्यातर्फे जी नावे दिलेली आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांचे नाव असून, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांचे नाव खोडलेले दिसते. उपरोक्त सन्माननीय सदस्यांची भाषणे झाल्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री चर्चेला उत्तर देतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांचे नाव दिले होते.परंतु त्यांचे भाषण झालेले आहे. त्याऐवजी मी सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांचे नाव दिलेले आहे.

सभापती : ठीक आहे. आता सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आपले भाषण सुरु करावे.

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, सन्माननीय वित्त मंत्री श्री.अजित पवार यांनी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभा आहे.

सभापती महोदय, माझे भाषण सुरु होण्यापूर्वी महाराष्ट्रातील जी वृत्तपत्रे आहेत, ज्याला आपण चौथा स्तंभ म्हणतो, त्यांनी या अर्थसंकल्पाबाबत काय म्हटलेले आहे त्यासंदर्भातील हेडींग मी वाचून दाखविणार आहे.जेणेकरुन या अर्थसंकल्पाबाबत महाराष्ट्रातील साडेअकरा कोटी जनतेचे काय मत आहे हे शासनाला कळले पाहिजे.

सभापती महोदय "लोकमत" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "महागाईची दादागिरी, अर्थसंकल्पामध्ये 600 कोटी रुपयांचे नवीन कर." म्हणजे "महागाईची दादागिरी" असा उल्लेख लोकमत या वृत्तपत्राने केलेला आहे.

"सकाळ" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "महागाईच्या वाटेवर गॅसचा भडका." दादांच्या अर्थसंकल्पामध्ये सर्वांना वाढले थोडे-थोडे 2000 कोटी रुपये."

"महाराष्ट्र टाईम्स्" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "रंजले-गांजले महागाईमध्ये लोटले"

"दैनिक वार्ताहार" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "जे का रंजले-गांजले त्यांसी दरवाढीने मारले"

"नवशक्ती" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की,"सर्वसामान्य माणूस गॅसवरती"

"लोकसत्ता" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "अर्थसंकल्पातून महागाईला अवतण

"नवाकाळ" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्राचे महाराज्य बनविणार, अर्थमंत्र्यांची फसवी गर्जना" "स्वयंपाकाचा गॅस महागला, इतर वस्तूही महागणार."

"सामना" या वृत्तपत्राने असे म्हटलेले आहे की, "बेसुमार महागाई, सुमार अर्थसंकल्प आणि चार आण्याची कोंबडी बारा आण्याचा गॅस"

अशा प्रकारे विविध वृत्तपत्रांमधून प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.रामदास कदम...

सभापती महोदय, अर्थसंकल्प वाचल्यानंतर हा अर्थसंकल्प आहे की खर्चाची खातेवारी आहे असा प्रश्न इतरांप्रमाणे मला देखील पडलेला आहे. एक उपचार म्हणून या गोष्टी केल्या जातात की काय असा प्रश्न मला पडतो. कागदोपत्री आकडेमोड दाखवून आपण सत्ता राबवितो म्हणजे फार मोठे उपकार करतो असा सत्ताधाऱ्यांचा समज झाला काय, असा मला प्रश्न पडतो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाचे वर्णन करायचे झाले तर दिशाहीन अर्थसंकल्प, कोणताही नवीन संकल्प नसलेला निरर्थक अर्थसंकल्प असे म्हटल्यास वावगे होणार नाही. तरतूद रकमेचा आढावा न घेता फक्त आकड्यांचा खेळ म्हणजे अर्थसंकल्प असे म्हटले तर मला ते चुकीचे वाटणार नाही. खर्चावर कोणतेही बंधन नाही आणि उत्पन्नाचे नवीन साधन नाही. म्हणून 600 कोटी रुपयांचे नवीन कर बसविण्यात आले आहेत. "केंद्राने बदडले आणि राज्याने झोडपले" असे मी या अर्थसंकल्पाचे वर्णन केले तर ते चुकीचे होणार नाही. आणखी कमी शब्दांत याचा अर्थ सांगायचा झाला तर " खिशात नाही आणा अन् मला बाजीराव म्हणा" अशी स्थिती आहे. बिन पैशांच्या घोषणेचा झिणझिणाट असे अर्थसंकल्पाचे वर्णन केले तर ते चुकीचे होणार नाही.

सभापती महोदय, राज्याचे उत्पन्न आणि खर्च याचा मेळ घालताना राज्याला नेमकी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे हे या अर्थसंकल्पात मला कुठेही दिसले नाही. सन 2011-2012 चा अर्थसंकल्प 1 लाख 54 हजार कोटी रुपयांचा होता. नंतर 14 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर करण्यात आल्या. म्हणजे 1 लाख 58 हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प होतो. आपण खर्चाचा अंदाज घेतला तर जवळपास 2 हजार कोटी रुपयांची तूट पहावयास मिळते. मागील काही वर्षात जे अर्थसंकल्प सादर करण्यात आले त्यातील एखाद-दुसरा अपवाद वगळता सर्व शिलकी अर्थसंकल्प सादर करण्यात आले. परंतु नंतरच्या वर्षात तो अर्थसंकल्प तुटीचा आहे असे लक्षात येते. प्रत्येक वेळी या सरकारचे अंदाज चुकलेले आहेत तेव्हा त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार आहे काय ? अपवाद म्हणून एखाद-दुसरा प्रसंग समजू शकतो. परंतु मागील दहा वर्षात शिलकी अर्थसंकल्प दाखविला आणि तो तुटीमध्ये निघाला. आपण 58 हजार कोटी रुपये शिल्लक दाखविता नंतर तूट आहे असे सांगता हे बरोबर नाही. यामध्ये एक प्रश्न निर्माण होतो की, ही तूट

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम...

कशामुळे आली ? शेतकऱ्यांना दोन हजार कोटी रुपयांची मदत केली आणि त्यामुळे तूट आली असे दाखविण्याचा येथे प्रयत्न केला.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

शासनाने दोन हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले आहे हे खरे असले तरी अर्थसंकल्पामध्ये फक्त 1585 कोटी 77 लाख रुपये दाखविण्यात आलेले आहेत. मी अर्थसंकल्पीय भाषण पूर्ण वाचले आहे. या राज्यातील शेतकऱ्यांना फसविण्यात आले आहे. मी याही पुढे जाऊन सांगेन की, दिनांक 15 मार्च, 2012 च्या अखेर 120 कोटी 1 लाख 73 हजार 930 रुपये एवढीच रक्कम खर्च झालेली आहे. दोन हजार कोटी रुपयांची घोषणा करण्यात आली आणि 1585 कोटी 77 लाख रुपये एवढ्याच रकमेची अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आली आहे त्यापैकी फक्त 1 लाख 43 हजार 930 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, बाकीची रक्कम कुठे गेली, कुणी खाल्ली, कुणाच्या घशात, कुणाच्या खिशात गेली? हे या ठिकाणी सांगितले पाहिजे कारण या संबंधीची माहिती कुठेही मिळत नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी फक्त सवंग घोषणा करुन फसविण्याचे काम या सदनाच्या माध्यमातून केले जात आहे, त्यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करण्याचे काम या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून झाले आहे असे म्हटले तर ते चुकीचे आहे असे मला वाटत नाही.

सभापती महोदय, हिरव्या पुस्तकामध्ये जी तूट दाखविलेली आहे ती या अर्थसंकल्पामध्ये लपवून ठेवलेली आहे. हिरव्या पुस्तकामध्ये असे म्हटले आहे की, राज्य वित्त आयोगाच्या शिफारशीच्या अंमलबजावणी करिता केलेल्या तरतुदीचा वापर न झाल्याने म्हणजे 754 कोटी रुपयांचा वापर झाला नाही म्हणून ही तूट आलेली आहे. सर्वसाधारण शिक्षणाच्या विविध योजनांच्या तरतुदीत घट प्रस्तावित केल्याने 1012 कोटी रुपये खर्च झालेले नाहीत म्हणून ही तूट आलेली आहे. म्हणजे शिक्षणाच्या नावाने ढोल वाजवावयाचे, प्रत्यक्षात पैसा खर्च करावयाचा नाही मात्र अर्थसंकल्पात दाखवायचे की, आम्ही शेतकऱ्यांना दोन हजार कोटी रुपये दिले म्हणून ही तूट आलेली आहे. अशा प्रकारच्या फसवा-फसवीच्या ज्याला आपण आकड्याचा खेळ असे म्हणतो तो कशा पध्दतीने दाखविण्यात आलेला आहे हे मी या ठिकाणी मुद्दाम स्पष्ट करीत आहे. जेएनएनयुआरएम अंतर्गत गृहनिर्माण योजनेसाठी केंद्र शासनाकडून अपेक्षे पेक्षा कमी 742 कोटी रुपये निधी प्राप्त झालेला आहे, हे पैसे अर्थसंकल्पात दाखविले नाहीत म्हणून खऱ्या अर्थाने ही तूट आलेली आहे. नगरविकास विभागाससाठी अपेक्षेपेक्षा कमी 378 कोटी रुपये निधी प्राप्त झाला पण याचा उल्लेख या अर्थसंकल्पामध्ये कुठे झालेला दिसत नाही. अशा पध्दतीने फक्त लपवालपवी

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम.....

करण्याचे काम या अर्थसंकल्पामध्ये कशा पध्दतीने केलेले आहे हे मला या ठिकाणी मुद्दाम सांगावयाचे आहे. आज महाराष्ट्रावर 2 लाख 26 हजार कोटी रुपयाचे कर्ज झालेले आहे की 2 लाख 53 हजार कोटी रुपयाचे कर्ज झालेले आहे ही बाब एकदा स्पष्ट होणे अत्यंत आवश्यक आहे.

सभापती महोदय, मागील दोन वर्षात या शासनाने 71 हजार कोटी रुपये कर्ज काढलेले आहे. मागच्या वर्षी 19 हजार कोटी रुपये कर्ज काढलेले आहे. या दोन वर्षात एकूण 73 हजार कोटी रुपये कर्ज काढण्यात आलेले आहे ते नेमके कशासाठी काढण्यात आलेले आहे. या राज्यावर 2 लाख 53 हजार कोटी रुपयाचे कर्ज आहे. काही वेळा उल्लेख केला जातो की, तुमची सत्ता होती, तुमचे सरकार होते तेव्हा तुम्हीही कर्ज काढले होते. होय, सभापती महोदय, आम्ही त्यावेळी 19 हजार कोटी रुपये कर्ज काढले हे आम्ही कबूल करतो पण या 19 हजार कोटी रुपयाच्या कर्जाचा हिशेब मी एका मिनिटात देऊ शकतो. होय, आम्ही मुंबई-पुणे रस्त्यासाठी 5 हजार कोटी रुपये कर्ज काढले. कृष्णा खोऱ्याचे काम करण्यासाठी 5 हजार कोटी रुपये कर्ज काढले अन्यथा त्या सगळया पाण्यावर कर्नाटक शासनाचा अधिकार राहिला असता. होय, सभापती महोदय, आम्ही महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी मोफत शौचालय बनविण्यासाठी कर्ज काढले. होय, सभापती महोदय, आम्ही महाराष्ट्रामध्ये गाव तेथे रस्ता तयार करण्यासाठी, नवीन रस्ते तयार करण्यासाठी कर्ज काढले. मुंबईमध्ये 55 उड्डाणपूल बनविण्यासाठी 5 हजार कोटी रुपये कर्ज काढले. आम्ही काढलेल्या 19 हजार कोटी रुपयाच्या कर्जाचा हिशोब मी देतो. या शासनाने 2 लाख 55 हजार कोटी रुपये कर्ज कशासाठी काढले हे का लपवून ठेवण्यात येत आहे? त्यासंबंधीची श्वेतपत्रिका का काढण्यात येत नाही. हिंमत असेल या संबंधीची श्वेतपत्रिका काढण्यात यावी आणि हा पैसा नेमका कुठे गेला हे महाराष्ट्रातील जनतेला एकदा कळू द्यावे. हा पैसा नेमका कुठे गेला आहे ते मी पुढे सांगणार आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम ....

हे स्पष्ट झाले पाहिजे. महाराष्ट्राला कर्जबाजारी करुन महाराष्ट्राची लूट करण्याचे काम हे शासन करीत आहे. आता जी पंचवार्षिक योजना लागू आहे त्याचे हे पहिले वर्ष आहे. या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या वर्षामध्ये आपण नेमके काय करणार आहात त्याचा या अर्थसंकल्पामध्ये काहीही मागमूस दिसत नाही. सर्व योजना मागच्याच आहेत. फक्त दोन टक्के योजना आपल्या आहेत. या महाराष्ट्राची लूट कशा पध्दतीने केली जाते याचे मी उदाहरण देऊ इच्छितो. आपण पिवळ्या पुस्तकामध्ये पाहिले तर राज्याचा सिमेंट कॉन्क्रीटीकरणाचा खर्च एका वर्षात प्रतिकिलोमीटर 1 कोटी 7 लाख रुपयांवरुन 2 कोटी रुपयांवर गेलेला आहे. रस्ते विकासासाठी, कॉन्क्रीटीकरणासाठी आतापर्यंत महाराष्ट्रामध्ये प्रतिकिलोमीटरला 1 कोटी 7 लाख रुपये खर्च येत होता तो खर्च आता 2 कोटी रुपयांवर गेलेला आहे. म्हणजे कशी लूट चालली आहे हे दिसून येईल. 2009-20010 मध्ये रस्त्याच्या सिमेंट कॉन्क्रीटीकरणासाठी प्रतिकिलोमीटरचे एस्टिमेट 1 कोटी 7 लाख रुपयांचे होते. आता तेच काम 2 कोटी रुपयांवर गेलेले आहे. त्याचप्रमाणे प्रति द.ल.घ.मी. अतिरिक्त पाणीसाठा निर्माण करण्यासाठी 2009-2010 मध्ये 3 कोटी 56 लाख रुपये खर्च आला होता. आता एक वर्षात त्यामध्ये 100 टक्के वाढ होऊन 2010-2011 मध्ये प्रति द.ल.घ.मी. पाणीसाठा निर्मितीसाठी 7 कोटी 11 लाख रुपये एवढा खर्च येत आहे. एका वर्षामध्ये खर्च दुप्पट झाला. पैशाची कशी लूट केली जाते हे यातून दिसून येते. या अर्थसंकल्पातील पैसे नेमके कोणाच्या कंत्राटदारांच्या घशामध्ये कसे जातात हे या ठिकाणी पहावयास मिळते. त्यांना 100 टक्के ॲडव्हान्स दिला. हे कंत्राटदार जणूकाही शासनाचे जावई आहेत. अशा पध्दतीने ज्या ज्या ठिकाणी टेंडर काढावयाचे, कॉन्ट्रक्ट द्यावयाचे त्या त्या ठिकाणी दुप्पट पैसे वाढवून देऊन लूट करावयाचे काम चालू आहे. मग महाराष्ट्र कर्जबाजारी होणार नाही का ?

सभापती महोदय, मी या ठिकाणी उदाहरण देतो. सन्माननीय मंत्री महोदय श्री. छगन भुजबळ आता या ठिकाणी उपस्थित नाहीत. बांधकाम खात्याचे हे प्रकरण मी आपल्याकडे देतो. हे प्रकरण फार गंभीर आहे. या ठिकाणी बांधकाम खात्याचे एक-एक काम पाच-पाच वेळा दाखविलेले आहे. ही 80 कोटीची कामे आहेत. त्या ठिकाणी पाच-पाच लाख रुपयांचे एक काम त्याच

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

सोसायटीला पाच-पाच वेळा दिलेले आहे. घराची दुरुस्ती, पाईपलाईन टाकण्याचे 5 लाखाचे काम आहे आणि पुन्हा-पुन्हा तेच काम दाखविलेले आहे. अशा पध्दतीने 80 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे. मी आपल्याला कामांची नावे वाचून दाखवितो. राज्य कामगार विमा रुग्णालय इमारत दुरुस्ती खर्च 1 कोटी 31 लाख 50 हजार रुपये, पोद्दार रुग्णालय इमारत दुरुस्ती खर्च 2 कोटी 8 लाख 90 हजार रुपये, एल्फिस्टन टेक्निकल हायस्कूल इमारत दुरुस्ती खर्च 2 कोटी 13 लाख 95 हजार रुपये, जे.जे.स्कूल ऑफ आर्ट इमारत दुरुस्ती खर्च 2 कोटी 7 लाख 70 हजार रुपये. नागपाडा पोलीस रुग्णालय, परिवहन विभाग व पोलीस कार्यालय दुरुस्ती खर्च 2 कोटी 75 लाख रुपये, वरळी पोलीस वसाहत, पोलीस कार्यालय इमारत दुरुस्ती खर्च 1 कोटी 75 लाख रुपये, नायगाव पोलीस कार्यालय व निवासस्थान इमारत दुरुस्ती खर्च 3 कोटी 67 लाख 50 हजार रुपये असा खर्च केलेला आहे. या अर्थसंकल्पातील पैशांची लूट ठेकेदारांसाठी कशा प्रकारे केली जाते हे यातून दिसून येते. याची सीआयडी मार्फत चौकशी करणार का ? हे पैसे कोणाचे आहेत ? अशा पध्दतीने या महाराष्ट्रामध्ये पैशाची लूट केली जाते. मी आपल्याकडे हे 80 कोटीचे प्रकरण देत आहे. माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना, माननीय मत्री महोदय श्री. छगन भुजबळ यांना विनंती आहे. यामध्ये नियम असा आहे की, 33 टक्के काम सुशिक्षित बेरोजगारांना दिले पाहिजे. 33 टक्के काम निविदा काढून आणि 33 टक्के काम सोसायट्यांना दिले पाहिजे.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

पण 100 टक्के काम नियम धाब्यावर बसवून या सोसायट्यांना दिले जात आहे. ठेकेदारांकडून व अधिकाऱ्यांकडून खोटी बिले काढली जात आहेत. लोकांच्या घामाचा हा पैसा आहे. महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पामध्ये तरतूद केल्यानंतर हा निधी काही लोकांकडे कसा जातो ते मी या निमित्ताने सांगण्याचा प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकडे आपल्यामार्फत आणखी एक प्रकरण देऊ इच्छितो.

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, अर्थसंकल्पावर आणखी अनेक सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडावयाचे आहेत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माझ्यापूर्वी ज्या सन्माननीय सदस्यांनी भाषणे केली आहेत त्यांनी किती वेळ भाषण केले त्याची माहिती माझ्याजवळ आहे. मला आपल्यावर हेत्वारोप करावयाचा नाही. पण मी ज्या ज्यावेळी भाषण करीत असतो त्यावेळी माझ्यावर वेळेचे बंधन घातले जाते. हेतूपुरस्सरपणे माझ्यावर अन्याय होत असेल तर मी यापुढे सभागृहामध्ये येणार नाही. मी नियमांचे पालन करणारा सदस्य आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी मघशी म्हटल्याप्रमाणे शासनाला मी आणखी एक उदाहरण सांगू इच्छितो. तत्कालीन उपायुक्त श्री.संतोषसिंग परदेसी यांचे हे प्रकरण आहे. त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. हे महाशय सध्या एका कॅबिनेट मंत्री महोदयांकडे खाजगी सचिव म्हणून काम करीत आहेत. गेली 7 वर्षे त्यांची चौकशी सुरु असूनही ती चौकशी पूर्ण होत नाही. सरकारमध्ये बसून शासनाच्या पैशांची लूट कशा प्रकारे सुरु आहे ते मी दाखवून देत आहे. "श्री.परदेसी यांची दिनांक 5.11.2007 रोजी कक्ष अधिकाऱ्यांच्या टिपणीवरुन उर्वरित 8 प्रकरणांची चौकशी पूर्ण करुन चौकशी अहवालाच्या आधारे आवश्यकतेनुसार श्री.परदेसी यांच्याविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील अधिनियम, 1979 नुसार विभागीय चौकशीची कारवाई सुरु करण्याकरिता दोषारोप पत्र तयार करुन दिनांक 30.10.2007 पर्यंत नगरविकास विभागाकडे पाठवावे अशा सूचना आयुक्त, मनपा, नवी मुंबई यांना देण्यात आल्या." यानंतर पुढे काही झाले नाही. कोट्यवधी रुपयांचे त्यांनी व्यवहार केले आहेत. कुंपणच शेत खात आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

श्री.रामदास कदम....

सभापती महोदय, शासनाचे काम कशा प्रकारे सुरु आहे त्याचे आणखी एक उदाहरण देतो. केंद्र सरकारकडून शेतकऱ्यांसाठी 1000 ट्रॅक्टर खरेदीसाठी 189 कोटी रुपये आले होते. परंतु दोन वर्षात फक्त 100 ट्रॅक्टरची खरेदी करण्यात आली आहे. अधिकारी मंत्र्यांचेही ऐकत नाहीत असे तेच सांगतात. टेंडर काढल्यानंतर मॅनेज करुन आपल्याला काही तरी पैसे घेता येतील या हेतूने खरेदी केलेली नाही. शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाण्याचा हा प्रकार आहे. हा केंद्र सरकारचा पैसा आहे. केंद्र सरकारकडून पैसा आल्यानंतरही गेल्या दोन वर्षामध्ये 900 ट्रॅक्टर का खरेदी केले नाहीत ? त्याचे मंत्री महोदयांकडून मला उत्तर पाहिजे.

राज्यात बेकायदेशीर असलेल्या दारुच्या दुकानांवर कारवाई करु नये अशा प्रकारचे राज्याचे मुख्य सचिव आदेश देतात हे आम्ही वर्तमानपत्रातून वाचले आहे. लोक दारुडे झाले तरी चालतील, पण राज्याचा महसूल वाढला पाहिजे. शासनामार्फत 27,777 कोटी 63 लाख रुपयांचा टॅक्स वसूल होत नाही. ए.जी.नी असे म्हटले आहे की, यापैकी 9668 कोटी इतक्या रकमेबाबत न्यायालयात कोणतेही प्रकरण प्रलंबित नसताना ही रक्कम का वसूल करण्यात आली नाही ? एका बाजूला राज्य तोट्यात असल्याचे दाखविले जाते, पैसा नाही असे सांगितले जाते, राज्यात शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. दुसऱ्या बाजूला 9668 कोटी रुपयांचा महसूल का गोळा करण्यात आला नाही, अशा गोष्टींना परदेसी सारखे अधिकारी जबाबदार आहेत. त्याबाबत आम्हाला कोण उत्तर देणार आहे ?

सभापती महोदय, या वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये सरकारच्या माध्यमातून आम्हाला मोगलाई दिसून आली आहे. घटनेतील तरतुदीनुसार सरकारला या सभागृहाच्या मंजुरीशिवाय एकही पैसा खर्च करता येत नाही.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असे असताना 4806 कोटीची ठोक तरतूद कशासाठी करण्यात आली ? सभापती महोदय, नियम काय सांगतो ? सभागृहाची मंजुरी घेतल्या शिवाय शासनाला एक पैसाही खर्च करता येत नाही. मग ही ठोक तरतूद कशासाठी केली.

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, मेरा पॉइंट ऑफ ऑर्डर है. सप्लीमेंटरी डिमान्ड्स कुल मिलाकर 4806 करोड़ की हैं और आयटम के हिसाब से ये डिमान्ड्स सभागृह में पेश की जाती हैं. एक अधिवेशन से दूसरे अधिवेशन के बीच में जो एडीशनल खर्च होता है, उससे संबंधित सप्लीमेंटरी डिमांड्स आयटम के हिसाब से पूरे डिटेल्स के साथ हमारे सामने पेश की जाती है. यह धनराशि एक इन्स्टॉलमेंट में नहीं है, बल्कि इसके पूरे डिटेल्स सभागृह के सामने पेश किए जाते हैं. मेरा कहना यह है कि गलत बात रिकॉर्ड पर नहीं आनी चाहिए.

श्री. रामदास कदम : सन्माननीय सदस्यांनी कृपा करुन माझा वेळ घेऊ नये. त्यांना जेव्हा भाषणाची संधी मिळेल त्यावेळी त्यांनी बोलावे. सभापती महोदय, मला हे सांगायचे आहे की, आधी पैसा खर्च करायचा आणि नंतर सभागृहाची मंजुरी घ्यायची ही कोणती पध्दत आहे ? मी या सभागृहामध्ये नवीन नाही. माझी आमदार म्हणून ही पाचवी टर्म आहे. आपल्याला अशा प्रकारे ठोक तरतूद करता येत नाही. परंतु आता दादागिरी चालली आहे.

सभापती महोदय, केलेल्या तरतुदी प्रमाणे फक्त 5 खात्यांनी पैसे खर्च केलेले आहेत. इतर खात्यांनी फक्त 35 टक्क्या पेक्षा जास्त रक्कम खर्च केलेली नाही. 31 मार्च येतोय म्हणून 70 टक्के रकमेची बिले काढायची आणि उर्वरित निधी जमा करुन घ्यायचा असा प्रकार चालला आहे. हे प्रकार कुठे तरी थांबले पाहिजेत.

सभापती महोदय, राज्य सरकारातील मंत्री आणि आमदारांचे साखर कारखाने, सूत गिरण्या आहेत. त्यांच्याकडे 4 हजार कोटीची थकबाकी आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेला देखील राज्य शासनाने हमी दिलेली आहे.

सभापती महोदय, शेवटचा मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. अरबी समुद्रामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्यदिव्य असे स्मारक उभारण्याची घोषणा या सरकारने केली. परंतु त्यासाठी या अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. दुसरे असे की, छत्रपती

. . .LL-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

शिवाजी महाराजांनी ज्या अफझलखानाचा कोथळा बाहेर काढला त्या अफझलखानाच्या थडग्याच्या ठिकाणी 5000 चौ.फूटाचे बेकायदेशीर बांधकाम झालेले आहे. तेथे मदरसा, मशिद, रहाण्यासाठी खोल्या बांधलेल्या आहेत. हे बांधकाम बेकायदेशीर असल्यामुळे पाडून टाकण्यात यावे असे उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला असून सर्वोच्च न्यायालयाने देखील उच्च न्यायालयाचा निर्णय ग्राह्य धरुन बेकायदेशीर बांधकाम पाडण्याचे निर्देश दिले. असे असताना उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या निर्णयाचा अवमान केला जात आहे. हे शासन कुणाचे आहे ? हे शासन अफझलखानची औलाद आहे काय ? अफझलखान या शासनाचा बाप लागतो काय ? तेव्हा न्यायालयाच्या निर्णयाचा अवमान करणा-या या शासनाचा निषेध करुनमी माझे भाषण संपवितो.

(सत्ताधारी पक्षाचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलू लागतात..)

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांच्या भाषणातील आक्षेपार्ह वाक्ये काढून टाकण्यात येतील.

...नंतर श्री. भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मघाशी माननीय सभापतींनी ही चर्चा किती वेळ घ्यावी यासंबंधी निर्णय दिला होता. आजच्या चर्चेसाठी उपलब्ध असलेल्या एकूण वेळेपैकी निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाला आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाला वाटून दिला पाहिजे. त्यानुसार विरोधी पक्षाचा किती वेळ शिल्लक आहे आणि सत्ताधारी पक्षाला किती वेळ उपलब्ध होणार आहे हे आपण सांगावे.

उप सभापती : अर्थसंकल्पावरील चर्चा दुपारी 2 वाजून 55 मिनिटांनी थांबविण्यात येणार आहे. या चर्चेची सुरुवात दुपारी 12.49 वाजता झाली. माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी 26 मिनिटे भाषण केले आहे. आता माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण आपले भाषण सुरु करतील.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मघाशी ही चर्चा 2.30 वाजता थांबविण्यात येईल असा माननीय सभापतींनी निर्णय दिला होता.

उप सभापती : मी सभापतीस्थानी आसनस्थ होत असताना माननीय सभापतींनी एवढेच सांगितले की, ही चर्चा दोन तास घेण्यात यावी. दोन तासानंतर चर्चेच्या उत्तराचे भाषण सुरु होईल. मी दुपारी 12.49 वाजता आसनस्थ होत असताना माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी भाषणाला सुरुवात केली. माननीय सभापतींनी दुपारी 12.30 वाजता दोन तास गृहित धरुन 2.30 पर्यंत चर्चा घेण्यात येईल असे सांगितले होते. माननीय सभापतींचे आदेश मलाही मान्य आहेत आणि आपल्यालाही मान्य आहेत. फक्त काही मिनिटांचा फरक आहे. तो फरक आपण मान्य करु या. माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-13 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि पाठिंबा देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री यांनी अतिशय चांगल्याप्रकारे अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानी आहे. देशातून आणि विदेशातून लोक या शहरात येतात. गोरगरीब माणसे सुध्दा आपल्या रोजीरोटीसाठी या शहराकडे धाव घेत असतात. या शहराची लोकसंख्या 1.30 कोटीपेक्षा अधिक झालेली आहे. या शहराचे मोठमोठे प्रश्न प्रलंबित आहेत. मोठया प्रमाणात विकासाची कामे या शहरात सुरु आहेत. या शहरातील सर्वात महत्वाची समस्या ही वाहतूक व्यवस्थेबाबतची आहे. लोकल ट्रेन, बेस्ट बसेस ही सार्वजनिक वाहतुकीची साधने कार्यक्षम आहेत. तरी देखील अपुरी पडत आहेत, कारण लोकसंख्या प्रचंड वेगाने वाढत आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये मुंबई, वसई, वाशी, ठाणे येथील समुद्र किनाऱ्यांचा वापर करुन नरिमन पॉईंट ते बोरीवली या पश्चिम किनाऱ्यावर जलवाहतूक सुविधा निर्माण करण्यासाठी 750 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्य सरकार, एमएमआरडीए आणि म्हाडा यांच्याकडून प्रत्येकी 250 कोटी रुपये हिस्सा देण्यात येणार आहे. या शहरातील वाहतुकीचा प्रश्न, पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या किंमती लक्षात घेता मुंबईकरांच्या दृष्टीने जलवाहतूक प्रकल्प अतिशय महत्वाचा आहे. या जलवाहतूक सुविधेमुळे उत्तर ते दक्षिण मुंबई हा प्रवास अवघ्या 34 मिनिटात होणार आहे. हा प्रकल्प 2014 पर्यंत पूर्ण करण्याचा संकल्प सोडण्यात आला आहे. मुंबईकरांच्या दृष्टीने हा प्रकल्प वाखाणण्यासारखा आहे. या प्रकल्पाचे काम चार टप्प्यात पूर्ण होणार आहे. त्यात मुख्य रस्त्यापासून जेट्टीपर्यंत जाण्याची सुविधा महत्वाची आहे. भाऊचा धक्का, नेरुळ, मांडवा येथे टर्मिनल इमारती, किनाऱ्यावरील कामांचा समावेश केलेला आहे. हा प्रकल्प जलद गतीने पूर्ण झाला पाहिजे. मुंबई शहरातील मेट्रो प्रकल्पाचे काम ज्याप्रमाणे आठ वर्षे रेंगाळत पडले आहे, तसे या प्रकल्पाबाबत होऊ नये. शासनाने जाहीर केल्याप्रमाणे 2014 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण झाला पाहिजे,

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

अशी अपेक्षा व्यक्त करते. शासनाने मुंबई महानगर परिसरातील पायाभूत सुविधांसाठी 1488 कोटीची तरतूद केली असून त्यातून 11 रस्ते, 3 रेल्वे उड्डाण पूल आणि 3 पुलांचे काम करण्यात येणार आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेशाकरिता 3000 कोटीची भरीव तरतूद केली आहे. ती मुंबईच्या विकासासाठी उपयुक्त ठरणार आहे. त्याचबरोबर मुंबई शहर व उपनगरातील जनतेसाठी महत्वाच्या असलेला आरोग्याच्या प्रश्नाबाबत शासनाने जे.जे. हॉस्पिटलला सुपर स्पेशॉलिटीचा दर्जा देण्यासाठी 630 कोटीची तरतूद केली आहे त्याच धर्तीवर केईएम, सायन आणि भगवती सारख्या मोठ्या हॉस्पिटल्स साठी देखील आवश्यक तो निधी दिला पाहिजे अशी मी सूचना करते.

श्री. पांडुरंग फुंडकर : महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण अत्यंत महत्वाचे मुद्दे सभागृहात मांडत आहेत पण संबंधित खात्याचे मंत्रीच सदनात उपस्थित नसल्याने त्या मुद्यांची नोंद कोण घेत आहे याची माहिती सभागृहाला मिळावी अशी माझी सूचना आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, जे.जे. प्रमाणे सेंट जॉर्जेस रुग्णालयाचा परिसर देखील मोठा असून त्याचा सुयोग्य वापर करुन घेतला तर टाटासारखे एक मोठे कॅन्सरवर आधुनिक पध्दतीने उपचार करणारे हॉस्पिटल येथे उभे राहू शकते, यादृष्टीने शासनाने विचार करावा. कारण या कामासाठी शासनाला वेगळी तरतूद करण्याची आवश्यकता नाही तर मुंबई महापालिकेचे बजेट जवळपास 26 हजार कोटीचे आहे आणि आम्ही वारंवार मागणी करीत आलो की, कॅन्सरवर आधुनिक उपचार करणारे हॉस्पिटल शासनाच्या किंवा महापालिकेच्या वतीने सुरु करावे, याचाही विचार होणे आवश्यक आहे.

यानंतर मुंबई, ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील करंजा व अर्नाळा जि. ठाणे येथील बंदर विकासासाठी शासनाने 28 कोटीची तरतूद केली आहे. तसेच नाबार्डच्या माध्यमातून 16 ठिकाणी जेट्टी उभारणे, मच्छीमारीचे आधुनिकीकरण, यांत्रिकीकरण, मासे साठविणे आणि वाहतूक इ. कामांसाठी 98 कोटी 8 लाखाची तरतूद केली आहे, हे कोळी बांधवांसाठी उपयुक्त ठरणार आहे. त्याचबरोबर जलक्षेत्र सुधार प्रकल्पासाठी 400 कोटीची तरतूद केली असून मुंबई, ठाणे, रायगड पासून रत्नागिरी व कोकणपर्यंतचा जो समुद्र किनारा आहे त्या भागातील मच्छीमार व्यावसायिकांना त्याचा चांगला फायदा होईल म्हणून ही तरतूद खूप महत्वाची आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

महोदय, नगरविकास व गृह निर्माण हा तिसरा महत्वाचा प्रश्न असून सबंध राज्यात देखील घरांचा प्रश्न महत्वाचा बनलेला आहे. शहरी गरिबांना मुलभूत सुविधा पुरविण्यासाठी केंद्र व राज्यांनी मिळून एकूण 867.89 कोटीची तरतूद केली आहे. तसेच एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमासाठी 413.13 कोटी एवढा राज्याचा हिस्सा असून शासनाने ती तरतूद केली आहे. तसेच 50 टक्क्यापेक्षा जास्त अनुसूचित जातीचे रहिवासी असलेल्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या लोकांना नागरी सुविधा विकसित करणे यासाठी देखील 60 कोटीची तरतूद केली आहे.

महोदय, जेएनएनयुआरएम अभियान राबविण्यासाठी 2200 कोटीची तरतूद शासनाने केली आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महा अभियान अंतर्गत 250 कोटीची तरतूद केली आहे. त्यातून 75 हजार घरे मुंबईत बांधण्यात येतील व ती खऱ्या अर्थाने मुंबईतील लोकांसाठी बांधण्यात येतील. कारण घरांच्या किमती आज प्रचंड वाढलेल्या आहेत. त्याचबरोबर नवीन टॅक्स, मालमत्ता कर किंवा पाणी पट्टी यांच्या दरात सुध्दा वाढ झालेली आहे, ही बाब खरोखरच चिंताजनक आहे. त्याचा परिणाम असा होतो की, मुंबईच्या माणसाला स्वत:च्या घरात राहण्याचे सुध्दा सुख मिळत नाही. तो स्वत:च्या घरात राहत असतानाही त्याला भाड्याच्या घरात राहतो की काय असे वाटते इतके टॅक्सेस त्याला भरावे लागतात, याचाही शासनाच्या पातळीवर विचार होणे आवश्यक आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

त्या व्यक्तीचा स्वत:च्या मालकीचा फ्लॅट असला तरी त्याला प्रॉपर्टी टॅक्स आणि इतर टॅक्सेस भरावे लागत असल्यामुळे आपण स्वत:च्या घरात राहतो आहे की, भाडयाच्या घरात राहतो आहे असा प्रश्न पडत असतो त्यामुळे यासंदर्भात विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, गरिबांना 3 महिन्याचे धान्य एकाच वेळी देण्यात येणार आहे. मुंबईमध्ये बीपीएलचे कार्ड धारक खूप कमी असल्यामुळे मुंबई किंवा मुंबईच्या परिसरातील रेशनिंगच्या दुकानात धान्य मिळत नाही. मुंबईतील गरीब वस्त्यांमध्ये राहणा-या लोकांना तीन महिन्याचे धान्य मिळाले तर चांगली गोष्ट होऊ शकेल.

सभापती महोदय, मराठी भाषेचा विकास करण्यासाठी तसेच मराठी भाषा, मराठी संस्कृती, तसेच मराठी संस्कार जपण्यासाठी अर्थसंकल्पात 15.60 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागात मराठी संस्कृतीची जोपासना करण्यासाठी 5 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. बेळगाव किंवा त्या ठिकाणी राहणा-याना निश्चित मदत होऊ शकेल व त्यामुळे ही बाब मला खूप उल्लेखनीय वाटते.

सभापती महोदय, घरेलू कामगार कल्याण योजनेकडे आपल्या सर्वांचे दुर्लक्ष होत असते. घरेलू कामगार हा घटक सर्वात दुर्लक्षित आहे. घरात काम करणारी बाई एक दिवस आली नाही तर नोकरी करणा-या महिलांची फार तारांबळ उडत असते. परंतु ज्या महिला घरकाम करतात त्यांच्या श्रमाची मात्र कोणीही दखल घेत नाहीत. परंतु घरेलू काम करणा-या महिलांची दखल अर्थसंकल्पात घेतल्यामुळे ही सर्वात उल्लेखनीय बाब असून यासाठी 6.50 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतुदीचा घरेलू कामगार महिलांना नक्कीच फायदा होईल.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानासाठी 2088.26 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे ती फार उपयुक्त आहे.

सभापती महोदय, शालेय पोषण आहार, औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी तरतूद करण्यात आलेली आहे ही बाब अतिशय उल्लेखनीय आहे. ज्या ठिकाणी आदिवासी मोठया प्रमाणात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

आहेत अशा नंदूरबार येथे मेडिकल कॉलेज होणार असल्यामुळे आदिवासी मुलांना मेडिकल कॉलेजचा उपयोग होऊ शकेल.

सभापती महोदय, गहू, तांदूळ, डाळी, हळद, मिरची, खजूर, चहा, प्रोजन मास, फळे, घाण्यावरील तेल या जीवनावश्यक वस्तूंना करामध्ये सूट देण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे स्त्रियांना लागणाऱ्या काजळ, रिबीन, बो,सॅनेटरी नॅपकिन अशा वस्तुवंर सूट दिलेली आहे. परंतु गॅसवर 5 टक्के वाढ केल्यामुळे महाराष्ट्रातील महिलांनी यासंदर्भात नाराजी व्यक्त केलेली आहे. माननीय अर्थमंत्र्यांनी गॅस वाढ मागे घेतली तर तमाम महिला वर्ग त्यांच्या पाठीशी उभा राहील. महागाई प्रचंड वाढल्यामुळे लोकांना गॅसचा भार आता सहन होणार नाही. महागाईमुळे कष्टकरी व मध्यमवर्गीय महिला पिचून गेलेली आहे त्यामुळे गॅसच्या किमतीच्या संदर्भात शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे. ज्या लोकांकडे दोन दोन गॅसचे सिलेंडर आहेत अशा लोकांच्या गॅसवरील किमती कमी केल्या नाही तर एक वेळ चालेल परंतु ज्यांच्याकडे एक सिलेंडर आहे अशाचा निश्चितपणे विचार व्हवावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बालकामगार विरोधी प्रचारासाठी 10 कोटी रुपये देणार आहोत. लहान मुलांना मजुरी का करावी लागते याबाबतीत शासनाने थोडा विचार करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात केवळ जाहिरात करुन चालणार नाही. बालकामगारांच्या प्रचारासाठी 5-10कोटी रुपये खर्च करण्यापेक्षा मुंबई शहरात 4.5 लक्ष मुले बेवारस असून रस्त्यावर भीक मागणे किंवा हॉटेलमध्ये काम करणे अशा प्रकारची कामे त्यांना करावी लागतात, अशा बालकांना कशाचाही सहारा नाही.

यानंतर श्री. भारवि...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

त्यांच्या पालनपोषणाची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. चेंबूर येथे बालकल्याण नगरीची प्रचंड मोठी जागा आहे. पूर्वी तेथे अडीच ते तीन हजार मुले रहात होती. अशा मुलांच्या संगोपनाची जबाबदारी परित्यक्ता महिलांना दिली तर दोघांचाही प्रश्न सुटू शकेल. आपण येथे 5 ते 10कोटी रूपयांची तरतूद केली आहे. तिचा खरा अर्थाने उपयोग होऊ शकेल. सुटलेला बाण आणि वाढलेला भाव याला माघार ठाऊक नसते. त्यामुळे गॅसची जी भाववाढ झाली आहे ती मागे घ्यावी अशी विनंती करते आणि अर्ध राहिलेले माझे भाषण संपविते.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री आणि वित्त मंत्री यांनी सन 2012-2013 चा जो अर्थसंकल्प सादर आहे तो खऱ्या अर्थाने राज्याला आर्थिक चालना देणारा आहे. कृषी, आधुनिकीकरणाची गती वाढविणार आहे, असे म्हटले तर वावगे होणार नाही.

या अर्थसंकल्पाद्वारे माननीय वित्त मंत्र्यांनी अनेक चांगल्या गोष्टी आपल्या समोर आणल्या आहेत. अनेक नवीन योजना आपल्या राज्याला दिल्या आहेत. अनेक नवीन उपक्रम हातामध्ये घेतले आहेत.

स्व.श्री.यशवंतराव चव्हाण साहेबांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. त्याला साजेसा आणि त्यांच्या नावाला शोभून दिसेल अशा पद्धतीचा हा अर्थसंकल्प आहे. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांच्या नावाने या अर्थसंकल्पामध्ये 100 कोटी रूपयांची तरतूद माननीय वित्त मंत्र्यांनी केली आहे, त्याचे निश्चितपणाने स्वागत केले पाहिजे. स्व.यशवंतराव चव्हाण साहेबांचे सर्व समाजाला पुढे घेऊन जाण्याचे धोरण होते. तळागाळातील लोकांना पुढे आणण्याचे धोरण होते. तशाच पद्धतीचे धोरण या अर्थसंकल्पामध्ये माननीय वित्त मंत्र्यांनी घेतलेले आहे.

पारधी समाजाला आदिवासी उपयोजनेमध्ये घेतले आहे. पारधी समाज हा भटका आहे. गावकुसा बाहेर असणारा हा समाज आहे. या समाजाकडे एका वेगळ्या नजरेने पाहिले जाते. अशा समाजाला न्याय देण्याचे काम, एकत्रित आणण्याचे काम माननीय वित्त मंत्र्यांनी केले आहे. या समाजाची मुख्य अडचण घरांची होती. या समाजाला स्वत:ची ओळख निर्माण करून देण्याचा प्रयत्न यंदाच्या अर्थसंकल्पातून झालेला आहे. पारधी समाजातील लोकांना घरकुलांसाठी, शेती साहित्य देण्यासाठी तसेच त्यांच्या बेरोजगार तरूणांना मदत करण्यासाठी 25 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. त्याचे आपण निश्चितपणाने कौतुक केले पाहिजे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रामध्ये शिक्षणाची गंगा आणली. ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचा प्रसार केला. बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्व पटवून दिले. अशा कर्मवीर भाऊराव पाटीलांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली होती. त्यासाठी पाच कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, त्यांच्या गावामध्ये अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या प्रती आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे....

सामाजिक जाण आणि भान असणारा हा अर्थसंकल्प आहे हे ही मी येथे निश्चितपणाने सांगू इच्छितो. शिक्षणा संबंधी अनेक गोष्टी जाहीर केल्या आहेत. अलिबाग, नंदूरबार, सातारा, मुंबई येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ही अतिशय चांगली आणि आनंदाची गोष्ट आहे. पण याचबरोबर माननीय अर्थमंत्र्यांना आणि माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, एकीकडे नवीन महाविद्यालये काढत असताना शासनाच्यावतीने ग्रामीण भागामध्ये जी महाविद्यालये आहेत, त्यांची आज काय अवस्था आहे, तेथे कोणत्या गोष्टींचा तुटवडा आहे याकडे लक्ष दिले तर फार बरे होईल. मी बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई येथून निवडून येतो. आमच्या मराठवाड्यामध्ये अगोदर औरंगाबादला महाविद्यालय झाले, त्यानंतर अंबेजोगाई येथे झाले. पण आज अंबेजोगाई येथील महाविद्यालयातील अनेक विभाग बंद पडले आहेत. धुळ्याच्या बाबतीत सुध्दा तशीच स्थिती आहे. मी अंबेजोगाईच्या बाबतीत उदाहरण दिले. धुळे किंवा अन्य भागातील जी वैद्यकीय महाविद्यालये आहेत, त्यांच्याकडे आपण कधी लक्ष देणार आहात हा खरा प्रश्न आहे. तसेच यासाठी काय तरतूद करणार आहात? तसेच यासाठी केवळ तरतूद करुन भागणार नाही तर तेथील जे कर्मचारी असतील किंवा प्रोफेसर असतील किंवा तेथील डॉक्टर असतील यांची पदे देखील भरण्यात आलेली नाही. कारण ग्रामीण भागामध्ये कोणी राहण्यास तयार होत नाही ही खरी यातील अडचण आहे. याबाबतीत आपण निश्चितपणे निर्णय घेऊन ग्रामीण भागातील जी वैद्यकीय महाविद्यालये आहेत त्यांच्याबाबतीत लक्ष द्यावे. तेथील अनेक विभाग बंद होत आहेत, तेथील मशिनरी बंद पडत आहे. या गोष्टी सुरु करण्याच्या दृष्टीकोनातून जर आपण काही तरतूद करु शकलो तर ते योग्य होईल आणि ग्रामीण भागाला न्याय देणे, विकास करणे हे स्व.यशवंतरावजी चव्हाण यांचे स्पप्न होते ग्रामीण भागाला न्याय देणे, विकास करणे ते सुध्दा निश्चितपणे या माध्यमातून पूर्ण झाल्याशिवाय रहाणार नाही.

सभापती महोदय, याच बरोबर मी आपल्याला एक गोष्ट सांगू इच्छितो की, याठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त करीत असताना विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांबाबत काही गोष्टींचा उल्लेख करण्यात आला. याठिकाणी मी सांगू इच्छितो की, या अर्थसंकल्पामध्ये दुधाळ जनावरांच्या वाटपाच्या माध्यमातून न्याय देण्याचे थोडेसे काम झालेले आहे. यामध्ये सर्वसामान्य लाभार्थ्यांसाठी 50 टक्के लाभ द्यावयाचा आणि अनुदान द्यावयाचे. तसेच अनुसूचित जाती, जमातीच्या लोकांना 75 टक्के सवलतीचा लाभ द्यावयाचा अशी एक चांगली योजना आणली असून त्यासाठी 35 कोटी 65 लाख रुपयांची तरतूद माननीय अर्थमंत्र्यांनी केलेली आहे. पण मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, माननीय अर्थ राज्यमंत्री विदर्भातील आहेत. त्यामुळे त्यांनी अर्थ राज्यमंत्री म्हणून दुधाळ जनावरांच्या बाबतीत विदर्भाकडे जास्त लक्ष देणे गरजेचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे . . . .

मी आपल्या माध्यमातून सरकारला सांगू इच्छितो की,त्यांनी जरा याकडे लक्ष द्यावे. विदर्भामध्ये दुधाचे जे संकलन होत आहे हे मी आपल्या माहितीसाठी सांगतो. सभापती महोदय, नागपूरला जिल्ह्यामध्ये फक्त 8 हजार लि., वर्धा येथे 5 हजार लि.चंद्रपूरला 4 हजार लि., गडचिरोलीला 1 हजार लि., गोंदियाला 5 हजार लि.,अमरावतीला 4 हजार लि., यवतमाळला दीड हजार, वाशिमला 1 हजार लि., बुलढाणा येथे 1 हजार लि., अकोला येथे 4 हजार लि. भंडारा येथे थोडी बरी परिस्थिती असून तेथे 50 हजार लिटर संकलन आहे हे सगळे गृहीत धरले तरी संपूर्ण विदर्भामध्ये 1 लाखापर्यंत दुधाचे संकलन होत नाही. मघाशी आम्ही माननीय मंत्री महोदयांबरोबर एकत्र बोलत होतो. त्यावेळी मी त्यांना विचारले की, नगर जिल्ह्यामध्ये दूधाचे संकलन किती आहे हे जर आपण पाहिले तर साधारणपणे 14 ते 15 लाख लि.प्रतिदिन संकलन होत आहे. पुण्यामध्ये 21 लाख लिटर्स इतक्या दुधाचे संकलन होत आहे. मग यामध्ये नगर असेल, पुणे असेल किंवा सांगली असेल, सातार असेल, सोलापूर असेल अगदी माझा बीड जिल्हा आहे तेथे सुध्दा पाच ते सहा लाख लि.प्रतिदिन दूध संकलन होते. एवढ्या मोठ्या प्रमाणात या भागांमध्ये दुधाचे संकलन होत आहे आणि आपण विदर्भामध्ये एक लाखापर्यंत सुध्दा दूध जमा करु शकत नाही. त्यामुळे आपण या गोष्टीवर भर दिला तर ते चांगले होईल.

सभापती महोदय, मला एक गोष्ट पक्की महिती आहे की, माननीय अर्थ राज्यमंत्री महोदयांनी विदर्भाच्या संदर्भातील भूमिका माननीय अर्थमंत्र्यांकडे मांडली तर ते त्यांचा शब्द टाळू शकणार नाहीत. त्यामुळे विदर्भातील दूधाचे प्रमाण कसे वाढेल यासाठी आपल्याल काही योजना करता येईल काय ? काही विशेष पॅकेज करता येईल काय ? तसेच त्याठिकाणी शेतकरी आत्महत्या करीत आहेत, यासाठी तेथे जोडधंदा निर्माण करता येईल काय यादृष्टीने प्रयत्न करावेत. कालच माझ्याकडे अकोल्याचे सर्व दूध उत्पादक संघाचे लोक आले होते.

यानंतर श्री.अ.शिगम . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे..

अकोला येथील दूध संकलन केंद्र बंद पाडण्याचा प्रयत्न अधिकारी करीत असून तेथे खाजगी दूध संकलन कसे वाढेल यासाठी ते प्रयत्नशील आहेत. अधिकारी कोणाची सुपारी घेऊन काम करीत आहेत हे मला माहीत नाही. सभापती महोदय, आपण आणखी थोडा वेळ वाढवून द्यावा अशी विनंती आहे. हा विदर्भातील प्रश्न आहे. तेव्हा जे अधिकारी असा प्रकार करीत असतील त्यांना आपण अटकाव केला पाहिजे हे मी या ठिकाणी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये कोरडवाहू शेतीसाठी चांगली तरतूद केलेली आहे. पहिल्यादांच अर्थसंकल्पामध्ये कोरडवाहू शेतीसाठी तरतूद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्यात जवळपास 55 टक्के कोरडवाहू शेती आहे. त्यामध्ये धान्य, कडधान्य, तेलबिया इत्यादींचा समावेश आहे. सरकारने कोरडवाहू शे्तीसाठी तरतूद केलेली आहे, परंतु माझी मागणी आहे की, या व्यतिरिक्त आणखी काही गोष्टी करण्याची आवश्यकता आहे. त्या गेल्यास कोरडवाहू शेतकऱ्यांना फार आनंद होईल. मी अगोदर सांगितल्या प्रमाणे महाराष्ट्रात 55 टक्के कोरडवाहू भाग आहे. तेव्हा त्यासाठी एक वेगळा संचालक नेमून त्यांच्यामार्फत काही योजना राबविल्यास कोरडवाहू शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकतो. माझ्या माहिती प्रमाणे माननीय केंद्रीय कृषी मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेब कोरडवाहू शेतीसाठी फार मोठे प्रयत्न करीत आहेत. त्याकरिता एक वेगळे महामंडळ कसे स्थापन करता येईल यासाठी ते विविध तज्ज्ञांशी चर्चा करीत आहेत. त्यातील काही लोकांशी मी स्वत: बोललो आहे. कोरडवाहू शेतकऱ्यांना विमा संरक्षण दिल्यास त्यांना दिलासा मिळेल. त्या शिवाय कोरडवाहू शेतीसाठी विभाग निहाय संशोधन केंद्र उभारल्यास त्याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर फायदा होऊ शकतो.

सभापती महोदय, पर्यटनासाठी 228 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सीवर्ल्ड करण्यासाठी तरतूद केलेली आहे. यामध्ये मला एक भीती दिसते की, त्यामध्ये रस्त्याची सुधारणा असा देखील उल्लेख आहे. मी कोणाचे नाव घेत नाही. फक्त उदाहरण देतो. एका पर्यटनस्थळासाठी मोठ्या प्रमाणावर तरतूद करताना त्यामध्ये गावाचे नाव आणि इतर असा उल्लेख करण्यात आला होता. परंतु नंतर सर्व निधी रस्त्याच्या कामावर खर्च झाला आणि ज्यासाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे..

तरतूद करण्यात आली होती तो विषय बाजूला राहिला. तेव्हा पर्यटनासाठी जी तरतूद करण्यात आलेली आहे त्या बाबत असेही होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, मुंबई आणि विदर्भामध्ये प्राणी संग्रहालय करण्याचा उल्लेख अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेला आहे. मुंबईकडे पर्यटनाच्या दृष्टीने आणि मनोरंजनाच्या दृष्टीने खास लक्ष देण्याची आवश्यकता आहे. कारण मुंबई शहरात राज्यांतील, इतर राज्यांतील तसेच परदेशातील पर्यटक येत असतात. परंतु मुंबई शहरामध्ये एखाद-दुसरे पर्यटन स्थळ सोडल्यास अन्य कोणतेही पर्यटन स्थळ नाही आणि मनोरंजनाचे साधन नाही. मुंबईत फक्त राणीचा बाग आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे....

या राणीच्या बागेच्या बाबतीत महानगरपालिकेचे अनेक वर्षापासून गुऱ्हाळ सुरु आहे, हे डॉ. दीपक सावंत यांना माहीत आहे. म्हणून या बाबतीत प्रयत्न होणे गरजेचे आहे. सभापती महोदय, या सगळया गोष्टी पैशाच्या बाबतीत असताना या ठिकाणी एक महत्वाचा प्रश्न आहे. या राज्यात उद्योग करावयाचे असतील किंवा कोणत्याही योजना करावयाच्या असतील तर त्यासाठी वीज पाहिजे. डिसेंबर, 2012 ला महाराष्ट्र लोडशेडिंग मुक्त करण्यात येईल अशी माननीय ऊर्जा मंत्र्यांनी घोषणा केली होती त्यासाठी ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या निश्चितपणे स्वागतार्ह आहेत.

सभापती महोदय, सीमा भागातील मराठी बांधवाकरिता भाषण संस्कृती जोपासण्याकरिता पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्याचबरोबर सीमा भागातील शिक्षण संस्थांना आणि शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना न्याय मिळत नाही. कर्नाटकमधील मराठीच्या अनेक शिक्षण संस्था बंद पडत आहेत कारण कर्नाटक शासन त्यांना मदत करत नाही याकडे शासनाने लक्ष देणे आवश्यक आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण थोडक्यात पूर्ण करावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी पाच मिनिटात माझे भाषण पूर्ण करतो.

उप सभापती : आपले भाषण सुरु होऊन 20 मिनिटापेक्षा जास्त वेळ झालेला आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी पाच मिनिटात माझ भाषण पूर्ण करतो. भाई कोतवाल यांच्या स्मारकाकरिता एक कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. भाई कोतवालांच्या कार्यक्रमाकरिता पहाटे 4.00 वाजता मी स्वत: माथेरानला गेलो आहे. त्यासाठी एक कोटी तरतूद केलेली आहे ती अपेक्षित आहे परंतु याच बरोबर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाकरिता आपण इंदू मिलची जागा घ्यावयास निघालो आहोत ही जागा केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग विभागामार्फत घ्यावयाची असेल तर त्यासाठी काय तरतूद करण्यात आली आहे? त्यासाठी एकाही पैशाची तरतूद करण्यात आलेली नाही. या संदर्भात आपण माननीय पंत प्रधान यांना भेटलो आहोत म्हणून त्यासाठी तरतूद करणे अत्यंत गरजेचे आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाची घोषणा माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेली आहे. छत्रपती शिवाजे महाराजांचे अरबी समुद्रात स्मारक उभे करण्याकरिता जे आर्किटेक्चर नेमले आहेत ते पैशासाठी आणि अन्य गोष्टीसाठी अडून आहेत. त्याच्यासाठी तरतूद होणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे. .. .

प्र. पाटील अर्थमंत्री असताना रायगड किल्ल्याच्या पायथ्याशी शिवसृष्टी उभी करण्याची घोषणा केलेली होती. त्याला अनेक वर्षे झालेली आहेत त्यासाठी सुध्दा तरतूद करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, मला कल्पना आहे की, महसुलामध्ये थोडीशी तूट झालेली आहे ही तूट भरुन काढण्याकरिता लक्ष देणे गरजेचे आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पूर्ण करावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी माझे भाषण दोन-तीन मिनिटात साधारणपणे 1.52 वाजता संपवितो.

उप सभापती : सन्माननीय सदस्य तालिका सभापती आहेत त्यामुळे त्याला वेळेच्या मर्यादेची कल्पना आहे. आपल्या भाषणासाठी आणखी वेळ लागणार असेल तर राष्ट्रवादी पक्षाकडून बोलणाऱ्या एक-दोन सदस्यांची नावे कमी करावयाची का?

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मला बोलावयाचे आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना देण्यात आलेला वेळ संपलेला आहे कृपया आपण खाली बसावे. यानंतर श्री. मनिष जैन यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, मी आपल्यावर आक्षेप घेत नाही पण हे बरोबर नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन (जळगाव स्थानिक प्राधिकाकरी संस्था) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर बोलण्याची मला परवानगी दिली त्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय राज्य मंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी या सभागृहाला अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन ....

या अर्थसंकल्पामध्ये महत्वाचे जे मुद्दे आहेत त्याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. आज आपल्याकडे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर आहे. या संदर्भात आपल्याकडे कायदा आहे. मी असे ऐकले आहे की, आपण जवळपास 18 हजार विहिरींना परवानगी देत आहोत. या 18 हजार विहिरींना परवानगी देताना आपल्याला 18 हजार नवीन कनेक्शन्स द्यावे लागतील. आपण नवीन कनेक्शन्सच्या संदर्भात काय विचार करीत आहात ? आपण जेवढ्या विहिरी देणार तेवढे कनेक्शन्स सुध्दा देणार आहात का आणि त्याची तरतूद शासन करणार आहे का ? त्याचबरोबर आपल्याला कायद्यामध्ये सुध्दा सुधारणा करावी लागेल. कायद्याप्रमाणे बोअरवेल 200 फुटापर्यंत करण्याची परवानगी आहे. आज 200 फूटच नाही तर 250 फुटापर्यंत सुध्दा पाणी लागत नाही. जर 250-300 फुटापर्यंत पाणी लागत नसेल तर 200 फुटाची जी आपली परवानगी आहे त्याबाबत पाठपुरावा करुन त्यामध्ये सुध्दा वाढ करावयास पाहिजे. आता उन्हाळा सुरु झालेला आहे. उन्हाळ्यामध्ये पाण्याच्या खूप समस्या निर्माण होतात. त्या समस्या कशा मार्गी लागतील या दृष्टीने शासनाने तरतूद केली पाहिजे. त्या बाबतीत संबंधित खात्याला सांगितले पाहिजे.

सभापती महोदय, एक्साईजच्या संदर्भात मागच्या 13 दिवसांपासून भारतातील आणि महाराष्ट्रातील सर्व ज्वेलर्स, कारागीर, हातकाम करणारे कारागीर, आमचे सुवर्णकार बंधू संपावर आहेत किंवा त्यांनी दुकाने बंद केलेली आहेत. एक्साईजचा विषय आपल्याकडे येत नाही परंतु मी महाराष्ट्र शासनाला निवेदन करतो की, त्यांची समस्या फार जेन्युईन आहे. मागच्या एक महिन्यात सोन्यावर 1 टक्के कस्टम ड्युटी होती ती 2 टक्के करण्यात आली आणि 2 टक्केवरुन 4 टक्के करण्यात आली. त्या बाबत आमचा कोणताही विरोध नाही पण त्यावर जे सरकारराज, लायसन्सराज सुरु होते त्या अधिकारीराजला त्यांचा विरोध आहे. त्यांचे इतरही काही मुद्दे आहेत. त्यांचे सर्व मुद्दे आपण समजून घ्यावेत. त्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना, माननीय अर्थ मंत्र्यांना निवेदन दिलेले आहे. त्यांचे निवेदन वाचून त्याचा पाठपुरावा करुन ते आपण केंद्रीय अर्थमंत्र्यांकडे किंवा केंद्र शासनाकडे पाठवावे अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, हे जे व्यापारी असतात ते आपल्याला कर देतात. कराशिवाय आपल्याला या ठिकाणी खर्च करणे अशक्य आहे. परंतु त्यांच्या खूप समस्या असतात. माननीय मंत्री महोदय

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन ....

श्री. राजेंद्र दर्डा साहेब सुध्दा व्यापारी आहेत. ते या सभागृहामध्ये व्यापारी म्हणून नाही तर एक समजदार, जाणकार मंत्री म्हणून शासनाचे प्रतिनिधित्व करतात. व्यापाऱ्यांना रिफंडच्या बाबतीत फार अडचणी येतात. तीन चार वर्षे रिफंडचे पैसे येत नाहीत. हे सर्वसामान्य व्यापाऱ्यांचे पैसे आहेत त्याचबरोबर एसईझेडमध्ये जे एक्स्पोर्ट युनिट्स आहेत त्या 100 टक्के एक्स्पोर्ट ओरिएंटेड युनिट्सला सुध्दा व्हॅट भरावा लागतो. ते कायद्यानुसार व्हॅट भरतात पण एसईझेडच्या त्या युनिट्सला सुध्दा तीन-चार वर्षे रिफंडचे पैसे मिळत नाहीत. ते व्यापारी स्थानिक मार्केटमध्ये माल विकत नाही तरी सुध्दा त्यांना भरपूर त्रास होतो. व्यापाऱ्याचे इतरही अनेक प्रश्न आहेत. 'सी' फॉर्मच्या बाबतीत प्रश्न आहे. एम व्हॅटमध्ये तसेच टीम कॅन्सलेशनच्या बाबतीत सुध्दा प्रश्न आहे. त्यांच्या भरपूर समस्या आहेत. आपण सर्व जाणकार आहात याची मला माहिती आहे. आपण सर्व समजून घ्याल अशी अपेक्षा करतो.

मला प्रामुख्याने असे सांगावयाचे आहे की, रिफंडची जी रक्कम आहे ती जवळपास 12 हजार कोटी रुपयांची आहे. आपण एका ठिकाणी उद्योजकांसाठी जवळपास 50 टक्के व्याज माफ केलेले आहे. त्याबद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. उद्योगांसाठी 50 टक्के व्याज माफ करण्याचा एक चांगला निर्णय घेतलेला आहे. पण आपले अंदाजे 12 हजार कोटी रुपये व्हॅट रिफंडमध्ये अडकलेले आहेत. त्या बाबतीत काही उपायोजना केली तर शासनाला पैसे मिळतील. शासनाला पैसे पाहिजेत कारण शासन व्याजाने पैसे घेते. जवळपास अठरा ते साडेअठरा हजार कोटी रुपयांचे व्याज आपण देतो. माझ्या माहितीप्रमाणे सेल्स टॅक्स किंवा व्हॅट खात्याच्या 35 ते 36 हजार केसेस चालू आहेत. परवा अर्थसंकल्पाच्या भाषणात थकीत वीज बिलाबाबत सांगितले. ते बिल कसे बाकी आहे वगैरे मी सांगणार नाही. परंतु जे वीज बिल थकीत आहे त्यांना आपण व्याजामध्ये 50 टक्के सूट देत आहोत. तशा पध्दतीची सूट जर आपण या ठिकाणी सुध्दा दिली तर व्यापाऱ्यांकडून पैसे येतील आणि शासनाला खर्च करावयास मिळतील तसेच व्याजाचा बोजा कमी होऊन रिफंड जास्त मिळेल किंवा ज्या ठिकाणी कामे अपूर्ण आहेत त्या ठिकाणी आपल्याला पैसे खर्च करता येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मनिष जैन ....

सभापती महोदय, आपल्या महाराष्ट्रामध्ये फार चांगले मायनिंग सेक्टर आहे. या ठिकाणी कोल आहे, लाईमस्टोन आहे, मॅगनिज आहे, बॉक्साईट आहे तसेच आयर्नओर आहे. मागच्या काही काळामध्ये आपण पाहतो की, खदानीमुळे अनेक घोटाळे किंवा प्रश्न निर्माण झाले आहेत. गोव्यामध्ये प्रश्न निर्माण झाले. कर्नाटक राज्यात एका मुख्यमंत्र्यांना राजीनामा द्यावा लागला. हा प्रश्न आपल्या महाराष्ट्रात येऊ नये म्हणून योग्य भूमिका घेऊन, मायनिंगवर बरोबर नियंत्रण करुन, बरोबर टॅक्सेशन लावले तर ते योग्य होईल. त्यामुळे आपल्या महाराष्ट्राचे उत्पन्न वाढेल आणि आपला फायदा होईल.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मनिष जैन...

सभापती महोदय, घरगुती गॅसवर सरकारने 5 टक्के टॅक्स लावल्याबद्दल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपली मते मांडलेली असल्यामुळे मी त्याबाबत बोलणार नाही. परंतु मी सीएनजीबाबत जरुर बोलणार आहे. महाराष्ट्र सरकारला सीएनजी आयात करावा लागतो. या गॅसवर शासनाने आता 5 टक्के व्हॅट लावला आहे. वास्तविक सीएनजी हा गॅस गोरगरीब लोक टॅक्सीमध्ये व रिक्षामध्ये भरतात. त्यामुळे या गॅसवर प्रक्रिया केली पाहिजे. आपण ग्लोबल वॉर्मिंगबाबत बोलत असतो. शासनाने पेट्रोल व डिझेल कारवर 2 टक्के कर लावला आहे. त्याची मी स्वागत करतो. केंद्र शासनाने जे केले आहे त्याच पध्दतीने राज्य शासनाने डिझेल गाडीवर 2 टक्के कर लावला आहे. पण सीएनजी वर लावलेला कर कमी करावा. लोक त्याचे स्वागत करतील. कारण या गॅसचा वापर गरीब लोक अधिक करीत असतात. गरीब लोकांची वाहने सीएनजीवर आधारित असतात. शासनाने सीएनजी किटवरील 2 टक्के कर माफ केलेला आहे. त्याप्रमाणे सीएनजीवर लावलेला कर माफ केला तर त्याचा अधिक फायदा होईल.

सभापती महोदय, बिडीवर शासनाने कर लावला आहे. परंतु सिगरेट व अल्कोहोलवरील कर वाढविलेला नाही. त्याचे कारण मी समजू शकतो. अल्कोहोलचा खप कमी झाल्यामुळे या वर्षी अल्कोहोलवरील कर वाढविलेला नाही असे काही वर्तमानपत्रातून छापून आलेले आहे. राज्यामध्ये अल्कोहोलवरील कर वाढविला तर काहीच हरकत नाही. त्याचा खप कमी झाला तर त्यापासून होणाऱ्या दुष्परिणामापासून लांब राहू.

आमच्या खानदेशातील पाटबंधारे प्रकल्प, रस्त्यांसाठी व धुळे-नागपूर पर्यंतच्या रस्त्याचे चौपदरीकरणासाठी साधारणपणे 300 कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित केलेला आहे. त्याबद्दल मी शासनाचे आभार मानतो. 7820 कि.मी.च्या रस्त्यांसाठी शासनाने 2899 कोटी रुपये दिलेले आहेत. परंतु शेततळे किंवा पाटबंधाऱ्यावर खर्च करीत असताना नवीन प्रकल्प न घेता अपूर्ण असलेल्या प्रकल्पांवर खर्च होणे आवश्यक आहे. जे प्रकल्प कमी खर्चात होऊ शकतात जसा शिरपूर पॅटर्न आहे अशा प्रकल्पांवर खर्च केला तर त्याचे स्वागतच होईल. आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून मी माझे भाषण वेळेमध्ये पूर्ण करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार व माननीय अर्थ राज्यमंत्री श्री.राजेंद्र मुळक यांचे अभिनंदन करतो. संपूर्ण जगामध्ये मंदीची लाट असताना प्राप्त परिस्थितीमध्ये समतोल साधरणारा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे त्याबद्दल माननीय अर्थ मंत्र्यांचे जेवढे अभिनंदन करावे तेवढे थोडे आहे.

सभापती महोदय, मी 1980 साली स्वत:चा उद्योगधंदा सुरु करण्याचे ठरविले होते. त्यावेळी एका चांगल्या उद्योगपतींनी मला असे विचारले होते की, आज तुम्ही किती कमवित आहात ? मी त्यावेळी त्यांना काही रक्कम सांगितली होती. त्यावर त्यांनी मला असे विचारले की, या पैशामध्ये तुझे भागते काय, त्यावर मी नाही असे उत्तर दिले होते. मग तु तुझा खर्च कसा भागवितो असे विचारल्यावर मी माझा खर्च कमी करण्याचा प्रयत्न करतो असे उत्तर दिले होते. त्यावर त्यांनी मला असे सांगितले की, तुला मोठे व्हावयाचे असेल, तुझे उत्पन्न वाढवावयाचे असेल तर खर्च कमी करण्याचा विचार कधी करु नको. आपले उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष दिले पाहिजे अशा प्रकारचे त्यांनी मला मार्गदर्शन केले. त्यामुळे मी आज येथेपर्यंत पोहोचलो आहे.

सभापती महोदय, या राज्यात ज्यावेळी अर्थसंकल्प सादर केला जातो त्यावेळी अनेक सन्माननीय सदस्यांकडून अनेक खर्चाच्या गोष्टी केल्या पाहिजेत असे सांगितले जाते. या सर्व गोष्टींची पूर्तता करावयाची झाल्यास शासनाला 1 लाख कोटींचा अर्थसंकल्प सादर करावा लागेल. अर्थसंकल्पावर बोलत असताना राज्याचा महसूल वाढविण्यासाठी कोणत्याही सन्माननीय सदस्यांनी सूचना केली नाही.

सभापती महोदय, कृषी हे भारताचे मुख्य अंग आहे. भारत हा देश कृषी प्रधान देश आहे असे मानतो, महाराष्ट्र राज्य कृषी प्रधान राज्य आहे असे मानतो.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

आपल्याला आठवत असेल की जेव्हा अमेरिका देश अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाला त्यावेळी त्या देशाने आपले सर्व लक्ष उद्योगधंद्याकडे केंद्रीत केले. हे सरकार देखील उद्योगधंद्याच्या वाढीकडे लक्ष देत आहे. परंतु आहे त्या पेक्षा जास्त लक्ष देण्याची गरज आहे. राज्यातील उद्योगधंदे वाढले तर रोजगार उपलब्ध होईल, बेरोजगारी दूर होईल, राज्यातील जनता संपन्न होण्यास मदत होईल. फूड सिक्युरिटीसारखे विधेयक उद्या मांडले जाईल, ज्या अनेक समस्या निर्माण होतात आणि त्यानुषंगाने चर्चा होतात त्या या राज्यातील जनता संपन्न झाल्यानंतर होणार नाहीत.

सभापती महोदय, आरोग्य विषयक अनेक योजना शासनाने राबविलेल्या आहेत. मुंबईतील जे.जे. हॉस्पिटल हे 600 कोटी रुपये खर्चून आधुनिक दर्जाचे सुपरस्पेशॅलिटी हॉस्पिटल करण्यात येणार आहे. या निमित्ताने मला शासनाच्या एक गोष्ट निदर्शनास आणून द्यावयाची आहे ती म्हणजे आपणाला ग्रामीण भागामध्ये नेहमी पिण्याच्या पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. या अर्थसंकल्पामध्ये विहिरींची संकल्पना मांडलेली आहे. आज विहिरीद्वारे जे पाणी उपलब्ध होते त्यामध्ये क्षाराचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये वॉटरप्रोन डिसिज निर्माण होतात. निरनिराळया आजारांना ग्रामीण भागातील जनतेला सामोरे जावे लागते. या निमित्ताने मला शासनाला सूचना करावयाची आहे की, प्रत्येक ग्रामस्तरावर राज्यसरकार आणि स्थानिक जनतेला एकत्र घेऊन फिल्ट्रेशन, सॉफ्टनिंग सारखे प्लॅण्ट टाकले तर ग्रामीण भागातील जनतेला पिण्यासाठी चांगले पाणी उपलब्ध होऊ शकेल आणि त्यांच्या आरोग्याच्या तक्रारी कमी होतील.

सभापती महोदय, क्रीडा विषयक अनेक उपाययोजना शासनाने केलेल्या आहेत. परंतु ज्या प्रमाणे चीन, जपान या देशामध्ये बालपणापासूनच ऑलिंपिक पात्रतेचे खेळाडू तयार करण्याचे प्रयत्न केले जातात तसे प्रयत्न सरकारने करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, राज्याचे उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष दिले गेले पाहिजे. शेजारच्या गोवा राज्याला पर्यटनाच्या माध्यमातून 1500 कोटी रुपयाचे उत्पन्न मिळते. महाराष्ट्र राज्याचे पर्यटनापासूनचे उत्पन्न किती आहे याची माहिती मला कुठे दिसली नाही. आज पर्यटन हा जगामध्ये पहिल्या क्रमांकाचा उद्योग मानला जातो. या पर्यटन व्यवसायामुळे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश बिनसाळे...

जास्तीत जास्त लोकांना रोजगार मिळू शकतो. तेव्हा या पर्यटन व्यवसायाकडे जाणीवपूर्वक लक्ष दिले गेले पाहिजे. लोणार सरोवर, कास पठार, सीवर्ल्ड, थीमपार्कच्या माध्यमातून पर्यटनक्षेत्र विकसित करण्याचे शासनाने प्रयत्न सुरु आहेत. माझी अशी सूचना आहे की, पर्यटनाच्या बाबतीत एक 5 वर्षाचा नियोजनबद्ध आराखडा तयार करुन त्यांची अंमलबजावणी केली तर या पर्यटनाच्या माध्यमातून राज्याचे उत्पन्न वाढण्यास निश्चितच मदत होईल. माथेरान येथे भाई वीर कोतवाल यांचे स्मारक उभारण्याचा मनोदय शासनाने व्यक्त केलेला आहे. मुंबई मेट्रोपोलिटन रिजनमध्ये असलेले माथेरान हे एकमेव हिल स्टेशन आहे. 26 जुलैला पाऊस झाला त्यावेळी साडेचार हेक्टर जमीन मोरबे धरणामध्ये वाहून गेली. माथेरानची माती त्या धरणामध्ये जात असते. या माथेरानचा योजनाबद्ध विकास केला पाहिजे. त्या ठिकाणी पिचिंग केले पाहिजे, संरक्षण भिंत बांधली पाहिजे, चांगले रस्ते उपलब्ध करुन दिले पाहिजेत. आज त्या ठिकाणी जाणारी मंडळी गुरासारखे सामान खेचत जातात. आपण 21व्या शतकाकडे जात असताना ही परिस्थिती बदलली पाहिजे. मुंबई शहराच्या आसपास माथेरान शिवाय अन्य कोणतेही हिल स्टेशन नाही. तेव्ह सुप्रीम कोर्टाला विनंती करुन माथेरानचा योजनाबद विकास करण्याची नितांत गरज आहे.

सभापती महोदय, विजेच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार या ठिकाणी मांडलेले आहेत. सरकारने जाहीर केलेले आहे की सन 2012 अखेरपर्यन्त महाराष्ट्र हा भारनियमनमुक्त होईल. सभागृहामध्ये ऊर्जा राज्यमंत्री हजर आहेत. ज्या पध्दतीने नागरिकरण वाढत आहे त्या पध्दतीने राज्य सरकार केन्द्र सरकारच्या मदतीने विविध योजना आणित आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

या योजनांच्या माध्यमातून आर्थिक सुबत्ता केवळ शहरांमध्ये नव्हे तर संपूर्ण ग्रामीण भागात यावयास लागली आहे. आर्थिक सुबत्ता आल्यानंतर वेगवेगळी उपकरणे लोक विकत घेत असतात आणि विजेची मागणी सातत्याने वाढत असते. या ठिकाणी एकाही सन्माननीय सदस्यांकडून किंवा सरकारकडून या संदर्भात विचार केला गेला नाही. विजेचा वापर कसा कमी करता येईल याकडे शासनाने लक्ष द्यावे.

सभापती महोदय, मी आमदारपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्यांदा या सभागृहात प्रवेश केला त्यावेळची सभागृहातील प्रकाश व्यवस्था आणि आज असलेली प्रकाश व्यवस्था यामध्ये काहीही फरक नाही. परंतु त्यावेळी लावण्यात आलेले साधे बल्ब बदलून एलईडी बल्ब वापरण्यात आले आहेत. त्यामुळे विजेचा वापर कमी झाला आणि उजेड पूर्वीसारखाच आहे. आपण जे साधे बल्ब वापरतो त्याची कायदेशीर पडताळणी करुन साध्या बल्बमुळे वीज वापर अधिक होत असल्यामुळे ते बॅन करता येतील काय याचा विचार शासनाने करावा. अमेरिकेमध्ये साधे बल्ब वापरण्यावर बंदी घालण्यात आली आहे. सीएफएल बल्ब, एलईडी बल्ब वापरण्यास प्रोत्साहन दिले पाहिजे. हे बल्ब महाग आहेत यात शंका नाही. परंतु त्यावरील टॅक्सेशन 12.5 टक्क्याऐवजी 5 टक्क्यावर आणले तर ते कमी किंमतीत उपलब्ध होतील आणि लोकांना त्याचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळेल. पर्यायाने विजेचा वापर कमी होईल.

सभापती महोदय, आज बाजारामध्ये ए.सी.वर स्टार रेटिंग केलेले असते. वॉटर हिटरवर स्टार रेटिंग केलेले असते. अशा अधिक स्टार रेटिंग असलेल्या उपकरणांवरील कर कमी केला पाहिजे. चार स्टार रेटिंग, पाच स्टार रेटिंग असलेल्या उपकरणांचा वापर वाढावा यासाठी कर कमी केला पाहिजे. सिंगल किंवा स्टार रेटिंग नसलेल्या उपकरणांच्या वापरावर बंदी घातली पाहिजे. अशा उपाययोजना केल्या तर विजेचा वापर कमी होईल. विजेचा वापर कमी होण्याबरोबरच वीज निर्मिती अधिक करण्याकडे शासनाने लक्ष दिले तर पुढील 50 वर्षे महाराष्ट्रात भारनियमन करावे लागणार नाही. महाराष्ट्र सरकारने अशा उपाययोजना एकत्रितपणे अंमलात आणणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, राज्याच्या उत्पन्नाची साधने वाढवावयाचे अनेक मार्ग आहेत. कदाचित काही लोकांना हा मुद्दा वेगळा वाटू शकेल. परंतु दुबईमध्ये आपण गेलो तर तेथे प्रत्येक वाहतूक

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे.....

सिग्नलवर कॅमेरा बसविलेला आहे. तो कॅमेरा बसविण्यामागे केवळ सिक्युरिटी हा उद्देश नसून त्या सिग्नलवरील प्रत्येक वाहनांचे दृश्य त्या कॅमेऱ्यामध्ये टिपून घेतले जाते. जर सिग्नल तोडल्याचे आढळून आले तर ताबडतोब सायंकाळी संबंधित वाहन मालकाच्या घरी दंड भरण्याची नोटीस पाठविण्यात येते. या मार्गाने करोडो रुपयांचे उत्पन्न दुबई शासनाला मिळत आहे. आपण केवळ सिक्युरिटीच्या कारणासाठी कॅमेरे बसविण्याची मागणी करीत असतो. या सगळ्या गोष्टीकडे एकाग्रतेने लक्ष देऊन वाहतूक पोलिसांनी त्याचा वापर करावा. आज एखाद्याने सिग्नल तोडला तर ट्रॅफिक पोलीस त्याचे वाहन अडवतो आणि त्याच्याकडून चलन फाडून दंडाची रक्कम वसूल करतो. परंतु कॉम्प्युटरायझेशनच्या माध्यमातून ऑटोमॅटिक पध्दतीने ही यंत्रणा राबविण्यात आली तर राज्य शासनाचे उत्पन्न वाढविण्यास मदत होऊ शकते.

सभापती महोदय, मुंबई शहर खूप मोठे आहे. या शहरामध्ये जेवढ्या सुविधा निर्माण करु तेवढ्या त्या कमी पडणार आहेत. मुंबई शहरामध्ये संपूर्ण जगातून पर्यटक येत असतात. मुंबई शहरालगत दोन्ही बाजूला चांगल्या प्रकारचा समुद्र लाभलेला आहे. माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सुचविल्याप्रमाणे ब्रेक वॉटर क्रिएट करुन 365 दिवस समुद्राचा वापर केला तर जल पर्यटनाला फार मोठी मदत होईल. मुंबईत येणाऱ्या पर्यटकांना आणि नागरिकांना याचा फार मोठा फायदा होऊ शकतो. आज मुंबई शहरामध्ये लोकांना विरंगुळ्याचे साधन उपलब्ध नाही. मुंबईकरांचे जीवन स्ट्रेसफूल झालेले आहे. जीवनातील ताणतणाव कमी करावयाचे असतील, विरंगुळा हवा असेल तर तो निर्माण करण्याचे काम या शहरामध्ये आपण करु शकलो तर माणसांची कार्यक्षमता अधिक वाढेल, काम करण्याची कार्यक्षमता वाढेल आणि त्या माध्यमातून मुंबईला तणावरहित शहर निर्माण करु शकतो.

सभापती महोदय, पुढील काळात कोणी खर्च कमी करण्याची गोष्ट करु नये. उत्पन्न कसे वाढेल, लूप होल्स कमी करुन जास्तीत जास्त उत्पन्न वाढेल यासाठी प्रयत्न करावेत. आज विक्रीकराच्या माध्यमातून शासनाला 30 हजार कोटी रुपयांचे येणे आहे. याबाबत गांभीर्याने विचार करुन चांगल्या योजना अंमलात आणून महाराष्ट्र सुजल, सुफल आणि सक्षम कसा होईल या बाबत लक्ष द्यावे एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.खर्चे...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वचित) : सभापति महोदय, आज हमारे देश की और विश्व की जो इकॉनामिक कंडीशन है, उस स्थिति में यह बहुत ही अच्छा बजट है. इसलिए मैं हमारे माननीय मुख्यमंत्री जी, उपमुख्यमंत्री जी और हमारे नौजवान वित्त राज्य मंत्री महोदय का तहेदिल से अभिनंदन करना चाहता हूं.

सभापति महोदय, हमारी ग्रामीण अर्थव्यवस्था को मजबूत करने के लिए बहुत अच्छे प्रावधान इस बजट में किए गए हैं. कृषि विकास के लिए 3252 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. ग्रामीण विकास के लिए 1503 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. सिंचाई के काम के लिए 7614 करोड़ रुपए का प्रावधान किया गया है. इसके अलावा वीआयडीसी के लिए राज्यपाल महोदय की तरफ से 2270 करोड़ रुपए की की रकम का प्रावधान किया गया है. इस प्रकार हमारी सरकार ने ग्रामीण अर्थव्यवस्था को मजबूत करने के लिए लगभग 14586 करोड़ रुपए का प्रावधान इस बजट में किया है. इसलिए यह बजट बहुत ही स्वागत योग्य है.

इसी प्रकार मैं बताना चाहूंगा कि सामाजिक क्षेत्र में 20 हजार करोड़ रुपए से ज्यादा का प्रावधान किया गया है. किसी काम के लिए भी कम प्रावधान इस बजट में नहीं किया गया है. इसलिए मैं बार-बार कहना चाहूंगा कि सभी माननीय सदस्यों द्वारा इस बजट का स्वागत किया जाना चाहिए.

सभापति महोदय, हमारी 12वीं पंचवर्षीय योजना का वर्ष अब शुरु हुआ है. यहां पर लिखा गया है कि महाराष्ट्र की पंचवर्षीय योजना का टोटल आउटले प्लानिंग कमीशन ने अभी सेंक्शन नहीं किया है. मैं माननीय वित्त राज्यमंत्री महोदय के मार्फत शासन से अनुरोध करुंगा कि आप प्लानिंग कमीशन से पांच साल का बजट एप्रुव कराते समय इस बात का ध्यान रखें कि अगले पांच वर्ष में महाराष्ट्र में और खास तौर से विदर्भ में किसानों की आत्महत्याओं तथा कुपोषण से होने वाली मृत्यु को पूरी तरह से रोका जा सके. सरकार को इस बात का ध्यान रखना चाहिए कि अगले पांच सालों में विदर्भ में किसानों की आत्महत्या और कुपोषण से होने वाली मृत्यु की संख्या जीरो कैसे की जा सकती है. इस तरह का प्रयास हमारी सरकार को प्लानिंग कमीशन के माध्यम से करना चाहिए. यह बात सही है कि प्लानिंग कमीशन किसानों की आत्महत्याओं को रोकने के लिए बहुत अच्छा प्रयास कर रहा है.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

सभांपति महोदय, कल हमारे माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर जी ने कहा कि विदर्भ में जो कपास उत्पादक किसान है उनके ऊपर 5 प्रतिशत टैक्स लगाकर सरकार ने उन पर अन्याय किया है.

सभापति महोदय, विदर्भ में किसानों की आत्महत्याएं रुकी नहीं हैं बल्कि और ज्यादा बढ़ी हैं. वहां पर इस तरह का विवाद चल रहा है कि बीटी कपास का सिस्टम ठीक है या नहीं है. ऐसी स्थिति में यदि हम कपास पर 5 प्रतिशत टैक्स लगाएंगे तो उचित नहीं होगा. मेरा अनुरोध है कि विदर्भ के किसानों के हितों को ध्यान में रखते हुए किसानों पर लगाया गया यह 5 प्रतिशत टैक्स वापस लेना चाहिए.

सभापति महोदय, श्रम और उद्योग विभाग के संबंध में बोलते हुए में कहना चाहूंगा कि हमारे श्रम विभाग का बजट अलोकेशन बहुत कम है. श्रम मंत्रालय में मॅन पावर की बहुत कमी है.उस कमी को दूर किया जाना चाहिए. श्रम मंत्रालय से संबंधित जो केस काफी दिनों से पेंडिंग पड़े हैं उनका निपटारा जल्द से जल्द करने के लिए फास्ट ट्रॅक कोर्ट की व्यवस्था की जानी चाहिए ताकि जो केस लेबर कोर्ट और इंडस्ट्रियल कोर्ट में काफी दिनों से पेंडिंग पड़े हैं उनका निर्णय जल्द से जल्द हो सके. इसलिए इस संबंध में ज्यादा बजट अलोकेशन किया जाना बहुत आवश्यक है.

सभापति महोदय, मैं उद्योग के संबंध में कहना चाहूंगा कि अभी नयी इंडस्ट्रियल पॉलिसी आने वाली है. इसलिए मेरा कहना है कि स्माल स्केल और मीडियम स्केल के जो उद्योग बंद हैं उनको फिर से चालू करने के लिए उन उद्योगों को विशेष आर्थिक सहायता दी जानी चाहिए तथा बंद उद्योगों को फिर से चालू करने के लिए सरकार द्वारा कोई विशेष प्रयत्न किया जाना चाहिए.

सभापति महोदय, आपके माध्यम से मैं माननीय वित्त राज्य मंत्री से कहना चाहूंगा कि बजट में सिर्फ इतना लिखा है कि मॉयनारिटी डॅवलपमेंट के लिए फंड दिया जाएगा. लेकिन इस बजट में इस बात का कोई उल्लेख नहीं है कि मायनारिटी डॅवलपमेंट के लिए कितना फंड दिया जाएगा. पिछले कुछ वर्षों के अनुभव के आधार पर मेरी मांग है कि अल्पसंख्यकों के डॅवलपमेंट

अशोधित पाठ / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

के लिए कम से कम 5 सौ करोड़ रुपए का प्रावधान इस बजट में किया जाना चाहिए. मेरा यह भी कहना है कि मौलाना आजाद महामंडल का कॉपर्स बिल्टअप करने के लिए 5 सौ करोड़ रुपए का प्रावधान किया जाना चाहिए.

सभापति महोदय, जहां तक वक्फ बोर्ड की लेंड का प्रश्न है. मुझे कहना है कि वक्फ बोर्ड की जो जमीन गलत तरीके से कुछ लोगों ने ले ली है, उस लेंड को वापस लेने के लिए कुछ राज्यों ने स्पेशल कानून बनाया है. मेरा कहना है कि महाराष्ट्र में भी वक्फ बोर्ड की जमीन गलत लोगों के हाथों में नहीं जानी चाहिए. इसलिए इस संबंध में महाराष्ट्र में भी एक स्पेशल कानून बनाया जाना चाहिए.

सभापति महोदय, मेरा अंतिम सुझाव यह है कि महाराष्ट्र में ई-गवर्नेंस के माध्यम से बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम का काम बहुत अच्छे ढंग से शुरु हुआ है. वहां पर अच्छे काम के लिए राजीव गांधी जी के नाम से जो अवार्ड दिया गया है यह अच्छी बात है. मेरा कहना है कि एडमिनिस्ट्रेशन को और अधिक चुस्त करने के लिए हमें एडमिनिस्ट्रेटिव रिफार्म्स कमीशन बनाना चाहिए और हमें देखना चाहिए कि हम अपने यहां पर होने वाली वेस्टेज तथा ज्यादा खर्च किस तरह से कम कर सकते हैं. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

---0---

इसके बाद श्री जुन्नरे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. रामनाथ मोते)

श्री. राजन तेली (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार व माननीय अर्थराज्य मंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी सन 2012-2013 चा अर्थसंकल्प माडून सर्वसामान्य जनतेला दिलासा दिल्याबद्दल त्यांचे स्वागत करण्यासाठी व समर्थन देण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, सन 2004-2005 च्या स्थिर किंमतीनुसार जे स्थूल उत्पन्न आहे ते राज्य उत्पन्नाच्या 3 टक्क्याने वाढून 7,41,694 कोटी रुपये असून मागील वर्षी हेच उत्पन्न 6,66,123 कोटी रुपये होते. चालू किमती नुसार सन 2010-2011 मधील स्थूल राज्य उत्पन्न 10,68,497 कोटी रुपये असून ते गत वर्षीच्या उत्पन्नापेक्षा 23 टक्क्याने अधिक आहे.

सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी राज्य सरकारने कर्ज काढले म्हणून टीका केली आहे. देशातील महाराष्ट्र राज्यानेच कर्ज काढलेले आहे असे नसून आंध्रप्रदेश, पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, केरळ या राज्यांनी सुध्दा कर्ज काढलेली आहेत. राज्य शासनाने विकासासाठी जे प्रयत्न केलेले आहे त्यासंदर्भात सर्वांनी स्वागत करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पात मच्छीमारांच्या संदर्भात चांगली तरतूद केलेली आहे. बंदराच्या विकासासाठी केंद्र शासनाकडून जो 75 टक्के निधी दिला जातो त्यामध्ये राज्य शासनाचा वाटा 25 टक्के आहे. सन 2012-2013 मध्ये बंदराच्या विकासासाठी 28 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली असून नाबार्डच्या अंतर्गत जेट्टी बांधण्यासाठी 98.8 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी एवढेच सांगेन की, सन 2007-2008 पासून कोकणातील संस्थांचे आर्थिक प्रस्ताव पडून आहेत त्यामुळे यासंदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे. काही डिझेलचे प्रस्ताव मान्य झाले नाही, काही प्रस्ताव आईस फॅक्टरीचे आहेत परंतु हे प्रस्ताव शासनाने अद्याप पावेतो मंजूर केलेले नाहीत. 5 वर्षे होऊन सुध्दा शासनाकडून कोकणातील मच्छीमारांना फायदा झालेला नाही त्यामुळे यासंदर्भात शासनाने तातडीने विचार करण्याची आवश्यकता आहे. खरे म्हणजे मच्छीमारांपासून राज्य शासनाला दर वर्षी 2 हजार कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजन तेली....

रुपये मिळत असतात परंतु मच्छीमारांसाठी शासनाने त्या तुलनेने फार कमी प्रमाणात निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. जवळ जवळ 56 हजार कुटुंब मच्छीमारीचा व्यवसाय करतात व 431 गावे मच्छीमारांचे आहेत. मत्स्य दुष्काळ जाहीर करण्यात यावा अशी सातत्याने मच्छीमार मंडळी मागणी करीत असतात परंतु त्यासंदर्भात दिलासा देण्याचे काम राज्य सरकारकडून झालेले नाही.

सभापती महोदय, आंतरराष्ट्रीय फिशरीचे एक सेमीनार झाले होते व त्या सेमीनारला माननीय पवार साहेब सुध्दा उपस्थित होते. त्यांनी सांगितले की, गेल्या 15 वर्षापासून माशांच्या निर्यातीमध्ये ज्या प्रमाणात वाढ व्हावयास पाहिजे होती ती झालेली नाही. आपल्या राज्याला 720 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे व केरळ राज्याला 550 कि.मी.चा समुद्र किनारा लाभला आहे परंतु आपल्या पेक्षा कमी किनार पट्टा मिळालेला असतांना देखील केरळ राज्यातून माशांची मोठया प्रमाणात निर्यात होत असते. त्यामुळे मच्छीमारी करणाऱ्या कुटुंबांना दिलासा देण्याचे काम राज्य शासनाने करणे आवश्यक आहे. आज ज्या प्रमाणे शेतकऱ्यांना कमी दराने कर्ज पुरवठा उपलब्ध करुन दिला जातो त्या प्रमाणेच मच्छीमारांनाही कमी दराने कर्ज पुरवठा शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, औद्योगिक संस्थेच्या प्रशिक्षणास बळकटी देण्यासाठी 13 व्या वित्त आयोगामार्फत 28.75 कोटी रुपये उपलब्ध करुन दिल्याबद्दल मी शासनाचे मनापासून आभार मानतो. आयटीआय किंवा पॉलिटेक्नीकची अवस्था अतिशय वाईट आहे. या औद्योगिक संस्थामध्ये स्टाफची कमतरता आहे, शिक्षकांची कमतरता आहे त्यामुळे औद्योगिक संस्थाचे बळीकटीकरणाच्या माध्यमातून निधी उपलब्ध करुन द्यावा व आवश्यक तो स्टाफ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा अशी माझी शासनाला विनंती आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

राष्ट्रीय ग्रामीण पेय जल योजने अंतर्गत सन 2012-2013 मध्ये केंद्राचा हिस्सा 840 कोटीचा आहे. राज्य जिल्हा नियोजन अंतर्गत 604 कोटी 80 लाख एवढा आहे. म्हणजे 1444.80 कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित केला आहे. यासाठी मी शासनाला मनापासून धन्यवाद देईन. पुरवणी मागण्यांवर बोलताना मी सांगितले होते की, जलस्वराज्य असेल, भारत निर्माण असेल, राष्ट्रीय ग्रामीण पेय जल योजना असेल त्यावर आज आपण करोडो रूपये खर्च करीत आहोत. पण त्याचे आऊट पूट काय आहे. आज राज्यातील अनेक योजना बंद आहेत. आपण हजारो टँकर लावले आहेत. यंदा परिस्थिती फार बिकट आहे. या सर्व योजना एकत्रित करून आपण माहिती दिली पाहिजे. जिल्हा निहाय रक्कम काढली तर असे दिसून येईल की, करोडो रूपये आपण छोट्या छोट्या जिल्ह्यांसाठी देत आहोत. पण आजही ग्रामीण भागातील लोकांना पिण्यासाठी मुबलक पाणी मिळत नाही म्हणून त्याकडे राज्य सरकारने अधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

यशवतंराव ग्राम सडक योजनेसाठी आपण 100 कोटीचा नियतव्यय ठेवला आहे. त्याबद्दल मी राज्य सरकारला धन्यवाद देतो. कोकणात सर्वात जास्त पाऊस पडतो. जिल्हा परिषदेकडे 4500 कि.मी.चे रस्ते आहेत. पण दहा-पंधरा वर्षे रस्ते दुरूस्तीसाठी निधी मिळत नाही. राज्य मार्ग आहेत त्यांच्या दुरूस्तीसाठी 8 ते 10 कोटी रूपये मिळतात. 250 लोकवस्तीच्या वाड्यांसाठी, गावांसाठी यशवंतराव ग्राम सडक योजना आपण राबविणार आहोत. या योजनेतून मुख्य बाजारपेठ जोडण्याचे काम केले आहे. त्याच पद्धतीने जे जुने रस्ते आहेत, जेथे आपण आमदार व खासदार निधी देऊ शकत नाही तेथे चांगल्या प्रकारची योजना राबवून ग्रामीण भागातील रस्ते मजबूत करण्यासाठी निश्चितपणाने प्रयत्न करावेत अशा प्रकारची विनंती देखील मी करीत आहे.

श्री.अंतुले मुख्यमंत्री असताना सागरी महामार्गाची कल्पना आली. जवळ जवळ 85 टक्के सागरी महामार्ग पूर्ण आहेत. पण रायगड मधील काही पूल शिल्लक राहिलेले आहेत. पर्यटनाच्या वाढीसाठी सागरी महामार्गाची संकल्पना होती. 1979 सालापासून सागरी महामार्गाला सुरूवात झाली. तो रस्ता आज 31 वर्षे अपूर्ण आहे. तो पूर्ण करण्यासाठी त्याचा उल्लेख बजेटमध्ये कुठेही दिसत नाही. माझी या निमित्ताने विनंती आहे की, हा सागरी महामार्ग गोवा येथे जाण्यासाठी अतिशय चांगला आहे. त्यामुळे तो पूर्ण करण्याची दखल आपण घ्यावी.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली....

माझ्याकडे कित्येक छोटे-छोटे विषय आहेत. घोटगे-सोनवडे घाट रस्त्याचा विषय आहे. या कामासाठी आपण गेल्या वर्षी निधी दिला. पण वन हरकती मुळे गेली 15 काम अपूर्ण आहे. आंबोली घाटाला पर्यायी, केसरी पंचवडे रस्ता आहे त्यासाठी निधी देणे आवश्यक आहे.

पर्यटन विकासाचा अतिशय महत्त्वाचा मुद्दा येथे आणला आहे. त्याबद्दल मी शासनाचे मनापासून अभिनंदन करतो. कोकणातील सीवर्ल्ड व रस्त्यासाठी 228 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. त्या बद्दल मनापासून धन्यवाद देतो. जगात पर्यटनाला चांगल्या प्रकारचे महत्त्व दिले जाते. पर्यटन हा व्यवसाय म्हणून स्वीकारलेला आहे. गोव्याला पर्यटना पासून जवळ जवळ दीड हजार कोटी रूपये मिळतात. देशातील एकमेव सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन म्हणून घोषित झालेला असताना ज्या पद्धतीने याकडे लक्ष केंद्रीत करायला पाहिजे होते त्या पद्धतीने केले जात नाही. या निमित्ताने माझी मागणी आहे की, कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्याला दरवर्षी 500 कोटी रूपये द्यावेत आणि दहा वर्षे कार्यक्रम आयोजित केला तर पर्यटनाच्या माध्यमातून दरवर्षी राज्याला दोन ते अडीच हजार रूपये मिळतील व तेवढी भर राज्याच्या उत्पन्नात होईल. एवढी ताकद पर्यटनामध्ये आहे.

फलोत्पादनाचा विषय देखील महत्त्वाचा आहे. कोकणातील फळांवर प्रक्रिया करण्यास प्राधान्य दिले पाहिजे. यासाठी कालबद्ध कार्यक्रम घेणे आवश्यक आहे. कोकणातील आंबा हे पीक हवामानामुळे अडचणीत आले आहे. यावर देखील कृषी विद्यापीठाने चांगल्या प्रकारे संशोधन केले पाहिजे. ह्या उद्योगातून देखील राज्याच्या तिजोरीमध्ये भर पडू शकते. तशा प्रकारचे काम राज्य सरकारने करावे अशी मी विनंती करतो.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच मनुका, बेदाणे, सुका मेवा यावर 5 टक्के परतावासहित टॅक्स लावण्यात आलेला आहे त्याबद्दल मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो. त्यामुळे तिजोरीमध्ये भर पडू शकते. आणि सर्वात महत्वाच्या विषयावर बोलून मी माझे भाषण संपविणार आहे. राज्यातील सिंचनाची परिस्थिती सर्वात अतिशय चिंताजनक आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेब यांनी भाषणामध्ये सांगितले की, माननीय राज्यपालांनी सुध्दा याबाबत चिंता व्यक्त केलेली आहे की, राज्यामध्ये जे अपूर्ण प्रकल्प आहेत, ते पूर्ण करण्यासाठी जवळजवळ 75 हजार कोटी रुपये लागणार आहेत. मी जास्त आकडेवारीमध्ये जाणार नाही. फक्त मी येथे काही उदाहरणे देईन.

सभापती महोदय, सध्या कोकणामध्ये काही प्रकल्प सुरु झालेले आहेत. माननीय वित्त राज्यमंत्री श्री.मुळकसाहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो की, तिल्लारी प्रकल्पाला 1986 मध्ये मंजुरी मिळाली आणि आज जवळजवळ 45 कोटी 20 लाख रुपयांचा प्रकल्प असून आता याची किंमत 898.72 इतकी आहे. मुळामध्ये सदरहू प्रकल्प 45 कोटी 20 लाखाचा असून याची किंमत 898.72 इतकी आहे. भातसा प्रकल्प 1969 ला मंजूर झाला आणि त्याची पूर्वी किंमत 13 कोटी 68 लाख होती, पण आता या प्रकल्पाची किंमत 754 कोटी 42 लाख इतकी आहे. टाळंबा प्रकल्प फक्त 72 कोटी रुपयांचा होता,आता त्या प्रकल्पाची किंमत 758 कोटी झाली आहे. 18 कोटी 90 लाख रुपयांच्या सूर्या प्रकल्पाला 1973 मध्ये प्रशासकीय मंजुरी मिळाली होती, आज तो जवळजवळ 357 कोटी रुपयांवर गेला असून साधारणपणे यामध्ये हजारपटीने वाढ झालेली आहे. म्हणून यामध्ये आपण जातीनिशी लक्ष दिले पाहिजे. जर आपण येथील वस्तुस्थिती पाहिली आणि इतर राज्यांनी जो खर्च केलेला आहे आणि तेथे जे इरिगेशन झालेले आहे त्याचा आणि महाराष्ट्राचा विचार केला तर महाराष्ट्र राज्याने जास्त खर्च केलेला आहे आणि इरिगेशन कमी झालेले आहे.

सभापती महोदय,आपल्याकडे फक्त 17.60 टक्के इरिगेशन आहे. आंध्र प्रदेशमध्ये इरिगेशन 48 टक्के इरिगेशन आहे, अरुणाचल प्रदेशमध्ये 20.2 टक्के आहे, बिहारमध्ये 61 टक्के आहे. दिल्लीमध्ये 72.08 टक्के आहे. गोव्याला जवळजवळ 22 टक्के आहे. गुजराथ मध्ये 45..06 टक्के आहे, हरियाणाचे 85.03 टक्के आहे, कर्नाटकमध्ये 31.09 टक्के आहे आणि पंजाबचे 95.06 टक्के आहे. म्हणून माझी राज्य शासनाला विनंती आहे की, इरिगेशनवर जास्त लक्ष केंद्रीत करावयास पाहिजे. तसेच उर्वरित महाराष्ट्रात आणि सिंधुदूर्ग आणि कोकणावर अन्याय होत आहे. आमच्या भागातील इरिगेशन किती आहे? तर कोकणातील इरिगशेन 1.77, ठाणे येथे् 2.5, रायगड येथे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली . . ..

1.25,रत्नागिरीचे 1.80 आणि सिंधुदुर्ग मध्ये 1.12 टक्के इरिगेशन आहे. याच बरोबर आपण उत्तर महाराष्ट्रातील स्थिती पाहिली तर नाशिक मधील इरिगेशन 4 म्हणजे जवळजवळ 17.44 इतके आहे आणि पश्चिम महाराष्ट्राचे पाहिले तर तेथील इरिगेशन 31.43 एवढे आहे. म्हणून या चर्चेच्या निमित्ताने माझी विनंती आहे की, उर्वरित महाराष्ट्रासाठी, कोकणासाठी वेगळा निधी देण्यात यावा. तसेच जे प्रकल्प बंद आहेत आणि विशेष करुन जे प्रकल्प 75 टक्के पूर्ण झालेले आहेत ते तरी एकदा मार्गी लावावेत अशा प्रकारची या चर्चेच्या माध्यमातून विनंती करतो.

सभापती महोदय, यानंतर मी दोन-तीन मागण्या करणार आहे की, कोकणच्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन कोकणासाठी स्वतंत्र असे वैधानिक विकास महामंडळ स्थापन करावे अशी मागणी करतो. त्याचबरोबर शैक्षणिक बॅकलॉग राहिलेला आहे. त्यासाठी कोकणामध्ये शैक्षणिक विकासासाठी स्वतंत्र विद्यापीठ तयार करावे.जेणेकरुन कोकणामध्ये सर्व प्रकारच्या शिक्षणाची सोय होऊ शकेल. अशा प्रकारचे एक शैक्षणिक संकुल उभे करावे अशी मी यामागणी करतो.तसेच कोकणात मरिन ट्रेनिंग इन्स्टीट्युट आणि मत्स्य विद्यापीठ स्थापन करावे. कोकणामध्ये मासे जास्त प्रमाणात विकले जातात आणि मत्स्य विद्यापीठ मात्र नागपूर येथे आाहे. परंतु हे विद्यापीठ कोकणामध्ये असावे अशी मी मागणी करतो. तसेच शेवटचा मुद्दा म्हणजे ऊस, साखर इ.बाबी पश्चिम महाराष्ट्राच्या आहेत. विदर्भातील कापूस आहे याप्रमाणे कोकणातील पर्यटन हा तेथील अर्थव्यवस्थेचा कणा आहे. त्यामुळे कोकण विभागाला जास्त निधी देण्यात यावा.याठिकाणी मला भाषण करण्याची संधी दिली त्याबद्दल सभापती महोदय मी आपणास मनापासून धन्यवाद देतो व माझे भाषण संपवितो.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पदवीधरांचा प्रतिनिधी म्हणून प्रथम रोजगारा संबंधी माझे विचार मांडतो. ज्यांच्यात आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य आहे अशा तरुणांना अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची रोजगाराची संधी नाही तेव्हा हे अधिवेशन संपल्यानंतर मी माझ्या पाच जिल्ह्यांमध्ये परत जाईन तेव्हा या पदवीधर तरुणांना काय सांगावे अशी खंत माझ्या मनात निर्माण झालेली आहे. चिंता निर्माण झालेली आहे. महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये राज्यातील रोजगार, स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये गेल्या आर्थिक वर्षात 25 लाख 86 हजार 200 इतक्या बेरोजगार पदवीधरांची नोंद झालेली आहे असा उल्लेख आहे. त्यामध्ये वैद्यकीय पदवीधर, अभियांत्रिकी पदवीधर व इतर तांत्रिक पदवीधरांची संख्या 4 लाख 15 हजार आहे. तर फक्त पदवीधरांची संख्या 47 हजार आहे. 25 लाख 86 हजार बेरोजगार तरुणांपैकी फक्त 1 लाख 91 हजार तरुणांना आपण नोकरी उपलब्ध करुन देऊ शकलो, परंतु उर्वरित 24 लाख तरुणांना कोणताही रोजगार उपलब्ध करुन देऊ शकलो नाही याबद्दल मी खंत व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्यात महात्मा गांधी रोजगार हमी योजनेंतर्गत घेण्यात येणारी कामे सातत्याने कमी होत आहेत. सन 2007-08, 2008-09, 2009-2010 या वर्षात अत्यंत कमी झालेली आहेत. वेळ अपुरा असल्यामुळे मी आकडेवारीमध्ये जात नाही.

सभापती महोदय, शहरी रोजगार योजनेंतर्गत शहरी प्रशिक्षणार्थींचे लक्ष्य 39 हजार 770 इतके ठेवले होते. परंतु प्रत्यक्षात 12 हजार 031 लोकांना प्रशिक्षण दिलेले आहे. म्हणजे आपले उद्दिष्ट फक्त 4.5 टक्के पूर्ण झालेले आहे. म्हणजे आपण जवळपास 38 हजार लोकांना प्रशिक्षणापासून वंचित ठेवलेले आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, सन 1961 मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या 3 कोटी 99 लाख इतकी होती. आज ही लोकसंख्या तिप्पटीने वाढलेली आहे. आज महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटी 24 लाख आहे. सन 1961 मध्ये 7 लाख 87 हजार रोजगार निर्मिती होती. आजच्या घडीला ती 16 लाख 56 हजार इतकी आहे. म्हणजे लोकसंख्या तिप्पटीने वाढत असताना रोजगार निर्मिती केवळ दुप्पटीने वाढलेली आहे. तेव्हा आपण प्रगत महाराष्ट्र अशी वल्गना करतो ते चुकीचे आहे असे मला वाटते.आपण लोकसंख्येच्या तुलनेत रोजगार निर्माण करु शकलो नाही. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील....

सभापती महोदय, आरोग्य विषयाबाबत बोलावयाचे झाले तर या ठिकाणी आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री येथे उपस्थित आहेत. आपण लोकसंख्येच्या प्रमाणात रोजगार निर्माण करु शकलो नाही त्याच प्रमाणे आरोग्य विषयक सुविधांची देखील निर्मिती करु शकलो नाही. मानव विकास परिगणित करणारे हे आरोग्य आणि शिक्षण क्षेत्र आहे. त्यामध्ये जी मानके आहेत त्यांचे पालन केले पाहिजे. नवजात अर्भकांचा मृत्यूदर आणि माता मृत्यूदर कमी झाला पाहिजे. आपण लोकसंख्येच्या प्रमाणात आंतररुग्णांसाठी खाटांचे प्रमाण पाहिले तर सन 1991 ते 2001 या काळात महाराष्ट्रामध्ये आंतररुग्ण खाटांची संख्या एक लाख लोकसंख्येमागे 144 होती. 2001 पासून 2011 पर्यंत ती 121 वर आली. आज आपण एक लाख लोकसंख्येमागे फक्त 102 खाटा उपलब्ध करुन देत आहोत. मी आरोग्य विभागात नोकरी केलेली आहे. मला माहीत आहे की, 20 वर्षापूर्वी सामान्य रुग्णालयात अशी परिस्थिती होती की, जेवढे रुग्ण खाटांवर होते तेवढेच रुग्ण खाटांखाली होते. तेव्हा आज काय परिस्थिती असेल याची कल्पनाच न केलेली बरी.

सभापती महोदय, वैद्यकीय कॉलेज असो किंवा शासकीय सामान्य रुग्णालय असो आज आरोग्य विषयक दर्जा दिवसेंदिवस खालावताना आपण पाहत आहोत. मी ज्या विभागाचे प्रतिनिधीत्व करीत आहेत तो विदर्भातील अमरावती जिल्हा हा अनुशेषग्रस्त आहे. अमरावती जिल्ह्यातील दरडोई उत्पन्न 57 हजार आहे. बुलढाणा, अमरावती आणि यवतमाळ यांचे दरडोई उत्पन्न 45 ते 50 हजारच्या आसपास आहे. दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिकाच्या टक्केवारीचे प्रमाण विदर्भामध्ये प्रमाण 50 टक्के आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील....

केवळ 4.4 टक्के शिधापत्रिका पांढऱ्या रंगाच्या म्हणजे सफेद आहेत. पुणे विभागात दारिद्रय रेषेखालील शिधापत्रिकांचे वाटप केवळ 25 ते 30 टक्के आहे.गेल्या चार-पाच वर्षातील अर्थसंकल्पातील तरतूद पाहिली तर समन्यायी वाटप झालेले नाही असे सातत्याने दिसून येते. अमरावती विभागाला किंवा विदर्भाला आरोग्याच्या दृष्टीने जेवढी तरतूद व्हावयास पाहिजे होती तेवढी तरतूद झालेली दिसत नाही याबाबत मी खंत व्यक्त करुन समन्ययी वाटप करण्यात यावे अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, शिक्षण विभाग असो की अरोग्य विभाग असो या विभागातील चतुर्थ आणि तृतीय श्रेणीतील पदांच्या बाबतीत मी बोलत नाही पण उच्च पदस्थ अधिकाऱ्याच्या संदर्भात उदाहरण द्यावयाचे झाले तर अमरावती विभागाचा आरोग्य विभागाचा जो उप संचालक गेली चार वर्षे प्रभारी काम करीत होता तो आता बदलून गेला पण त्या जागेवर कोणीच नवीन उप संचालक आलेले नाहीत. आता त्याठिकाणी जे उप संचालक काम करीत आहेत ते नागपूर विभागाचे आहेत. नागपूर विभागाचे उप संचालक अमरावती विभागाचा अतिरिक्त प्रभार घेऊन काम करीत आहेत इतकी दयनीय अवस्था आरोग्य विभागाची असेल तर आरोग्य विभागाच्या खालावलेल्या दर्जाबद्दल न बोललेले बरे. शिक्षणाच्या बाबतीतील परिस्थिती सुध्दा अशीच आहे. एका तालुक्याची पाहणी केली असता आणि माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागितली असता अमरावती परिमंडळातील, अकोला जिल्हयातील मुर्तिजापूर तालुक्यातील शिक्षण विभागतील 40 पदे रिक्त आहेत. मग ती गट शिक्षण अधिकाऱ्याची असतील, विस्तार अधिकाऱ्याची असतील, मुख्याध्यापकाची असतील किंवा तत्सम पदे असतील 40 ते 50 पदे एका तालुक्यातील पदे रिक्त असतील तर प्रगती कशी होणार याचा अंतरमुख होऊन विचार करण्याची आवश्यकता आह.

सभापती महोदय, महाराष्ट्राच्या उत्पन्नात या वर्षी तूट झाली असे सांगण्यात येते. त्यासंबंधीची बरीच कारणे आहेत. कृषी विभागातील उत्पादन तेवढे होऊ शकलेले नाही, कास्तकारांना आकस्मिक निधी द्यावा लागला त्यामुळे निर्विवादपणे आपल्याला काही नवीन स्त्रोत शोधावयास पाहिजेत. केवळ गृहिणीच्या स्वंयपाक घरात घाला घालून आपण हे करु शकत नाही त्यासाठी नवीन नवीन मार्ग शोधावे लागतील.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. रणजित पाटील...

सभापती महोदय, मला याठिकाणी पर्यटनाच्या बाबतीत विशेष उल्लेख करावासा वाटतो. आमच्या शेजारी असलेल्या मध्यप्रदेश राज्याने पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी ज्या सुख-सोयी उपलब्ध करुन द्याव्या लागतात त्या बाबतचे राष्ट्रीय स्तरावरचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळविले आहे. यातून रोजगार निर्माण होतो शिवाय अर्थसुध्दा निर्माण होतो. बेरोजगारांच्या, पदवीधरांच्या हाताला काम मिळते् त्यामुळे याबद्दल प्रयत्न झाले पाहिजेत. गोवा हे राज्य सुध्दा महाराष्ट्राच्या बाजूला आहे. येथे दरवर्षी दहा लाख पर्यटक येतात. त्यातील चार लाख पर्यटक हे विदेशी असतात त्यामुळे परदेशी चलन मिळते. या सर्व बाबींचा विचार करावा तसेच रस्त्यांचे जाळे, विमानतळ आणि हॉटेल इंडस्ट्रि निर्माण करण्यात याव्यात अशी मी सूचना करतो व चालू आर्थिक वर्षातील बजेट सामान्य माणसाला दिलासा न देणारे आहे असे माझे मत व्यक्त करुन सभापती महोदय, आपण मला या ठिकाणी बोलण्याची संधी दिली त्या बद्दल आपले आभार मानून मी माझे भाषण संपवितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ D/ MMP/

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, स्व. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दीच्या वर्षामध्ये माननीय उप मुख्यमंत्री व वित्त मंत्री माननीय श्री. अजित पवार यांना अर्थसंकल्प मांडण्याचे भाग्य लाभले आहे. त्यांनी या अर्थसंकल्पात महाराष्ट्र राज्याला एका शाश्वत विकासाकडे नेण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न केलेला आहे त्याबद्दल मी त्यांचे सर्वप्रथम अभिनंदन करतो. सचिन तेंडुलकर हा खेळपट्टीवर उभा राहून सर्वांगीण खेळ करतो. चौकार, षटकार आणि धावा काढून संघाला विजयी करण्याचा प्रयत्न करतो त्या पध्दतीने विक्रमी वीरासारखे नेतृत्व माननीय श्री. अजित पवार यांनी महाराष्ट्र राज्याला देऊन अतिशय चांगल्या पध्दतीने अर्थसंकल्प मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव...

सभापती महोदय, मला या ठिकाणी आणखी एका बाबतीत नाशिककर या नात्याने मला माननीय अर्थमंत्र्यांचे अभिनंदन करावयाचे आहे. ज्यावेळी स्व. यशवंतराव चव्हाण दिल्लीला गेले त्यावेळी हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावला असे बोलले गेले आणि त्याचा मला रास्त अभिमान याकरिता आहे की, ज्यावेळी स्व. यशवंरावजी चव्हाण साहेब दिल्लीला गेले आणि ज्यावेळी त्यांना खासदार बनावयाचे होते त्यावेळी आमच्या नाशिककरांनी स्व. यशवंतरावजी चव्हाण यांना बिनविरोध खासदारकी देऊ केली होती. त्यांच्या जन्म शताब्दी वर्षात आदरणीय श्री. अजितदादा पवार यांनी जो नाशिक-पुणे रेल्वे प्रकल्प अनेक वर्षापासून प्रलंबित होता त्या प्रलंबित रेल्वे मार्गासाठी जो नियतव्यय उपलब्ध करुन दिला तसेच नाशिक येथील ओढ्या सारख्या ठिकाणी टर्मिनस उभारण्याकरिता त्यांनी जो नियतव्यय उपलब्ध करुन दिलेला आहे त्याबद्दल संपूर्ण नाशिककरांच्या वतीने मी माननीय अर्थमंत्री श्री. अजितदादा पवार यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो, त्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, त्याच पध्दतीने आमच्या मालेगावकरांसाठी चांगले वस्त्रोद्योग धोरण जाहीर करुन मालेगावमधील पावरलूम्सच्या संदर्भात त्यांनी जो एक आशेचा किरण या मालेगावकरांना दाखविलेला आहे त्याबद्दल सुध्दा संपूर्ण मालेगावकरांच्या वतीने आमचे नेते श्री. अजितदादा पवार यांचे मन:पूर्वक आभार मानतो. मला एक कळकळीची विनंती करावयाची आहे. ज्या पध्दतीने आपण नाशिककराना अतिशय चांगल्या पध्दतीने न्याय देत आहात त्याच पध्दतीने आमच्या या नाशिककर कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत सुध्दा काही तरी ठोस निर्णय घेण्याची वेळ आलेली आहे. या ठिकाणी आमचे सहकारी सन्माननीय सदस्य श्री. संजय पाटील हे बेदाणा उत्पादकांकरिता भांडत आहेत तसेच नाशिककरांचा सुध्दा बेदाण्याच्या बाबतीत तेवढाच आग्रह आहे. परंतु कांदा उत्पादक आणि बेदाणा उत्पादक यांच्यामधील जर फरक आपण बघितला तर कांदा उत्पादक शेतकरी हे दोन-पाच एकर कोरडवाहू शेतीमध्ये कांदा उत्पादन करुन यावर वर्षाचा आर्थिक लेखाजोखा मांडण्याचा प्रयत्न करीत असतो. परंतु त्यांना योग्य भाव न मिळाल्यामुळे त्यांची अतिशय दयनीय अवस्था झालेली आहे. मी नाशिकरांच्या वतीने पुन्हा एकदा माननीय अर्थ अभिनंदन करुन मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

श्री. उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर या सभागृहामध्ये बरीच प्रदीर्घ चर्चा झालेली आहे आणि जवळजवळ सर्व विषयांना स्पर्श झालेला आहे. त्यामुळे मला बोलण्यासारखे फारसे काही शिल्लक राहिलेले नाही. परंतु एक मात्र निश्चित आहे की, स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांच्या जन्म शताब्दीच्या निमित्ताने 100 कोटी रुपयांची तरतूद करीत असताना त्यांच्या कल्पनेतील जो महाराष्ट्र होता त्या अनुषंगाने कृषीच्या बाबतीत तरतूदी केलेल्या आहेत.

विशेषत: या ठिकाणी जर आपण अर्थसंकल्पावर नजर टाकली तर आपल्या लक्षात येईल की, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असा उल्लेख केला होता की, शेजारच्या कर्नाटक राज्यात कृषी विषयक वेगळा अर्थसंकल्प मांडलेला आहे. त्या संदर्भात त्यांनी 17-18 हजार किंवा 19 हजार कोटी रुपये असा काही तरी आकडा सांगितला. ते बोलल्यानंतर मी अर्थसंकल्प सहज पाहात होतो. या अर्थसंकल्पातील पहिले जवळजवळ 16 टप्पे आपण पाहिले तर ते कृषी किंवा कृषी सलग्न असलेल्या विषयांचे आहेत. त्याची मी सर्वसाधारण बेरीज केली तर ती 19 हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त होते. किंबहुना काही ज्या अकल्पित गोष्टी घडतात किंवा जर निसर्ग कोपला तर त्यावेळी जी निधीची उपलब्धता करुन दिलेली आहे उदा. धान असेल, कापूस असेल किंवा इतर पिके असतील त्यांच्या बाबतीत अवेळी पावसामुळे किंवा अवकाळी पावसामुळे वेगळी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी ताबडतोब घोषणा केली आणि त्यावेळी 2 हजार कोटी रुपयांची तरतूद करुन दिलेली आहे. माझ्या म्हणण्याचा उद्देश असा आहे की, सकृतदर्शनी जरी हा आकडा 17 ते 18 हजार कोटी रुपयांचा दिसत असला तरी प्रसंगी तो आकडा 22 हजार कोटी रुपयांपर्यंत जाऊ शकतो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे यातील ही पाने जर बाजूला काढली आणि वेगळे पुस्तक केले तर त्यांची कल्पना साकार होऊ शकते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार....

कृषीच्या संदर्भात वेगळा अर्थसंकल्प मांडला असे मानसिक समाधान त्यांना मिळू शकेल ही गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, शासनाने थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांच्या वीज बिलामध्ये 50 टक्के व्याजापर्यंत सवलत दिलेली आहे. त्यासाठी 2500 कोटींची तरतूद केलेली आहे. सिंचन योजनांबाबत अनेक सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केलेला आहे. त्याबाबत बोलताना मी असे सांगेन की, जी जुनी धरणे किंवा पाटबंधारे प्रकल्प आहेत त्यामधून पाण्याची गळती मोठ्या प्रमाणात होऊन पाणी वाया जात आहे. या प्रकल्पाच्या दुरुस्तीची कामे शासनाने केली पाहिजेत असे मला वाटते.

सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी अर्थसंकल्पाचे स्वागत करीत असताना पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे असे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी विजेचा काटकसरीने वापर कसा करावा ते देखील आपल्याला उत्तम प्रकारे सांगितले आहे. घरगुती विजेच्या वापरापासून ते शासन, संस्था यांनी विजेची काटकसर कशी करावी ते सांगितले आहे. अमेरिका, दुबई व इतर परदेशातील अनेक उदाहरणे सांगून त्यांनी सभागृहात कल्पना मांडलेल्या आहहेत. त्यांचे सर्वांनीच स्वागत केलेले आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी त्यांच्या भाषणात एक वाक्य असे उच्चारले होते की, यशवंतराव चव्हाण यांनी आम्हाला धोक्याने महाराष्ट्रामध्ये घातले आहे. कदाचित आपण चुकून बोलला असाल. हे वाक्य ऐकून माझ्यासारख्या संवेदनशील माणसाला फार दु:ख झ ाले, यातना झाल्या. या सभागृहात प्रश्नांबाबत गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. पण अशी वाक्ये कोणत्याही सदस्यांच्या तोंडात चुकून सुध्दा येता कामा नयेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मी त्यावेळी असे म्हटले होते की, संयुक्त महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी त्यांनी आम्हाला विनंती केली होती. त्यावेळी त्यांनी असेही म्हटले होते की, जर तुमचा विकास झाला नाही आणि मी जर हयात असलो तर तुम्हाला वेगळा विदर्भ करुन देईन. ते आज हयात असते तर आम्हाला वेगळे विदर्भ राज्य मिळाले असते. त्यांच्या विनंतीला मान देऊन आम्ही महाराष्ट्रात आलो. मी तोलून मापून बोलत असते.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ MMP/

श्री.उल्हास पवार : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्या भाषणात 'धोक्याने' असा शब्दप्रयोग केला होता. परंतु त्यांच्या म्हणण्यानुसार त्यांनी तसा शब्द उच्चारला नसेल तर मी आपले स्वागत करतो. यशवंतराव चव्हाणांच्या कल्पनेतील सामान्य माणूस किंवा समाजवादाच्या दृष्टीने, भावनिक, आर्थिक, सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने हा महाराष्ट्र एकसंध रहावा ही भावना त्यांनी व्यक्त केलेली आहे. त्या भावनेला आज काही ठिकाणी तडे जात आहेत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. ते तडे सांधले पाहिजेत.

सभापती महोदय, मघाशी औचित्याच्या मुद्याद्वारे सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो मुद्दा मांडला त्यावेळी मला क्षणभर असे वाटले की, ही चर्चा येथेच थांबवावी व त्याची प्रसिध्दी उद्याच्या वर्तमानपत्रामध्ये येऊ नये.

सभापती महोदय, या शासनाने ग्रामविकासाच्या अनेक योजना आखल्या आहेत. ग्रामीण भागातील जनतेच्या दृष्टीने दलित व आदिवासी यांना सामाजिक न्याय देण्याच्या दृष्टीकोनातून घरकूल योजना, शिष्यवृत्ती योजना या सर्व योजना उत्तम प्रकारे प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचा मानस या अर्थसंकल्पात व्यक्त केलेला आहे. शासनाने दलित व आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ केलेली आहे. मला सांगण्यास आनंद वाटत आहे की, गेल्या 4 वर्षांपासून या महाराष्ट्रामध्ये 72 दलित विद्यार्थी राज्याच्या शिष्यवृत्तीच्या आधारावर परदेशामध्ये शिक्षण घेत आहेत. कदाचित त्यांची संख्या वाढली असेल, त्यांना अधिक संधी उपलब्ध करुन दिली पाहिजे. या सर्व मुद्यांचे सर्वांनी स्वागत केले पाहिजे.

राज्याला महसूल वाढवावयाचा असतो हे खरे आहे. शासनाने तंबाखू, बिडी यावरील कर वाढविला आहे ही चांगली गोष्ट आहे. पण यासारख्या ज्या ज्या वस्तू असतील त्यावर जेवढा कर लावता येईल तेवढा कर शासनाने लावावा. मग मद्य, तंबाखू, बिडी, सिगरेट, गुटखा यासारख्या वस्तूंवरील कर वाढवावा. तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी राज्यात गुटखा बंदी केली होती. परंतु कोणी तरी सुप्रीम कोर्टामध्ये गेले आणि तांत्रिक मुद्यावर सुप्रीम कोर्टाने ही बंदी उठविल्यामुळे राज्यात गुटखा पुन्हा सुरु झाला आहे. ही दुर्दैवी गोष्ट आहे. म्हणून या वस्तूंवर जेवढा कर लावता येईल तेवढा लावावा आणि राज्याचे उत्पन्न वाढवावे. त्याचे माझ्यासारखा कार्यकर्ता समर्थनच करील व मनापासून पाठिंबा देईल. मला वाटते की, सर्व सन्माननीय सदस्य या गोष्टीला पाठिंबा देतील.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

त्यातून तुम्ही उत्पन्न वाढवा. घरगुती गॅसवर आपण 5 टक्के कर आकारला आहे तो मध्यम वर्ग, कनिष्ठ मध्यम वर्ग आणि गरिबांना त्रस्त करणारा आहे. म्हणून का कर काढला पाहिजे. या करामुळे घरगुती गॅस सिलेंडरची किंमत जवळ जवळ 25 रुपयांनी वाढणार आहे. म्हणून हा गॅसवरील कर काढावा आणि मी ज्या सूचना केलेल्या आहेत त्यावर कर वाढवावा अशी मी माननीय अर्थ मंत्र्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, व्यसनाधीनता वाढत चालली आहे. व्यसनमुक्तीसाठी कोणकोणेत्या योजना केलेल्या आहेत किंवा भविष्यात कोणत्या योजना करण्यात येतील याचे चिंतन माझ्यासारख्या कार्यकर्त्याला या अर्थसंकल्पामध्ये, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसत नाही. व्यसनमुक्तीसाठी अनेक योजना होत्या. उदा. या महाराष्ट्रामध्ये माननीय बाळासाहेब भारदे आणि माननीय वि.स.पागे साहेब असताना कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती होत होती. आपले भागवत सांप्रदायातील कीर्तनकार, नारदीय कीर्तनकार, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाच्या गुरुदेव सेवा मंडळाचे कीर्तनकार, गाडगेबाब पंथातील कीर्तनकार यांना मानधन देऊन गावागावामध्ये जनजागृती करण्याचा एक प्रकल्प शासनाच्या माध्यमातून चालू होता. तो आता चालू आहे की नाही हे माहीत नाही. त्यांना विशिष्ट मानधन दिले जात असे. ही कीर्तनकार मंडळी कीर्तनाच्या माध्यमातून जनजागृती करत असत.

श्री. दिवाकर रावते : सन्माननीय सदस्यांनी उत्पन्न वाढीसाठी विडी, सिगारेट, गुटखा, दारु यावर अधिकाधिक कर लावावा अशी सूचना केली. आता आपल्या राज्यामध्ये आणखी एक नवा उत्पन्न वाढीचा मार्ग निर्माण झालेला आहे. तो म्हणजे अफूच्या शेतीला परवानगी देऊन त्यावर जास्तीचा कर लावता येईल. एका बाजूला अशा गोष्टींवरील कर वाढविण्याच्या सूचना सन्माननीय सदस्य करीत आहेत आणि दुस-या बाजूला व्यसनमुक्तीवर सूचना करीत आहेत...

श्री. उल्हास पवार : खसखस याबद्दल माझा अभ्यास नाही. माझा म्हणण्याचा उद्देश एवढाच आहे की, महसूल उत्पन्न वाढवायचे असेल तर हे सर्व केले पाहिजे. व्यसनमुक्तीसाठी आपल्या राज्यात पूर्वी योजना होत्या. जनजागृती करुन जनता जास्तीत जास्त व्यसनापासून कशी दूर जाईल याचे चित्र या ठिकाणी दिसले पाहिजे. सन्माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

मोठी घोषणा केली, आश्वासन दिले, त्याचे मी या ठिकाणी स्वागत करतो. पण या योजना साकार करण्याच्या दृष्टीने आपण प्रशिक्षणाच्या माध्यमातून जास्तीत जास्त काय प्रयत्न करीत आहोत हे दिसत नाही. ते अधिक प्रमाणात दिसले पाहिजे.

शिक्षणाच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी आपले विचार मांडले. शिक्षणाच्या दृष्टीने मोफत शिक्षणा पासून ते विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या स्टेशनरी पर्यन्त अनेक उपक्रम राज्याचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांनी जाहीर केलेले आहेत त्याचे मी स्वागत करतो. सन्माननीय सदस्यांनी येथे सांगितले की, राज्यातील पहिल्या वर्गापासून ते चतुर्थश्रेणी पर्यन्तची अनेक पदे रिक्त आहेत. अनेक पदे, अनेक ठिकाणी अनेक विभागात रिक्त आहेत. अगदी बाल भारती पासून. एकेका संचालकाकडे चार चार चार्ज आहेत. राज्यामध्ये अनेक ठिकाणी संचालक उपलब्ध नाहीत. या संदर्भात मी संबंधित मंत्री महोदयांशी चर्चा केली. त्यांनी सांगितले की, 7 वर्षाच्या, 5 वर्षाच्या अनुभवाचे टप्पे कमी करुन ते 3 वर्षापर्यन्त आणले. तरी सुध्दा त्या दर्जाचे अधिकारी मिळत नाहीत. वेगळया मार्गाने या खात्याला पूर्ण वेळ संचालक देता येतील का जेणेकरुन त्या खात्याला न्याय मिळेल यादृष्टीने विचार झाला पाहिजे. महात्मा गांधी यांच्या वर्धा येथील आश्रमाला 75 वर्षे पूर्ण झालेली आहेत. म्हणून त्यासाठी जी वेगळी तरतूद करण्यात आलेली आहे त्याचे मी स्वागत करतो. महात्मा गांधी यांनी सेवाग्राम येथे जो आश्रम केलेला आहे त्याला 75 वर्षे पूर्ण होत असताना आज भारतातच नव्हे तर जगामध्ये गांधीजींच्या वाङमयाची, विचारांची फार आवश्यकता निर्माण झालेली आहे. म्हणून ते केवळ पर्यटन केन्द्र न रहाता जगातील एक आशेचे केन्द्र निर्माण कसे होईल यादृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. आज तो आश्रम उपेक्षित दिसतोय. त्या आश्रमाच्या ठिकाणची सोय, तेथील व्यवस्था, तेथील यंत्रणा वाढीच्या दृष्टीने आपण अर्थसंकल्पामध्ये तरतूद केली त्याचे मी स्वागत करतो.

सभापती महोदय, पर्यटनाच्या संदर्भात बोलत असताना अनेक सन्माननीय सदस्यांनी असा उल्लेख केला की शेजारच्या गोवा राज्यात दरवर्षी 10 लाख पर्यटक येतात. खरे तर आपला कोकणचा समुद्र किनारा हा इतका सौंदर्यपूर्ण आहे की त्याबाबत अनेक वेळा चर्चा झाली, अनेक

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार...

घोषणा झाल्या. परंतु या कोकण परिसरातल्या पर्यटनाच्या ज्या संपूर्ण यंत्रणा आहेत त्याना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने, त्या विकसित होण्याच्या दृष्टीने अधिक प्राधान्य दिले पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

पर्यटनामध्ये अनेक गोष्टी येतात. त्यामध्ये शासनाने तीर्थक्षेत्राचा समावेश केला आहे. खरे म्हणजे तीर्थक्षेत्र हा माझ्या दृष्टीने जिव्हाळ्याचा विषय आहे. त्यावर मी अनेकदा या सभागृहात विचार मांडले आहेत. शासनाने 480 कोटी रुपये तीर्थक्षेत्र विकासासाठी उपलब्ध करुन दिले त्याचे मी स्वागत केले आहे. परंतु या तीर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने पंढरपूर, देहू, आळंदी येथे योजना सुरु असल्या, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची गेल्या वर्षी जन्मशताब्दी परिपूर्ण झाली असली तरी शासनाच्या माध्यमातून जगद्गुरु संत तुकाराम यांची जन्मशताब्दी असेल त्या दृष्टीने प्रबोधनाचे कार्यक्रम होणे आवश्यक आहे. त्यांच्या वाड़:मयाला प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने आणि तीर्थक्षेत्र विकासाच्या दृष्टीने काही प्रकल्प अंमलात आणण्यामध्ये फार मोठया प्रमाणात कामे सुरु असली तरी उदासिनता जाणवते. तो विचार, ती भावना या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून मी जरुर मांडू इच्छितो.

सभापती महोदय, मराठी भाषेबद्दल, सीमा प्रश्नाबद्दल तरतूद करण्यात आली आहे. मराठी भाषेच्या विकासासाठी साहित्य संस्कृती मंडळ, विश्वकोष या सर्व देणग्या स्व.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राला दिल्या आहेत. त्या माध्यमातून मराठी भाषेचा विकास आणि भाषेला अभिजात दर्जा देण्याची घोषणा केली आहे. मराठी भाषा भवन उभारण्याकरिता तरतूद केली आहे, त्या घोषणेचे मी स्वागत करतो. मनापासून विनंती करतो की, भाषा भवन लवकरात लवकर मुंबईमध्ये उभे राहिले पाहिजे आणि त्या माध्यमातून मराठी भाषा विकासाचे जे जे प्रश्न असतील ते सुटले पाहिजेत आणि साहित्यिक, सांस्कृतिक कल्पना राबविल्या पाहिजेत. काल सभागृहात लोककलेसंबधीची लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. त्या कलांना प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने अधिकाधिक तरतूद केली तर या सर्व गोष्टीचे आपल्या सर्वांना स्वागत करता येईल. एकूण ग्रामीण जनतेला, कृषी क्षेत्रातील जनतेला शैक्षणिकदृष्टया हा अर्थसंकल्प दिलासा देणारा आहे ही भावना व्यक्त करुन माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन 2012-13 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्याचे महत्व लक्षात घेऊन अर्थसंकल्पामध्ये 100 कोटी रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे. त्यांना अभिप्रेत असलेले तत्वज्ञान, ते जे जीवन जगले आणि त्यांनी जे धोरण घेतले होते त्या धोरणाला अनुषंगिक असा अर्थसंकल्प नाही याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्याचे दरडोई उत्पन्न 87686 रुपये असून राष्ट्रीय उत्पन्न केवळ 53033 रुपये असल्याची नोंद आहे. राष्ट्रीय उत्पन्नापेक्षा राज्याचे दरडोई उत्पन्न अधिक आहे. ही गोष्ट खरी असली तरी महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न वाढविण्यासाठी कोणतीही तरतूद केल्याचे दिसत नाही. राज्याचे दरडोई उत्पन्न 1 लाखावर नेण्याकडे आमचा कल आहे असा संदेश शासनाने दिला असता तर महाराष्ट्रातील जनतेला दिलासा मिळाला असता.

सभापती महोदय, कृषी विकासाबाबत अनेक योजना मांडल्या आहेत. सेंद्रिय शेतीबाबत खूप बोलता येण्यासारखे आहे. परंतु शिक्षण क्षेत्राबाबत बोलणे अधिक गरजेचे वाटते. यापूर्वी अनेक वक्त्यांनी जरी या क्षेत्राबाबत विचार मांडले असले तरी जे मुद्दे या ठिकाणी मांडले गेले नाहीत ते मांडण्याचा मी प्रयत्न करणार आहे. सभापती महोदय, स्व.यशवंतराव चव्हाण यांनी प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण सर्व स्तरावर मोफत देण्याची भूमिका घेतली होती. त्यांनी महाराष्ट्रातील वाड्या वस्त्यांमध्ये प्राथमिक, माध्यमिक, वरिष्ठ महाविद्यालय, विद्यापीठ यांचे जाळे विणले. महाराष्ट्रामध्ये चांगले वातावरण निर्माण केले. महाराष्ट्रामध्ये त्यांचा वारसा म्हणविणाऱ्या मंडळींनी त्यांच्या राहिलेल्या कार्यात हात घालणे हे त्यांचे कर्तव्य होते. पूर्व प्राथमिक शिक्षण म्हणजे बालवाडी शिक्षण, मॉंटेसरी एज्युकेशन म्हणतो ते बालवाडीचे शिक्षण या महाराष्ट्रामध्ये गेली 60 वर्षे देण्याचे काम करणाऱ्या शिक्षकांना अभ्यासक्रम नाही, त्यांच्याकरिता वेतनश्रेणी नाही, निधीची तरतूद नाही. अर्थसंकल्पामध्ये बालवाडी शिक्षकांसाठी आर्थिक तरतूद झालेली नाही. महाराष्ट्रातील शिक्षणाचा मूळ पाया पूर्व प्राथमिक शिक्षण आहे त्याकडे दुर्लक्ष झालेले असल्यामुळे शिक्षणाचा पाया ढासळू लागला आहे. त्या दृष्टीने तरतूद होणे आवश्यक असताना शासनाने तरतूद केलेली नाही.

स्व.यशवंतराव चव्हाण यांनी पहिल्या ते चौथ्या पंचवार्षिक पंचवार्षिक योजनांमध्ये महाराष्ट्रातील वाड्या वस्त्यांसाठी प्राथमिक शाळांचे जाळे विणले.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

विशेषत: सांगली जिल्ह्याच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर 14 हजार प्राथमिक शिक्षकांपैकी आता फक्त 6500 इतकेच प्राथमिक शिक्षक शिल्लक राहिले आहेत. यावरुन असे लक्षात येते की, जिल्हा परिषदेमार्फत मोफत शिक्षण देणाऱ्या प्राथमिक शाळा आता हळूहळू बंद पाडल्या जात असून त्या ठिकाणी इंग्रजी माध्यमाच्या शाळा वेगाने वाढविल्याजात आहेत. चालू वर्षी देखील मराठी माध्यमाच्या शाळांचाच बृहत आराखडा तयार करण्याचे काम शासन करीत आहे. अशा प्रकारे बृहत आराखडा फक्त मराठी माध्यमाच्या शाळांसाठीच तयार केला जातो आणि इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या बाबतीत मात्र मागेल त्याला, मागेल तेथे आणि मागेल तेव्हा अशी भूमिका हे शासन घेत असते. या अर्थसंकल्पात देखील शासनाने मराठी माध्यमाच्या शाळा वाचविण्यासाठी कोणतीही तरतूद केलेली दिसून येत नाही. त्याचबरोबर शासनाने गेल्या सहा महिन्यात रिक्त पदांची भरती करण्याबाबत सर्वच क्षेत्रातील जाहिराती प्रसिध्द केल्या पण प्राथमिक शिक्षण क्षेत्रात मात्र कोणती जाहिरात दिली नाही आणि ती का थांबविली तर आकृतिबंधाच्या नावाखाली जी भरती होते त्यात 50 टक्के कपात केली जाते. त्याचा परिणाम असा झाला की, आज माध्यमिक व प्राथमिक शाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी जवळजवळ संपत आला आहे. तरी देखील शासनाने अशी बंदी उठवून नवीन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती करण्यासाठी अर्थसंकल्पात मात्र कोणतीच तरतूद केल्याचे दिसून येत नाही. माझी शासनाला विनंती आहे की, शिक्षणाचा दर्जा जो घसरलेला आहे त्यात सुधारणा व्हावी असे वाटत असेल तर ही बंदी तात्काळ उठवावी आणि शिक्षकांची भरती करावी.

महोदय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांकडे असलेला वाढीव कार्यभार आणि वाढीव तुकड्या असल्याने गेल्या चार वर्षांपासून जास्तीचे काम या लोकांना करावे लागत आहे. त्या व्यतिरिक्त पट पडताळणीच्या नावाखाली जी प्रकरणे राखून ठेवलेली आहेत त्यांचा निपटारा करण्यासाठी किमान या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली दिसत नाही. त्याचप्रमाणे कायम विना अनुदानित शाळांच्या बाबतीत मूल्यांकनाच्या जाचक अटी लादल्या त्यासाठी कोणतीही तरतूद केलेली दिसत नाही. याचा अर्थ या आर्थिक वर्षात ज्या शाळांना 20 जुलै, 2009 पासून सन 2012 पासून अनुदान सुरु होणार होते पण त्यासाठी तरतूद न केल्यामुळे हे अनुदान सुरु होणार

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भगवान साळुंखे .....

नाही असे दिसते, या दृष्टीने शासनाने पावले टाकली पाहिजेत. राज्यात 8500 शाळा कायम विना अनुदानित तत्वावर चालविल्या जात आहेत. त्यात एम.ए. बी.एड. व बी.ए.बी.एड. धारक शिक्षक गेली अनेक वर्षे विनावेतन काम करीत आहेत. हे शिक्षक आझाद मैदानावर उपोषणासाठी बसलेले असून त्याबाबत शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे. तसेच राज्यात जवळजवळ 250 सिनियर कॉलेजेस कायम विना अनुदान तत्वावर चालू आहेत, त्यांच्या बाबतीत देखील शासनाने कोणतीही तरतूद केलेली नाही. सिनियर कॉलेजमध्ये काम करणाऱ्या प्राध्यापकांना युजीसीने नेट-सेट परीक्षांमधून सूट दिलेली आहे परंतु राज्य शासनाने त्यानुसार त्यांचा विचार केलेला दिसत नाही, याबाबत शासनाने लक्षा घालावे.

केंद्र सरकारने प्राथमिक शाळांच्या बाबतीत सर्व शिक्षा अभियान योजनेच्या माध्यमातून कला, क्रीडा व कार्यानुभव या विषयांशी संबंधित आर्थिक तरतूद केली आहे परंतु त्यात राज्य शासनाचा जो हिस्सा आवश्यक असतो तो टाकला न गेल्याने ज्या शाळा या योजनेकडे डोळा लावून बसलेल्या होत्या त्यांची निराशा झालेली आहे. राज्यात डी.एड. आणि बी.एड. धारक शिक्षकांची संख्या भरपूर आहे. हे शिक्षक दोन ते तीन लाख रुपये भरुन शिक्षकाची नोकरी मिळवितात पण त्यातून चांगल्या गुणवत्तेचे शिक्षण मिळत नाही म्हणून या कॉलेजेसला अनुदान देणे आवश्यक आहे याकडे लक्ष वेधतो आणि मी थांबतो.

जय हिंद. जय महाराष्ट्र.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी जो अर्थसंकल्प मांडलेला आहे त्याला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे. अनेक चांगले उपक्रम आणि भरघोस पध्दतीने विभागांना आर्थिक तरतूद करण्याची भूमिका माननीय अर्थमंत्र्यांनी घेतलेली आहे. स्व. यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्राच्या कृषी औद्योगिक रचनेचा पाया घातला तसेच त्यांनी धवल क्रांती आणली त्यांच्या जन्मशताब्दी निमित्त महाराष्ट्र शासनाने भरघोस अशी तरतूद केल्याबद्दल मी माननीय अर्थमंत्र्यांचे आभार मानतो.

सभापती महोदय, माननीय अर्थमंत्र्यांनी चांगल्या पध्दतीने अर्थसंकल्प मांडल्यामुळे आम्ही सर्व सन्माननीय सदस्य त्यासंदर्भात भूमिका मांडत आहोत.

सभापती महोदय, मला माननीय अर्थमंत्र्यांचे एका गोष्टीकडे लक्ष वेधावयाचे आहे की, आमच्या परिसरात प्रचंड दुष्काळ पडला असून बेदाणा तयार करणा-या द्राक्ष बागायतदारांवर फार मोठे संकट आलेले आहे. बेदाण्यावर 5 टक्के कर वाढ लावून दुष्काळाने त्रस्त झालेल्या शेतक-यांना पुन्हा अडचणीत आणण्याची भूमिका शासनाकडून होता कामा नये. गॅस दरवाढीच्या संदर्भात या ठिकाणी सर्व सन्माननीय सदस्यांनी भूमिका मांडली त्याच पध्दतीने बेदाणा तयार करणा-या शेतक-यांच्या बाबतीतही मांडली पाहिजे. काजू प्रमाणे बेदाण्यावरही 5 टक्के कराची भूमिका असली तरी द्राक्ष बागायतदार शेतकरी हे बेदाणा तयार करतात. काजू प्रमाणे बेदाण्याला परतावा देता येणार नाही अशी भूमिका या निमित्ताने मी व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, सांगली जिल्हा हा कर्नाटक बॉर्डर वरील जिल्हा आहे. कर्नाटक राज्यात बेदाण्यावर 2 टक्के सुध्दा कर लावलेला नाही. त्यामुळे कर्नाटक राज्य आपल्या व्यापा-यांना त्यांच्याकडे बोलावून पुन्हा नवीन पेठ करण्याची भूमिका घेईल त्यामुळे सांगलीतील पेठ कर्नाटक मध्ये जाता कामा नये. हळद, गूळ, मिरचीला जसा कर लावलेला नाही तसेच बेदाण्यालाही कर लावू नये, बेदाण्यावरील कर मागे घेण्यात यावा अशी सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने मागणी करतो व अर्थसंकल्पाला पाठिंबा देतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) :सभापती महोदय, सन 2012-2013 सालच्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत मला माझी भूमिका मांडण्याची संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो, धन्यवाद व्यक्त करतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्प तयार करतांना शासनाची भूमिका अर्थसंकल्पाच्या स्वरुपातून लक्षात येत असते. मी अर्थसंकल्पाचे अवलोकन केल्यानंतर माझ्या असे लक्षात आले की, शासनाची मालकत्वाची भूमिका असून ती पालकत्वाची नाही. शासन पालक समजून एखादी कृती करणार असेल तरच जनतेचे भले होऊ शकते अशी माझी धारणा आहे व ही या निमित्ताने व्यक्त करु इच्छितो.

सभापती महोदय, आदिवासींच्या विकासासाठी 9 टक्के तरतूद आवश्यक असतांना केवळ 3 टक्के तरतूद आदिवासींच्या विकासावर करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, शिक्षणासाठी सकल उत्पन्नाच्य किमान 10 टक्के तरतूद करणे आवश्यक असतांना 3 टक्क्यापर्यंत तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, आरोग्याच्या बाबतीत सुध्दा अशीच परिस्थिती आहे. आरोग्याच्या बाबतीतही सकल उत्पन्नाच्या 5 टक्के तरतूद करण्याची आवश्यकता असतांना फक्त 1 टक्का तरतूद करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, जेव्हा शिक्षक-शिक्षकेतर कर्मचा-यांचा विषय सभागृहात उपस्थित होतो तेव्हा चर्चेच्या निमित्ताने असे सांगण्यात येते की, शिक्षणाच्या गुणवत्तेचे काय ? जर शिक्षण क्षेत्रातील दुरवस्था आपण दूर केली नाही तर शिक्षणाची गुणवत्ता वाढूच शकत नाही हे साधे तत्व आम्ही कधीच विचारात घेत नाही. 21 व्या शतकात आपल्या राज्यात एक शिक्षकी व द्वी शिक्षकी शाळा शेकडोंने आहेत. फळा नसलेल्या शाळा, पिण्याच्या पाण्याची सोय नसलेल्या शाळा, स्वच्छतागृह नसलेल्या अनेक शाळा आपल्या राज्यात आहेत. असे असतांना शिक्षणाच्या गुणवत्तेचा विषय सभागृहात उपस्थित केला जातो आहे. भौतिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आम्ही जर आर्थिक तरतूद करणार नसू तर शैक्षणिक गुणवत्तेचा विषय बोलणे हे केवळ बोलण्यासाठीच राहील , त्यातून काहीही साध्य होणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.नागो पुंडलिक गाणार....

शिक्षणाचा अधिकार दिला, असे आम्ही सांगतो आणि स्वत:ची पाठ थोपटून घेतो. शिक्षणाचा अंमल करणारे या देशातील हे पहिले राज्य आहे, असे बोलत असताना त्या करिता लागणाऱ्या निधीसाठी मात्र या अंदाजपत्रकात तरतूद करण्यात आलेली नाही. या राज्यात जन्म घेतलेल्या बालकाला, विद्यार्थ्याला राष्ट्रीय संपत्ती समजून त्याच्या शिक्षणाचा पूर्ण भार शासनाने घ्यावा त्या करिता आवश्यक असलेल्या निधीची तरतूद करावी अशी मी विनंती करतो. धन्यवाद.

.....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचा मुद्दा.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. सध्या मुंबई विद्यापीठामध्ये बजेट मांडले जात आहे. जशी आपल्याकडे बजेटवर चर्चा सुरू आहे त्या प्रमाणे मुंबई विद्यापीठामध्ये बजेट मांडले जात आहे. मुंबई विद्यापीठ स्वायत्त आहे हे मला माहीत आहे. असे जरी असले तरी मुंबई विद्यापीठाचा मनमानी कारभार चालला आहे. तो विद्यापीठाला आणि आपणा सर्वांना लाजिरवाणा आहे, असे मला म्हणावयाचे आहे. गेल्या तीन दिवसांपासून मुंबई विद्यापीठा संबंधी वर्तमानपत्रातून बातम्या येत आहेत. हॉल तिकीट न मिळाल्यामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेला बसू शकले नाहीत, पेपर फुटला गेला, पेपरमध्ये विचारलेले प्रश्न आणि अभ्यासक्रमात शिकवलेले हे वेगळे होते, एक पेपर छापलाच नाही, अशा प्रकारच्या बातम्या येत आहेत. यावर सिनेट सदस्यांनी आवाज उठविला म्हणून व्हाईस चान्सलर श्री.वेळूकर यांनी त्यांना निलंबित केले आहे. त्यांना बजेटमध्ये भाग घ्यायला दिला नाही. असा मनमानी कारभार तेथे चालला आहे. बजेट एका ऑथोरिटीने प्रेझेंट करायला पाहिजे होते. ते एका नॉमिनेटेड मेंबर कडून सादर केले गेले. ते बजेट सिनेट सदस्यांच्या अनुपस्थितीत मंजूर केले गेले. एवढा मोठा हाहाकार मुंबई विद्यापीठाने सुरू केलेला आहे.

सभापती महोदय, हा प्रश्न उपस्थित करण्या मागची एवढीच भूमिका आहे की, आपल्या राज्याने काही कायदे बनविले आहेत. या कायद्यान्वये श्री.वेळूकर हटाव असे माननीय राज्यपालांना आपण सांगू शकतो. श्री.वेळूकरांनी मनमानी कारभार चालविला आहे. त्यांचे स्वत:चे पी.एच.डी.चे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. ते आज जातील की उद्या जातील अशा प्रकारची स्थिती आहे म्हणून माझी विनंती आहे की, आपण ताबडतोब हस्तक्षेप करून माननीय राज्यपालांना आमच्या सर्वांच्या भावना कळवाव्यात व श्री.वेळूकरांना ताबडतोब हटविण्याची मोहीम राज्य शासनाने हाती घ्यावी. तसेच संबंधित सिनेट सदस्यांचे निलंबन रद्द करून पुन्हा एकदा त्यांना सिनेट सदस्य म्हणून काम करण्याची संधी द्यावी अशी माझी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे.

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबई विद्यापीठाचा विषय मांडला आहे. मुंबई विद्यापीठाचा राजाभाई टॉवर इतका शरमेने कधी झुकला नसेल तितका तो आज, काल, परवा वर्तमानपत्रातून ज्या बातम्या येत आहेत त्याने झुकला असेल. मुंबई विद्यापीठाच्या परीक्षेसाठी मुले बाहेर पडली आहेत. त्यानंतर त्यांना ऐन वेळी सेंटर बदलल्याचे कळते. अर्ध्या तासामध्ये गोरेगावहून दहिसरला जावे लागते. अशा प्रकारच्या तक्रारी केल्यानंतर मुलांना नीट स्पष्टीकरण न मिळणे हे चुकीचे आहे. हे होते न होते तोच दुसऱ्या दिवशी मुंबई विद्यापीठाशी संबंधित वर्तमानपत्रात बातमी येते. काल माजी सिनेट सदस्य श्री.पराग वेदक यांनी फुटलेला पेपर SMS करून पत्रकारांना व कुलगुरूंना कळविले. पण कुलगुरूंनी ते डिनाय केले. पण 45 मार्काचे प्रश्न वर्तमानपत्राला कळल्यामुळे त्यांनी ते छापले. तो पेपर फुटला होता. काल संध्याकाळी देखील दुसरा पेपर मिळाला होता. त्यासंबंधी देखील कुलगुरूंना कळविण्यात आले की, आता तरी तो पेपर बदलावा. नाही तर तो उद्या देखील फुटेल. सुदैवाने तो पेपर बदलला गेल्यामुळे तो फुटला नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे . . . .

त्याठिकाणी सिनेटवर निवडून गेलेले जे प्रतिनिधी आहेत, त्यांनी जर याबाबतीत जाब विचारला तर त्यांना सिनेट सभागृहातून निष्कासित करण्यात येते. मला असे वाटते की, शिक्षण क्षेत्रामध्ये अशा प्रकारच्या घटना होणे हे निषेधार्ह आहेत. ज्याठिकाणी लोकशाहीचे धडे शिकविले पाहिजेत, त्या ठिकाणी अजून माननीय कुलगुरुंनी कायम स्वरुपी प्र-कुलगुरु नेमलेले नाहीत, तेथे कुलसचिव नाहीत. एक्झाम कंट्रोलर श्री.शिंदे यांच्यावर त्याच ठिकाणी चर्चा होऊन ॲक्शन घेण्यात आली होती. अशा प्रकारे विधान सभेच्या अधिवेशनाच्या कालावधीत मुंबई विद्यापीठामध्ये एवढा सगळा गोंधळ, गडबड होणार असेल तर ते बरोबर नाही. आज सदस्यांना निष्किासित करण्याची घटना घडली आहे, ॲथॉरिटी नसताना एका व्यक्तीने यापूर्वी एकदा, दोनदा असे केले आहे. त्यांनी सिनेट मध्ये बजेट मांडले होते.

सभापती महोदय, यापूर्वी याच बजेटवर चर्चा होत असताना माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री श्री.राजेश टोपेसाहेबांनी मान्य केले की,त्यांच्या अकाऊंटस् मध्ये गडबड आहे. अनेक वेळा अकाऊंटस्मध्ये कोणते पैसे आले आणि कोणते पैसे आले नाहीत याबाबतचा हिशोब ते सिनेटमध्ये सादर करु शकले नाहीत. त्याबाबतचा विषय सभागृहात निघाला आणि येथे माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले. असे असताना मला असे वाटते की, आज सिनेट सदस्यांना निष्कासित करण्याची घटना घडलेली आहे. या बाबतीत कोणतीही चर्चा करावयाची नाही आणि जर त्यांना बहुमताच्या जोरावर रेटून न्यायवयाचे असेल तर मला असे वाटते की,आपण माननीय मंत्री महोदयाना येथे बोलवावे. याबाबतचे स्पष्टीकरण सभागृहाच्या माध्यमातून मुंबईच्या जनतेला कळले पाहिजे अशी मी मागणी करतो.

. . . .3 के-2 . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, यामध्ये मी एकच गोष्ट समाविष्ट करु इच्छितो की, विधान सभेचे सन्माननीय सदस्य आणि विधान परिषदेचे सन्माननीय सदस्य म्हणून आपण काही सन्माननीय सदस्यांना सिनेटवर नामनिर्देशित करतो.त्यानुसार विधान परिषदेमधून मुंबई युनिव्हर्सिटीच्या सिनेटवर मी स्वत: सदस्य म्हणून आहे.परंतु मी मागच्या वेळीच त्यांना सांगितले की, तुम्ही ज्या सिनेटच्या बैठका घेता त्या विधीमंडळाचे अधिवेशन सुरु असताना घेतल्या जातात. मागच्या वेळेला मी केवळ तेथे सही करुन आलो आणि यावेळी तर मला तेथे जाताच आले नाही कारण याठिकाणी बजेटच्या संदर्भातील महत्वाची चर्चा होती.त्यामुळे यामध्ये काहीतरी बदल झाला पाहिजे. जर अधिवेशन काळामध्ये अशा प्रकारच्या बैठका झाल्या आणि आम्हाला तेथे सदस्य म्हणून पाठवणार असाल तर मग आम्हाला त्यामध्ये भाग घेणे गरजेचे आहे. त्यामध्ये काही सुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामुळे माननीय मंत्री महोदयांनी या गोष्टीची दखल घ्यावी अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी उपस्थित केलेला विषय महत्वाचा आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मागे एकदा डॉ.दीपक सावंत यांनी उल्लेख केल्या प्रमाणे मुंबई विद्यापीठ हे देशातील सर्वात नावाजलेले विद्यापीठ आहे. या विद्यापिठातून डिग्री मिळण्यासाठी असंख्य विद्यार्थी प्रयत्न करीत असतात. याठिकाणी फार पूर्वीपासून चालत आलेल्या परंपरेचे पालन करणारे कुलगुरु येऊन गेले आहेत. मात्र आता गेल्या काही दिवसापासून या विद्यापीठातील कारभाराबद्दल जे गोंधळ बाहेर येत आहेत ते पाहिल्यांनतर तेथील सगळाच कारभार अनागोंदी पध्दतीने हुकूमशाही प्रवृत्तीने आणि कोणाचीही तमा न बाळगता अशा प्रकारे सुरु आहे. आम्हा काही सदस्यांना काही विद्यापीठांवर विधीमंडळातर्फे सिनेट सदस्य म्हणून जाण्याची संधी मिळते.याठिकाणी मघाशी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश बिनसाळे यांनी सांगितल्याप्रमाणे विद्यापीठा-तील बैठका नेमक्या अशा वेळी लावल्या जातात की, आम्हाला त्या बैठकांना उपस्थित राहता येत नाही.आमच्या मुक्त विद्यापीठाचा पदवीदान समारंभ सुध्दा याच काळामध्ये असतो.तसेच वर्षभरा तील एक किंवा दोन बैठकांना सुध्दा आम्हाला उपस्थित रहाता येत नाही.

सभापती महोदय, या संदर्भात काही चौकशी केली तर कुलगुरुंचा दरारा तेथील सगळ्या वातावरणामध्ये एवढा प्रचंड असतो की दबक्या आवाजामध्ये सुध्दा तेथील कोणताही माणूस आपल्याशी बोलण्याचे धैर्य करीत नाही. अशी जर परिस्थिती असेल आणि जर अशा प्रकारे गोंधळ सुरु असेल तर मग महाराष्ट्राच्या आणि देशाच्या दृष्टीने सगळ्यात नावाजलेल्या विद्यापीठाच्या ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

कारभाराबद्दल एक मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे आणि त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन माझी उच्च व तंत्रशक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, याबाबत तातडीने कारवाई करावी आणि मुंबई विद्यापीठा-बरोबरच महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांच्या म्हणजे अगदी कुलगुरु निवडीच्या प्रक्रियेपासूनच्या सर्व पायऱ्यांवरील चर्चा आपण सदनामध्ये घडवून आणावी.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी अतिशय महत्वाचा मुद्दा येथे मांडलेला आहे आणि तो सर्वांशी संबंधित आहे. आपण आपल्या पाल्याला परीक्षा केंद्रावर घेऊन जातो आणि ऐनवेळी आपल्याला कळते की, आपल्या पाल्याचे परीक्षा केंद्र बदललेले आहे त्यावेळी आपली काय अवस्था होते, एवढा आपण विचार केल्यास या औचित्याचे गांभीर्य किती आहे हे आपणास कळून येईल. प्रत्येक घरातील विद्यार्थ्यांशी निगडीत हा विषय आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी येथे चर्चा झाली पाहिजे. कारण या सदनाच्या माध्यमातून विद्यापीठाचे कायदे केले जातात. सर्व विद्यापीठांवर विधानसभा आणि विधानपरिषदेतील सदस्यांची नियुक्ती करण्यात येते. विद्यापीठावर नियुक्ती झालेल्या सन्माननीय सदस्यांनी विद्यापीठाच्या ज्या काही अडचणी असतील त्या येथे सभागृहात मांडाव्यात हे त्या मागील कारण आहे. तेव्हा आपला विद्यापीठाशी थेट संबंध आहे. आपण प्रथम येथे कायदे करतो. विद्यापीठास स्वायत्तता नंतर मिळते. विद्यापीठाच्या स्वायत्ततेमध्ये काही गडबड असेल तर त्या बाबत येथे कायदे केले जातात. ही इतकी गंभीर घटना आहे की, परीक्षेचा पेपरच छापण्यात आला नाही. एकवेळ पेपर फुटल्याचे आपण समजू शकतो कारण कोणीतरी पैशासाठी तसे करीत असतो. परंतु परीक्षेचा पेपरच छापला नाही ही गंभीर बाब आहे. विद्यार्थ्यांना हॉल तिकिट मिळत नाही. विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रावर कुठेही भटकायला लावले जाते, मागील वर्षापासून विद्यापीठात असा गोंधळ सुरु आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितले ते बरोबर आहे की, त्या ठिकाणी कुलगुरुंचा एवढा दबदबा आहे की तेथे कुजबुज करणे देखील धोक्याचे झाले आहे. एवढी हिटलरशाही निर्माण करणारा कुलगुरु आम्ही सहन करीत आहोत, कुलगुरु पदासाठी पीएचडीची आवश्यकता असते, परंतु ती पीएचडी या कुलगुरुंकडे नाही. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहून त्यांचे निलंबन जाहीर करावे अशी माझी या ठिकाणी मागणी आहे. सभागृहात एकमताने त्यांच्या निलंबनाची मागणी झालेली आहे हा संदेश माननीय राज्यपाल महोदयांपर्यंत गेला पाहिजे आणि त्याची अंमलबजावणी माननीय राज्यपालांनी करावी, अशा प्रकारचा ठराव आजच येथे माननीय मंत्री महोदयांकडून मांडला गेला पाहिजे किंवा अशाप्रकारचे सरकारचे मत माननीय राज्यपाल महोदयांकडे गेले पाहिजे अशी आग्रही मागणी मी करतो. या घटनेमुळे आम्ही सभागृहापुढील कोणतेही कामकाज करण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते...

माननीय मंत्री महोदय सभागृहात आलेले आहेत. तेव्हा त्यांनी सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन कुलगुरुंचे आजच्या आज तातडीने निलंबन करावे आणि तसे माननीय राज्यपालांना कळवावे. मग या संदर्भात न्यायालयात जो काही निर्णय लागायचा तो लागेल. परंतु उच्छाद मांडणारा आणि विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळणाऱ्या हट्टी आणि एककल्ली माणूस विद्यापीठात राहता कामा नये अशी आमची भावना आहे आणि या प्रकारामुळे आम्ही सभागृहापुढील कोणतेही कामकाज करण्याच्या मन:स्थितीमध्ये नाही.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, हमारे माननीय सदस्यों ने मुंबई विद्यापीठ के मिस-मेनेजमेंट के बारे में जो कुछ कहा है, उस के बारे में कोई मतभेद नहीं है, उसमें कुछ गलत नहीं है. हमारे माननीय सदस्य श्री. प्रकाश बिनसाले और श्री. हेमंत टकले ने विद्यापीठ की सिनेट की मीटिंग के बारे मे कहा कि अधिवेशन के दौरान सिनेट की मीटिंग होने के कारण वे उसमें उपस्थित नहीं रह सके. मैं नागपुर विद्यापीठ का नॉमीनेटेड सिनेट मेम्बर हूँ और सिनेट की एक्सटेंडेड मीटिंग आज हो रही है. अधिवेशन होने की वजह से मैं इस मीटिंग उपस्थित नहीं हो सकता. इस बात की ओर शासन को ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, दूसरी बात यह है कि महाराष्ट्र के सभी विद्यापीठों के बारे में चर्चा होनी चाहिए. मैं माननीय सदस्यों से एक ही बात का अनुरोध करना चाहता हूँ कि विद्यापीठ के वाइस-चान्सलर एकेडमिक पोस्ट है, डिगनीफाइड पोस्ट है और सरकार के माध्यम से माननीय राज्यपाल के द्वारा उनकी अपाइंटमेंट होती है. मुंबई विद्यापीठ के वाइस-चान्सलर को हटाने की मांग मुझे नॉन एकेडमिक लगती है. मुझे लगता है कि इस विषय पर चर्चा होनी चाहिए और सब से महत्वपूर्ण विषय यह है कि महाराष्ट्र यूनिवर्सिटी एक्ट 1994 के ऊपर भी चर्चा होनी चाहिए. इसमें बहुत सारे कॉन्ट्राडिक्शन है, बहुत सारी त्रुटियां हैं. इसलिए इसके ऊपर सम्पूर्ण रुप से चर्चा होनी चाहिए.

. . . . . .

. . . .नंतर 3M-1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलत असतात)

उप सभापती : सभागृहाची बैठक 10 मिनिटे स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 3.25 ते 3.35 पर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मुंबई विद्यापीठ ही एक स्वायत्त संस्था आहे. त्या विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना पेपर उशिरा मिळाला असेल किंवा परीक्षेचा पेपर फुटला असेल तर ती गोष्ट विद्यापीठाच्या हिताची नाही. याबद्दल शंका असण्याचे कारण नाही. त्याबाबत जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर शासनाने जरुर कारवाई करावी. परंतु विद्यापीठाच्या बाबतीत सभागृहात कसलेही राजकारण केले जाऊ नये अशी आमची भूमिका आहे. कारण विद्यापीठ हे शिक्षकांचे मंदिर आहे. त्याच्या बाबतीत कोणतेही राजकारण होता कामा नये. तेथे काही गैरप्रकार झाले असतील तर त्याची निश्चितपणे चौकशी झाली पाहिजे. गैरव्यवहार झाला असेल, पेपर फुटला असेल तर त्याबाबत जरुर चौकशी करावी. पण विद्यापीठाच्या नावाखाली राजकारण कोणीही करु नये. सभागृहात माननीय उच्च शिक्षण मंत्री श्री.राजेश टोपे हे उपस्थित आहेत. त्यांनी त्याबाबत जरुर चौकशी करावी.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपल्या जागेवर जाऊन बसावे. सन्माननीय उच्च शिक्षण मंत्री हे या विषयाच्या संदर्भात निवेदन करण्यासाठी उभे राहिले आहेत. आपण त्यांचे निवेदन ऐकून घ्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, हे कायद्याचे राज्य आहे, मुंबई विद्यापीठात जर काही बेकायदेशीर झाले असेल तर त्याबाबत कायद्याप्रमाणे जरुर कारवाई करु. सन्माननीय सदस्यांच्या भावना मला समजल्या आहेत. सन्माननीय सदस्यांनी माझे ऐकून घ्यावे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : मी सभागृहाची बैठक 4.00 वाजेपर्यन्त स्थगित करीत आहे. 4.00 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा सुरु होईल.

(दुपारी 3.40 ते 4.00 वाजेपर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित झाली.)

....नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

सभापतीस्थानी माननीय उप सभापती

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आम्ही आपल्याकडून न्यायाची अपेक्षा करतो. माननीय उच्च शिक्षणमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मुंबई विद्यापीठातील सिनेट सदस्यांच्या निलंबनाबाबत मंत्री महोदयांना निवेदन करु द्यावे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी मुंबई विद्यापीठात दोन दिवसांपूर्वी जे काही प्रकरण घडले त्या संदर्भात औचित्याचा मुद्दा मांडला होता. प्रामुख्याने दोन-तीन मुद्दे त्यांनी उपस्थित केले होते. परीक्षेचा पेपर फुटला, विद्यार्थ्यांना हॉल तिकीट देण्यामध्ये विलंब झाला, त्यामुळे अनेक विद्यार्थी परीक्षा देण्यापासून वंचित राहिले. या संदर्भात विद्यापीठामध्ये सिनेटची बैठक दोन दिवसांपासून सुरु आहे. सभागृहात या प्रश्नाची चर्चा सुरु झाल्यानंतर मी माहिती घेतली. मला सभागृहाच्या निदर्शनास आणावयाचे आहे की, हॉल तिकीटचा जो मुद्दा मांडण्यात आला त्यानुसार ज्या 98 विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली नाही त्यांच्यासाठी 10 एप्रिल, 2012 रोजी विशेष पेपरला बसू देण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्याचबरोबर कॉम्प्युटराईज्ड फॅसिलिटेटर, जे प्रमुख असतात, त्यांच्यामार्फत हॉल तिकीट प्रक्रिया पूर्ण केली जाते. त्यांचा निग्लिजन्स लक्षात घेऊन श्री.मुजुमदार यांना सस्पेंड करण्यात आले आहे. त्याचबरोबर सिनेटची 10 लोकांची समिती गठीत करण्यात आली आहे. या सगळ्या गोष्टींची त्या समितीमार्फत चौकशी व्हावी अशा प्रकारची सूचना देण्यात आली आहे. त्यामुळे हॉल तिकीट वाटपामध्ये विलंब होणे किंवा दोन दिवसापूर्वी परीक्षेचा पेपर फुटणे याची चौकशी होणार आहे. आजचा पेपर फुटला अशी वृत्तपत्रात बातमी प्रसिध्द झाली आहे. परंतु त्यांनी ठामपणे सांगितले की, आजचा पेपर फुटलेला नाही. या संदर्भात सिनेटच्या सदस्यांची समिती गठीत करण्यात आलेली असून सगळ्या गोष्टीची चौकशी होणार आहे. त्या चौकशीच्या अनुषंगाने पुढे जे जे अकाऊंटेबल असतील त्या सर्वांवर कारवाई केली जाणार आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, सिनेटची बैठक आणि विधिमंडळाचे अधिवेशन एकाच वेळी सुरु असते. असा प्रकार पुन्हा होऊ नये याबाबतची सूचना

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे.....

निश्चितपणे सर्व विद्यापीठांना दिली जाईल. कारण अनेक सन्माननीय सदस्य वेगवेगळया विद्यापीठामध्ये सिनेटचे सदस्य असतात. त्याबाबत निश्चितपणे सूचना दिली जाईल. आज सिनेटची बजेटची बैठक सुरु झाली होती. त्यामध्ये जवळजवळ दोन तास या प्रश्नावर चर्चा झाल्यानंतर काही समाधान होत नाही म्हणून गोंधळ चालला होता. त्या अनुषंगाने 8 सिनेट सदस्यांना सस्पेंड करण्यात आले ही गोष्ट खरी आहे. त्यामुळे या सगळ्या गोष्टीचा जो काही रिपोर्ट असेल तो रिपोर्ट आम्ही मागविला आहे. तो रिपोर्ट आल्यानंतर पूर्णत: योग्य ती कारवाई केली जाईल. शासन म्हणून निश्चितपणे आम्ही स्वत: लक्ष घालू.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आता मंत्रीमहोदयांनी सांगितले की, त्यांनी गोंधळ घातला. गोंधळ घातल्यानंतर विद्यार्थ्यांच्या माध्यमातून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना सस्पेंड केले गेले. त्याच वेळी सभा तहकूब करता आली असती. आपण या सभागृहात वेळप्रसंगी बैठक तहकूब करतो. त्यांना चर्चेला बोलावले असते आणि त्यांच्या कानावर घालून पुन्हा एकदा अर्थसंकल्प मंजूर केला असता.

नंतर श्री.खर्चे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

हे सर्व बाजूला सारुन थेट त्यांना सभागृहाच्या बाहेर काढण्याचे जे कृत्य केले आहे ते समर्थनीय नाही. ज्यांच्यावर विश्वास ठेवून त्यांना विद्यापीठाच्या सिनेटवर निवडून दिलेले आहे त्यांच्या सहकार्याने कारभार चालविणे अभिप्रेत असताना असा प्रकार जो करण्यात आला तो योग्य नाही. तसेच आम्ही पीएच.डी. च्या संदर्भात मुद्दा मांडला होता त्यासंदर्भात काय झाले हे देखील सभागृहाला समजले पाहिजे. हे प्रकरण न्यायालयात असल्याचे समजले पण किती वर्षे ते न्यायालयात राहणार आहे, पीएच.डी. धारक लोक निवृत्त होईपर्यंत प्रकरण न्यायालयात राहील की काय किंवा एखादा बेकायदेशीर सदस्य येऊन त्याची जागा घेईल, असा प्रकार होण्यापूर्वी हा निकाल लागणार काय याचाही खुलासा झाला पाहिजे.

श्री. राजेश टोपे : महोदय, मी या निमित्ताने सभागृहाला इतकेच सांगू इच्छितो की, साधारणत: याच मुद्यावर विद्यापीठात अडीच तास सवंग अशी चर्चा झाली. तसेच या प्रकरणाचा संपूर्ण रिपोर्ट शासन म्हणून आम्ही मागविलेला आहे. तसेच पीएच.डी. च्या संदर्भातील विषय न्यायप्रविष्ट असल्याने यासंदर्भात भाष्य करणे उचित होणार नाही. तसेच माननीय राज्यपालांचे कार्यालय राज्याचे प्रमुख म्हणून संपूर्ण माहिती घेतच असतात.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, उद्या विद्यापीठाच्या परीक्षा व्यवस्थित होतील, पेपर फुटणार नाही यासंबंधात आपण शासनाला निदेश द्यावेत अशी आमची विनंती आहे.

उप सभापती : ठीक आहे, शासन त्यानुसार काळजी घेणारच आहे. आता अर्थसंकल्पावर माननीय उप मुख्यमंत्री सभागृहात उत्तर देतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: सन 2012-13 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु ....

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : महोदय, दिनांक 26 मार्च, 2012 रोजी विधानसभेत सन 2012-13 साठीचा 152 कोटी शिलकीचा अर्थसंकल्प मी सादर केला तर वरिष्ठ सभागृहात माननीय राज्य मंत्री यांनी अर्थसंकल्प सादर केला आहे.

महोदय, या अर्थसंकल्पावरील चर्चेत भाग घेत असताना सभागृहातील दोन्ही बाजूच्या अनेक सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला. त्यात काहींनी त्याचे स्वागत केले तर काहींनी टीकेचे धनी बनविले. त्यात साधारणपणे माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, डॉ. दीपक सावंत, माननीय श्री. दिवाकर रावते, श्रीमती शोभा फडणवीस अशा जवळपास 37 सदस्यांनी भाग घेतला. मला एका गोष्टीची जाणीव आहे की, माणूस म्हटला की मत-मतांतरे येतातच आणि हे लक्षात घेऊन यासंपूर्ण चर्चेकडे मी सकारात्मक दृष्टीकोनातून बघत होतो आणि माझी दृष्टी अधिक व्यापक करण्याच्या दृष्टीने चर्चेत भाग घेतलेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे सुरुवातीलाच मनापासून आभार मानतो. माझ्या माहितीप्रमाणे माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विरोधी पक्षनेते पदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर अर्थसंकल्पावरील त्यांचे हे पहिलेच भाषण आहे. ते तरुण आहेत, हरहुन्नरी आहेत आणि काही तरी करुन दाखविण्याची त्यांची जिद्द आहे. दिल्लीमध्ये सुध्दा त्यांनी दाखवायला पाहिजे की भाऊसाहेबांसारख्या वडीलधाऱ्या माणसाला बाजूला करुन विरोधी पक्षनेते पद पटकावले. त्यांच्या भाषणातून मला अपेक्षा होती पण त्यांनी एकदम कक्ष अधिकाऱ्याने तयार केलेला हा अर्थसंकल्प असल्याचे सांगून टाकले. लोकशाहीमध्ये या सर्व गोष्टी धरुन चालायला पाहिजे, ते अभिप्रेतच असते. स्व. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत, त्यांनी जो विचार, जो मूलमंत्र या राज्याला दिला त्याबद्दल सर्व राजकीय पक्ष, नेते, कार्यकर्ते तसेच जनतेच्याही मनात नितांत आदर आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

यशवंतराव म्हटल्यानंतर ज्या महान व्यक्तिमत्वाची उभ्या महाराष्ट्राला ओळख पटते ते व्यक्तिमत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण साहेब होय. स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष चांगल्या प्रकारे साजरे करण्याचे महाराष्ट्र सरकारने ठरवले आहे. लोकाभिमुख कारभार झाला पाहिजे, प्रशासनावर पकड असली पाहिजे, महाराष्ट्रातील कोणत्याही भागाला महाराष्ट्र राज्य आमचा विचार करीत नाही, त्यांच्या मनामध्ये कोणतीही प्रादेशिक भावना किंवा विभागीय भावना येता कामा नये अशा पध्दतीचे काम स्व.यशवंतराव चव्हाणांनी केंद्रामध्ये तसेच राज्यामध्येही करुन दाखवले होते. त्यांच्या जन्मशताब्दी काळात मला जनतेसमोर अर्थसंकल्प सादर करण्याची संधी मिळाली ते मी माझे भाग्य समजतो.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तसेच काही सन्माननीय सदस्यांनी वित्त विभागाच्या संदर्भात काही मूलभूत मुद्दे उपस्थित केलेले आहेत. काहींनी सांगितले की, आम्हाला अर्थसंकल्पात धोरण काहीच दिसत नाही. ही गोष्ट खरी आहे की, कोणत्याही ठिकाणी काम करीत असतांना काही का होईना व्हीजन असलेच पाहिजे, कशा पध्दतीने आपण उद्याची वाटचाल करणार आहोत यासंदर्भात व्हीजन असलेच पाहिजे. राज्याचे ध्येय धोरण अर्थसंकल्पात ध्वनीत होत नाही असे म्हणणे माझ्या दृष्टिकोनातून वस्तुस्थितीस धरुन नाही. त्यामुळे स्व. यशवतंराव चव्हाण साहेबांच्या विचारांशी सुसंगत व सर्वसमावेशक विकासाला अनुकूल अर्थसंकल्प सादर करण्याचा प्रयत्न मी या ठिकाणी केलेला आहे हे मी सुरुवातीलाच सांगू इच्छितो.

महाराष्ट्राची ध्येय धोरणे 15 वर्षापूर्वीच निश्चित झालेली आहेत. त्या ध्येय धोरणानुसार आमच्या आघाडी सरकारची वाटचाल सुरु आहे. कदाचित ते थोडेसे अतिशयोक्तीचे ठरेल परंतु मी आपल्याला सांगू इच्छितो की, 1999 सालामध्ये आघाडी सरकारच्या माध्यमातून शासन करण्यास आम्ही सुरुवात केली होती. जनतेने आमचे काम पाहून आम्हाला सन 2004 व सन 2009 मध्ये पुन्हा निवडून दिले. आघाडी शासनाचे काम जनतेला बरे वाटले म्हणून जनतेने आम्हाला तीन तीन वेळेस सरकार चालविण्याची संधी दिली. शासन करतांना आमच्याकडून काही गोष्टी चुकल्या असतील परंतु जो काम करतो तोच चुकत असतो, जो कामच करत नाही तो चुकणारच नाही. माननीय मुख्यमंत्री किंवा आमच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

मंत्रिमंडळातील वरिष्ठ, ज्येष्ठ मान्यवरांना विरोधी पक्ष नेत्यांनी, गट नेत्यांनी किंवा कोणत्याही पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी लक्षात आणून दिल्यानंतर ती बाब राज्याच्या हिताची असेल तर त्यामध्ये लक्ष दिले गेले पाहिजे, दुरुस्ती केली पाहिजे व राज्याला विकासाच्या माध्यमातून पुढे नेले पाहिजे या पध्दतीचे काम आम्ही करण्याचा प्रयत्न करीत आहोत. यामधूनच कृषी उद्योगाला चालना देणे किंवा कृषीच्या माध्यमातून आपल्याला रोजगार कसा निर्माण करता येईल व त्याच बरोबर आरोग्य, शिक्षण, पाणी या मूलभूत गरजांसाठी निधी कसा उपलब्ध करुन देता येईल, राज्याच्या पायाभूत सुविधा भक्कम कशा करता येईल व हे सर्व करीत असतांना सर्व घटकांचा विकास व्हावा असे उपक्रम राबविणे ही आमचे पूर्वीपासूनचेच ध्येय धोरणे आहेत व हीच ध्येय धोरणे माझ्या अर्थसंकल्पात प्रतिबिंबित झाल्याचे आपल्याला दिसून आले असेल.

सभापती महोदय, गेल्या वर्षी 58 कोटी रुपयांचा शिलकीचा अर्थसंकल्प सादर केला करण्यात आला होता. परंतु नंतर त्याचे 2055 कोटी रुपयांच्या तुटीमध्ये रुपांतर झाले. राज्याचे मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांनी व मी उप मुख्यमंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्या नंतर मी ठरवले होते की, कोणत्याही परिस्थिती स्वच्छ व पारदर्शक कार्यक्रम करावयाचा. अलीकडच्या काळात वेगवेगळया राज्यात काही ना काही घोटाळे झाल्याचे चित्र आपल्याला पहावयास मिळाले आहे. जे काम आपल्याकडून होईल ते चांगले झाले पाहिजे, राज्याच्या विकासाचे झाले पाहिजे व काम करीत असतांना त्यामध्ये पारदर्शकता असली पाहिजे

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

आपली भूमिका स्वच्छ असली पाहिजे. हे सगळे करीत असताना राज्याला आर्थिक शिस्त देखील लावली पाहिजे. तसा प्रयत्न करीत असताना आमच्यावर आरोप झाला की, 58 कोटी शिलकीचा अर्थसंकल्प 2055 कोटी रूपयाच्या तुटीमध्ये कसा काय नेला ? आम्ही या राज्याचे प्रतिनिधीत्व करीत असताना आम्ही खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे प्रतिनिधीत्व करतो. कामगार वर्ग देखील आहे. मोठ्या प्रमाणावर शहरीवर्ग देखील आहे. शेतकरी अडचणीत असताना त्यांच्यासाठी पडेल ती किंमत मोजण्यास आम्ही तयार आहोत. त्यांना कधीही निधी कमी पडू द्यायचा नाही हा आमच्या लोकशाही आघाडी सरकारचा निर्धार आहे. त्यामुळेच 2055 कोटीची तूट आम्हाला स्वीकारावी लागली. महसूल कमी झाला. अनाठायी खर्च झाला म्हणून तूट आलेली आहे असे अजिबात समजण्याचे कारण नाही. आम्ही बाकीच्या बाबतीत अंदाज व्यक्त केले होते. ते कराच्या बाबतीत होते. यासंबंधातील आकडे मी पुढे सांगणार आहे. आम्ही कर वसूल केलेला आहे. एवढेच नव्हे तर जास्तीचा कर वसूल करण्यामध्ये आमची यंत्रणा यशस्वी झालेली आहे, ही गोष्ट देखील महाराष्ट्राच्या लक्षात येईल.

ही तूट कशामुळे आली. परतीचा पाऊस चांगल्या पद्धतीने पडायला पाहिजे होता. पण तो पडला नाही. त्यामुळे विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र या भागामध्ये कापूस, सोयाबीन, धान पिकविणारा शेतकरी आहे त्याला मदत झाली पाहिजे म्हणून निर्णय घेतले. आमच्याकडे पैसे नव्हते. अडचणीच्या काळात शेतकऱ्याला सावरले पाहिजे. शेतकरी मोडला म्हणजे राज्य मोडेल. त्यामुळेच आम्ही दोन हाजार कोटी रूपयांचे पॅकेज जाहीर केले. एक गोष्ट खरी आहे की, हे पैसे देण्यामध्ये उशीर झालेला आहे. त्यासंबंधी देखील सन्माननीय सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले आहेत. पुरवणी मागणी मध्ये आपण बाकीचे पैसे मंजूर करून घेतले आहेत हे ही आपल्याला माहिती आहे. हे पैसे देण्याचे काम व्यवस्थित व्हावे म्हणून ती जबाबदारी आमचे ज्येष्ठ मंत्री श्री.पतंगराव कदम यांच्या विभागाकडे दिलेली आहे. आम्हाला खात्री आहे की, त्यांच्याकडे जबाबदारी दिल्यानंतर शेतकऱ्यांकडे व्यवस्थितपणे पैसे जाणार आहेत. श्री.पतंगराव कदम यांचे नाव घेतल्यानंतर दोन्ही बाजू कडील सन्माननीय सदस्य गप्प बसतात हा अनुभव गेली कित्येक वर्षे मी बघत आहे. कोणी हू की चू करत नाही. 2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

सभापती महोदय, अनाठायी खर्च केला म्हणून तूट वाढली असे अजिबात नाही. शेतकऱ्यांना मदत केली म्हणून तूट वाढलेली आहे. शेवटी बाकीच्या ठिकाणी आर्थिक शिस्त पाळण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. हे सर्व करीत असताना राज्य कर्जबाजारी झाले असे सांगण्यात आले. राज्याची कर्ज घेण्याची क्षमता राज्याच्या उत्पन्नावर अवलंबून असते. हे ज्यांना अर्थकारण माहिती असते त्यांना निश्चितपणे समजून येत असेल. ही मर्यादा केंद्र शासन ठरवून देत असते. राज्याचे एकूण दायित्व आम्ही सांगितले आहे. या वर्षाभरामध्ये 2 लाख 52 हजार कोटी एवढे होत असले तरी राज्याची अर्थव्यवस्था मोठी असून राज्याच्या उत्पन्नाची टक्केवारी जवळपास 19 टक्के पर्यंत आहे. केंद्राने ठरवून दिले आहे की, राज्याला 26 टक्के मर्यादे पेक्षा पुढे जाता येणार नाही. 26 टक्क्यांपर्यंत जाता येते म्हणून आम्ही कर्ज काढत बसत नाही. जेथे आपल्याला विकास करावयाचा आहे, पायाभूत सुविधा उभारावयाच्या आहेत. अशाच कामाला हा सगळा पैसा खर्च करता आला पाहिजे.

व्याज महसुलाचे प्रमाण साधारणपणे 14 टक्के इतकेच आहे. हे प्रमाण ठरलेल्या 20 टक्यापेक्षा कमी आहे. दरवर्षी राज्याला साधारणपणे 3 टक्के कर्ज उभारता येते. मागच्या वर्षी आम्ही 1.93 टक्के एवढे कमी कर्ज प्रस्तावित केले होते. या वर्षी 3 टक्के कर्ज उभे करता येत असले तरी 1.65 टक्के इतके कर्ज प्रस्तावित केले आहे. याचा अर्थ असा होत नाही की, योजनांना देण्यासाठी निधी कमी पडत आहे. योजनेचा आकार वाढून देखील कर्ज मर्यादेत ठेवले आहे. राज्याला आरबीआयकडून अधिकचे कुठलेही कर्ज मिळालेले नाही. एवढेच नव्हे तर अर्थोपाय अग्रिम देखील घेतलेला नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार . . . .

सभापती महोदय, कर्जावरील व्याज देण्यासाठी कर्ज काढण्यात येते असे विरोधी पक्षनेत्यांचे मत आहे. मी महसूल त्रुटीवर नियंत्रण ठेवण्याचा पूर्णपणे प्रयत्न केलेला आहे आणि आता पायाभूत सुविधा आणि इतर सार्वजनिक यंत्रणा निर्माण करण्याची गरज आहे यासाठी काही प्रमाणात कर्ज घ्यावे लागले तर वित्तीय शिस्तीवर विपरित परिणाम होत नाही. उलटपक्षी राज्याच्या विकासासाठी ही अपरिहार्य अशी गोष्ट आहे. साधारणपणे हे सर्व करीत असताना काही सन्माननीय सदस्यांकडून केंद्र शासनाच्या पैशावर योजना केल्या जातात अशा प्रकारचा आरोप चर्चेच्या निमित्ताने झाला. खरे तर केंद्र शासनाकडून पूर्वी अबांधील स्वरुपात योजने अंतर्गत निधी प्राप्त होत होता आणि हा निधी गाडगीळ आणि मुखर्जी यांच्या सूत्रांप्रमाणे विभिन्न राज्यांना दिला जात होता. मागील अनेक वर्षापासून केंद्र शासनाने हा निधी बांधील स्वरुपामध्ये काही विशिष्ट योजनांसाठी उपलब्ध करुन दिलेला आहे. मग ए.आय.बी.पी.असेल, जे.ए.एन.यु. आर.एम.असेल, आर.के.डी.वाय.असेल, एस.एस.ए. असेल, बी.एस.यु.पी.असेल, आय.एच.एस.बी.पी. असेल अशा प्रकारच्या योजना आहेत आणि केंद्र शासनाकडून हा निधी येतो याचा अर्थ राज्य शासन काहीच करीत नाही असा दावा अजिबात कोणाला करता येणार नाही. हा निधी पूर्व अबांधील स्वरुपामध्ये प्राप्त झालेला असला तरी राज्यांनी स्वत:च्या योजनेसाठी हा निधी वापरला असता. तथापि राष्ट्रीय पातळीवर विशिष्ट क्षेत्राला चालना देण्याचे धोरण केंद्र शासनाने स्वीकारले आहे आणि त्यामध्ये एकसूत्रता आणण्याकरता केंद्र शासनाने या विविध योजना आखलेल्या आहेत.

सभापती महोदय, मला सांगण्यास आनंद वाटतो की, या योजनेतून केंद्र शासनाकडून जास्तीत जास्त निधी आणण्याचे काम एआयबीपी च्या निमित्ताने केले. आपण केंद्र सरकारमध्ये कोणालाही विचारावे की कोणत्या राज्याने जास्त निधी नेलेला आहे. याबाबत सांगावयाचे तर सर्वात जास्त निधी एआयबीपीच्या माध्यमातून आणण्याचे काम महाराष्ट्र शासनाने केलेले आहे.आम्ही एवढ्या वरच थांबलो नाही.त्यामध्ये जवळ पास दोन हजार कोटी रुपये दरवर्षी एआयबीपीच्या मधून अलीकडच्या काळामध्ये प्राप्त होत आहेत आणि जवाहरलाल नेहरु नॅशनल अर्बन रिन्ह्युअल मिशनमध्ये देखील सर्वात जास्त निधी आणणारे राज्य म्हणून उभ्या भारत देशामध्ये महाराष्ट्र राज्याचा नंबर लागतो आणि या योजनेसाठी राज्याचा हिस्सा देखील पूर्णपणे दिलेला आहे. तिकडून निधी आला आणि आमची जी काही मॅचिंग ग्रँट होती ती दिली नाही असे झाले नाही. असे असताना सुध्दा मला आजच्या चर्चेच्या निमित्ताने या जवळपास 1 लाख 60 हजार कोटीचा प्लॅन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि नॉन प्लॅनचा जो अर्थसंकल्प आहे, त्यामध्ये केद्र शासनाचा निधी फक्त 10 टक्के आहे असे मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना सांगू इच्छितो. बाकी सगळा निधी या राज्यामध्ये उभा करण्याचे काम आपण करीत असतो आणि तो 10 टक्के पेक्षा कमी आहे.बाकीचा निधी राज्याच्या स्वत:च्या स्त्रोतातून निर्माण करण्याचे काम लोकशाही आघाडीच्या सरकारच्या माध्यमातून आम्ही करुन दाखविले आहे.

सभापती महोदय, काहीजण असे म्हणाले की, ही आकड्यांची जग्लरी आहे.तुम्ही फसविले, तुमचे जमेचे आकडे फसवे आहेत.परंतु सभापती महोदय, मला सांगावयाचे आहे की, जे काही करावयाचे ते स्वच्छ भूमिकेतून करावयाचे. फसवाफसवी करुन काही केले तर ते फार काळ टिकत नसते. जर बनवाबनवी केली तर ती कधी ना कधी उघडकीस येत असते. आजचा दिवस ढकलावयाचा आणि उद्याचे पहावयाचे अशा प्रकारची आमची कामाची पध्दत नाही.

सभापती महोदय, मी यानिमित्ताने येथे राज्याच्या प्रमुख कर संकलनाची आकडेवारी सांगू इच्छितो. साधारणपणे 2007-2008 मध्ये विक्री कराचा अंदाज 26,612 कोटी रुपये इतका होता आणि प्रत्यक्षात 26,772 कोटी रुपये इतका झाला. 2008-2009 मध्ये हा अंदाज 28,439 इतका होता आणि प्रत्यक्षात 30,680 इतका झाला. 2009-2010 रोजी 31,688 इतका होता आणि प्रत्यक्षात 32677 इतका झाला. 2010-2011 मध्ये 40,815 इतका होता आणि प्रत्यक्षात 42,482 इतका झाला. अशा प्रकारे प्रमुख कर संकलनाचा विभाग आहे किंवा महत्वाचे जे विभाग आहेत त्या बाबतीत जो सुधारित अंदाज होता, त्यापेक्षा प्रत्यक्षात जास्त कर मिळविण्याचा प्रयत्न मुद्रांक व नोंदणी शुल्कामध्ये केला,राज्य उत्पादन शुल्कामध्ये केला, विजेवरील कर आणि शुल्कामध्ये केला, वाहनांवरील कर आणि शुल्कामध्ये केला. तसेच व्यवसाय करामध्ये देखील केला आणि त्यामुळे महसुलामध्ये वाढ होत आहे. तसेच जो अंदाज केला जात आहे, त्या प्रमाणातच प्रत्यक्ष महसूल जमा करण्याचे काम गेल्या काही वर्षामध्ये सातत्याने राज्याने केलेले आहे.

यानंतर श्री.अ.शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.अजित पवार...

तीच गोष्ट महसुली खर्चाच्या बाबतीत सांगता येईल, अनेक विभागांमध्ये आम्ही जे सुधारित अंदाज केले होते त्याच प्रमाणात महसुली खर्च केलेला आहे. तेव्हा जमेचे आकडे फसवे आहेत असे चुकीच्या पध्दतीने सांगणे हे देखील बरोबर नाही.

सभापती महोदय, राज्याला पुढे न्यावयाचे असेल, देशाला पुढे न्यावयाचे असेल तर आपणास कृषी विभागाकडे लक्ष देणे आवश्यक आहे. या संदर्भात केंद्र सरकारने जी भूमिका स्वीकारलेली आहे तशीच भूमिका राज्य सरकारने देखील स्वीकारली पाहिजे. सन 2011-2012 च्या आर्थिक पाहणी अहवालामध्ये कृषी क्षेत्रामध्ये उणे नऊ टक्के आणि कृषी आणि संलग्न क्षेत्रामध्ये उणे 5 टक्के असा उल्लेख झालेला आहे. एका वर्षाच्या आकडेवारीवरुन राज्याची या क्षेत्रामध्ये पीछेहाट झाली असा ढिंढोरा पिटण्याचे काही कारण नाही. आपणास असा निष्कर्ष अजिबात काढता येणार नाही. कारण पावसावर आधारित शेती क्षेत्रामध्ये असे प्रसंग येत असतात. या राज्याने अनेक चढउतार पाहिलेले आहेत. अनेकवेळा दुष्काळांना तोंड दिलेले आहे. काही वेळा आपण जनावरांसाठी छावण्या सुरु केल्या. काही वेळेला अन्य कामे थांबवून दुष्काळामध्ये होरपळणाऱ्या जनतेला आधार देण्याचे काम केलेले आहे, काम दिलेले आहे, पाणी, चारा, देण्याचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, सन 2010-2011 या वर्षात कधी नव्हे इतके उत्पन्न झालेले आहे. तेलबियांचे 44 लाख टन इतके उत्पादन झाले. डाळीचे 34 लाख टन उत्पादन, कापसाचे 80 लाख गाठी उत्पादन झालेले आहे. महाराष्ट्र राज्याने देशामध्ये सर्वात जास्त डाळीचे उत्पादन काढले म्हणून केंद्र सरकारने राज्याला "कृषी करवट पुरस्कार" दिला. सन 2011-2012 मध्ये परतीचा पाऊस झाला नाही त्यामुळे रब्बी क्षेत्रात 20 लाख हेक्टर इतकी घट झाली. सर्व पिकांमध्ये साधारणत: 15 ते 20 टक्के घट झालेली आहे. सन 2010-2011 हे अतिशय उत्तम वर्ष गेले परंतु सन 2011-2012 मध्ये पावसाच्या लहरीपणामुळे ग्रोथ रेट नऊ टक्के निगेटीव्ह आलेला आहे.

सभापती महोदय, आपण मागील काही वर्षाची आकडेवारी पाहिली तर आपणास उत्पादनात वाढ झाल्याचे दिसून येईल. सन 1960 ते 1970 या काळात अन्नधान्याचे उत्पादन 65 लाख टन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

होते. सन 2000 ते 2011 या काळात अन्नधान्याचे उत्पादन 122 लाख टन झालेले आहे. म्हणजे आपण दुपटीने उत्पादन वाढविले आहे. परंतु त्याच प्रमाणात दुपटीने लोकसंख्या वाढलेली आहे यामध्ये दुमत नाही. डाळीचे उत्पादन पहिल्या दशकात 8 टन होते. पाचव्या दशकात 32 लाख टन वाढ झाले. तेलबियाचे उत्पादन पहिल्या दशकात 8लाख टन होते, पाचव्या दशकात 32 लाख टन झाले. कापूस 12 लाख गाठीवरुन आता 84 लाख गाठींवर गेला आहे. ऊस 112 लाख टनावरुन 896 टनावर गेला आहे.

सभापती महोदय, काही सन्माननीय सदस्यांनी माझ्यावर टीका करताना सांगितले की, दहा वर्षात पाण्याचे काय झाले, किती सिंचन झाले, किती पैसा खर्च झाला, कुठे पैसा गेला ,कुठे सिंचनाचे क्षेत्र वाढले, मी याबाबत सांगू इच्छितो की, आम्ही तापी, मांजरा, गोदावरी नदीवर बॅरेजेच बांधले. अगदी नाथसागर पासून बाभळीपर्यंत बॅरेजेच केले. यातून सिंचनाची क्षमता वाढलेली आहे आणि त्या त्या भागातील लोकप्रतिनिधींना हे मान्यच करावे लागेल. मागील काळात आपल्याकडे किती कारखाने होते आणि आता किती कारखाने झालेले आहेत याचा देखील विचार करावा. आता किती तरी मोठ्या प्रमाणावर कापूस आणि ऊसाचे उत्पादन वाढलेले आहे. सोयाबीन, धान, द्राक्ष किंवा इतर फळबागांमध्येही मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. गेल्या वर्षी परतीच्या पावसामुळे फटका बसला ही गोष्ट मी मान्य करतो. परंतु यामुळे राज्य एकदम अडचणीत गेले अशी ओरड करण्याचे काही कारण नाही. आज फलोत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात पहिला क्रमांक आहे. केळी, द्राक्ष, संत्रा, मोसंबी इत्यादी पिकांचे देखील चांगले उत्पादन झालेले आहे. देशात सर्वात जास्त उत्पादन महाराष्ट्रात होते म्हणून आम्ही "महाराज्य" झाले पाहिजे असे म्हणतो. देशाच्या एकूण उत्पादनापैकी 35 टक्के कांदा महाराष्ट्रात होतो तर निर्यात 80 टक्के होते.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी निर्यातीच्या बाबतीत काही प्रश्न मांडले. आमच्या बाजूच्या सदस्यांनी देखील काही प्रश्न मांडले.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

ज्यावेळी शेतकरी कापूस पिकवितो, कांदा पिकवितो किंवा साखर तयार करतो त्यावेळी निर्याती याबद्दलचे केंद्र शासनाचे धोरण कमीत कमी दोन वर्षाचे असलेच पाहिजे. तीन महिन्यांनी धोरण बदलणे हे बरोबर नाही. म्हणून या संदर्भात माननीय केंद्रीय मंत्री श्री. शदर पवार यांनी स्पष्ट भूमिका घेतली आणि माननीय मुख्यमंत्र्यंच्या नेतृत्वाखाली आम्ही केंद्रीय मंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांना भेटलो, माननीय पंतप्रधानांना भेटलो, सगळयांना भेटलो तेव्हा त्यांच्याही ही गोष्ट लक्षात आली आणि पुन्हा एक्स्पोर्टला परवानगी मिळाली पण त्याचा काही प्रमाणात फटका देशात सगळयांना बसला ही गोष्ट मी मान्य करतो परंतु कुठलेही धोरण ठरवत असताना ते कमीत कमी दोन वर्षाचे आणि जास्तीत जास्त पाच वर्षाचे, अशा प्रकारचे असले पाहिजे.

सभापती महोदय, फुलांच्या शेतीत "कट फ्लॉवर"मध्ये आघाडी घेतलेली आहे. सर्वात जास्त ऊसाचा उतारा आणि साखर उत्पादन आपण केले. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल आपल्याला शेतकऱ्यांबद्दल आस्था आहे तशीच आम्हालाही आस्था आहे. आमचाही भाग जिराईत भागात, बागायती भागामध्ये मोडतो. एकदम तेथे सर्व सुजलाम-सुफलाम झाले आहे असे समजण्याचे कारण नाही. पाणी सगळीकडे पोहचविण्याचा कितीही प्रयत्न केला तरी आपल्याकडे पाण्याच्या मर्यादा आहेत. पहिले प्राधान्य पिण्याच्या पाण्यासाठी आणि दुसरे प्राधान्य शेतीसाठी हे धोरण 40, 50 वर्षामध्ये या महाराष्ट्रामध्ये आमच्याच शासनाने बदलवून दाखविले आणि दुसऱ्या क्रमांकावरील शेतीला अग्रक्रम दिला आहे. अशा पध्दतीचा प्रयत्न शासनाचा चाललेला आहे. यावेळी जाणीवपूर्वक 200 कोटी रुपयाची तरतूद कोरडवाहू मिशनकरिता केलेली आहे. ती फार आहे अशा प्रकारचा शासनाचा दावा नाही. त्यामध्ये आणखी वाढ करावयाची आहे. या वर्षी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यामध्ये अधिकचे उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न त्या-त्या विभागाच्या अधिकाऱ्यांना व्यवस्थितपणे विश्वासात घेऊन केलेली आहे. त्यातील लिकेजेस 100 टक्के कसे थांबविता येतील आणि उत्पन्न कसे वाढविता येईल असा शासनाचा निश्चितपणे वर्षभर प्रयत्न चालू राहील, त्यातून उद्या कोरडवाहूला अधिकचे देता आले तर तेही देण्याचा प्रयत्न शासन करणार आहे. आदरणीय श्री. शरद पवार साहेबांनी सन्माननीय श्री. प्रणव मुखर्जी यांना एक प्रस्ताव दिला होता.

सभापती महोदय, विदर्भाच्या बाबतीत आम्हाला एका गोष्टीची खंत आहे. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते सभागृहात नेहमी या विषयावर बोलत असतात. ते डायरी काढतात आणि किती

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार. . .

शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या हे सांगतात. आज शेतकरी आत्महत्येपर्यंत प्रवृत्त होतो ही आमच्या दृष्टीने आणि संपूर्ण राज्याच्या दृष्टीने शरमेची बाब आहे परंतु त्यातून बाहेर पडण्याकरिता या शेतकऱ्यांना शून्य टक्के व्याजाने, एक लाख रुपयापर्यंत पीक कर्ज कसे देता येईल, त्यामध्ये आणखी सवलती कशा देता येतील, माननीय पतप्रधानांचे पॅकेज, माननीय मुख्यमंत्र्यांचे पॅकेज कसे देता येईल अशा प्रकारचा प्रयत्न शासन सातत्याने करीत आहे.पण यामध्ये जेवढे यश मिळावयाला पाहिजे तेवढे मिळाले नाही, हेही मी स्पष्टपणे मान्य करीन परंतु याच्यामध्ये यश कसे गाठता येईल या दृष्टीने शासनाचा प्रयत्न निश्चितपणे आहे.

सभापती महोदय, विदर्भासाठी 3250 कोटी रुपयांची पाच वर्षासाठी सूक्ष्म व लघु सिंचनासाठी तरतूद जाहीर करण्यात आलेली आहे. त्यातून 300 कोटी रुपये सन 2012-2013 मध्ये मिळणार आहेत. राष्ट्रीय कृषी विकास योजना आणि इतर राज्य योजनांतर्गत एक लाखा पेक्षा जास्त शेततळी, सिमेंट नालाबंडिगची निर्मिती झालेली आहे. त्याही पेक्षा जास्त निर्मिती पुढील पाच वर्षात करावयाची आहे. अर्थसंकल्पावरील भाषण करत असताना मी साधारणपणे 3 हजार शेततळी दाखविलेली आहेत तसेच 18 हजार विहिरी दाखविलेल्या आहेत, मी देखील त्याबद्दल समाधानी नाही. कारण मोठया प्रमाणात विहिरी घेण्यात आलेल्या आहेत. आता शेतकऱ्यांनी विहीर घेतली तर त्या विहिरीला पाणी लागत नाही कारण भूगर्भातील पाण्याची पातळी खोलवर चाललेली आहे. त्यामुळे शेततळी कशी वाढविता येतील या बद्दलचा प्रयत्न 100 टक्के करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदय,श्री. बाळासाहेब थोरात हे कृषी मंत्री असताना त्यांनी आदरणीय श्री. पवार साहेबांच्या माध्यमातून या शेततळयांसाठी पैसे आणले होते तसे सन्माननीय मंत्री महोदय, श्री. राधाकृष्ण विखे-पाटील आणि आम्ही सर्वजण मिळून शेत तळयांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न करु. राज्य आणि केंद्र शासनाची मिळून दरवर्षी कृषी क्षेत्रासाठी भक्कम तरतूद झाली पाहिजे. पणन व्यवस्था बळकट करण्यासाठी बाह्य सहाय आणि इतर प्रकल्पाद्वारे पाच वर्षामध्ये अडीच हजार कोटी रुपये उपलब्ध केले जाणार आहेत. खाजगी सार्वजनिक भागीदारीचे राज्य शासनाचे प्रयत्न आहेत. यामध्ये वर्ल्ड इकॉनॉमी फोरमच्या मुंबईच्या सभेत 25 खाजगी उद्योजकांकडून प्रतिसाद मिळाला आहे. त्यामध्ये अडीच हजार कोटी रुपयांची गुंतवणूक आवश्यक आहे.फक्त एका वर्षाच्या आकडेवारीवरुन माझी सभागृहातील दोन्ही बाजूच्या सन्माननीय नेत्यांना

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

आणि सदस्यांना विनंती आहे की, महाराष्ट्राची पिछेहाट झाली अशा प्रकारचा निष्कर्ष आपण काढू नये. तथापि कोरडवाहू शेतीला स्थैर्य देणे आवश्यक आहे, त्यासाठी हे शासन निश्चितपणे विशेष अधिकचा प्रयत्न करील अशा प्रकारची खात्री मी या ठिकाणी देऊ इच्छितो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी राज्यातील विजेच्या तुटवड्याबाबत शासनाने कोणती पावले उचलली आहेत याची विचारणा केली आहे. डिसेंबर, 2012 पर्यंत या राज्याला भारनियमनातून मुक्त करणार म्हणजे करणार आहे. मी ही केवळ घोषणा करीत नाही तर त्याबाबत शासनाने कार्यक्रम आखला असून त्याच्या आधारे बोलत आहे. सन्माननीय सदस्य श्री.अरुण गुजराथी यांनी सांगितल्या प्रमाणे यंदाच्या वर्षी वीजनिर्मितीसाठी 1500 कोटी रुपये प्रस्तावित केलेले आहेत. या रकमेतून वीजनिर्मिती होणार नाही. कोणत्याही वित्तीय संस्थांकडून कर्ज घ्यावयाचे असल्यास शासनाला प्रथम 20 टक्के रक्कम द्यावी लागते. त्यानंतर त्या वित्तीय संस्था 80 टक्के रक्कम देतात. म्हणजे 1500 कोटीमधून 6 हजार कोटी रुपये उभे केले जाणार आहेत. हे शासन औट घटकेचा विचार करीत नाही तर दीर्घ काळाचा विचार करीत आहे. पुढील काळात राज्याला भारनियमनाला तोंड द्यावे लागू नये याची आम्ही काळजी घेत आहोत. 2014 मध्ये होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये हा मुद्दाच राहू नये अशी व्यवस्था करीत आहोत. हा मुद्दा मागील निवडणुकीच्या वेळी राहिला होता. सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांना मी सांगू इच्छितो की, तो मुद्दा तुम्हाला लोकांना पटवून देता आला नाही. कारण विरोधी पक्षावर जनतेचा विश्वास नाही. 2009 मध्ये आमच्याऐवजी तुमचे राज्य असते तर केवळ याच मुद्यावर आम्ही सत्तांतर घडवून आणले असते. पण तुम्हाला जमतच नाही तर त्याला आम्ही काय करणार ? (अडथळा)

सभापती महोदय, महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तीन कंपन्यांच्या माध्यमातून राज्यात विजेचे काम सुरु आहे. सध्या महानिर्मिती कंपनीची स्थापित क्षमता 9,738 मेगावॉट इतकी आहे. त्यापैकी 6,480 मेगावॉट औष्णिक, 2,585 मेगावॉट जलविद्युत, 672 मेगावॉट वायूवर आधारित आहे. त्याचप्रमाणे औष्णिक विद्युत केंद्रातून जास्तीत जास्त पीएलएफ मिळविण्यासाठी प्रयत्न करीत आहोत. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीत क्रमांक 2 वरील प्रश्नाबाबत मी व माननीय ऊर्जा राज्यमंत्र्यांनी सांगितलेले आहे. महानिमिर्तीने खापरखेडा येथील 500 मेगावॉटचा नवीन वीज संच कार्यान्वित केला असून भुसावळ येथे दोन संच डिसेंबर, 2012 च्या आत कार्यान्वित होत

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

आहेत. त्यातून 1,500 मेगावॉट वीज मिळेल. 2012-13 या वर्षात 1,400 मेगावॉट क्षमतेचे केंद्रीय प्रकल्प व 2,255 मेगावॉट क्षमतेचे खाजगी प्रकल्प कार्यान्वित होत आहेत. केंद्रीय प्रकल्प व खाजगी प्रकल्प यातून डिसेंबर, 2012 अखेर 16 हजार मेगावॉट वीजनिर्मितीची अपेक्षा असून विजेची मागणी 15 हजार मेगावॉट इतकी असणार आहे. डिसेंबर, 2012 पर्यंत राज्याला भारनियमनातून मुक्त करण्याचे शासनाचे धोरण आहे. त्यासाठी अनेक प्रकारच्या योजना आखल्या आहेत. मग सिंगल फेस असेल, गावठाण फिडर सेपरेशन असेल, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेत झालेली कामे असतील यामध्ये काही त्रुटी असतील त्याकडे जरुर अधिक लक्ष देवू.

ब-याच वेळा असा आरोप केला जातो की, बाहेरची वीज घेण्याकडे सरकारचा कल असतो. तसे अजिबात नाही. राज्याला सन 2011-12 मध्ये अपेक्षित वीज होती त्यासाठी 43 टक्के वीज महानिर्मितीकडून घेतली होती. केंद्रीय प्रकल्पातून 20 टक्के, पवन ऊर्जा, जल ऊर्जा व अणू ऊर्जाद्वारे 31 टक्के आणि खाजगीकरणातून फक्त 6 टक्के वीज घेतली आहे. यामध्ये पूर्णपणे पारदर्शकता आहे. वीज घेताना ई-टेंडर काढावे लागते. एमइआरसीची परवानगी घ्यावी लागते. गुजरात सरकारने कर्नाटक राज्याकडून घेतलेल्या विजेचा दर किती होता, मध्य प्रदेश राज्यातील विजेचा दर किती आहे, त्याचीही सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी माहिती घ्यावी. शासनाला काहीही झाकून ठेवण्याचे कारण नाही. अलीकडच्या काळात, घरगुती, शेती, वाणिज्य वापर यामध्ये प्रत्येक वर्षात वाढ होत आहे. ती वाढ गृहित धरुनच वीजनिर्मितीचे प्रकल्प मार्गी लावण्याचे काम केले जात आहे.

हे सर्व करीत असताना मला एक गोष्ट आर्वजून सांगितली पाहिजे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार पुढे सुरु...

या सगळया गोष्टी होत असताना आपण सुध्दा विरोधाला विरोध करण्याची भूमिका कुठे तरी सोडली पाहिजे. सत्ताधारी पक्ष म्हणून आम्ही काम करतो. कोणत्याही ठिकाणी काम करीत असताना अलीकडच्या काळामध्ये प्रत्येकाला वीज पाहिजे असते, पण आपल्या भागामध्ये तो प्रकल्प नको असतो. हे करीत असताना काही ठिकाणी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना मला एक गोष्ट नम्रतापूर्वक सांगायची आहे की, आम्ही एखादा प्रकल्प उभारणीचे काम हाती घेतले तर विरोधी पक्षाचे आहात म्हणून विरोधासाठी विरोध करणे हे महाराष्ट्राला अजिबात झेपणारे नाही. उदाहरण द्यावयाचे झाले तर जैतापूरच्या महत्वाकांक्षी आणि गरजेच्या प्रकल्पाचा उल्लेख करता येईल. भविष्यात आपल्या पुढच्या पिढीने आपल्याला निश्चितपणे दुवा दिला पाहिजे अशा प्रकारचे काम आपण केले पाहिजे. आपल्या काळात झालेल्या कामांवर पुढच्या पिढीचा विकास अवलंबून राहाणार आहे. महाराष्ट्र सुजलाम, सुफलाम व्हावा असे आमचे सर्वांचे प्रयत्न आहेत. जैतापूरचा ऊर्जा प्रकल्प ही काळाची गरज आहे. अंधारमय महाराष्ट्राला प्रकाशाची आस आहे. म्हणून विरोधासाठी विरोध करु नका. तुम्ही विधायक कामाला मोठ्या मनाने साथ द्या. आज राज्य कुठे चालले आहे. जपानमध्ये घटना घडल्यानंतर देशाच्या पंतप्रधानांनी त्यामध्ये अधिक लक्ष घातले आहे. इतरही त्या प्रकल्पाला पाठिंबा देत आहेत.

सभापती महोदय, कधी ना कधी कोळसा संपणार आहे, कधी ना कधी पाण्यावर मर्यादा येणार आहेत, कधी ना कधी गॅसवर देखील मर्यादा येणार आहे. आपल्याला गॅसचे प्रकल्प घ्यायचे आहेत. केन्द्र सरकारने सांगितलेले आहे की, पहिल्यांदा घरगुती गॅस वापराला प्राधान्य दिले जाईल आणि गॅस शिल्लक राहिला तर तुमचा विचार करु. तेव्हा गॅसच्या बाबतीत देखील मर्यादा आहेत. वा-यावर चालणा-या पवन ऊर्जेला देखील मर्यादा आहेत. सौर ऊर्जेला मर्यादा असली तरी ती वीज खूप महाग आहे. पारंपारिक ऊर्जा निर्मितीमध्ये कोजनरेशनला मर्यादा आहेत. मला विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना आणि विशेषत: सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम यांना सांगायचे आहे की, ऊर्जा नाही तर कारखाने नाहीत, कारखाने नाहीत तर रोजगार नाही, रोजगार नाही तर उत्पन्न नाही आणि उत्पन्न नाही तर कर नाही. तेव्हा अशा प्रकारे विरोधासाठी विरोध करणे आपल्याला अजिबात चालणार नाही. आपल्या राज्यात हे प्रकल्प झाले पाहिजेत अशा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

प्रकारचा सकारात्मक दृष्टीकोन आपण घेतला पाहिजे. मला माहीत आहे की, यामध्ये आपली काही जणांनी अडचण होते. काही वेळा लॉबीमध्ये बसल्यानंतर सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम मला सांगतात की, तुमचे मला सगळे पटते, पण काय करणार...

श्री. रामदास कदम : मी असे कधी बोललोच नाही...

श्री. अजित पवार : एक गोष्ट माझ्या लक्षात आली नाही, ती म्हणजे असे ते म्हणाले असे मी सांगितले तर संध्याकाळी लगेच त्यांना मातोश्रीवरुन फोन येईल. आरएपीडी आणि आरडीमध्ये मोठ्या प्रमाणावर कामे करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आपल्या राज्याच्या संदर्भात माझी एवढीच विनंती आहे की, धोपावेचा दोंडाईचा प्लॅण्ट असेल, माननीय श्री. सुशीलकुमार शिंदे यांनी सोलापूर येथे आणलेला एनटीपीसीचा प्लॅण्ट असेल, मौदाचा प्लॅण्ट असेल असे अनेक प्लॅण्ट करावे लागतील. त्या शिवाय ख-या अर्थाने या राज्याला पुढे नेता येणार नाही. आमची चर्चा करण्याची तयारी आहे. विरोधाला विरोध करण्याची भूमिका महत्वाची नाही. राज्यातील उद्योग आणि रोजगार ह्या गोष्टी देखील तितक्याच महत्वाच्या आहेत. माननीय विरोधी पक्षनेते आणि त्यांच्या सहका-यांनी ही भूमिका मांडली. या राज्यात 17202 गुंतवणूक इरादे प्राप्त झाले आहेत. आपल्या राज्याची शेजारच्या गुजरात राज्याशी तुलना केली जाते. गुजरात राज्यामध्ये 11308 गुंतवणूक इरादे प्राप्त झालेले आहेत. महाराष्ट्र राज्यात गुजरात पेक्षा 52 टक्के अधिक गुंतवणूक प्राप्त झालेली आहे. अंमलबजावणीचा दर 50 टक्क्या पेक्षा अधिक आहे. त्याकरिता आमचे सातत्याने प्रयत्न सुरु आहेत. राज्यात नवीन लघु आणि मध्यम उद्योगा मार्फत होणा-या रोजगार निर्मितीच्या संदर्भात अर्थसंकल्पात जाणीवपूर्वक उल्लेख केलेला आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.अजित पवार.....

रोजगार निर्मितीचे आपल्यासमोर एक मोठे आव्हान आहे. याची पूर्ण जाणीव शासनाला आहे. त्याकरिता आम्ही नुकतेच वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले. त्या धोरणाप्रमाणे खाजगी आणि सहकारी क्षेत्रामध्ये सवलती द्यायचा आम्ही निर्णय घेतला आहे. रेशीम उद्योगाला चालना देण्यासाठी विशेष प्रयत्न आम्ही करीत आहोत. या नवीन वस्त्रोद्योग धोरणामुळे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना वीज आणि व्याज दरामध्ये सवलत अशा आकर्षक सवलतीचा आणि कौशल्य विकासाचा कार्यक्रम हाती घेण्याचा आमचा सगळ्यांचा प्रयत्न आहे. त्या दिशेने आम्ही चाललो आहोत.

सभापती महोदय, नागरीकरण आज मोठया प्रमाणात होत आहे. आज मुंबई महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे, ठाणे महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात आहे, नाशिक महानगरपालिका मनसेच्या ताब्यात आहे. इतर ठिकाणच्या काही महानगरपालिका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तर काही राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या ताब्यात आहेत. त्या त्या भागातील जनतेने लोकशाही पध्दतीने जो कौल दिला तो आपण मान्य केला आहे. आता एकमेकावर टिकाटिप्पणी करुन चालणार नाही. उलट पाच वर्षे त्या शहराला अधिक चांगल्या पध्दतीने पुढे कसे नेता येईल या दृष्टीने लक्ष दिले पाहिजे. कोणकोणते प्रश्न आहेत ते कसे सोडविता येतील याबाबत लक्ष दिले पाहिजे. आज मुंबई महानगरपालिका तुमच्या ताब्यात आल्यामुळे आमच्यावर तुम्ही टीका करीत आहात की, राज्य सरकार मदत करीत नाही. एमएमआरडीए मदत करीत नाही. राज्य सरकार लक्ष देत नाही. आम्ही म्हणायचे, मुंबईत काम करणार आहोत, परंतु महानगरपालिका शिवसेनेच्या ताब्यात असल्यामुळे ते सहकार्य करीत नाहीत. माझे स्पष्ट मत आहे की, आता पुढील दोन वर्षे कोणत्याही निवडणुका नाहीत. व्यवस्थितपणे आपण नागपूर, पुणे, ठाणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, सोलापूर अशी जी काही महत्वाची शहरे आहेत त्या शहरांचे जे काही प्रश्न आहेत त्या प्रश्नाबद्दल आपण एकत्र बसू, चर्चा करु. त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न करु. आज महापालिकेच्या हातात असेल ते काम त्या महापालिकेने करावे, परंतु पारदर्शकपणे काम करावे. व्यवस्थितपणे ई-टेंडरिंग करावे. राज्य सरकारच्या हातात जे काम असेल ते काम राज्य सरकार करेल. एकत्रितपणे केंद्राकडे जाऊन मुंबई शहराकरिता आणि राज्याच्या सर्वांगीण

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार.....

विकासाकरिता कोट्यवधी रुपयांचा निधी आणण्यासाठी आपल्याला माननीय मुख्यमंत्री मदत करतील. इतर सर्वजण मदत करायला तयार आहेत. राज्याचे दिग्गज मान्यवर केंद्रीय मंत्रीमंडळात आहेत. नागरीकरणाचे मोठे प्रश्न आपल्या सगळ्यांना भेडसावत आहेत. त्याबाबत मला जाणीव आहे, एखादी महानगरपालिका स्वत:च्या ताकदीवर त्या शहराचा विकास करु शकत नाही. त्यासाठी राज्य सरकारची, केंद्र सरकारची आणि जागतिक बँकेची सुध्दा मदत लागणार आहे. म्हणून जेएनएनयुआरएम, आयडीएसएमटी आणि महाराष्ट्र राज्य नगरोत्थान योजनेच्या माध्यमातून नागरी भागासाठी मोठा निधी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. 946 आणि 5500 हजार कोटी रुपये उपलब्ध झालेले आहेत. आयडीएसएमटी अंतर्गत 94 प्रकल्पांसाठी 1860 कोटी रुपये उपलब्ध झाले. राज्याच्या नगरोत्थान योजनेंतर्गत 2620 कोटी रुपये उपलब्ध झाले आहेत. मागील चार-पाच वर्षात जवळपास 7600 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत. त्यामध्ये आणखी वाढ झाली पाहिजे याबद्दल कोणाचे दुमत नाही. त्या दिशेने आम्ही चाललो आहोत.

सभापती महोदय, मानव विकास निर्देशांकाबद्दल 2012-13 मध्ये 360 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. याबाबत इतर राज्ये खूप मागे आहेत. फक्त केरळ, हिमाचल प्रदेश आणि दिल्ली या राज्यानंतर महाराष्ट्राचा क्रमांक लागतो. आपल्या राज्याचा प्रथम क्रमांक आला पाहिजे, मुंबई, ठाणे, रायगड, पुणे, नागपूर ही 5-6 मोठी शहरे वगळता इतर ठिकाणी देशाच्या सरासरीपेक्षा दरडोई उत्पन्न कमी आहे. नंदूरबार, गडचिरोली, चंद्रपूर आणि मराठवाड्यातील काही भाग खूप मागे आहे. सरासरी पर कॅपिटा इन्कम 85 हजार रुपये म्हणतो ते या महत्वाच्या जिल्हयांमुळे शक्य झाले आहे. परंतु यामध्ये अधिक लक्ष घालून उत्पन्न वाढविण्यात यावे यासाठी 125 तालुके आम्ही निवडले आहेत. तेथील पर कॅपिटा इन्कम कसे वाढविता येईल, त्यामध्ये बदल कसा करता येईल याचा प्रयत्न सुरु झालेला आहे. 11 व्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा केला नाही असा उल्लेख केला गेला. स्थापन केलेला कोअर ग्रूप, विविध बैठका या अनुषंगाने मंत्रीमंडळाने दिनांक 23.05.2009 रोजी झालेल्या नियोजन समितीच्या 11 व्या योजनेच्या 1.38 लाख कोटीच्या निधी वाटपास मंजुरी दिलेली आहे. त्या कामामध्ये आमचे निश्चित लक्ष आहे.

नंतर श्री.खर्चे...

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

महोदय, मुंबईकडे सुध्दा जाणीवपूर्वक लक्ष देण्याचा प्रयत्न आमच्या शासनाने केला आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी एक नवीन मुद्दा उपस्थित केला व तसे प्रपोझल देखील त्यांनी सुचविले. ते म्हणाले की, पावसाळ्यात मांडवा येथे जाण्यात अडचणी निर्माण होतात व त्यासाठी त्यांनी 1000 कोटीचे प्रपोझल देखील सुचविले. तसेच या प्रकल्पासाठी केंद्र सरकारकडून सुध्दा पैसे मिळतील असे ते म्हणाले. या अनुषंगाने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, यासंदर्भात प्रथम माझ्या स्तरावर एक बैठक घेऊन त्यात संबंधितांना बोलावण्यात येईल. केवळ रस्त्याने वाहतूक करुन प्रश्न सुटणार नाहीत म्हणून जल वाहतुकीकडे सुध्दा तितकेच लक्ष द्यावे लागेल, विमान वाहतुकीचाही पर्याय समोर ठेवावा लागेल. त्याचबरोबर अन्य साधने त्यात मेट्रो रेल्वेकडेही लक्ष देणे क्रमप्राप्त ठरते. अशा सर्व गोष्टींचा विचार करता सन्माननीय सदस्यांनी सुचविलेले प्रपोझल आणि इतर मान्यवरांच्या सूचना यांचाही विचार करण्यात येईल. त्याचबरोबर परवा आपण मांडवा जेट्टीच्या उद्घाटनासाठी गेला होता, ते उद्घाटन माननीय उद्योग मंत्री श्री. नारायण राणे यांच्या हस्ते झाले. त्यांनाही आपण सोबत घेऊ. तसेच मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे, श्री. भास्करराव जाधव अशा सगळ्यांनाच बरोबर घेऊन एकत्र बसून चर्चा करु. विरोधासाठी विरोध ठीक आहे पण चांगल्या कामासाठी मात्र नेहमीच पॉझिटीव्ह ॲप्रोच असला पाहिजे.

महोदय, मुंबईत आणखी एक वैद्यकीय महाविद्यालय देण्याचा निर्णय या शासनाने घेतला आहे. तसेच मुंबई महानगर प्रदेशात मोठ्या प्रमाणात ताण होतो म्हणून ठाणे आणि रायगड जिल्ह्यासाठी 1488 कोटीचे नियोजन शासनाने या अर्थसंकल्पात केले आहे. काही लोक कदाचित म्हणतील की एमएमआरडीए आणि शासनाचा काय संबंध आहे ? पण मी सांगू इच्छितो की आपणच त्यांना जमीन दिलेली आहे त्यामुळे त्यांच्या माध्यमातून विकास करणे देखील आवश्यक आहे. तसेच काही राज्यांमध्ये पाहिले तर दिसून येईल की, त्यांचा अर्थसंकल्प 1 ते 1.50 लाख कोटीपेक्षा जास्त झाला होता. आंध्र प्रदेश राज्याने हे केले होते. पण वस्तुस्थिती अशी आहे की, त्यांच्या अखत्यारित असलेली सर्व महामंडळे मग त्यात सिडको असेल, एमएमआरडीए असेल, म्हाडा असेल अशा संस्थांचे बजेट एकत्रित केले म्हणून हा आकडा मोठा दिसून येतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार .....

एमएमआरडीए, सिडको किंवा म्हाडा अशा संस्थांनी मुंबईत घर बांधणीचे काम चांगल्या प्रकारे केलेले आहे. मग ते टीडीआरच्या संदर्भात असो, एफएसआयच्या संदर्भात असो की सिडकोने घेतलेल्या जमिनीवरील घरांच्या बाबतीत असो याचा फायदा नागरिकांना होत असतो, पण आजच्या परिस्थितीत घरांच्या किंमती मात्र खूप वाढलेल्या आहेत.

महोदय, जे.जे. हॉस्पिटलला हायराईज सुपर स्पेशालिटी बनविण्यासाठी 650 कोटीची तरतूद यावर्षी शासनाने केली आहे. खालच्या सभागृहात सन्माननीय सदस्य श्री. देवेंद्र फडणवीस यांचे अर्थसंकल्पाच्या बाबतीत वेगळेच मत आहे, त्यासंदर्भात मी खालच्या सभागृहातही उत्तर देईन. त्यांचे म्हणणे असे आहे की, नरिमन पॉईंट पासून बोरिवली पर्यंत जल वाहतूक सुरु करण्यासाठी 750 कोटीचा प्रकल्प असून त्यात शासनाचे 250 कोटी, एमएमआरडीएचे 250 कोटी आणि सिडकोचे 250 कोटी असा हा प्रकल्प आहे. त्यातून पूर्व किनारा नेरुळ ते दक्षिण मुंबई आणि रायगड जिल्ह्यातील मांडवा बंदरापर्यंत असा हा प्रस्ताव आहे. ही जल वाहतूक सन 2014 पर्यंत पूर्ण होईल असे आमचे प्रयत्न राहतील. हे काम पूर्ण करुन मोठ्या हिमतीने आणि ताकदीने आम्ही पुन्हा जनतेसमोर जाऊ आणि राहिलेले काम करण्याची धमक आणि ताकद आघाडी सरकारमध्ये असल्याचे सांगू.....काकडे यांचा काहीच संबंध नाही. त्यांनीच मला सांगितले की, मी ओझरते बोललो पण त्याला प्रेसने हेडलाईन दिली. वास्तविक या कामाचे टेंडर ज्यांना भरावयाचे असेल त्यांनी भरावे, शेवटी काम पूर्ण करण्याची ताकद असणारी कंपनीच हे काम पूर्ण करु शकेल. याचे कारण मागील काळात दोन तीन वेळा फार वाईट अनुभव आले. या कामाच्या बाबतीत रस्ते विकास महामंडळाने खास कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने जागतिक निविदा मागविल्या असून त्यात सिंगापूर, चायना अशा जागतिक निविदांचा समावेश आहे. हे काम एमएमआरडीए आणि सिडको यांच्या माध्यमातून आपण करणार आहोत. अशा प्रकारे शासनाने मुंबईसाठी काम करण्याची भूमिका सुध्दा घेतलेली आहे.

महोदय, विक्रीकरात 20 अक्क्याने वाढ केली असून विरोधी पक्षनेते मग माननीय सदस्य श्री. भाऊसाहेब फुंडकर, दिवाकर रावते किंवा रामदास कदम असतील या सर्वांना माझी विनंती आहे. की.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्री.अजित पवार...

चांगले अधिकारी असतील तर त्यांचे कौतुक केले पाहिजे, चुकीचे काम कोणी करीत असेल तर त्यांना पाठीशी कधीच घालावयाचे नसते. आपल्या सभागृहात यासंदर्भात चांगला अनुभव येतो परंतु विधानसभेत मात्र वेगळा अनुभव येतो त्यामुळे यासंदर्भात मी खालच्या सभागृहात मत व्यक्त करणारच आहे. अधिका-यांनी चांगले काम केले, चांगल्या प्रकारे यंत्रणा राबवली, राज्याचे उत्पन्न वाढवले तर त्यांना शाबासकी दिली पाहिजे. जे चुकीचे वागतील त्यांना शासनही केले पाहिजे या पध्दतीचे काम आघाडी शासन करीत आहे.

सन 2010-2011 मध्ये उत्पादन शुल्का द्वारे देशात 1,38,299 कोटी रुपये कर गोळा झाला होता व सन 2011-2012 मध्ये 1,50,696 कोटी रुपये कर गोळा झाला होता. महसुलाची वाढ 8.94 टक्के आहे. महागाईचा परिणाम विक्री कर महसुलावरही स्वाभाविकपणे होत असतो. परंतु कर चुकवेगिरी करणा-या व्यापा-यांविरोधात आम्ही धडक कार्यक्रम राबवला. हवालाच्या केसेस सुध्दा सापडल्या व त्या माध्यमातून 300 कोटी रुपये वसूल केले गेले व हवालाच्या केसेसचा फायदा इन्कम टॅक्सला सुध्दा झालेला असून त्यांनी सुध्दा त्यांच्याकडून पैसा वसूल केलेला आहे. या धडक कारवाईमुळे विक्री करामध्ये गेल्या वर्षीपेक्षा या वर्षी 10 हजार कोटी रुपयांची वाढ अपेक्षित आहे. या पध्दतीने आमचे काम चालले असून यामध्ये अजून चांगले काम करण्यासाठी कर चुकवेगिरी करणा-या व्यापा-यांविरोधात आमच्या विभागाने अतिशय कडक कारवाई केली आहे व त्याचाच परिपाक म्हणून 1801 व्यापा-यांवर आम्ही कारवाई केली असून त्यांच्याकडून 316 कोटी रुपयांचा कर वसूल केलेला आहे. जवळपास 47 हवाला व व्यापा-यांविरोधात पोलिसात तक्रार दाखल केली असून 14 व्यापा-यांना अटक करण्यात आलेली आहे. विभागाने केलेल्या कारवाईस कठोर स्वरुपाची शास्ती व दंड वसूल केला जाणार आहे.

सभापती महोदय, मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, अर्थमंत्री म्हणून माझा व राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री. पृथ्वीराज चव्हाण साहेबांचा एकाही कामामध्ये हस्तक्षेप नसतो. अधिका-यांना काम करण्याची मोकळीक दिलेली आहे. कोणी आम्हाला फोन करण्याच्या भानगडीतही पडत नाही. सगळयांना सांगितले आहे की, राज्याच्या महसुलात जर वाढ होत असेल

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्री.अजित पवार...

तर त्या बाबतीत कोणाचीही लुडबूड आम्ही सहन करणार नाही. कामामध्ये आम्ही पारदर्शकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. बदल्यांमध्ये सुध्दा पारदर्शकता आणलेली आहे. आमदारांनी जरी सेल्स टॅक्सच्या अधिका-याची बदली करण्यास सांगितले तरी सुध्दा बदली केली जात नाही. खरे म्हणजे आमदारांचा आणि सेल्स टॅक्सचा काही एक संबंध नसतो. आमदाराला त्याच्या विचाराचा मामलेदार, पीएसआय हवा असेल किंवा विकास कामाच्या संदर्भात काही मागणी असेल तर मी ते समजू शकतो. त्यामुळे मला बदल्यांच्या संदर्भात कोणी सांगण्याच्या भानगडीत पडत नाही व कोणी आलेच तर त्याला माझ्या भाषेत सांगण्याचे काम मी करीतच असतो.

सभापती महोदय, भोपाळ येथे भारतातील सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या शक्ती प्रदत्त समिती समोर सर्वोत्कृष्ट संगणकीकरण कार्यपध्दती विषयाच्या सादरीकरणाच्या दरम्यान विक्री कर विभागाच्या मार्फत विक्रीची खोटी बिले देणा-या व कर चुकवेगिरी करणा-या व्यापा-यांविरोधात करण्यात आलेल्या मोहिमेचे शक्ती प्रदत्त समितीने कौतुक केले असून सर्व राज्यांना महाराष्ट्राची मोहीम अनुसरण्याचे आदेश दिले अशा पध्दतीचे काम आम्ही सेल्स टॅक्सच्या बाबतीत करीत आहोत. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे म्हणाले की, या बजेटमध्ये मागेल त्याला वीज कनेक्शन देण्याची घोषणा होती परंतु मोठया प्रमाणावर वीज कनेक्शन द्यावयाचे बाकी आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नसून काही काही जिल्हयामध्ये तर मागेल त्याला वीज कनेक्शन दिले जात आहे. सोलापूर येथे वीज कनेक्शनची मागणी असून त्या ठिकाणी शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्यासाठी "महावितरण आपल्या दारी" या योजनेतून कनेक्शन दिले जात आहे. शेतक-याने, घरगुती ग्राहकाने किंवा उद्योगपतींनी विजेचे कनेक्शन मागितले तर त्याला तेथल्या तेथे विजेचे कनेक्शन दिले जाईल असा आम्हाला एक दिवस राज्याला दाखवावयाचा आहे. मी सभागृहाला विश्वास देऊ इच्छितो की, दोन वर्षाच्या आत मध्ये ऊर्जा विभाग मागेल त्याला वीज देईल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

तशा पद्धतीच शब्द मी सभागृहाला देऊ इच्छितो.

सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी क्रीडा धोरणाच्या संबंधातील मुद्दे उपस्थित केले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी हॉकी असोसिएशन संबंधी काही मुद्दे उपस्थित केले होते. आमच्या श्री.रावते साहेबांनी सांगितले की, राज्यात प्रलंबित वसुली 35134 कोटीची असून शासन वसुलीसाठी कोणतेच प्रयत्न करीत नाही. तसे अजिबात नाही. 35134 पैकी 1271 कोटी रक्कम वसुलीस उपलब्ध आहे. या वसुलीसाठी व्यापाऱ्यांची बँक खाती गोठविणे, महाराष्ट्र जमीन महसूल कायद्या खाली कारवाई करणे इत्यादी कारवाई देखील करण्यात आली आहे. सन 2011 मध्ये सुरूवातीला वसुलीसाठी उपलब्ध रक्कम 640 कोटी होती. नव्याने येणाऱ्या वसुलीच्या प्रकरणात जानेवारी 2012 पर्यंत 557 कोटी रक्कम वसुल झाली आहे. आवश्यक त्या प्रकरणात कसूरदार व्यापाऱ्यांवर अभियोगाची कारवाई करण्याची देखील सूचना देण्यात आली आहे. 34041 एवढी रक्कम वसुलीसाठी उपलब्ध असून ही रक्कम, न्यायालयीन प्रकरणे, अपिलातील प्रकरणे, ऑफिशियल लिक्वीडेटर मधील प्रकरणे इत्यादी मधील आहे, हे पण आपण लक्षात घेतले पाहिजे.

सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी कापूस आणि तेलबिया संबंधी भूमिका मांडली. याचा शेतकऱ्यांना फटका बसणार आहे अशी त्यांना भीती वाटते आहे. कापूस आणि तेल बियांवर 5 टक्के एवढा कर आहे. 2005 पर्यंत मुंबई विक्रीकर कायद्यामध्ये खरेदी कर आकारण्याची तरतूद होती. त्यावेळी याच नुसार खरेदी कर आकारण्यात येत होता. त्यामुळे या कराचा बोजा शेतकऱ्यांवर अजिबात पडणार नाही. तो कर व्यापाऱ्यांवर असतो. त्यात फक्त वजावट होत असते. खरेदी कर नसल्यामुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर व्यापारी शेतकऱ्यांकडून माल घेतात आणि पर प्रांतात पाठवून देतात. यावर व्यापारी कुठल्याही प्रकारचा कर भरत नाही. नोंदणीकृत व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेला माल राज्या बाहेर विकल्यास त्यास 2 टक्के केंद्रीय विक्री कर लागू होतो. त्यामुळे सदरील मालाची खरेदी करण्याकरिता सर्वसाधारण व्यापाराचा कल नसतो. त्यामुळे राज्याचा मोठ्या प्रमाणावर महसूल बुडतो. तसेच नोंदणी घेऊन कर भरणाऱ्या व्यापाऱ्यांच्या व्यवसायावर याचा परिणाम होत असल्याने त्या बाबतच्या तक्रारी देखील आलेल्या आहेत. श्री.खडसे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

साहेबांनी त्यांच्या भाषणामध्ये खरेदी करासाठी जुन्या मुंबई विक्री कर कायद्यांतर्गत असलेली तरतूद पुन्हा लागू करण्या विषयी भाष्य केले आहे, हे मी श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्यामुळे त्यांचा या तरतुदीस पाठिंबा असेल. कर चुकवेगिरी थांबविण्यासाठी बहुतांशी सर्व राज्यांनी खरेदी कर लागू केलेला आहे. याबाबत माननीय मुख्यमंत्री, मी व माननीय राज्यमंत्री यांनी बऱ्याच बारकाईने अभ्यास केला आहे. अधिवेशन संपल्यानंतर पुन्हा ज्यांचे या बद्दल वेगळे मत आहे त्यांची एक बैठक घेण्यात येईल. सदर बैठक ही प्रधान सचिव, कमिशनर यांच्या सोबत घेण्यात येईल. यात जर शेतकऱ्यांचे नुकसान होणार असेल तर हा कर मी तिथल्या तिथे थाबवेन. मी शेतकऱ्यांचे अजिबात नुकसान होऊ देणार नाही. शेवटी आमची पण जात शेतकऱ्याचीच आहे. आम्ही शेतकऱ्यांचे भले करण्यासाठी येथे आलो आहोत. पण सर्व चर्चा करूनच निर्णय घेणार आहे. यात तुमचे देखील मत परिवर्तन होऊ शकेल. यात शेतकऱ्यांवर अन्याय होत नाही असे देखील तुम्हाला वाटेल.

येथे काही माननीय सदस्यांनी तेल बियांचा देखील प्रश्न उपस्थित केला होता. हा प्रश्न माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यांनी उपस्थित केला होता. या संबंधी देखील माझी चर्चा करण्याची तयारी आहे. काहीही झाले तरी राज्यातील शेतकऱ्यांवर नवीन भूर्दंड येता कामा नये, अशा प्रकारची भूमिका राज्य शासनाची आहे.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी चंद्रपूर येथील वैद्यकीय महाविद्यालयासंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. खरे तर आम्ही चार महाविद्यालये दिली आहेत. त्यामध्ये आणखी महाविद्यालये देण्याची राज्य शासनाची भूमिका आहे. याबाबत मंत्रिमंडळ योग्य तो निर्णय घेईल. महाविद्यालय चंद्रपूरला द्यायचे की, गोंदियाला द्यायचे असा प्रश्न आहे. विदर्भातील दोन्ही आमदारांनी ठरवावे की, महाविद्यालय कुठे द्यायचे. आपण एकत्र बसवून ठरविले की, आम्ही लगेच ते मंजूर करू.

सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी कुपोषण तरतुदीमध्ये वाढ केलेली नाही असे सांगितले आहे. आम्ही त्यामध्ये वाढ केलेली आहे. आंबा, काजू नुकसान भरपाई संबंधातील मुद्दा देखील कोकणातील माझ्या सहकारी मित्रांनी उपस्थित केला आहे. यासंबंधी काल माननीय मुख्यमंत्र्यांना व मला शिष्टमंडळ येऊन भेटले आहे.माननीय मंत्री श्री.गावित साहेबांना देखील शिष्ट

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

मंडळ भेटले आहे. यासंबंधी सगळे जण बोलत आहेत. यामध्ये देखील आपण निश्चितपणे योग्य प्रकारचा मार्ग काढू या.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. अरुणभाई गुजराथी यांनी अर्थसंकलपावरील चर्चेच्या दरम्यान असे विचार व्यक्त केले होते की, विक्री कर विभागातून परतावे वेळेत दिले जात नाहीत. परंतु यासंदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, प्रलंबित परताव्याची प्रकरणे निकाली काढण्यासाठी विक्रीकर विभागाने आता कृती आराखडा तयार केला असून त्यामध्ये क्रॉस चेक पध्दतीने आमूलाग्र बदल केले जात असून, प्रलंबित परतावे प्रकरणातील सन 2005-2006 ते 2007-2008 या कालावधीतील क्रॉस चेक प्रत्यक्ष व्यापा-यांकडे भेटी देऊन करण्यात येत आहेत. सन 2008-2009, 2009-2010, व 2010-2011 चे क्रॉस चेक इलेक्ट्रॉनिक्स पध्दतीने संगणकामार्फत तयार करण्यात आलेले आहेत. परतावा निपटा-यासाठी विविध योजना करण्यात आल्या असून विक्री कर विभाग परताव्याचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहे. इलेक्ट्रॉनिक्स क्रॉस चेकींग प्रकरणात अंशिक परतावा योजना, निर्यातदारांसाठी जलद परतावा योजना, मोठया उद्योगांसाठी जलद परतावा योजना बँक गॅरंटीच्या आधारे केली जाते. परतावा कृती आराखडयाच्या परिणामामुळे सन 2011-2012 मध्ये 12,449 प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत व 4,100 कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा परतावा देण्यात आलेला आहे. सन 2010-2011 च्या तुलनेत परतावा, अर्जांचा निपटारा व रक्कम निश्चितपणे जास्त असून यासंदर्भात आम्ही बारकाईने लक्ष देत आहोत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी रायगड जिल्हयातील कोंढाणे प्रकल्पाच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केला होता. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, या प्रकल्पाची किंमत 80 कोटी रुपये होती व या प्रकल्पास सन 2011 मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती. या प्रकल्पामध्ये सुरुवातीला 20.19 द.ल.घ.मीटर पाणी साठा होणार होता परंतु आता तो 85 द.ल.घ. मिटर होणार असून या सुधारित प्रकल्पाची किंमत आता 435 कोटी रुपये व एकूण साठा 105.44 द.घ.मीटर आहे. या प्रकल्पाच्या कामामध्ये सर्व काम पारदर्शकतेने झालेले असून आपल्याला माहिती आहे की, कर्जत परिसरात वाढते नागरिकीकरण, औद्योगिकीरण व नवीन आंतरराष्ट्रीय विमानतळ या सर्वांमुळे लागणारा अतिरिक्त पाण्याचा विचार करता आपण या प्रकल्पाचे काम हाती घेतलेले आहे. सन्माननीय सदस्यांना या प्रकल्पाच्या कामामध्ये पारदर्शकता नाही असे वाटत असेल तर त्यासंदर्भातील भूमिका जलसंपदा विभागाकडून निश्चितपणे घेतली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

सभापती महोदय, अर्थसंकल्पाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केलेले आहेत त्या सर्व मुद्यांना कमी वेळेत स्पर्श करणे मला शक्य नाही. परंतु या अर्थसंकल्पाच्या निमित्ताने नवीन आर्थिक वर्षाच्या शुभ संकल्पनांची नांदी सभागृहासमोर सादर होत असतांना विकासाचे चित्र राज्याच्या जनतेसमोर तुम्ही आम्ही मांडणे आवश्यक असते. राज्याचा विकास अधिक वेगाने कसा होईल यासाठी शासन निश्चितपणे प्रयत्न करीत आहे. अर्थसंकल्पाच्या संदर्भात सभागृहात सन्माननीय सदस्यांनी फार चांगले विचार व्यक्त केलेले आहेत. आपला दृष्टिकोन नेहमी सकारात्मक असला पाहिजे. चर्चेच्या दरम्यान विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी असे विचार व्यक्त केले होते की, शासन केवळ खोटी माहिती देऊन जनतेची दिशाभूल करीत आहे. सभागृहाच्या माध्यमातून मला जनतेला विश्वास द्यावासा वाटतो की, आम्ही सकारात्मक विचाराने महाराष्ट्र राज्याच्या प्रगतीसाठी वाटचाल करीत आहोत. विरोधाला विरोध करण्याची भूमिका आमची कधीही राहणार नाही. मला एवढेच सांगावयाचे आहे की, नकार घंटा वाजवत बसण्यापेक्षा आपण सगळयांनी सकारात्मक भूमिकेतून जीवनाचा आनंद कसा लुटता येईल याचे मर्म उलगडून दाखवावयाचे आहे. मला सन्माननीय सदस्य सर्वश्री. विनोद तावडे, भाऊसाहेब फुंडकर, दिवाकर रावते तसेच सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांना सांगावयाचे आहे की,

"सांगा कसे जगायचे, सांगा कसे जगायचे?
कण्हत कण्हत की, गाणे म्हणत,
तुम्हीच ठरवा,
डोळे भरुन तुमची आठवण कोणी तरी काढतंच ना,
उन्हं उन्हं दोन घास तुमच्यासाठी कोणी तरी वाढतंच ना,
शाप देत बसायचे की, दुवा देत हसायचे
हे आता तुम्हीच ठरवा" एवढेच मला या निमित्ताने आपल्याला सांगावयाचे आहे.

यानंतर कु.थोरात...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार...

माननीय श्री.विनोद तावडे साहेब हे विरोधी पक्ष नेते झाल्यापासून बऱ्याच कविता म्हणतात आणि आम्ही काहीच नाही म्हण्यापेक्षा काही तरी म्हणू म्हणून मी कविता वाचली. आम्ही जनकल्याणाच्या योजना राबविण्यासाठी आम्ही येथे आलो आहोत. आपली विकासाची वाटचाल चालू असताना

आपणच ठरवावयाचे की, शाप देत बसायचे की दुवा देत बसायचे,
पेला अर्धा सरला असेही म्हणता येईल,
अन् पेला अर्धा भरला असे देखील म्हणता येईल,
पेला सरला आहे असे म्हणायचे की, भरला आहे म्हणायचे
हे ज्याच्या त्याच्या नजरेवर अवलंबून असते,
म्हणूनच तुम्हाला विचारावेसे वाटते की,
सांगा कसं जगणार आहात, कण्हत कण्हत की गाणं म्हणत ?

एवढेच मला आपणास सांगायचे आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी वित्त विभागाच्या वेबसाईटचा उल्लेख करताना सांगण्यात आले की, त्या वेबसाईटवर जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांचा फोटो होता. मी सांगितले होते की, त्यांच्याकडून ते खाते गेले आहे तेव्हा निदान त्यांचा फोटो तरी राहू द्या. अजित पवार काम करतील आणि श्री.सुनील तटकरे यांचा फोटो राहील. फोटो पाहून काम होते काय ? मी तो फोटो वेबसाईटवरुन काढणार होतो. परंतु माननीय श्री.जयंतराव पाटील मला म्हणाले की, अजित, तू माझे सर्व ऐकतो तर त्या ठिकाणी तुझ्या फोटोऐवजी सुनीलचा फोटो राहू दे.

सभापती महोदय, काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष श्री.माणिकराव ठाकरे आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष श्री.मधुकरराव पिचड यांनी सांगितले की, त्या ठिकाणी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसमुळे आपण मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री म्हणून बसला आहात. आम्हाला विश्वासात न घेता गॅसवर कशी करवाढ केली ? त्यावेळी मी त्यांना सांगितले की, आमचे चुकले. यातून काही तरी मार्ग काढला पाहिजे. कारण काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या प्रदेशाध्यक्षांनी तसेच या सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांनी गॅसवरील कर वाढ मागे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार....

घेण्याची विनंती केलेली आहे. श्री.माणिकराव ठाकरे यांचे मी नेहमीच ऐकत असतो.

सभापती महोदय, सन 2008 पासून घरगुती गॅसला करमुक्त ठेवण्यात आले होते. राज्यात केरोसीनवर 3 टक्के कर आकारणी होते. केरोसीन हे गरिबातील गरीब माणूस वापरतो. वाड्या-तांड्यावर राहणारे लोक केरोसीन वापरतात. केरोसीनवर 3 टक्के कर आहे. आता अनेक ठिकाणी पाईप लाईन गॅस वापरला जातो तेथे साडेबारा टक्के कर आकारला जातो. मुंबई-ठाणे परिसरात 5 लाख 20 हजार पाईप लाईन गॅसधारक आहेत. केंद्र सरकारने एलपीजीवर 600 रुपयांची सबसिडी दिलेली आहे. इतर राज्यांमध्ये देखील घरगुती गॅसवर कर आकारला जातो. मध्य प्रदेशमध्ये 5 टक्के, आंध्र प्रदेश 5 टक्के, झारखंड 5 टक्के, जम्मू काश्मिर 5 टक्के, अरुणाचल प्रदेश 5 टक्के, पंजाब 4 टक्के अशाप्रकारे कर आकारला जात आहे. दोन्ही प्रांताध्यक्षांच्या भावना आणि सभागृहातील सर्वच सन्माननीय सदस्यांच्या आणि जनतेच्या भावना लक्षात घेऊन एलपीजी गॅसवरील 5 टक्के कर 2 टक्क्यापर्यंत कमी करण्याची मी घोषणा करतो.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

सभापती महोदय, एलपीजीवरील कराचा दर देखील पीडीएस केरोसीन इतका म्हणजे 3 टक्के इतका राहील यामुळे साधारण 75 ते 80 कोटी रुपये महसुलात घट होईल. ही तूट विक्रीकराच्या वसुली अधिक कार्यक्षमतेने करुन भरुन काढण्याचा शासनाचा प्रयत्न राहील अशा प्रकारची खात्री मी सभागृहाला देतो. सभापती महोदय, अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये सभागृहातील दोन्ही बाजूच्या जवळपास 37 सन्माननीय सदस्यानी आपापली भूमिका मांडत असताना काही सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला कदाचित माझ्याकडून स्पर्श झाला नसेल परंतु मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, याबाबतीत कोणी नंतर भेटून सांगितले की, यामध्ये अमुक ही अडचण आहे तर मी, माननीय मुख्यमंत्री आणि मंत्रिमंडळातील सर्व सहकारी त्या बाबत निश्चित विचार करु. जे या राज्याच्या हिताचे असेल, फायद्याचे असेल, जनतेच्या भल्याचे असेल ते करण्याकरताच आम्ही सर्वजण राज्य करतो आणि त्या बाबतीत आमच्याकडून तसूभर देखील चूक होणार नाही. मी पुन्हा एकदा या चर्चेत सहभागी झालेल्या सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानतो आणि हा अर्थसंकल्प सभागृहाने कृपया एकमताने मंजूर करावा, अशी सभागृहाला विनंती करतो आणि आपली रजा घेतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ KTG/

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय,माननीय अर्थमंत्र्यांचे मी मनापासून एका गोष्टीसाठी नक्की अभिनंदन करेन. कारण दादांनी त्यांच्या भाषणामध्ये आबासांरखे या राज्यातील, त्या राज्यातील, या देशातील, त्या देशातील असे न सांगता आपली स्वत:ची आकडेवारी सांगून, जे नाही त्याबद्दल अर्धा पेला रिकामा तर अर्धा पेला भरलेला आहे असे सांगितलेले आहे त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, दादा आपण असे म्हटले की, आपण पहिल्यांदाच विरोधी पक्ष नेता झालेले आहात. खरे म्हणजे बजेटचे भाषण भाऊसाहेब आणि मी एकत्र बसून तयार केले होते. ते कुठे दिल्लीला दाखविण्याचा मुद्दा नव्हता आणि जी काही टीका असेल ती माझी एकटयाची नव्हती. लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, सकाळ, विसरभोळा, पचपचीत, जुन्या योजना या व इतर सर्व वर्तमानपत्रांनी अशी टीका अर्थसंकल्पावर केलेली आहे. पण मी त्या खोलात जाणार नाही. मला या ठिकाणी दोन-तीन महत्वाचे मुद्दे मांडावयाचे आहेत. आपण विशेष: असे सांगितले की, जो काम करत नाही तो चूकणार नाही, मी काम करतो तर मी चुकेन. याचा अर्थ शेजारी बसणारे काम करत नाहीत असा आपला माननीय मुख्यमंत्र्यांकडे अंगुली निर्देश होता की नाही मला माहीत नाही. पण मला असे वाटले की, आपण बहुतेक माननीय मुख्यमंत्र्यांकडे बोट दाखवित आहात. आपण असे म्हटले की, आम्ही सी.एम., डी.सी.एम. झाल्यानंतर राज्यात आधी जसे घोटाळे व्हायचे तसे होत नाहीत. त्यामध्ये आदर्शचा उल्लेख आला. मला या ठिकाणी दोनच गोष्टी आदरणीय उप मुख्यमंत्र्यांना विचारावयाच्या आहेत.

सभापती महोदय, विजेच्या विषयाच्या बाबतीत दादा, आपण असे म्हटले की, 16000 मेगावॅटची योजना डिसेंबर, 2012 पर्यंत करण्यात येणार आहे. आता आर्थिक सर्वेक्षणाप्रमाणे ही योजना डिसेंबरपर्यंत 16000 मेगावॅटची असेल मात्र गेल्यावेळी मे महिन्यामध्ये 18145 मेगावॅट पर्यंत होती असे आर्थिक पाहणी अहवाल सांगतो. आपली वीज निर्माण करण्याची क्षमता एखादवेळी तेथपर्यंत पोहचेल हे मलाही पटेल पण दादा, आपल्याला माहीत आहे की, आता रिलायन्सचा जो गॅस घेण्यात येतो तो कमी येत आहे. कोळशाची कमतरता आहे त्यामुळे निर्मिती क्षमता असून सुध्दा त्यासाठी जो कच्च्यामालाचा पुरवठा लागतो तो निसर्गत: कमी होणार आहे. त्या बाबतीत शासनाने काय विचार केला आहे हे मला समजून घ्यावयाचे आहे. (अडथळा) काही सन्माननीय सदस्य म्हणत

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

आहेत की, जैतापूरचा प्रकल्प झाला पाहिजे. जैतापूरचा प्रकल्प होण्यासाठी दहा वर्षे लागतील. करणार म्हणजे करणारच, अशा प्रकारची सन्माननीय मंत्री महोदय, श्री. भुजबळ यांची स्टाईल आपण उचललेली दिसते. दादा, आपण कविता आणि थोडा अभिनय वाढवला असता तर एकदम भुजबळ स्टाईल झाले असते.

सभापती महोदय, दुसरे असे की, सिंचन क्षेत्र वाढले आहे तसेच देशात महाराष्ट्राचे सिंचन क्षेत्र सगळयात जास्त आहे असे आपण सांगितले आहे. दादा, देशात सगळयात जास्त उत्पादन आहे यापेक्षा प्रति एकरी आपले उत्पादन जास्त आहे का याचा विचार केला पाहिजे. शेवटी क्वालिटीच्या दृष्टिकोनातून आपण बोलणार आहात. अजित दादा बोलत आहेत असे वाटले पाहिजे. जनरल, घाऊक बोलून काय उपयोग?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

प्रती एकरी आपले उत्पादन जास्त आहे का आणि नसेल तर का नाही, याचा विचार केला पाहिजे. आम्ही सिंचनाच्या विषयामध्ये एक न्यायालयीन चौकशीची मागणी केली होती. आपण सांगितले की सर्व चांगले आहे. 'दूध का दूध, पानी का पानी' असे सर्व साफ आहे असे आपण सांगितले. एकदा चौकशी होऊन जे काही मळभ आहे ते दूर होऊ द्या. ती चौकशी शासन का करीत नाही, हा खरोखरच न कळण्यासारखा मुद्दा आहे.

आपण जे कर्ज काढतो ते जीडीपीच्या आधारावर काढतो. आपण अतिशय मोकळेपणाने मान्य केले की, मुंबई, पुणे, ठाणे, रायगड येथील जीडीपी जास्त आहे आणि गडचिरोलीमध्ये निम्मा जीडीपी आहे. याचा प्रामाणिकपणे विचार करता आपण जर यातून मुंबईचा जीडीपी बाजूला काढला तर आपल्या कर्जाचे प्रमाण 28 टक्क्यावर जाते. जे मान्य प्रमाण आहे त्यापेक्षा कर्जाचे प्रमाण जास्त जाते. त्यामुळे आपण अवाच्यासवा कर्ज काढतो असे जे आम्ही म्हणतो ते काही चुकीचे नाही. आता आपण गॅसवरील कर कमी केला त्यामुळे 85 ते 90 कोटी रुपये उत्पन्न कमी होईल. ते उत्पन्न बाकीच्या गोष्टीतून भरुन काढू असे जे आपण म्हणतो त्या बाबतीत मला एवढेच सांगावयाचे आहे की, गेल्या वेळी 40 ते 42 टक्के पैसे सर्व्हिस सेक्टरमधून आले होते. ते सर्व्हिस सेक्टर आणि विशेषत: त्यातील बीएसएफआय म्हणजे बँकीग सर्व्हिस इन्शुरन्स फायनान्स यामध्ये जगातील मार्केट आणि देशातील बँकांचे व्याजदर वगैरे सगळे पाहिले तर गेल्या वेळी जे उत्पन्न होते ते दीड टक्केपर्यंत येऊ शकते, एवढी भयानक अवस्था आहे. त्यामुळे त्या माध्यमातून आपण जे उत्पन्न मिळेल असे दाखविले आहे तेवढे उत्पन्न मिळणार नाही. गेल्यावेळी ते उत्पन्न जे 8 ते 10 टक्के होते ते आता 3 ते 5 टक्के खाली येणार आहे. आपण आकडेमोड करुन ते उत्पन्न जास्त दाखविले असेल तर दाखवा, तो भाग वेगळा. पण पुढच्या काळामध्ये जागतिक मंदी तसेच बॅकिंग क्षेत्रामधील अवस्था, मॅन्युफॅक्चरींगमध्ये आपण कमी आहोत ती अवस्था तसेच रियल इस्टेटमध्ये होणारी घसरण हे सर्व बघता आपल्याला जो रेव्हेन्यू कमी येणार आहे त्याचा विचार करता या सगळ्या योजना कशा पूर्ण करणार ?

आपण सिडकोसाठी 250 कोटी, 250 कोटी रुपये एमएमआरडीएसाठी आणि 250 कोटी रुपये कोस्टलसाठी देण्याचा उल्लेख केला. ते करताना आपण अर्थसंकल्पात फक्त 20 हजार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

रुपये दाखविलेले आहेत. 250 कोटी रुपये दिल्याशिवाय 2014 मध्ये ते होणार नाही. करणार म्हणजे करणार, करण्याची क्षमता आहे वगैरे आपण म्हटले परंतु आता आपण 20 हजार रुपयेच खर्च दाखविलेला आहे. म्हणजे पुढची तरतूद आपल्याला पुरवणी मागण्यांमध्ये दाखवावी लागणार आहे. आता गॅसचे 80 कोटी रुपये उत्पन्न कमी झाले, त्यात 200 कोटीतील काही टाकले म्हणजे हे डेफिसिट बजेटच चालू झाले. त्यामुळे यातील सगळा खेळ जो आपण जमविणार आहात, हॉस्पिटलच्या आणि बाकीच्या ज्या काही घोषणा आहेत त्या आपण कशा पूर्ण करणार ते आपण जनतेला सांगितले तर अधिक बरे होईल.

श्री. माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आज सदनामध्ये सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला उत्तर देताना सर्व सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना माननीय उप मुख्यमंत्री व सभागृहाचे नेते श्री. अजितदादा पवार यांनी सविस्तर अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. काँग्रेस पक्षाकडून सातत्याने आम्ही अशी मागणी केली होती की, गॅसवर जो 5 टक्के कर लावलेला आहे तो कमी केला पाहिजे. या संदर्भातील मागणी आम्ही केली आणि त्या मागणीला प्रतिसाद देताना माननीय वित्त मंत्र्यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली की, केरोसीनवर 3 टक्के कर असल्यामुळे किमान तेवढा तरी कर गॅसवर असला पाहिजे. गॅसवरील कर 2 टक्के कमी केल्याबद्दल मी या ठिकाणी माननीय उप मुख्यमंत्री आणि वित्त मंत्री तसेच माननीय मुख्यमंत्री आणि राज्य शासनाला धन्यवाद देतो. त्याचबरोबर अंदाजपत्रकाच्या निमित्ताने मायनॉरिटीच्या संदर्भात आणखी तरतूद असली पाहिजे या बाबतीत मी एक पत्र माननीय मुख्यमंत्र्यांना पाठविले होते. या अर्थसंकल्पात जरी आपण सगळ्या विषयात तरतूद करु शकलो नाही तरी आम्ही जी मागणी केलेली आहे त्या संदर्भात पुरवणी मागण्यांच्या किंवा इतर मागण्यांच्या माध्यमातून उल्लेख असला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त करतो. परत माननीय उप मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला अत्यंत नम्रपणे खेद व्यक्त करावयाचा आहे. सरकारमधील एका पक्षाचे अध्यक्ष यांनी आताच गॅसवरील कर कमी केल्यामुळे माननीय उप मुख्यमंत्र्यांना धन्यवाद दिले आहेत. परंतु माननीय मुख्यमंत्र्यांना ही दरवाढ माहीत नव्हती काय ? काँग्रेस पक्षाने मागणी केल्यामुळे गॅसवरील कर कमी केला असे सांगण्याचा जो प्रयत्न होत आहे तो कितपत योग्य आहे ? कापूस व सोयाबीनच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी आज उल्लेख केला आहे. परंतु काल मी या संदर्भात मुद्दा मांडल्यावर त्याची नोंद केल्याचे सांगितले होते. शासनाने कापसावर 5 टक्के कर वाढविल्यामुळे व्यापाऱ्यांनी कापसाचे भाव ताबडतोब खाली आणले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना भाव कमी मिळत आहे. व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडूनच 100 ते 200 रुपयांची वसुली सुरु केली आहे. थेट कापूस उत्पादक शेतकरी मरत आहे. व्यापारी कधीच आपल्या डोक्यावर तोटा घेत नाहीत. ते शेतकऱ्याच्याच खिशात हात घालत आहेत. कापसाचा भाव 3000 च्या आत आलेला आहे. कालच 3100 रुपये या दराने सौदे झाले आहेत, याबाबत माहिती घेतली तर मिळू शकेल. अर्थसंकल्पातील तरतुदी 1 एप्रिल, 2012 पासून लागू होणार आहेत. पण कापसाचा भाव कमी करण्याची सुरुवात माननीय अर्थमंत्र्यांनी करवाढ जाहीर केल्यापासून सुरु झालेली आहे. त्यामुळे आपण ठोस घोषणा करावी. तरच शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल. आता काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष व सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी शासनाला सांगितल्यानंतर शासनाने गॅसचे भाव कमी केले आहेत असे त्यांनी मत मांडले आहे. हा विनोदी प्रकार आम्ही ऐकला आहे. त्यांचा माननीय अर्थ मंत्र्यांनी मान राखला आहे, त्याप्रमाणेच मंत्री महोदयांनी शेतकऱ्यांचाही दुवा घ्यावा अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी बेदाण्याच्या बाबतीत मागणी केली होती त्याचा मंत्री महोदयांच्या उत्तरातून उल्लेख झालेला आहे. त्याचप्रमाणे 15 हजार कोटींची शासनाने विविध वित्तीय संस्थांना हमी दिलेली आहे. त्या हमीचे रिपेमेण्ट करण्यासाठी अर्थसंकल्पात कोठेही तरतूद केल्याचे मला दिसून आले नाही. हे रिपेमेण्ट शासनाने केले तर हे बजेट तुटीचे होण्याची शक्यता आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहाचे नेते व राज्याचे माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी अतिशय चांगला व गतिशील अर्थसंकल्प राज्यासमोर मांडलेला आहे. आघाडीमधील सर्वांच्या भावना लक्षात घेऊन एलपीजी गॅसवरील कराच्या कपातीची घोषणा केलेली आहे. ही घोषणा जनतेला दिलासा देणारी आहे. ज्या जाणीवेतून शासनाने हा निर्णय घेतला आहे त्याबाबत मला शासनाचे खरोखरच अभिनंदन करावयाचे आहे. माननीय अर्थ मंत्र्यांनी राज्यात आर्थिक शिस्तीचा आग्रह धरलेला आहे. त्यानुसार काम झाले तर निश्चितच राज्य 2012 अखेर भारनियमन मुक्त होईल. आर्थिक समस्यांवर मात करुन वेगाने पुढे जाईल असा विश्वास जनतेमध्ये निर्माण होईल.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांनी अल्पसंख्याक घटकांसाठी निधी वाढवून देण्याची मागणी केली आहे. वित्त विभाग याबाबत जरुर सहानुभूतीने विचार करील. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी कापसाच्या भावाचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्याबाबत मी सोमवारी बैठक आयोजित करतो. सोमवारच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या हिताचाच निर्णय घेऊ. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी बेदाण्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. बेदाण्याच्या प्रश्नासंबंधी सन्माननीय मंत्री श्री.आर.आर.पाटील आणि सन्माननीय सदस्य श्री.संजय पाटील यांचे शिष्टमंडळ मला भेटण्यासाठी आले होते. बेदाण्यासंबंधी मागील काळात शासनाने निर्णय घेतला आहे त्यामुळे शेतकरी अडचणीत येणार नाही. महाराष्ट्रात काही भागात बेदाणा पिकविला जातो. बेदाण्याच्या प्रश्नासंबंधी सोमवारी बैठक घेण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, घरगुती गॅसवरील कर कमी केला आहे तो कोणामुळे कमी केला ते आपण स्पष्ट करावे.

श्री.अजित पवार : महाराष्ट्रातील तमाम महिलांच्या मागणीमुळे गॅसवरील कर कमी केला आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : विदर्भ, मराठवाडा आणि खानदेश हे तीन कापूस पिकविणारे विभाग आहेत. कापूस उत्पादक शेतक-यांची माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी दखल घेतली त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. कोणत्याही कापूस उत्पादक शेतक-यावर कर लादला जाणार नाही एवढे तरी आपण येथे जाहीर करावे जेणेकरुन हा संदेश शेतक-यांपर्यन्त पोहोचू शकेल.

श्री. अजित पवार : मी सदनाला या चर्चेच्या निमित्ताने सांगू इच्छितो की, कापूस उत्पादक शेतक-यांना कोणत्याही प्रकारचा भूर्दंड पडणार नाही अशा प्रकारची खबरदारी आघाडी सरकार घेईल. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी 15000 कोटीच्या हमीचा उल्लेख केला. हे 15000 कोटी रुपये द्यावे लागत नाहीत. एमएससी बँकेला 50 कोटी रु. पाहिजे होते. ते तातडीने सप्लिमेण्टरी बजेटमध्ये दिलेले आहेत. सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, गॅसवरील 2 टक्के कर कमी केल्यामुळे 80-90 कोटी रु.ची जी तूट येईल ती विक्रीकरातून वसूल केली जाईल. त्यासाठी कोणती अडचण येणार नाही. जगामध्ये मंदी होती आणि ती यंदाच्या वर्षी देखील चालू होती. तरी देखील कर वसुली आपण व्यवस्थितपणे केली आणि हा अनुभव सेल्सटॅक्सच्या निमित्ताने महाराष्ट्राला आलेला आहे. सुरुवातीपासून आमचे रिसोर्सेस देणा-या डिपार्टमेण्टस्ना शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत आहोत. दर महिन्याला 25 टक्के, 50 टक्के 75 टक्के याप्रमाणे पैसे देतो, त्याप्रमाणे वसुली होते. वसुलीच्या बाबतीत काही चुकत असेल तर संबंधित अधिका-याशी चर्चा करुन एखाद्याची कुवत नसेल तर त्याला बाजूला करुन, चांगला अधिकारी नेमून काम केले तर अडचण येईल असे मला वाटत नाही. हा अर्थसंकल्प सर्वंकष विचार करुन सादर केलेला आहे. यातून वर्षभरात योग्य पध्दतीने मार्ग निघतील अशी मला आशा आहे.

उप सभापती : सन 2012-13 च्या अर्थसंकल्पावरील चर्चा आता पूर्ण झाली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कामकाज सल्लागार समितीचा अहवाल सभागृहाला सदर करणे व संमत करुन घेणे

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर करतो.

विधान परिषद कामकाज सल्लागार समितीची बैठक गुरुवार, दिनांक 29 मार्च, 2012 रोजी दुपारी 3.30 वाजता घेण्यात आली. सदरहू बैठकीत समितीने विचारविनिमय करुन सोमवार, दिनांक 30 मार्च ते शुक्रवार दिनांक 20 मार्च 2012 पर्यंतचे सभागृहाचे कामकाज पुढीलप्रमाणे असावे असा निर्णय घेतला.

मार्च, 2012

शुक्रवार, दिनांक 30	: अशासकीय कामकाज (विधेयके)
शनिवार, दिनांक 31	: बैठक होणार नाही

एप्रिल, 2012

रविवार, दिनांक 1	: सुट्टी
सोमवार, दिनांक 2	: शासकीय कामकाज
मंगळवार, दिनांक 3	: (1) सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या प्रस्तावावर चर्चा (2) शासकीय कामकाज
बुधवार, दिनांक 4	: शासकीय कामकाज
गुरुवार, दिनांक 5	: सुट्टी
शुक्रवार, दिनांक 6	: सुट्टी
शनिवार, दिनांक 7	: बैठक होणार नाही
रविवार, दिनांक 8	: सुट्टी
सोमवार. दिनांक 9	: शासकीय कामकाज
मंगळवार, दिनांक 10	: (1) सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या प्रस्तावावर चर्चा (2) शासकीय कामकाज

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हर्षवर्धन पाटील....

बुधवार, दिनांक 11	: शासकीय कामकाज
गुरुवार, दिनांक 12	: (1) विरोधी पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या प्रस्तावावर चर्चा (2) शासकीय कामकाज
शुक्रवार, दिनांक 13	: अशासकीय कामकाज (ठराव)
शनिवार, दिनांक 14	: सुट्टी
रविवार, दिनांक 15	: सुट्टी
सोमवार, दिनांक 16	: शासकीय कामकाज
मंगळवार, दिनांक 17	: (1) सत्तारुढ पक्षातर्फे सुचविण्यात येणा-या प्रस्तावावर चर्चा (2) शासकीय कामकाज
बुधवार, दिनांक 18	: (1) सन 2012-13 चे विनियोजन विधेयक (2) शासकीय कामकाज
गुरुवार, दिनांक 19	: (1) अंतिम आठवडा प्रस्ताव (2) शासकीय कामकाज
शुक्रवार, दिनांक 20	: (1) शासकीय कामकाज (2) अशासकीय कामकाज (विधेयके)

उप सभापती : कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहाला सादर झाले आहे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, कामकाज सल्लागार समितीचे प्रतिवृत्त सभागृहास संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

..नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड येथे पोलीस जमादाराचा मारहाणीमुळे झालेला मृत्यू

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील सभागृहात उपस्थित आहेत. त्यामुळे मी एक महत्वाचा मुद्दा उपस्थित करु इच्छितो. दिनांक 25 मार्च, 2012 रोजी बीड जिल्हयातील शहाड पिंपरी येथील एका ढाब्यावर श्री.अर्जून दबाले या पोलीस जमादाराला मारहाण करण्यात आली. हा ढाबा श्री.दिलीप गोरे या माजी जिल्हा परिषद सदस्याच्या मालकीचा आहे अशी माहिती मिळाली आहे. त्या ढाब्यावर वाद निर्माण झाल्यामुळे श्री.दबाले यांना मारहाण करण्यात आली. त्या ठिकाणच्या पी.आय.ने त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यास मदत केली नाही. त्यांना हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यानंतर उपचार होऊन डिस्चार्ज देण्यात आला. परंतु आज त्यांचा मृत्यू झालेला आहे. एका पोलीस कर्मचाऱ्याला अशा पध्दतीने मारहाण केली जाते आणि त्यात त्याचा मृत्यू होतो. मृत्यू झाल्यानंतर तेथील एस.पी.नी सांगितले की, त्यांचा हृदयविकारामुळे मृत्यू झालेला आहे. श्री.दबाले यांची मुले पोलीस विभागात नोकरी करीत आहेत. त्यांचे म्हणणे असे की, हा मृत्यू मारहाणीमुळे झालेला आहे. पोस्टमार्टेम अहवाल काय आला आहे हे अद्याप उघड झालेले नाही. पोलिसाला मारहाण करुन ठार मारले जाणे या संदर्भात सरकारने निवेदन केले पाहिजे. माननीय मंत्री श्री.प्रकाश सोळंके हे बीड जिल्हयातील आहेत. बीड जिल्हयातील अंतर्गत राजकारण काय आहे याची मला माहिती नाही. परंतु ही घटना या राज्याला शोभनीय नाही. या संदर्भात माननीय गृहमंत्र्यांनी स्पष्टीकरण केले तर वास्तव सभागृहासमोर येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, आज पोलीसच पोलिसांच्या जिवावर उठले आहेत. दारुचा गुत्ता चालविणाऱ्यावर धाड टाकण्यासाठी गेलेल्या पोलीस कर्मचाऱ्याला हॉकी स्टिकने मारहाण करण्यात आली. त्यामुळेच त्या पोलीस कर्मचाऱ्याला हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागले हे मान्य करणार आहात की नाही? या घटनेबद्दल प्रथमत: कलम 327 लावले पाहिजे आणि पोस्टमार्टेम अहवाल आल्यानंतर कलम 302 लागू झाले पाहिजे. मारहाण झालेल्या अधिकाऱ्याचा हृदयविकारामुळे मृत्यू झाल्याचे सांगून गुन्हेगारांना मोकळे सोडायचे का? त्यातून अराजकता घडते. पोलिसांच्या बाजूने मंत्री महोदयांनी ठामपणे उभे राहिले पाहिजे. मृत झालेल्या पोलिसाच्या संदर्भात शासनाची भूमिका स्पष्ट केली पाहिजे. जर गुन्हेगारांना वाचविण्याचा प्रयत्न केला तर

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पोलीस खात्याकरिता ते फार घातक ठरेल असे वाटते. प्रामाणिकपणे पोलीस अधिकारी आपले कर्तव्य बजावण्यासाठी गेल्यानंतर त्यांना मारहाण केली जात असेल तर ते फार गंभीर आहे, एवढेच मला सांगावयाचे आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, माझ्याकडे या प्रकरणाची प्राथमिक माहिती उपलब्ध आहे. परंतु डिटेल रिपोर्ट घेऊन उद्या सभागृहाचे कामकाज संपण्यापूर्वी सविस्तर निवेदन केले जाईल.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. चंद्रकांत पाटील (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 30 मार्च, 2012 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दि. 29 मार्च, 2012 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ देण्यात यावा व उर्वरित 140 मिनिटांचा वेळ खालीलप्रमाणे अशासकीय विधेयकांना देण्यात यावा.

1. सन 2011 चे वि.प.वि. क्र. 8 - महाराष्ट्र लोक आयुक्त आणि उप लोक आयुक्त (सुधारणा) विधेयक, 2011, श्री. दिवाकर रावते, वि.प.स. यांचे - 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. सन 2011 चे वि.प.वि. क्र. 13 - महाराष्ट्र सहाय्क प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) विधेयक, 2011 श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे - 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. सन 2011 चे वि.प.वि. क्र. 9 - महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (सुधारणा) विधेयक, 2011. श्री. विजय सावंत, वि.प.स. यांचे इ 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
4. सन 2011 चे वि.प.वि. क्रमांक-4 बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, 2011. श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांचे- 35 मिनिटांपेक्षा जास्त नाही

उप सभापती : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर झाला आहे.

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्ती वय 58 वरुन 60 करण्याचे नागपूर विभागाच्या जन प्रतिनिधींनी शासनाकडे केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मोखाडा-जव्हार तालुक्यामध्ये (जि.ठाणे) भीषण पाणीटंचाई असून शासनाने टँकर उपलब्ध न केल्याने आदिवासींना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत असणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे यांनी "राज्यातील सुशिक्षीत तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी सुरु केलेल्या उद्योजक आणि बेरोजगारांच्या संयुक्त मेळाव्याच्या महत्वाकांक्षी योजना बंद पडण्याच्या मार्गावर असल्यामुळे राज्यातील बेरोजगारांचा विचार करुन त्यांच्या रोजगाराची जबाबदारी घेण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "दिनांक 26 मार्च, 2012 रोजी मुंबई विद्यापीठाच्या तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या नव्या तसेच दूरस्थ शिक्षण केंद्रातील जुन्या अभ्यासक्रमाच्या बिझनेस इकॉनॉमिक्स पेपर क्र. 3 या विषयाच्या प्रश्न पत्रिकेची छपाई न केल्यामुळे 612 विद्यार्थ्यांना सहन करावा लागणारा मन:स्ताप" "या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

.....3

उप सभापती .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आरोंदे गावातील तेरेखोल खाडीत बांधण्यात येणाऱ्या पुलानजिक असलेल्या जेट्टीला मेरी टाईम बोर्डाने परवानगी दिल्याने मच्छीमारांसाठी असलेल्या खार बंधाऱ्याला धोका पोहचत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "पुणे महानगर पालिकेच्या धोरणानुसार बांधा, वापरा व हस्तांतर करा या योजनेखाली मंगेश इंटरप्रायजेस, पुणे या कंपनीला कर्वे रोड पादचारी पुलाचे विस्तारीकरण व सौंदर्यीकरण करण्याचे काम वरील योजनेअंतर्गत देऊन येरवडा ब्रीज, धोबी घाट येथील युनिपोल जाहिरात फलक हा व्यावसायिक वापराकरिता सन 2014 पर्यंत करार केलेला असून या भागातील महानगर पालिकेचे विभाग अधिकारी श्री. ढोले यांनी मा. न्यायालयाच्या स्थगिती आदेश असतानाही प्रकाशित करण्याची कारवाई केल्यामुळे मंगेश इंटरप्रायजेसला नुकसान झाल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री. जगदीश गुप्ता यांनी "गोंदिया जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. समरीत, लघु पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. शंखपाल आणि अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. लोणारे यांनी कोट्यवधी रुपयांचा केलेला भ्रष्टाचार उघडकीस आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील. जे सन्माननीय सदस्य सभागृहात हजर असतील त्यांच्या लक्षवेधी सूचनांवर चर्चा होईल, जे सन्माननीय सदस्य उपस्थित नाहीत त्यांच्या लक्षवेधी सूचनांवर उद्या चर्चा होईल.

------ (नंतर श्री. जुन्नरे .....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: : चंद्रपूर येथील जंगलात वाघांचे झालेले मृत्यू

मु. शी. : चंद्रपूर येथील जंगलात वाघांचे झालेले मृत्यू यासंबंधी श्रीमती शोभा फडणवीस, श्री. विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"चंद्रपूर जवळील लोहारा जंगलात दिनांक १९ फेब्रुवारी, २०१२ ला वाघिणीचा झालेला मृत्यू, दिनांक २४ जानेवारी, २०१२ ला गोंडपिंपरी ता.आक्सापूर जंगलात वाघाचा झालेला मृत्यू, दिनांक २०/१/२०१२ ला सिन्देवाही ता.वासेरा जवळ बिबट्याचा झालेला मृत्यू, दिनांक २०/१/२०१२ ला यवतमाळ जि.चिल्ली दगडथर मार्गावर बिबट्याचा झालेला मृत्यू, तसेच दिनांक २०/१/२०११ ला पांढरकवडा ता.टिपेश्वर जंगलात फासात अडकून वाघाचा झालेला मृत्यू, २००५ च्या व्याघ्र गणनेनुसार राज्यात २६८ वाघ तर ५१३ बिबटांची संख्या असणे, परंतु सन २०११ मध्ये फक्त १६९ वाघ असल्याचे वनविभागाच्या आकडेवारी वरुन दिसून येणे, राज्यात मोठया प्रमाणात होत असलेल्या वाघांच्या शिकारीकडे वनविभागाचे होत असलेले दुर्लक्ष, वाघांचे होणारे संशयास्पद मृत्यू, मोठया प्रमाणात वाढलेले वाघाच्या अवयवांचे तस्करीचे प्रमाण, शासनाने यावर करावयाची कारवाई व उपाययोजना."

डॉ. पतंगराव कदम (वन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात विभागाने जे उत्तर दिलेले आहे ते केवळ वन विभागाच्या अधिका-यांना व कर्मचा-यांना वाचविण्यासाठी देण्यात आलेले आहे. लोहारा जंगलात पट्टेदार वाघाच्या मृत्यूच्या संदर्भात उत्तरात माहिती देण्यात आलेली आहे की, "वाहनाच्या धडकेने वाघिणीच्या डोक्याला जबरदस्त मार बसून डोक्यात रक्तस्त्राव झाल्यामुळे मृत्यू". परंतु वाघाच्या मागच्या पायाला खोल रक्ताळलेली जखम झालेली होती ती का झाली होती ? याचा काहीही उल्लेख उत्तरामध्ये करण्यात आलेला नाही. वाहनाची धडक लागली तर डोक्याला मार लागेल मागच्या पायाला मार लागूच शकत नाही त्यामुळे मागच्या पायाला मार कसा लागला ? वाघीण ज्या ठिकाणी मरण पावली होती त्याच्या 3 ठिकाणी गवत जळाल्याचे आढळून आले होते त्याची चौकशी झाली काय ? 20 ते 25 मीटरच्या झुडपामध्ये खुंटी गाडल्याचे आढळून आली होती त्याचीही चौकशी झाली नाही. खुंटीच्या काही अंतरावर विजेच्या तारा होत्या परंतु त्याचाही उल्लेख उत्तरात करण्यात आलेला नाही. त्यामुळे संशयाला जागा असणा-या बाबीवरुन वन विभागाने गंभीरतेने दखल घेतलेली नाही असे माझे स्पष्ट मत आहे तरी आपण पुन्हा एकदा वरिष्ठ पातळीवर चौकशी करुन ख-या अर्थाने वाघिणीचा मृत्यू कसा झाला ?

सभापती महोदय, गोंडपिंपरी त. आक्सापूर हे एफडीसीएमचे जंगल आहे. या ठिकाणच्या वाघाचा मृतदेह अधिकाऱ्यांना 8 दिवसानंतर दिसला. 8 दिवसामध्ये तुमचे वन अधिकारी, गार्ड व कमर्चारी तिकडे फिरकलेच नाहीत काय ? 8 दिवस वाघ मरुन पडलेला असतांना विभागाने दुर्लक्ष का केले ? या घटनेमध्ये बिरडी आणि आक्सापूरच्या 11 लोकांना पकडून आणण्यात आले व त्यांना रात्री बेदम मारहाण करण्यात आली व त्यातील एकाला सोडून देण्यात आले. दुस-या दिवशी त्या व्यक्तीला पुन्हा पकडण्यास गेले असतांना या व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. वाघाच्या बदल्यात माणसाला मारण्याचे नवीन धोरण शासनाने सुरु केले आहे काय ? या माणसाचा मृत्यू कशामुळे झाला याची पोलीस चौकशी झाली का ? त्यामुळे या व्यक्तीच्या मृत्यूची चौकशी करण्याची गरज आहे. पहिल्या घटनेच्या संदर्भात असे उत्तर देण्यात आले आहे की, ब्रेन हॅमरेजमुळे वाघाचा मृत्यू झाला होता व वाघाच्या शरीराचे कोणतेही अवयव कापून नेण्यात आले नव्हते असेही आपण पुढे म्हटले आहे. हा वाघ सकाळी 10.30 वाजता मेला आणि चार पाच तासात तुमचे लोक पोहचल्यामुळे शिका-याला वाघाचे अवयव कापावयास वेळ मिळाला नाही हे खरे आहे काय ? त्यामुळे वाघाच्या मृत्यूच्या संदर्भात तसेच मृत पावलेल्या व्यक्तीच्या संदर्भात उच्च चौकशी पुन्हा केली जाणार आहे काय ? ..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस यांनी वाघाच्या मृत्यूच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केली असून यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, सदर वाघिणीचा मृत्यू वाहनाच्या धडकेमुळे अति रक्तस्त्राव झाल्यामुळे झालेला आहे. सदर वाघिणीच्या शरीरावरील नखे, दात व मिशा शाबूत होत्या. शिकारी करणारे लोक वाघाचे दात,मिशा तसेच नखे चोरुन नेत असतात.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, उत्तरात असे म्हटले आहे की, वाघाचा मृत्यू वाहनाच्या धडकेने झाला आहे. वाहनाची धडक लागली असेल तर वाघाच्या डोक्याला मार बसेल परंतु या घटनेमध्ये वाघाच्या मागच्या पायाला खोल जखम होती, आजू बाजूचे गवत जाळण्यात आले होते, थोडया अंतरावर खुंटी गाडून निशाणी तयार करण्यात आली होती तसेच काही अंतरावर विजेच्या तारा सोडण्यात आल्या होत्या.

यानंतर श्री. भारवि...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभाताई फडणवीस...

त्यानंतर काही अंतरावर विजेच्या तारा सोडून ठेवल्या होत्या. या कुठल्याही गोष्टीची चौकशी आपल्या वन अधिकाऱ्या मार्फत केली गेली नाही. त्यामुळे वाहनाच्या धडकेने वाघ मेला हा चुकीचा निष्कर्ष आहे. त्यामुळे सर्व वाघांच्या प्रकरणात आपण फेर चौकशी करणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सर्व वाघांचा शव विच्छेदनाचा अहवाल आलेला आहे. सन्माननीय सदस्य म्हणतात त्या प्रमाणे सर्व प्रकरणांची उच्चस्तरिय चौकशी करण्यात येईल.

एक सन्माननीय सदस्य : सभापती महोदय, खालच्या सभागृहात वाघांची संख्या वाढली म्हणून वाघांचे अभिनंदन न करता वन मंत्र्यांचे अभिनंदन करण्यात आले. आता वाघांची संख्या कमी झाली तर त्यास जबाबदार कोण ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सभापती महोदय, आपल्या राज्यामध्ये वाघांची संख्या कमी झालेली नाही.

उप सभापती : या प्रश्नाचा बोलविता धनी दुसरा आहे.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय मंत्री श्री.पंतगराव कदम यांच्याकडे वन खाते आहे. महाराष्ट्रामध्ये वाघांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ होत आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, गेल्या 8-10 वर्षामध्ये वाघांची शिकार करताना 102 शिकारी सापडले. पण एकाही शिकाऱ्यावर अजून पर्यंत कारवाई करण्यात आलेली नाही. तेव्हा या शिकाऱ्यांवर कारवाई करणार आहात काय ? शासनाने शिकारी पोसण्याचे काम सोडून त्यांच्यावर कारवाई करण्याचे काम करावे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस म्हणतात तशी वस्तुस्थिती नाही. आता पर्यंत जे शिकारी सापडले आहेत व त्यांच्या विरूद्ध गुन्हे शाबूत झाले आहेत त्यांच्या विरूद्ध कारवाई करण्यात आली आहे. त्या संबंधातील सगळी माहिती मी पटलावर ठेवण्यास तयार आहे.

श्री.शोभा फडणवीस : सभापती महोदय, अजून पर्यंत एकाही शिकाऱ्याला शिक्षा झालेली नाही. म्हणजे आपण शिकाऱ्यांवर कारवाई केली असे म्हणता येईल काय ? केवळ कागदोपत्री कारवाई करून शिकाऱ्यांना वाचविण्याचा प्रयत्न करू नये. वाघांचा मृत्यू झाल्यामुळे आदिवासींना मारायचे हा कुठला न्याय आहे ? शिकाऱ्यांवर काय कारवाई केली ते सांगावे. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, गोंडपिंपरी, ता.आक्सापूर जंगलात वाघाचा मृत्यू झाल्या बद्दलचा प्रश्न आहे. येथे सुद्धा 2 ते 3 महिने संबंधितांना जेलमध्ये टाकण्याचे काम आमच्या विभागाने केले आहे. यापूर्वी देखील सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये जे गुन्हेगार सापडले त्यांच्यावरही कारवाई करण्यात आली आहे. सिंदेवाही, जिल्हा, चंद्रपूर,गडचिरोली,अमरावती असेल तेथे आम्ही कारवाई केली आहे. मी मघाशी म्हटल्याप्रमाणे सर्व यादी पटलावर ठेवण्यास तयार आहे. या उपर काही शंका आली तर निश्चितपणे त्यासंबंधी कारवाई केली जाईल.

सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांची भावना अगदीच चुकीची आहे असे मी मानत नाही. याचे कारण दोन महिन्यामध्ये जवळ जवळ 3 वाघ, 2 बिबटे मरणे ही बाब आमच्या विभागाने गांभीर्याने घेतली आहे. मी आपल्याला थोडक्यात सांगतो की, वाघ प्रजाती अशी आहे की, बछडी एक वर्षाची झाल्यानंतर ते एकत्र रहात नाहीत. वेगवेगळ्या भागामध्ये राहतात. मानव जात एरिया वाटून घेतो तशा प्रकारचा एरिया ते वाटून घेतात. त्यांच्या भागामध्ये दुसऱ्या कोणत्याही प्राण्याने जायचे नसते. त्यामुळे ही प्रजाती एका बाजूला वाढत आहे. दुसऱ्या बाजूला जंगलाचे क्षेत्रफळ तेच राहत आहे. त्यामुळे वाघ मग जंगला बाहेर जातात. त्यामुळे मग अशा घटना घडतात. यासाठीच आमच्या विभागाने अत्यंत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. आपली पाच सहा अभयारण्ये आहेत. या सगळ्यांचे क्षेत्रफळ तिथल्या एकाही गावालाही देण्यात येणार नाही. उलट तेथील क्षेत्रफळ दुप्पट करण्याचा निर्णय आमच्या विभागाने घेतला आहे.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2 बाबत

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, लक्षवधी सूचना क्रमांक 2 च्या सूचनेबाबत उत्तर देणारे माननीय राज्यमंत्री श्री.सचिन अहिर सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

उप सभापती : सदरहू लक्षवेधी सूचनेबाबत उत्तर देण्यासाठी माननीय गृहनिर्माण मंत्री श्री.सचिन अहिर सदनामध्ये उपस्थित नाहीत.त्यामुळे माननीय गृहनिर्माण मंत्री महोदयांना बोलविण्यात यावे. तोपर्यंत तिसरी लक्षवेधी सूचना चर्चेसाठी घेण्यात यावी.

. . . .4 एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : हवामानातील बदलाबाबतची माहिती विनाविलंब मिळण्यासाठी राज्यातील काही भागामध्ये डॉप्लर रडार यंत्रणा उभारण्याचा घेतलेला निर्णय

मु.शी. : हवामानातील बदलाबाबतची माहिती विनाविलंब मिळण्यासाठी राज्यातील काही भागामध्ये डॉप्लर रडार यंत्रणा उभारण्याचा घेतलेला निर्णय यासंबंधी सर्वश्री उल्हास पवार,मोहन जोशी,जयप्रकाश छाजेड, प्रा.सुरेश नवले, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री. अमरनाथ राजूरकर, अशोक उर्फ भाई जगताप वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.उल्हास पवार (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"हवमानातील बदलाबाबतची माहिती विनाविलंब मिळावी आणि संभाव्य जीवित व वित्तहानी टाळता यावी यासाठी भारतीय हवामान विभागाने राज्यात काही भागात डॉप्लर रडार यंत्रणा उभारण्याचा घेतलेला निर्णय, त्यामध्ये पहिला टप्पा म्हणून मुंबईत हवामानाचा वेध घेणारी डॉप्लर रडार यंत्रणा उभारण्यात येणे, रत्नागिरी शहराच्या साळवी स्टॉप येथील वेधशाळेच्या ठिकाणी ही यंत्रणा उभारण्यासाठी केंद्र शासनाने रुपये 5 कोटीचा मंजूर केलेला निधी अजूनही रखडलेला असणे, फीयान वादळाचा सर्वाधिक फटका कोकण किनारपट्टीला बसला होता. अनेक मच्छीमारी नौका व मच्छीमार समुद्रात बुडाले होते, ही रडार यंत्रणा बसविण्यात आली तर कोकण किनार पट्टीचा भाग पूर्णत: त्याच्या कक्षेत येऊन हवामानातील बदलाची माहिती तत्काळ मिळेल, अशा या यंत्रणेमुळे त्सुनामी, फियान किंवा वादळी वाऱ्यांचा अंदाज येथील मच्छीमारांना 24 तास आधी मिळेल व जीवित, वित्तहानी टाळता येईल, याकरिता राज्य शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .4 एम-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, जगामध्ये ग्लोबल वार्मिंगमुळे हवामानामध्ये होणारे बदल, अवकाळी पाऊस याबाबत सूचना देणारी अधुनिक यंत्रणा याकडे वेळेवर गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे. कारण केंद्र शासनाने या विभागाच्या माध्यमातून अलिकडे जगामध्ये काही घटना घडलेल्या आहेत आणि विशेषत: भारतामध्ये 2005 मध्ये आलेला पाऊस असेल, केरळच्या किनाऱ्यावर आलेल्या त्सुनामी लाटा असतील, या सर्व गोष्टींचे गांभीर्य, तसेच भविष्यात येणाऱ्या संकटाची चाहूल ज्या यंत्रणेमार्फत अगोदर त्या भागातील जनतेला देणे सोपे होईल अशा प्रकारची ही यंत्रणा आहे. मी याठिकाणी मुद्दाम 2005 चा उल्लेख केलेला आहे आणि हे एवढयासाठी सांगतो की, ही यंत्रणा अधिकाधिक प्रमाणात बसविणे आवश्यक आहे. यासाठी केंद्र शासनाने देखील निधी उपलब्ध करुन दिलेला आहे अशा प्रकारची बातमी आहे. परंतु शासनाच्या माध्यमातून वेळेवर गोष्टी न पोहोचल्यामुळे आणि याचे दुष्परिणाम काय होतात हे आपण अनुभवले आहे. आपण निवेदनामध्ये देखील 2005 चा उल्लेख केलेला आहे. या राज्यामध्ये त्सुनामी लाटा निर्माण झाल्या होत्या. मागील 100 वर्षामध्ये एवढा पाऊस झाला नव्हता इतका पाऊस मुंबईमध्ये झाला होता. त्यानंतर अनेक घटना घडल्या. मुंबईमध्ये एका समुद्र किनाऱ्यावर काही वाहिन्यांमधून, चॅनेल्समधून, इतर माध्यमांमधून त्सुनामी लाट आली अशा प्रकारची भयावह बातमी सांगण्यात आली आणि मग इ ालेल्या चेंगराचेंगरी मध्ये 19 माणसे मृत्युमुखी घडली आणि हा प्रश्न मुंबईमध्ये घडलेला आहे. म्हणून शासनाने या यंत्रणेकडे गांभीर्याने लक्ष दिले पाहिजे आणि केंद्र शासनाच्या माध्यमातून आपल्याकडे या संबंधातील जास्तीतजास्त यंत्रणा कशी उपलब्ध होईल आणि यासाठी जो निधी उपलब्ध होईल त्याचा कसा जास्तीतजास्त वापर करता येईल याकडे शासन गांभीर्याने लक्ष देऊन तत्परतेने पावले उचलणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जुलै 2005 मध्ये मुंबईमध्ये अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली. त्यानंतर देशामध्ये 17 ठिकाणी डॉप्लर रडार बसविण्याच्या बाबतीत केंद्र शासनाकडून प्रस्तावित करण्यात आले. याठिकाणी नेव्ही नगर, कुलाबा, मुंबई आणि नागपूर या दोन ठिकाणी डॉप्लर रडार बसविलेले आहेत आणि ती यंत्रणा तेथे कार्यान्वित झालेली आहे. त्याचप्रमाणे मुंबई विमानतळ, रत्नागिरी, चिखलठाणा, सोलापूर आणि अकोला याठिकाणी सुध्दा भविष्य काळामध्ये डॉप्लर रडार बसविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी राज्य शासन निश्चितपणे त्याचा पाठपुरावा करीत आहे. दि.12-1-2012 रोजी या संदर्भात इंडियन मेट्रोलॉजीकल डिपार्टमेंटच्या संबंधितांबरोबर एक बैठक घेण्यात आली आणि या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बैठकीमध्ये साधारणत: पुढच्या टप्प्यामध्ये जे रडार बसविण्यात येणार आहेत त्यासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. याठिकाणी मला सन्माननीय सदस्यांच्या माहितीसाठी एक गोष्ट सांगावयाची आहे की, डॉप्लर रडार हे केंद्र शासनाच्या इंडियन मेट्रोलॉजीकल डिपार्टमेंटच्या माध्यमातून बसविले जातात आणि त्यासाठी राज्य शासनाला कोणत्याही प्रकारचा निधी मिळत नाही. संपूर्णत: ही केंद्र शासनाची योजना आहे आणि यासाठी राज्य शासन केवळ जागा उपलब्ध करुन देणे एवढयापुरतेच त्यांना सहकार्य करते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, यासाठी निधी उपलब्ध आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले ते खरे आहे की, ही केंद्र शासनाची योजना आहे. आपण फक्त जागा उपलब्ध करुन द्यायची आहे. मी विचारले की, आपण या प्रकरणी गांभीर्याने पावले उचलली काय ? या योजनेसाठी केंद्राकडून 100 टक्के निधी मिळणार आहे, तेव्हा या संदर्भात केंद्र शासनाकडे पत्र व्यवहार केला आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी या ठिकाणी सांगितले की, मुंबई विमानतळावर डॉप्लर यंत्रणा बसविण्यासाठी निश्चितपणे पाठपुरावा सुरु आहे. त्याच प्रमाणे रत्नागिरी, चिखलठाणा, सोलापूर, अकोला व ज्या ज्या ठिकाणी जागा उपलब्ध करुन द्यायची आहे त्या ठिक्राणी निश्चितपणे राज्य शासनामार्फत जागा उपलब्ध करुन देण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, कोकण किनारपट्टीवर फयान सारखे वादळ आले होते. त्या संदर्भात बरीच चर्चा झाल्यानंतर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड येथे अशा प्रकारचे एक यंत्र बसविले होते. नंतर ते यंत्र बंद पडले. हे यंत्र अजूनही दुरुस्त करण्यात आलेले नाही. तेव्हा हे यंत्र दुरुस्त करण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा की, फयान वादळ आल्यानंतर प्रत्येक ट्रॉलर धारकांना हवामान बदला संबंधातील माहिती देणारे यंत्र घेण्यासाठी सबसिडी देण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते, त्याचे पुढे काय झाले ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना डॉप्लर रडार बसविण्या संदर्भातील आहे. सन्माननीय सदस्यांनी वेगळा प्रश्न विचारलेला आहे. तरी सुध्दा जी काही माहिती या ठिक्राणी दिलेली आहे त्याबाबत सांगू इच्छितो की, ना दुरुस्त असलेले यंत्र दुरुस्त करण्याची तसेच ट्रॉलरधारकांना हवामान बदला संबंधातील माहिती देणारे यंत्र बसविण्या बाबतची कार्यवाही शासना मार्फत केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दीप्ती चवधरी : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, डॉप्लर रडार यंत्रणा बसविण्याची कार्यवाही कार्यान्वित झालेली आहे. पण ती यंत्रणा कार्यान्वित झाल्याचे कुठे दिसत नाही, ही यंत्रणा सुरु आहे हे कुठे समजू शकेल ? हवामानाचा अंदाज न आल्यामुळे पेरण्या केल्या जातात आणि त्यामध्ये करोडो रुपये वाया जातात. तेव्हा आपण डॉप्लर यंत्रणा बसविल्यास शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची बचत होणार आहे. ही योजना केंद्र शासनाची असली तरी राज्य शासन ही यंत्रणा बसविण्यासाठी युध्द पातळीवर प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, नागपूर आणि नेव्ही नगर, कुलाबा या दोन ठिकाणी डॉपलर रडार यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून अधिक शास्त्रशुध्द आणि अचूक अंदाज वर्तविण्यात येत आहेत आणि त्याचा फायदा निश्चितपणे मिळत आहे. अशा प्रकारची रडार यंत्रणा उभारण्या बाबत शासन अतिशय गंभीर आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी स्वत: केंद्र स्तरावर पत्रव्यवहार सुरु केलेला आहे आणि पूर्वी हा विभाग त्यांच्याकडे असल्यामुळे त्यांच्या नेतृत्वाच्या माध्यमातून अधिक गतीने हे काम होईल अशी मला सन्माननीय सदस्यांना ग्वाही द्यायची आहे. भविष्य काळात अशा प्रकारची रडार यंत्रणा मराठवाडा, विदर्भ, सोलापूर व अन्य भागांमध्ये लवकरात लवकर बसविण्यासाठी शासनाच्या वतीने पाठपुरावा करण्यात येईल.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, दोन दिवसांपूर्वी मुंबई शहरामध्ये वाळवंटी प्रदेशातून मोठ्या प्रमाणावर धूळ आली आणि जवळचा माणूस अस्पष्ट आणि अदृश्य दिसू लागला. तेव्हा डॉप्लर रडार यंत्रणेवर याची पूर्व सूचना मिळाली होती काय ?

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सर्वसाधारणपणे जे रडार असतात त्यांच्या तुलनेमध्ये डॉप्लर हवामान रडारमुळे उच्च प्रतीची माहिती मिळते. ढग भरुन आल्यावर किती प्रमाणात पाऊस पडेल, कोणत्या भागात पाऊस पडेल तसेच पावसाचा अचूक अंदाज मिळविण्यासाठी याचा फायदा होऊ शकतो. त्याच बरोबर वाऱ्याची गती, दिशा, पाण्याच्या थेंबाची आकृती, गारांचा आकार या बद्दल सुध्दा माहिती मिळू शकते. वाऱ्याची गती आणि वेग या बद्दल अचूक माहिती मिळत असल्याने चक्रीवादळ विषयक आणि वादळ विषयक माहिती मिळते. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्या बाबतीतही निश्चितपणाने आयएमडी इंडियन मेट्रॉलॉजिकल डिपार्टमेंटकडून त्या दिवशीचे वेदर रिपोर्ट मागवून आपल्याला दिले जातील.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, यह जो डॉप्लर रडार सिस्टम है यह बहुत ही अल्ट्रा माडर्न सिस्टम है. यह सिस्टम नागपुर में भी लगाया गया है. उस सिस्टम का उद्घाटन माननीय मुख्यमंत्री ने किया था. उस कार्यक्रम में मैं भी उपस्थित था. मैं बताना चाहूंगा कि इस रडार से न केवल विमान के आवागमन की जानकारी में फायदा होता है बल्कि यह सिस्टम हमारे किसानों के लिए भी बहुत उपयोगी है. हम सभी जानते हैं कि हमारी खेती बारिश के ऊपर निर्भर करती है. इसलिए कब कैसा मौसम रहेगा तथा कब बारिश आएगी और कब तूफान आ सकता है, इन सब बातों की जानकारी इस रडार के माध्यम से हमको मिल सकती है.

माननीय मंत्री महोदय ने बताया कि यह सिस्टम पूरी तरह से केंद्र सरकार द्वारा स्पांसर्ड किया गया है. यहां पर बताया गया है कि एक साल पहले जो यंत्र लगाए गए थे, उनकी ग्रांट भी अभी तक केंद्र सरकार से नहीं आयी है. यहां पर आपने लिखा है कि, "भारत सरकार किंवा राज्य सरकार यांच्या मार्फत आतापर्यंत काहीही आर्थिक तरतूद करण्यात आलेली नाही."मेरा कहना है कि अभी 4 यंत्र आपने प्रस्तावित किए हैं. मेरा कहना है कि यह काम जल्द से जल्द किया जाना चाहिए और माननीय मुख्यमंत्री महोदय के माध्यम से यह काम जल्द से जल्द किया भी जा सकता है. मुझे पूछना है कि क्या सरकार इस बारे में जल्द से जल्द प्रयत्न करेगी. दूसरा मेरा प्रश्न यह है कि हमारे यहां पर कोंकण में 750 किलोमीटर का कोस्टल एरिया है. क्या बचे हुए यंत्रों को वहां पर लगाने के लिए सरकार की ओर से प्रयत्न किया जाएगा ? वहां पर ये यंत्र लगाए गए तो वहां पर ये यंत्र सिक्युरिटी की दृष्टि से बहुत फायदेमंद होंगे तथा त्सुनामी जैसे तूफानों की संभावना का भी पहले से पता लगाया जा सकता है. मुझे पूछना है कि इन यंत्रों को लगाने के संबंध में क्या सरकार ने कोइ प्रायर्टी लिस्ट तैयार की है? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी पहिल्यांदाच सांगितले की, देशामध्ये एकूण 17 ठिकाणी हे बसविले जाणार आहेत. त्यापैकी महाराष्ट्रामध्ये सात ठिकाणी बसविण्यात येणार आहेत या सात ठिकाणांपैकी दोन नेव्हीनगर, कुलाबा आणि नगपूर येथील कार्यरत झालेले आहेत. मुंबई विमानतळ, रत्नागिरी, चिखलठाणा, औरंगाबाद, सोलापूर आणि अकोला या ठिकाणी हे प्रस्तावित आहेत. ज्या ठिकाणी हे प्रस्तावित केलेले आहेत त्या ठिकाणी लवकरात लवकर बसविण्यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून पाठपुरावा चालू आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, डॉप्लर रडारच्या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने राज्य शासनाच्या कारभारासाठी काही महत्वाच्या गोष्टी या निमित्ताने पुढे येत आहेत. केंद्र शासनामध्ये सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजीसाठी वेगळे खाते आहे. आता आपण या सगळया प्रणाल्यांमध्ये विज्ञानाचा आणि तंत्रज्ञानाचा उपयोग जास्तीत जास्त करुन घेण्याचा प्रयत्न करीत असतो त्यासाठी अतिशय सक्षम असे विज्ञान आणि तंत्रज्ञान खाते राज्य शासनाला निर्माण करता यईल काय?

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

रस्त्याचे काम विहित मुदतीमध्ये कंत्राटदाराने पूर्ण केले नसल्यामुळे त्याला दंड करण्यात आला आहे. या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, या रस्त्याचे 67 टक्के काम पूर्ण झालेले आहे.

तालिका सभापती (श्री.रामनाथ मोते) : सभागृहाची वेळ संध्याकाळी 6.15 पर्यंत होती. कामकाज संपेपर्यंत सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या रस्त्याचे काम केवळ 67 टक्के झालेले असताना त्या कंत्राटदाराला 91 टक्के पैसे देण्यात आले. टेंडरचा नियम असा आहे की, जेवढे काम पूर्ण होईल तेवढे पैसे पाहिजेत. परंतु 50 टक्के काम पूर्ण झाल्याबरोबर म्हणजे उद्योजकाने या कामावर 50 टक्के खर्च केला असताना अधिकाऱ्यांनी त्याला 91 टक्के पैसे दिल्यामुळे त्याने या रस्त्यांचे काम अतिशय संथ गतीने सुरु ठेवले आहे. या रस्त्याच्या कामावर सुरुवात होऊन एक वर्ष झाले तरी केवळ 67 टक्के काम पूर्ण झालेले आहे. डिसेंबरच्या अधिवेशनामध्ये पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या वेळी मी हा विषय उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी या कंत्राटदाराला एक महिन्याच्या आत टर्मिनेट करण्याची नोटीस देण्यात येईल असे सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक 23 डिसेंबर, 2011 रोजी कंत्राटदाराला करारनामा रद्द करण्याची नोटीस देण्यात आली. त्यालाही आता 3 महिने उलटून गेले आहेत.

या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, त्या कंत्राटदाराने ॲफिडेव्हिट करुन पहिल्या भागासाठी डिसेंबर, 2012 पर्यंत मुदत वाढवून मागितली आहे. दुसऱ्या भागाचे काम 2013 मध्ये पूर्ण करुन असे सांगितले आहे. त्या कंत्राटदाराला प्रत्येक वेळी मुदत वाढवून देत असताना शासनाला त्याच्याबद्दल इतके प्रेम का वाटत आहे ? ज्या कंत्राटदाराची काम करण्याची क्षमता नाही अशा कंत्राटदारास काम देण्याचा विभागाचा कोणता हेतू आहे ? आजही सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी त्या कंत्राटदाराला वाचवित आहेत. माझ्याजवळ वर्तमानपत्राचे कात्रण आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व पोलीस स्टेशन्सना मॅनेज केले आहे. सर्व पोलीस स्टेशनने त्या रस्त्यावर झालेल्या अपघातांबाबत असे रिपोर्ट दिले आहेत की, झाडाला धक्का लागून अपघात झाला, रस्त्याच्या खाली गाडी उतरल्यामुळे अपघात झाला आहे, चालकांवरच त्या अपघातांचे दोष

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.पांडुरंग फुंडकर....

टाकले आहेत. जवळपास 125 कि.मी.पर्यंत एकतर्फी रस्ता खोदून ठेवलेला आहे. त्यामुळे माणसे मरत आहेत, जखमी होत आहेत. तरीही त्या कंत्राटदाराबाबत शासनाला प्रेम वाटत आहे, त्याला वेळोवेळी मुदत वाढवून का दिली आहे ? या रस्त्यावरुन किती दिवस व किती माणसांचा बळी घेतला जाणार आहे आणि टेंडरमध्ये मुदतवाढ मागण्याची तरतूद नसताना या कंत्राटदाराबाबत सहानुभूती दाखविण्याचे कारण काय ? शासन अधिक काळ मुदतवाढ देऊ शकत नाही. परंतु त्याने ॲफिडेव्हिटद्वारे मागणी केली म्हणून शासन त्याला मुदतवाढ देत आहे असे सांगून कंत्राटदाराला पाठिशी घालण्याचे काम सुरु आहे. या कंत्राटदाराकडून ज्या गतीने या रस्त्याचे काम सुरु आहे ते पाहिले तर 2020 पर्यंत सुध्दा हे काम पूर्ण होणार नाही.

मंत्री महोदयांनी डिसेंबरच्या अधिवेशनात त्याला काढून टाकण्याची नोटीस देऊन काळ्या यादीत टाकण्याचे कबूल केले होते. या रस्त्याचे काम 67 टक्के झालेले असताना त्याला 91 टक्के पैसे कोणत्या अधिकाऱ्यांनी दिले, त्या अधिकाऱ्यांवर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विस्तृत प्रश्न विचारला असल्यामुळे मी देखील विस्तृतपणे उत्तर देणार आहे. पुणे-नगर-औरंगाबाद-जालना पर्यंत चार पदरी रस्ता शासनाचा सहभाग न घेता पूर्ण केला आहे. जालन्यापासून देऊळगाव राजा-बेराळा फाटा ते चिखली अमडापूर खामगाव पर्यंतच्या रस्त्याची लांबी 146 कि.मी.इतकी आहे. एकूण प्रकल्पाचा खर्च 339.35 कोटी इतका आहे. या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याची सातत्याने मागणी होत होती. कारण पुणे-जालन्यापर्यंत चौपदीकरण झालेले होते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

या कामाचे एकदा नाही, दोनदा नाही तर चार वेळा टेंडर मागविण्यात आले होते. कदाचित त्या रस्त्यावर पुरेशी वाहतूक नसल्यामुळे कोणताही कॉण्ट्रॅक्टर काम करण्यासाठी पुढे आला नाही. चार वेळा रिटेंडरिंग करावे लागले. शेवटी कामाचे 2 भाग करुन प्रयत्न केले. त्यानंतर एक कॉण्ट्रॅक्टर काम करण्यास तयार झाला. हे दोन्ही भाग एकाच कॉण्ट्रॅक्टरकडे आहेत. या दोन्ही भागाचा अभ्यास केला तर असे दिसून येते की या दोन भागांचे एकूण 52 टक्के काम झालेले आहे. व्हीजीएफ 45 टक्के दिलेला आहे. हे काम रेंगाळलेले आहे हे खरे आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडु रंग फुंडकर साहेबांनी विचारल्या प्रमाणे कॉण्ट्रॅक्टरला नोटीस दिली. त्याच्यावर दररोज 20 हजार रुपयाप्रमाणे दंड आकारला आणि 73 लाख रुपये दंडापोटी वसूल देखील केलेले आहेत.

हे टेंडर का रद्द केले नाही असा सन्माननीय सदस्यांचा पुढचा प्रश्न आहे. मी आताच सांगितले की, जेव्हा 2006-07मध्ये हे काम करण्याचे ठरविले त्यावेळी 4 वेळा टेंडर मागवून देखील कोणी प्रतिसाद दिला नव्हता. आज परिस्थिती अशी आहे की, या सर्व कामाचा खर्च वाढलेला आहे. 2006-07मध्ये एका कि.मी. रस्त्याची कॉस्ट 2.2 कोटी होती. आता ही कॉस्ट सुमारे 5 कोटी पर्यन्त जाते. 2006-07मध्ये हे काम करायला कोणी उत्सुक नव्हता आणि आता तर कॉस्ट डबल झालेली आहे. तेव्हा हा कॉण्ट्रॅक्टर सोडून दिला तर दुसरा कोणी कॉण्ट्रॅक्टर हा रस्ता करील असे मला वाटत नाही. किंबहुना केन्द्र सरकारने देखील याला व्हीजीएफ देणे शक्य नाही. जेव्हा अशा प्रकारची बीओटीची कामे होतात त्यावेळी राज्य शासनाचा विभाग, संबंधित कॉण्ट्रॅक्टर आणि बँक यांचे त्रीपक्षीय ॲग्रीमेण्ट होत असते. बँक खात्री करुन पैसे देत असते. या प्रकरणामध्ये बँक ऑफ इंदोर आणि पंजाब नॅशनल बँक ही सबऑर्डिनेट बँक आहे. मी आधी मिटींग घेतली आणि नंतर नोटीस देऊन सांगितले की हे सर्व काम थांबवावे लागेल. फक्त खड्डे भरण्याच्या ऑर्डर्स् दिल्या होत्या. बँकने इण्टरव्हेन केले आणि विंध्यवासिनी मेगा स्ट्रक्चर कंपनी बरोबर जॉईण्ट व्हेंचर केले आणि या कॉण्ट्रॅक्टरच्या वतीने ॲफिडेव्हिट दिले.

पहिल्या टप्प्याचे 67 टक्के काम झालेले आहे. हा पहिला टप्पा डिसेंबर 2012 पर्यन्त पूर्ण करु आणि दुसरा टप्पा जून 2013 पर्यन्त पूर्ण करु असे त्याने लिहून दिलेले आहे. "सकाळ" आणि

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

"लोकमत समाचार" या वृत्तपत्रातून काम सुरु झाल्याचे फोटो छापून आलेले आहेत. सन्माननीय सदस्य देखील प्रयत्न करीत आहेत. त्यांचा दणका, आमचा दणका, जे काही असेल त्यातून काम सुरु झालेले आहे.

....नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4..... श्री.छगन भुजबळ....

प्रत्यक्ष कामाचे फोटो मी आणलेले आहेत. नियमाप्रमाणे, कायद्याप्रमाणे दंडाबाबत सुध्दा कारवाई केली आहे. ज्यावेळी आपण बी.जी.एफ.घेतो त्यावेळी केंद्र शासनाचे जे नियम आहेत त्या नियमाप्रमाणे ॲग्रीमेंट केले जाते. त्यातील नॉर्मनुसार दंड त्याच्याकडून वसूल केला आहे. आज त्या कामाचे रिटेंडरिंग केले किंवा टेंडर रद्द करायचे ठरविले तर कोर्टबाजी आणि इतर गोष्टी होतील व पुन्हा या कामासाठी कॉन्ट्रॅक्टर मिळेल की नाही याचीही शाश्वती नाही. किंबहुना मागील अनुभव पाहता त्याचे उत्तर नकारार्थीच मिळेल. जर काम पूर्ण करुन मिळत असेल आणि नवीन जॉईंट व्हेन्चरच्या माध्यमातून कंपनी फंडिंग करीत असेल तर या कामावर अधिक अधिकारी नेमून, व्हिजिलन्स देऊन कोणत्याही परिस्थिती लवकर काम पूर्ण करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असे माझे स्वत:चे मत आहे. मी मागील वेळी सांगितल्याप्रमाणे आम्ही कारवाई केली, त्यांना नोटीस सुध्दा दिली होती. एकूण मी जो खुलासा केला तो पाहता मला असे वाटते की, हा रस्ता पूर्ण करणे गरजेचे आहे. अन्यथा या रस्त्याबाबत आणखी अडचणी येण्याची भीती असल्यामुळेच शासनाने हा निर्णय घेतला आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, दिनांक 14.11.2011 रोजी अधीक्षक अभियंता, अकोला यांनी पत्र पाठवून या रस्त्याचे 40 टक्के काम पूर्ण झाल्याचे कळविले. पुन्हा दिनांक 20.2.2012 रोजीच्या पत्राने 37 टक्के काम पूर्ण केल्याचे कळविले. अशा पध्दतीने चुकीची माहिती देणाऱ्या अधीक्षक अभियंत्यांवर कोणती कारवाई करणार आहात?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, पूर्णपणे याची चौकशी केली जाईल. लांबी, रुंदी, माती किती टाकली, डांबर किती टाकले, किती खोदाई केली, टक्केवारी कमी किंवा जास्त झाली याचा पूर्ण अभ्यास करुन माननीय सदस्यांना कळविले जाईल.

श्री.केशवराव मानकर : दिनांक 23.12.2011 रोजी टर्मिनेशनची नोटीस दिली. नियमाप्रमाणे 60 दिवसात कारवाई केली पाहिजे. परंतु एक वर्ष उलटून गेले आहे. एका वर्षात त्याच्याविरुध्द कारवाई का केली नाही? त्याला सूट दिली आहे का?

श्री.छगन भुजबळ : मी याचे उत्तर दिलेले आहे. या कामाचा खर्च वाढलेला आहे. पूर्वी या कामाला प्रतिसाद मिळाला नव्हता. आता कॉन्ट्रॅक्टर सोडून गेला तर रस्ता तसाच अर्धवट स्थितीत पडून राहील. म्हणून काम करुन घ्यायचे ठरविले आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, झालेला प्रकार पाहता कंत्राटदार अकार्यक्षम आहे हे स्पष्ट होते. काम गुणवत्तेचे झाले पाहिजे यासाठी विभागाकडे अधिकारी आहेत. त्या अधिकाऱ्यांची भूमिका संशयास्पद दिसून येते, दिशाभूल करणारी दिसून येते. झालेल्या कामाबद्दल दोन पत्रांच्या माध्यमातून विसंगत माहिती दिली गेली. एकीकडे प्रिलिमनरी टर्मिनेशन नोटीस दिली जाते आणि दुसरीकडे कालावधी वाढविण्याचा प्रस्ताव सादर केला जातो. अपघात होऊ नये म्हणून प्रवाशांच्या सुरक्षेबद्दलची जबाबदारी ठेकेदाराची होती. त्याबद्दल काहीच न करता शासनातर्फे 40 लाख रुपये खर्च केले आहेत. वरील सर्व बाबी संशयास्पद आणि दिशाभूल करणाऱ्या आहेत. सेल्फ कॉन्ट्रॅडिक्टरी अशा अधीक्षक अभियंत्याची जबाबदारी निश्चित करुन कारवाई करणार आहात काय?

श्री.छगन भुजबळ : या संदर्भात जरुर आम्ही चौकशी करु. माझ्याकडे जो अहवाल आला त्यानुसार अपघात होणे ही केव्हाही दु:खद घटना असते. पोलिसांचे रेकॉर्ड आहेत, त्यामध्ये प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये अपघाताची वेगवेगळी कारणे आहेत. परंतु बहुतांशी एकच कारण असते ते म्हणजे ड्रायव्हरच्या चुकीमुळे अपघात झाला असे आहे. तरी सुध्दा हे काम करावयाचे आहे. हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण करणे गरजेचे आहे. ज्या दिवशी आपण बीओटीचे काम सुरु करतो.....

नंतर श्री.खर्चे....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 4..... श्री. छगन भुजबळ.....

समजा हे काम 31 मार्च, 2009 रोजी सुरु झाले तेव्हापासून 20 वर्षापर्यंतच त्या ठेकेदाराला टोल वसूल करण्याचा अधिकार असतो. अशा प्रकारे त्याने जर दोन वर्षात काम पूर्ण केले तर त्याला 18 वर्षे टोल वसूल करता येईल आणि पाच वर्षात काम पूर्ण केले तर 15 वर्षाचाच अवधी मिळेल. यामागील उद्देश असा की लवकरात लवकर ठेकेदाराने काम पूर्ण करावे. जेणेकरुन रस्ताही लवकर तयार होईल आणि कंत्राटदारालाही फायदा मिळेल. काही अडचणीमुळे हे काम एक भाग 67 टक्के पूर्ण झाला, 33 टक्के बाकी आहे तर दुसरा भाग 52 टक्के पूर्ण झाला. सरासरी विचार करता बँकेच्या अधिकाऱ्यांनी एकत्र बसून हे काम पूर्ण करण्याची गरज असल्याचे सांगितले या निष्कर्षाप्रत आल्यानंतरच नवीन ठेकेदार शोधला व आता हे काम सुरु झाले असून ते पूर्ण करण्याची संधी या ठेकेदाराला दिली पाहिजे, अन्यथा पुन्हा कोर्टबाजी झाली तर पुन्हा टेंडरिंग वगैरे बाबींची भीती वाटते, परिणामी काम उशीरा पूर्ण होईल.

श्री. रामदास कदम : महोदय, या कामाचे दोन भाग केले असून एक काम 67 टक्के तर दुसऱ्या भागाचे काही काम झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, रस्त्याचे काम पूर्ण होणे देखील आवश्यक आहे, लोकांना सुविधा मिळाल्या पाहिजेत तसेच कंत्राटदाराला जे काम दिलेले आहे ते वेळेत पूर्ण केले असते तर ही वेळच आली नसती. या रस्त्यावर जे अपघात झाले त्यात 57 लोकांचा मृत्यू झालेला आहे. हे सर्व मृत्यू ड्रायव्हर्सच्या चुकीनेच झाले असे म्हणता येणार नाही. माझी अशीही सूचना आहे की, या कामासाठी आपण दोन वर्षाची मुदतवाढ दिली आहे. दुसऱ्या टप्प्याच्या बाबतीत पुन्हा निविदा काढून दोन्ही कामे एकाच वेळेला सुरु झाली तर एका वर्षात काम पूर्ण होईल व एक वर्ष वाचेल, असा निर्णय मंत्री महोदय घेतील काय ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, दुसऱ्या कामाची मुदत अजून संपलेली नाही. मघाशी मी सांगितल्याप्रमाणे 2.30 कोटी प्रति किलोमीटर इतका या कामाचा खर्च असून दुसऱ्या टप्प्याचे काम देखील 37 टक्के झालेले आहे. आपण जर पुन्हा काम करायला लागलो तर त्याला केंद्र शासनाची मान्यता मिळणार नाही. म्हणून माझी विनंती आहे की, हे काम सुरु झालेले असल्याने तसेच दोन टप्प्यातील 67 आणि 33 टक्के काम पूर्ण झालेले असून दुसऱ्या भागाची मुदत संपलेली नाही. म्हणून सभागृहाने असा आग्रह धरु नये कारण त्यामुळे रस्त्याचे काम रेंगाळण्याचीच अधिक शक्यता आहे....

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, माननीय मंत्री महोदय ने जो परिस्थिति बतायी है, उसको देखकर ऐसा लगता है कि सरकार ने जायज निर्णय लिया है. यह काम बीओटी तत्व के आधार पर हो रहा है. इसलिए इस काम में विलंब होने की वजह से कॉंट्रेक्टर का कॉस्ट एस्कॅलेशन जरुर होगा तथा टोल नाका सिर्फ 20 साल तक वसूलने की वजह से उसको फायदा भी कम होगा. मुझे सिर्फ एक प्रश्न यही पूछना है कि क्या इस विलंब के कारण राज्य सरकार को भी कुछ आर्थिक नुकसान हुआ है ?

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, यामध्ये राज्य शासनाचे आर्थिक नुकसान काहीही होणार नाही. जेवढे पैसे ठेकेदाराला देण्यात आलेले होते त्यापेक्षा अधिक रक्कमेचे काम प्रत्यक्षात झालेले आहे. एकूण 339 कोटी रुपयांचे काम असून एकूण कामापैकी 52 टक्के काम झाले असून एकंदर 170 कोटी रुपयांचे काम झालेले असून ठेकेदाराला आपण 60 कोटी रुपयांचा अग्रीम दिलेला आहे. यामध्ये शासनाचे नुकसान झाले नसून यामध्ये रस्ता लवकर तयार न झाल्यामुळे गैरसोय झालेली आहे ही वस्तुस्थिती आहे. काम पूर्ण झाले तरी ठेकेदाराचेच नुकसान होणार असून ठेकेदाराला टोलचा कालावधी केंद्रशासनाच्या नियमाप्रमाणे वाढवून मिळणार नाही.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांच्या मताशी मी काही अंशी सहमत आहे. संबंधित ठेकेदाराला शासनाकडून व अधिका-याकडून फार मोठे सहकार्य आतापर्यंत करण्यात आलेले आहे. रस्त्याचे काम झाले पाहिजे असा आमचा आग्रह आहे. आपण वर्तमानपत्राचे जे कटींग दाखवले आहे त्यासंदर्भात माझ्याकडे भरपूर कटींग्स् आहेत. रस्त्याचे काम पूर्ण न झाल्यामुळे माणसे मरत असतांना अधिकारी ठेकेदाराला वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत. माझा एवढाच स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपण उत्तरात म्हटले आहे की, या ठिकाणचे काम 67 टक्के पूर्ण झालेले आहे. टेंडरच्या नियमा प्रमाणे किती काम झाल्यावर किती पैसे द्यावयाचे असतात यासाठी काही नियम आहेत. यासंदर्भातील टेंडरचा क्लॉजही माझ्याकडे आहे. 67 टक्के काम पूर्ण झाल्यानंतर ठेकेदाराला 91 टक्के रक्कम कोणत्या आधारावर देण्यात आलेली आहे ? सदर ठेकेदाराला 26.3.2010 रोजी 2 कोटी रुपये दिले गेले, दि. 31.3.2010 रोजी 3.38 कोटी रुपये दिले गेले. एकाच महिन्यात व एकाच दिवशी दोन बिले ठेकेदाराला दिलेली आहेत. 67 टक्के काम पूर्ण झालेले असतांना ठेकेदाराला 91 टक्के रक्कम कोणत्या आधारावर दिलेली आहे? संबंधित ठेकेदाराने आपल्या टेंडरचा ब्रिच ऑफ कॉन्ट्रक्ट केलेला आहे. ज्या अधिका-याने ब्रिच ऑफ कॉन्ट्रॅक्ट केलेला आहे त्यांच्यावर तुम्ही कारवाई करणार आहात काय ? ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भूजबळ : सभापती महोदय, चौकशी केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, याचा अर्थ मंत्री महोदय अधिका-यांना पाठीशी घालण्याचे काम करीत आहेत असा अर्थ होतो.

श्री. छगन भुजबळ : सभापती महोदय, अधिका-याला पाठीशी घालण्याचे काम केले जाणार नसून चौकशी केल्यानंतर अधिकारी दोषी आढळून आला तर निश्चित कारवाई केली जाईल. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याला मी उत्तर दिलेले आहे. प्रत्येक वेळेस लक्षवेधी सूचनेला मंत्र्यांनी अघळपघळ भाषण केले पाहिजे अशी अपेक्षा कोणी धरु नये. सन्माननीय सदस्यांनी संबंधित अधिका-याची चौकशी केली जाईल काय असा प्रश्न विचारला असल्यामुळे, चौकशी केली जाईल असे मी उत्तर दिलेले आहे. चौकशीमध्ये कोणी दोषी आढळले तर आपोआप कारवाई सुरु होत असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. :खरेदी केंद्रावर कापूस घेण्यास नकार दिल्यामुळे शेतकऱ्यांनी केलेले चक्काजाम आंदोलन

मु. शी. : खरेदी केंद्रावर कापूस घेण्यास नकार दिल्यामुळे शेतकऱ्यांनी केलेले चक्काजाम आंदोलन यासंबंधी सर्वश्री संदीप बाजोरिया, विक्रम काळे, हेमंत टकले, सतीश चव्हाण, रमेश शेंडगे, अरुण गुजराथी, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संदिप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील २० प्रमुख कापूस खरेदी केंद्रांवर तसेच वर्धा जिल्ह्यात देवळीच्या मार्केट यार्डमध्ये कापूस विक्रीसाठी आलेला असता दिनांक ५ मार्च, २०१२ रोजी कापूस खरेदी करण्यास तेथील अधिकाऱ्यांनी अचानक केलेला विरोध, शेतकऱ्यांनी फार लांबून कापूस विक्रीसाठी नेला असता तेथील अधिकाऱ्यांनी कापूस खरेदीस अचानक नकार दिल्यामुळे शेतकऱ्यांत भीतीचे वातावरण, काही शेतकऱ्यांनी संताप व्यक्त करण्यासाठी केलेले चक्काजाम आंदोलन, शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करणेबाबत शेतकऱ्यांची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (पणन राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री. रामनाथ मोते) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री.संदीप बाजोरिया : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले आहे त्याच्याशी मी सहमत नाही. कापूस हे विदर्भातील नगदी पीक आहे. या वर्षी मोठ्या प्रमाणावर कापसाचे उत्पादन झाले आहे. राज्यात या वर्षी कापूस निर्यात बंदी केली जाणार नाही असे वाणिज्य मंत्र्याने आश्वासन दिले होते. परंतु, मार्च 2012 मध्ये कापूस निर्यात बंदी केल्याने कापसाचे एकंदरीत भाव 500 ते 600 रूपयाने कमी झाले. सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्या यवतमाळ जिल्ह्यात झाल्या आहेत. आज कापसाचे भाव कमी होत आहेत. शेतकऱ्याने आपल्या घरी कापूस विक्रीसाठी साठवून ठेवला होता. तो कापूस विक्रीसाठी यवतमाळ आणि वर्ध्याच्या खरेदी केंद्रावर नेला. मोठ्या प्रमाणावर कापूस त्यांनी विक्रीसाठी आणला होता. पण एपीएससीच्या अधिकाऱ्यांनी कापूस खरेदी करण्यास मज्जाव केला. तो कापूस खरेदी करण्यास नकार दिला. त्यानंतर केंद्र शासनाचा निर्णय झाला. कापूस निर्यात बंदी उठविली गेली. अशा प्रकारे आज अनिश्चिततेचे वातावरण आहे. खाजगी कापूस व्यापाऱ्यांनी कापूस खरेदी करण्याचे बंद केले तर हमी भावा प्रमाणे शासन शेवट पर्यंत कापूस खरेदी करणार आहे काय ? असा माझा प्रश्न आहे. निर्यात बंदीसाठी केंद्र शासनाच्या जाचक अटी आहेत. मागच्या वर्षी गाठीची परवानगी घेतली आहे. त्यामुळे वाढीव गाठीला परवानगी देण्याची मागणी केंद्र सरकारला शासन करणार आहे काय ? यावर्षी 393 लाख गाठीचे उत्पादन होणे अपेक्षित आहे. जवळपास 84 लाख गाठींची परवानगी केंद्र शासनाने दिलेली आहे. ही मोठी तफावत आहे. त्यामुळे राज्य शासन हमी भावा प्रमाणे शेतकऱ्यांचा कापूस खरेदी करणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, कापसाच्या संबंधात अतिशय महत्त्वाची लक्षवेधी सूचना सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केली आहे. 5 मार्च रोजी विदेश व्यापार मंत्रालयाने, नवी दिल्ली यांनी कापसाच्या गाठीवर निर्यात बंदी लागू करण्याची अधिसूचना काढली. त्यानंतर मार्केटमध्ये अनिश्चितता आली. त्यामुळे कापसाचे भाव 500 ते 600 रूपयाने कमी झाल्याने खाजगी व्यापाऱ्यांनी कापसाची खरेदी काही काळाकरिता बंद केली, ही वस्तुस्थिती आम्ही नाकारत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके....

तातडीने निर्यात बंदी उठवावी म्हणून माननीय मुख्यमंत्री यांच्या नेतृत्तवाखाली माननीय उप मुख्यमंत्री, माननीय पणन मंत्री यांचे शिष्टमंडळ दिल्लीला गेले. माननीय पंतप्रधान आणि माननीय अर्थमंत्र्यांना भेटून ही बंदी तातडीने उठविण्यासाठी प्रयत्न केले. त्यामुळे 12 मार्च रोजी अधिसूचने अन्वये निर्यात बंदीच्या धोरणामध्ये केंद्र शासनाने बदल केला. कापूस हे राज्यातील महत्त्वाचे पीक आहे. जवळ जवळ 35.5 लाख हेक्टरवर याची लागवड या हंगामामध्ये झालेली आहे. साधारणपणे 345 लाख क्विंटल कापसाचे उत्पादन होईल. म्हणजे 69-70 लाख बेल्सचे उत्पादन होईल अशा प्रकारचा आपला अंदाज आहे. आज पर्यंतचा अंदाज पाहिला तर 50 लाख बेल्सचे उत्पादन एपीएमसीच्या रेकॉर्डवर आले आहे. त्यापैकी 25 लाख बेल्स एक्सपोर्ट केल्या आहेत.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आता सध्याच्या परिस्थितीत परत 12 मार्चनंतर कापूस खरेदी केंद सुरु झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा जो पहिला प्रश्न आहे त्यानुसार ज्यावेळेस मार्केट मध्ये खाजगी व्यापारी कापूस खरेदी करावयाचे थांबवतील तेव्हा सध्याच्या धोरणाप्रमाणे केंद्र शासनाच्या वतीने मग नाफेड असेल किंवा सीसीआय असतील यांच्यासारख्या एजन्सीच्या माध्यमातून कापूस खरेदी होते. अशा वेळी जर खाजगी व्यापाऱ्यांनी खरेदी करण्याचे नाकारले किंवा तशी परिस्थिती निर्माण झाली तर निश्चितपणे केंद्र शासनाच्या माध्यमातून, नाफेडच्या माध्यमातून, सीसीआयच्या माध्यमातून हमी भावावर खरेदी करण्यासाठी तातडीने राज्य शासन पुढाकार घेईल आणि कोणत्याही परिस्थितीत कोणत्याही शेतकऱ्याचा कापूस हा घरामध्ये शिल्लक असणार नाही याची काळजी घेण्यात येईल अशी ग्वाही या निमित्ताने मला या सदनाला द्यावयाची आहे. याठिकाणी मला सांगावयाचे आहे की, सर्वसाधारणपणे निर्यातीसाठी जे रजिस्ट्रेशन झालेले आहे, ते 130 लाख बेल्स् इतके आहे आणि 5 मार्चला बंदी आणण्यात आली त्यावेळेस 84 लाख बेल्स्च्या ऐवजी 94 लाख बेल्स् निर्यात झाल्या होत्या. म्हणून सध्याच्या अधिसूचनेप्रमाणे जे काही रजिस्ट्रेशन झालेले आहे,त्याचे व्हेरिफीकेशन करुन केंद्र शासनाच्या माध्यमातून एक्सपोर्टसाठी परवानगी देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, जर व्यापाऱ्यांनी खरेदी करण्यास बंदी केली तर त्याच्यावर शासन उपाययोजना करणार आहे. पण आमच्या माहितीनुसार दिनांक 1 एप्रिल पासून संबंधित व्यापाऱ्यांनी ए.पी.एम.सी.ला पत्र दिले आहे की, आम्ही 1 एप्रिल पासून कापूस खरेदी करणार नाही. मग अशा आपत्कालीन परिस्थितीमध्ये तातडीने कापूस करण्याची यंत्रणा शासनाने उभी केलेली आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, मी येथे सांगितले की, सध्या राज्य शासनाच्या वतीने कोणतीही कापूस खरेदी करीत नाही. परंतु केंद्र शासन जो हमी भाव जाहीर करते त्याच्यापेक्षा मार्केटमध्ये कमी भाव झाले तर केंद्र शासनाच्या माध्यमातून म्हणजे नाफेड आणि सीसीआयच्या माध्यमातून कापूस खरेदी केली जाते. 1 एप्रिल नंतर जर अशी परिस्थिती उद्भवली तर केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन नाफेड आणि सीसीआय ची केंद्रे सुरु करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न राहील.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आताच माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर . .. .

जर अशा प्रकारची परिस्थिती उद्भवली तर अशा वेळी आम्ही केंद्र शासनाला विनंती करुन किंवा केंद्र शासनाकडून अशा प्रकारची खरेदी सुरु करु. परंतु आताच तशी स्थिती निर्माण झालेली आहे. पण आज राज्यामध्ये कापूस खरेदीसाठी नाफेडची कोणतीही यंत्रणा नाही. नाफेडला अजूनही कोणतीही खरेदी करण्याविषयी मान्यता दिलेली नाही. सीसीआय मार्फत होणारी कापूस खरेदी बंद आहे. 1 एप्रिलला 4 दिवस शिल्लक आहेत आणि या दिवसामध्ये केंद्र शासनाला कधी सांगणार, खरेदी केंद्राची व्यवस्था कधी करणार, तेथे माणसे कधी नेमणार ? महाराष्ट्र भर म्हणजे खानदेश, मराठवाडा आणि विदर्भामध्ये एवढ्या कापूस खरेदी केंद्रांची आवश्यकता आहे तर यासाठी चार दिवसामध्ये खरेदी केंद्राची व्यवस्था कशी करणार आहात ? तसेच सीसीआय सुध्दा आता कापूस घ्यावयास तयार नाही. सध्या सीसीआय, नाफेड यांच्या मार्फत कापूस खरेदी बंद आहे. फक्त आपण आता शेतकऱ्याला व्यापाऱ्यांच्या भरवशावर सोडलेले आहे. अशा वेळी जर व्यापाऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी किंमतीने कापूस घ्यावयास सुरुवात केली तर शेतकऱ्यांना कोणीही वाली रहाणार नाही आणि मग याची सर्व जबाबदारी सरकारवर येणार आहे. म्हणून तातडीने या बाबतीत शासन पर्यायी व्यवस्था करणार आहे काय ? अशा वेळी आम्ही नाफेडला सांगू, केंद्र शासनाला सांगू, सीसीआय ला सांगू असे म्हणून चालणार नाही. आपण म्हटल्याबरोबर सीसीआय खरेदी करील किंवा आपण असे म्हटल्याबरोबर नाफेड खरेदी करील असे होत नाही. म्हणून आपण यासंबंधी तातडीने काय उपाययोजना करणार आहात हा प्रश्न आहे आणि त्याचे याठिकाणी उत्तर आले पाहिजे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, नाफेडने सुरुवाती पासूनच हमीभावावर खरेदी करण्याची तयारी दर्शविली होती. त्या प्रमाणे कापूस पणन संघाला सबएजन्ट म्हणून नेमले होते. परंतु व्यापाऱ्यांकडे मिळणारे दर हमीभावापेक्षा जास्त असल्यामुळे एकही शेतकरी केंद्रावर कापूस घालायला तयार नव्हता. उद्या व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करण्यास सुरुवात केल्यास, नाफेडच्या आणि सीसीआयच्या माध्यमातून हमीभावावर खरेदी करण्याचे धोरण आहे आणि शासनाचा तसा निश्चितपणे प्रयत्न राहील.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करण्यास सुरवात केल्यानंतर आम्ही केंद्र सुरु करु, त्या करिता केंद्राकडे विनंती करु असे होता कामा नये. शेतकऱ्यांच्या अडचणीच्या वेळी सरकार त्यांच्यामागे ठामपणे उभे आहे असा संदेश गेला पाहिजे, असा येथे विषय आहे. व्यापारी जास्त दर देत होते म्हणून शेतकरी केंद्रावर कापूस आणत नव्हते असे मंत्री महोदयांनी सांगितले. परंतु आपण केंद्र सुरु ठेवावयास पाहिजे. तेथे कोणी आले नाही तर खरेदी होणार नाही, परंतु शेतकऱ्यांना आधार वाटेल की, व्यापाऱ्यांनी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करण्यास सुरुवात केल्यास आपणास केंद्रावर कापूस देता येईल. जर व्यापाऱ्यांनी कमी भावाने खरेदी करण्यास सुरुवात केल्यास आम्ही केंद्र सुरु करु. अशा प्रकारे सरकारला जर तरच्या गोष्टी करता येणार नाहीत. शेतकरी केंद्रावर आला नाही ही आनंदाची बाब आहे. शेतकऱ्यांच्या अडचणीवेळी सरकार त्यांच्या पाठिशी ठामपणे उभे आहे. व्यापाऱ्यांनी झिडकारले तर आम्ही आहोत अशा प्रकारचा संदेश जाण्यासाठी आपण केंद्र सुरु करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, आम्ही कोणत्याही परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असे सुरुवातीलाच ठामपणे सांगितलेले आहे. शेतकऱ्यांचा एक क्विंटल माल देखील शिल्लक राहणार नाही याची काळजी घेण्यात येईल असे आश्वासन दिलेले आहे.

श्री. एस.क्यू. जमा : सभापति महोदय, यह सवाल बहुत गंभीर है. माननीय उप मुख्यमंत्री ने आज कहा कि हम किसानों का पक्ष लेते हैं. लेकिन आपके शासन की जो तैयारी है, उससे मुझ ो ऐसा लगता नहीं है. पहली बात यह है कि 5 तारीख को निर्यातबंदी की गई और

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एस.क्यू. जमा. . .

12 तारीख को निर्यातबंदी खोल दी गई. इन 7 दिनों में कपास का मार्केट भाव गिर गया और इससे किसानों का नुकसान हुआ. मेरा पहला प्रश्न यह है कि क्या आपने किसानों के नुकसान के बारे में जानकारी ली है ? हमारे माननीय सदस्यों ने यहां पर कहा कि 4 दिन शेष हैं, सी.सी.आई. के केन्द्र बंद हैं और हमारे राज्य की तरफ से कपास की खरीदी की कोई व्यवस्था नहीं है. नाफेड के पास डायरेक्ट खरीदी करने का कोई मेकेनिज्म नहीं है. अगर बाजार भाव मिनिमम सपोर्ट प्राइस से कम हुआ तो खरीदी करने की अभी कोई व्यवस्था आपके पास नहीं है और यह 4 दिन में हो नहीं सकता. कपास उत्पादक किसानों का पहले से ही नुकसान हो चुका है. इस नुकसान को रोकने के लिए क्या हमारी सरकार 2 दिन के अन्दर कोई ठोस निर्णय लेगी ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, कापसाच्या प्रश्ना संबंधी सरकार निश्चितपणे गंभीर आहे. व्यापाऱ्यांनी हमी भावापेक्षा कमी दराने खरेदी सुरु केली त्यामध्ये निश्चितपणे हस्तक्षेप करण्यात येईल. निर्यातबंदी लागू करण्यापूर्वी ॲव्हरेज प्राईज 3650 होती. त्यानंतर दिनांक 6 मार्च रोजी 3400 ॲव्हरेज रेट खाली आला. दिनांक 12 मार्चपर्यंत नंतर पुन्हा 3550 ॲव्हरेज रेट आला. दिनांक 27 मार्चपर्यंत 3550 रुपये ॲव्हरेज रेट होता.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, अर्थसंकल्प जाहीर झाला आणि त्यामध्ये पाच टक्के कर वाढ झाल्यानंतर व्यापाऱ्यांनी उलटे सत्र सुरु केले. आज दुपारी 3100 रुपयांनी खरेदी झालेली आहे.

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

मी या ठिकाणी विरोध करण्यासाठी उभा नाही तर परिस्थितीची जाणीव करुन देण्याकरता उभा आहे. शासन शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही या बद्दल आम्हाला आनंद आहे. शासनाने हमी भावा प्रमाणे खरेदी सुरु केली तर शेतकरी व्यापाऱ्याकडे न जाता शासनाकडे येतील. शेतकरी 200 रुपये खोट खाणार नाहीत म्हणून शासन हमी भावाप्रमाणे खरेदी करणार आहे का?

श्री. प्रकाश सोळंके : सभापती महोदय, शासनामार्फत हमी भावाने खरेदी करण्याच्या संदर्भात ताताडीने येत्या दोन ते तीन दिवसात पाऊले उचलण्यात येतील.

<u>सभागृहाच्या कामकाजाबाबत</u>

सभापती : आता मी नियम 97 अन्वये अल्पकालीन चर्चा घेण्याचे ठरविलेले आहे

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, पंधरा मिनिटे सुट्टी घेण्यात यावी त्यानंतर या अल्पकालीन चर्चेला सुरुवात करण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. आता 15 मिनिटे सुट्टी घेण्यात येईल. त्यानंतर अल्पकालीन चर्चेला सुरुवात करण्यात येईल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 6.55 ते 7.15 पर्यंत तहकूब झाली.)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ. शी. : गडचिरोली जिल्ह्यात पुस्टोला गावाजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेल्या स्फोटात केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान शहीद होणे

मु. शी.: गडचिरोली जिल्ह्यात पुस्टोला गावाजवळ नक्षलवाद्यांनी घडविलेल्या स्फोटात केंद्रीय राखीव पोलीस दलाचे जवान शहीद होणे या विषयावर सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र. पाटील, संजय केळकर, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ. नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभाताई फडणवीस, सर्वश्री परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ. रणजित पाटील, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा

सभापती : या कल्पकालीन चर्चेसंबंधी मतदानाकरिता औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. ही चर्चा व माननीय मंत्री महोदयांचे उत्तर यासाठी आता मी दीड तासाचा वेळ दिलेला आहे. आवश्यकता वाटल्यास थोडा जादा वेळ वाढवून देण्यात येईल. या चर्चेच्या संदर्भात माझ्या दालनामध्ये जी चर्चा झाली त्याप्रमाणे विरोधी पक्षातील दोन सन्माननीय सदस्य आणि सत्ताधारी पक्षातील दोन सन्माननीय सदस्य बोलतील असे ठरले होते.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने सन्माननीय सदस्य श्री. रामदास कदम, श्री. पांडुरंग फुंडकर आणि श्रीमती शोभाताई फडणवीस बोलतील.

सभापती : ठीक आहे. विरोधी पक्षाचे तीन सन्माननीय सदस्य आणि सत्ताधारी पक्षाचे तीन सन्माननीय सदस्य बोलतील व नंतर माननीय मंत्री महोदय, या चर्चेला उत्तर देतील. यानंतर सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. पांडुरंग फुंडकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"गडचिरोली जिल्ह्यात 'ग्रीन हन्ट' मोहीम राबवित असताना पुस्टोला गावाजवळ (ता.धानोरा) दिनांक 27 मार्च, 2012 रोजी नक्षलवाद्यांनी घडविलेल्या शक्तिशाली भूसुरुंग स्फोटात जवानांची बस 40 फूट उंच उडून दूर फेकल्याने या हल्ल्यात नक्षलवाद्यांच्या झालेल्या चकमकीत केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या 3 उप निरीक्षकांसह 12 जवान शहीद होणे, 28 जवान जखमी होणे, त्यातील 8 जवानांची प्रकृती चिंताजनक असणे, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यातील पुस्टोला गावाजवळ नक्षलवाद्यांनी काल घडवून आणलेला बॉम्बस्फोट ही गडचिरोली जिल्ह्यातील 1 फेब्रुवारी, 2009 नंतरची शक्तिशाली स्फोट घडवून आणणारी दुसरी घटना आहे.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

दिनांक 1.2.2009 रोजीच्या बॉम्बस्फोटामध्ये पोलीस उपनिरीक्षकासह 15 जणांची हत्या झाली होती. तथापि, कोणत्याही सुरक्षा दलाचे जवान एवढ्या मोठया संख्येने मारले जाण्याची घटना आपल्या राज्यामध्ये पहिल्यांदाच घडली होती. आम्ही घेतलेल्या माहितीनुसार हा स्फोट इतका प्रचंड होता की, या स्फोटात सापडलेली बस 20 फूट उंच उडाली व त्यामुळे 12 जवान जागीच ठार झाले. घटना घडल्यानंतर गडचिरोली येथील हेडक्वार्टरला कळविण्यात आले. परंतु कुमक येण्यापूर्वीच नक्षलवादी फरार झाले. 2011 ते 2012 पर्यंत या कालावधीत 42 जणांची गडचिरोली जिल्ह्यामध्ये हत्या झालेली आहे. गेल्या 20 वर्षात 412 जणांची हत्या झालेली आहे. नक्षलवाद्यांच्या सापळ्यात वारंवार जवान अटकतात हे लक्षात आल्यानंतर गृह मंत्रालयाने एक आदेश काढला. स्टॅण्डर्ड ऑपरेटिव्ह प्रोसिजरबाबत देशातील सर्व राज्यांना आदेश पाठविण्यात आले. या एस.ओ.पी.चे पालन करावे अशा प्रकारच्या सूचना देशाच्या गृह मंत्रालयाने दिलेल्या आहेत.

आपल्या महाराष्ट्रात संपूर्ण रस्ता मोकळा करण्याची तंत्रशुध्द पध्दत गडचिरोली जिल्ह्यात जवानांनी विकसित केलेली आहे. सी 60 च्या रोडवर आजवर एवढी मोठी घटना घडलेली नव्हती. रस्ता मोकळा करण्याकरिता सर्वात प्रथम सुरुंग शोध पथक घेऊन पायी निघतात. या पथकाने यंत्राच्या सहाय्याने रस्त्याची पाहणी केल्यानंतर मागे जेवढी वाहने असतील तेवढी वाहने पुढे जाण्याचा संकेत दिला जातो. रस्त्यात सुरुंग पेरला असेल तर तो या यंत्राच्या सहाय्याने निकामी केला जातो. कालच्या घटनेत त्या मोहिमेवर केंद्रीय सुरक्षा दलाच्या जवानाबरोबर ते शोध पथक होते अशी आमची माहिती आहे. पण या शोध पथकाने रस्त्याची पाहणी करण्यापूर्वीच त्या रस्त्यावरुन वाहने गेली. केंद्रीय सुरक्षा दलाच्या हालचालीवर नक्षलवाद्यांचे बारकाईने लक्ष होते. एवढेच नव्हे तर त्यांनी सतत 3 दिवस लक्ष ठेवले होते. नक्षलवाद्यांनी ही बाब हेरली की, सी 60 रस्त्याची भूसुरुंग शोध पथकाने तपासणी करण्यापूर्वीच त्यावरुन मोटारीचे ताफे निघालेले आहेत. त्याचा अंदाज घेऊनच त्यांनी भूसुरुंगाचा स्फोट घडवून आणल्याची माहिती आहे. 2008 पर्यंत नक्षलवाद्यांचे प्राबल्य गडचिरोली, गोंदिया, अमरावती, चंद्रपूर, नागपूर व भंडारा या जिल्ह्यापुरते सीमित होते. पण 2011 पर्यंत नंदुरबार, नाशिक, यवतमाळ, वर्धा आदि जिल्ह्यांमध्ये त्यांनी आपले बस्तान बसविले आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...

गेल्या वर्षापासून माओवाद्यांच्या 92 व नक्षलवाद्यांच्या 1998 पासून 159 घटना घडल्यामुळे आता महाराष्ट्र राज्य झारखंड राज्यासारखे होते काय अशी भीती निर्माण झाली आहे. बहुसंख्य नक्षलवादी हे आंध्र प्रदेशातील आहेत. पोलीस यंत्रणेने घेतलेल्या कडक निर्णयामुळे ते आपल्या राज्यात आसऱ्याला येत आहेत. आंध्र प्रदेशातील गडचिरोली जिल्ह्याच्या सीमेवर असलेल्या सिरोंच्या तालुक्यातील पेंढी शंकर नावाचा आदिवासी कार्यकर्ता पोलिसांच्या एन्काऊंटरमध्ये मारला गेला होता. तेव्हापासून त्या चळवळीने वेग घेतला आहे. आयबीए च्या अंदाजानुसार माओवाद्यांचे पूर्णवेळ 500 कार्यकर्ते असून 4-5 हजार स्थानिक कार्यकर्त्यांचा त्यांना पाठिंबा आहे. इतके नेटवर्क त्यांनी उभे केलेले आहे. त्यांचा बंदोबस्त पाहिजे त्या प्रमाणात झाला नाही म्हणून अशा प्रकारच्या घटना पुन्हा पुन्हा तेथे घडत आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर...

` नक्षलवादी चळवळीवर या सभागृहामध्ये जवळपास दोन अडीच तासाची चर्चा मी विरोधी पक्षनेता असताना या सभागृहामध्ये करण्यात आली होती. त्यावेळी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी या संदर्भात काय काय उपाययोजना करणार, कशा पध्दतीने परिस्थिती हाताळणार, कशा पध्दतीने आम्ही पुढे जाणार हे सांगितले होते. या नक्षलवादी समस्येचा बिमोड करण्यासाठी केन्द्र सरकारने 7 राज्यामध्ये निमलष्करी दलाचे 25 हजार जवान दोन वर्षापूर्वी मोठा गाजावाजा करुन तैनात केले होते. ग्रीनहण्ट या नावाने 30 वर्षे मुरलेल्या अतिडाव्या चळवळी विरोधात सरकारने कारवाई सुरु केली. मंगळवार, दिनांक 27 मार्च 2012 रोजी नक्षलवाद्यानी भूसुरुंगाने केन्द्रीय सुरक्षा दलाच्या जवानांची बस उडवून दिली आणि त्यामध्ये 12 जवान शहीद झाले. ही अत्यंत भयंकर अशी घटना महाराष्ट्रामध्ये घडलेली आहे. ही हिंसा देश विघातक, लोकशाही व घटना विरोधी आहे असा व्यापक अर्थ ध्यानात घेऊन तिच्या समूळ उच्चाटनासाठी सर्वंकष मोहीम घेणे गरजेचे आहे. दुर्दैवाने केन्द्र व राज्य सरकारच्या पातळीवर हे होताना दिसत नाही.

गडचिरोलीतील घटना घडण्याच्या दोन दिवस आधी केन्द्रातील मंत्री श्री. जयराम रमेश यांनी तेथे जाऊन जाहीरपणे नक्षलवाद्यांना उपदेशाचे डोस पाजले. नक्षलवाद्यानी लोकशाही प्रवाहामध्ये सामील व्हावे हा जुना स्वर त्यांनी जयप्रकाश नारायण यांच्या प्रमाणे आळवला. नक्षलवाद्यांना आर्जवे करण्याची वेळ कधीच निघून गेली आहे. आता तर त्यांच्यावर धडक कारवाई करण्याची ही वेळ आहे. नेमके इथेच सरकारचे घोडे कुठे तरी पेंड खाताना आम्हाला दिसत आहे. गनिमी युध्दात तरबेज असलेल्या नक्षलवाद्यांना त्याच पध्दतीने चोख उत्तर द्यायचे असेल तर नुसती जवानांची संख्या वाढवून चालणार नाही तर त्यांना मदत करणारी प्रभावी गुप्तचर यंत्रणा उभारणे गरजेचे आहे. पण याबाबतीत गंभीरपणे विचार होताना दिसत नाही. सन्माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी जाणीवपूर्वक त्या जिल्ह्याचे पालकत्व मागून घेतले. त्या जिल्ह्याचे ते पालकमंत्री झाले. मी नक्षलवाद्यांचा बंदोबद करीन असे चॅलेज त्यांनी स्वीकारले होते. हे चॅलेंज स्वीकारल्या नंतर अशा प्रकारची घटना घडून गेली. यावरुन माननीय गृहमंत्र्यांचे चॅलेंज नक्षलवाद्यांनी स्वीकारलेले आहे असा त्याचा अर्थ आहे. अशा प्रतिकूल अवस्थेमध्ये फौजांकडून यशाची अपेक्षा करणे मुळात गैर आहे. वस्तुस्थितीकडे डोळेझाक करायची आणि असे हल्ले झाले

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर..

की उसना आव आणून लढण्याचा निर्धार करायचा अशी शासनाची भूमिका आहे.

काल पत्रकार परिषदेमध्ये माननीय गृहमंत्र्यांनी सांगितले की, जशास तसे उत्तर देऊ. आता 12 जवान शहीर झालेले आहेत. त्यांना आपण कधी आणि कसे उत्तर देणार आहात ? नक्षलवाद्यांनी पलायन केलेले आहे. गृहमंत्र्यांनी ठोशास ठोसा अशा प्रकारचे उत्तर दिले जाईल असे सांगितले. असा लढण्याचा निर्धार व्यक्त करणे म्हणजे शहिदांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे आहे. ही घटना झाल्यानंतर बोलणे हे वेगळे. खरे म्हणजे घटना होणार असेल तर त्याची माहिती गुप्तचर यंत्रणेकडून मिळाली पाहिजे. आपली गुप्तचर यंत्रणा फेल गेलेली आहे. गुप्तचर यंत्रणेला या घटनेचा सुगावा आधी लागला असता तर हा भूसुरुंग स्फोट झाला नसता. सभापती महोदय, हिंसक घटनांमध्ये वाढ झाली की चर्चेला वेग येतो. दोन्ही सभागृहामध्ये चर्चा होते. वर्तमानपत्रातून चर्चा होते. त्यानंतर त्यांच्या नावावर काही मोहिमा उघडल्या जातात आणि त्यावर कोटयवधी रुपये खर्च केले जातात आणि त्याचे फलित शून्य निघते. नक्षलवाद्यांच्या प्रभाव क्षेत्रात दहशतीखाली राहाणा-या सामान्य आदिवासींची मने जिंकण्यासाठी केवळ शस्त्रे उपयोगाची नाहीत तर नक्षलग्रस्त परिसरात राहाणा-यांच्या मागे पाठबळ उभे करण्याची गरज आहे. त्यांच्या विकासाला हात घालण्याची गरज आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

असे न होता तेथील स्थानिक जनतेला मात्र शासनाने वाऱ्यावर सोडले आहे. नि:शस्त्र आदिवासी आणि सशस्त्र जवान नक्षलवाद्यांचे भक्ष्य ठरत आहेत. गेल्या काही महिन्यांमध्ये या दोन घटकांना लक्ष्य करण्याचे काम नक्षलवादी चळवळीने सुरु केले आहे.

सभापती महोदय, अशा घटनांबाबत प्रस्ताव आणून आम्ही सभागृहात चर्चा केली आहे. आदिवासींच्या समस्येवर चर्चा केलेली आहे. परंतु या चर्चेतून पुढे काय झाले हे आम्हाला कळलेले नाही. पार्लमेंटमध्ये केंद्रीय गृहमंत्री श्री.चिदंबरम यांनी दिलेली माहिती अतिशय भयानक आहे. 2007 ते 2011 या काळात नक्षलवादी चळवळीकडून देश स्तरावर 2725 माणसे मारली गेली. त्यापैकी 920 लोक हे पोलिसांचे खबरे होते आणि 1211 सुरक्षा दलाचे जवान होते. आपल्या राज्यात 420 जवान नक्षलवादी कारवायांमध्ये मृत्युमुखी पडलेले आहेत. अशा परिस्थितीत या घटनेबाबत केवळ चर्चा करुन चालणार नाही. या समस्येचे मूळ शोधून काढले पाहिजे. नक्षलवादी कारवाया संपूर्ण महाराष्ट्रभर पसरत चालल्या आहेत. गेल्या आठ-दहा दिवसातील घटना पाहिल्या तर औरंगाबाद येथे एटीएसच्या माध्यमातून सीमी संघटनेच्या एका अतिरेक्याला एन्काऊंटर करण्यात आले. सीमी संघटनेचे जाळे मराठवाड्यामध्ये पसरले आहे. यवतमाळ जिल्हा त्याच क्षेत्राला लागून आहे. सीमी संघटनेचा दुसरा अड्डा अकोला येथे आहे. अहमदाबाद येथील बॉम्बस्फोटामध्ये सहभाग घेतलेला एक अतिरेकी औरंगाबाद येथे मारला गेला. त्याच्या भावाला अकोला येथील एटीएस पथकाने अटक केली. त्यामुळे विदर्भ आणि मराठवाडा हे सीमी संघटनेच्या अतिरेक्यांचे कार्यक्षेत्र बनलेले आहे. सीमी संघटना, माओवादी यांनी महाराष्ट्राला टार्गेट करण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. या संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करुन उपाययोजना करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, छत्रपतींच्या महाराष्ट्रामध्ये गनिमी काव्याने लढून जर सरकारला चॅलेंज करणारी औलाद पैदा होणार असेल तर ती वेळीच ठेचून काढली पाहिजे. विरोधी पक्षाच्या वतीने आम्ही चर्चेचा आग्रह धरला. नक्षलवादी चळवळीची मोहीम महाराष्ट्रामध्ये फोफावते आहे. छत्तीसगड, बिहार, झारखंड, आंध्रप्रदेश राज्यात ही चळवळ मोठया प्रमाणात फोफावली आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये एकाच जिल्हयापुरती मर्यादित असलेली ही चळवळ आज माओवादी, सीमी किंवा इतर वेगवेगळ्या संघटना क्लब होऊन महाराष्ट्राला पोखरण्याचे काम करीत आहेत. याची

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

दखल वेळीच घेतली नाही तर महाराष्ट्राचा झारखंड झाल्याशिवाय राहणार नाही. शासनाच्या माध्यमातून या संदर्भात योग्य ती उपाययोजना करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, कोणी काहीही म्हणत असले तरी माझा माननीय गृहमंत्र्यांच्या कार्य पध्दतीवर पूर्ण विश्वास आहे. ते अत्यंत प्रामाणिकपणे काम करीत आहेत. महाराष्ट्रात फोफावत असलेली ही नक्षलवादी चळवळ त्यांनी मोडून काढली तर त्यांचे नाव देशभर होईल. त्यांनी ज्या जिद्दीने गडचिरोली जिल्हयाचे पालकमंत्री पद स्वीकारले त्याच जिद्दीने नक्षलवादी चळवळीचे चॅलेंज स्वीकारुन ही चळवळ मोडून काढावी अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, अतिशय संवेदनशील आणि महत्वाच्या विषयावर बोलण्याची संधी दिल्याबद्दल मी आपली अत्यंत आभारी आहे.

महोदय, मंत्री महोदयांनी सभागृहात निवेदन केले की, नक्षलग्रस्त भागात नागरी सुविधांचा अभाव आहे. ही गोष्ट खरी आहे की कोणतीही अशांतता जेव्हा निर्माण होते त्यावेळेल त्या भागात सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य विषयक आणि आर्थिक विषमता असल्याचे जाणवते. अशा प्रकारे या सर्व घटना काम करीत असतात म्हणूनच या भागात नक्षलाईट तयार झालेले आहेत. पण या सुविधांचा अभाव शासनाला दूर करणे आवश्यक आहे आणि मंत्री महोदयांनी तसे निवेदन केल्यामुळे एक आशादायी चित्र निर्माण झाले व निश्चितच या असुविधा पूर्ण करण्याचा प्रयत्न शासनाकडून केला जाईल अशी माझी खात्री आहे.

महोदय, नक्षलवाद्यांकडे आधुनिक शस्त्रास्त्रे असतात पण आपले शासन देखील पोलिसांना आधुनिक शस्त्रे उपलब्ध करुन देत आहेत. तसेच शहीदांच्या कुटुंबीयांना संरक्षण सुध्दा देत आहेत. तरी सुध्दा माननीय विरोधी पक्षाचे ज्येष्ठ सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी सांगितले की, जे शोध पथक होते त्यांनी पुढे जाऊन तपासणी करण्यापूर्वीच या रक्षकांच्या गाडया पुढे गेल्या आणि हा स्फोट झाला. या स्फोटात 12 लोक मृत्युमुखी पडले. अशा प्रकारे कोणत्याही योजना आपल्याकडे असतात त्यांची अमलबजावणी योग्य प्रकारे होणे गरजेचे असते. खरे म्हणजे स्वातंत्र्यपूर्व काळापासून हा नक्षलाईट ग्रूप ॲक्टीव्ह आहे. स्वातंत्र्य चळवळीच्या पूर्वी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष हा एकच मोठा पक्ष या देशात काम करीत होता पण पुढे काँग्रेस पक्षाला पाठिंबा द्यायचा की नाही अशा प्रकारचा वाद निर्माण होऊन मार्क्सवादी पक्ष (कम्युनिस्ट) आणि भारताचा कम्युनिस्ट पक्ष, ज्याला उजवा कम्युनिस्ट पक्ष म्हणतो अशा दोन शाखा निर्माण झाल्या होत्या. त्याच दरम्यानच्या काळात या देशात जेव्हा सीपीएमने "स्वातंत्र्य लढा आणि समाजवाद" अशा प्रकारची श्लोगन केली होती ती स्लोगन भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या लोकांना मान्य होती. पण दरम्यानच्या काळात "स्वातंत्र्य लढा आणि समाजवादी" .....अडथळा.....अन्यायाला विरोध करणे हा गुन्हा नाही .....अडथळा.....त्याला हिंसा म्हणत नाही तर प्रतिकार करणे असे म्हणतात. स्वत:च्या संरक्षणासाठी समोरच्यावर हल्ला करणे हा कायद्याने सुध्दा गुन्हा होत नाही.....अडथळा.....(प्रा. सुरेश नवले बसूनच बोलत असतात) सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

नवले यांना माझी विनंती आहे की, आपण मार्क्सवादावर आपले व्याख्यान जरुर करावे पण किमान आता माझ्या भाषणात अडथळा आणू नये. .....अडथळा.....सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले हे काही दिवस आपल्याबरोबर म्हणजेच शिवसेनेत असल्यामुळे आक्रमकता हा गुण त्यांच्यात अजूनही आहेच. कृपया माझ्या भाषणात अडथळा न आणता मला बोलू द्यावे अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करते.

महोदय, स्वातंत्र्य पूर्व काळात हा नक्षलवादी ग्रूप देशात कार्यरत होता आणि आता तर त्याची व्याप्ती खूप वाढलेली आहे. सीपीएमने पश्चिम बंगाल, त्रिपुरा मध्ये चांगल्या प्रकारचे काम उभे केलेले आहे, त्याचबरोबर केरळसारख्या राज्यात देखील या पक्षाचे काम बऱ्यापैकी चांगले आहे. अहिल्या रांगणेकर, कॉ. डांगे साहेब असताना आपल्या राज्यात देखील चांगल्या प्रकारचे काम उभे केले होते. त्या काळात सुध्दा राज्यात नक्षलवादी ग्रूप कार्यरत होता. आणीबाणीच्या काळात सुंदर नवलकर यांना नक्षलवादी घोषित करुन कारागृहात टाकण्यात आले होते, याची साक्षीदार मी आहे. अशा प्रकारे हे तीन ग्रूप या देशात काम करीत असताना त्यांच्यामध्ये फक्त नक्षलचा अट्टाहास होता की, नाव माओवाद्यांचे घ्यावयाचे आणि हिंसा घडवून आणावयाच्या. मुळात अशा प्रकारचा जो आंतरविरोध निर्माण होतो हा स्वतंत्र चर्चेचा भाग आहे. कामगार, शेतकरी, शेतमजूर आणि समाजव्यवस्था यांच्यामध्ये साम्राज्यशाही, मुक्त अर्थव्यवस्था, भांडवलदारी हे सर्व उच्चभ्रू असतात ते शोषण करण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे आंतरविरोध निर्माण होऊन त्यातून असे वाद निर्माण होतात अशा प्रकारचे ॲनालिसीस नक्षलवादी ग्रूप करतात. त्यात असे बघणे आवश्यक आहे की, अशा प्रकारचे आंतरविरोध आपल्यामध्ये आहेत काय आणि ते असतील तर ते संपविण्यासाठी कशा पध्दतीने आपण प्रयत्न करीत आहोत हे तपासणे आवश्यक आहे. मार्क्स आणि लेनिन यांचा बराच पगडा देशाच्या राजकारणावर आहे. रशियामध्ये जरी हे फेल्युअर ठरले असले तरी मार्क्सवाद अजून संपलेला नाही. त्या वादाला संपुष्टात आणत असताना काही चुका झाल्या असतील आणि त्यातून कदाचित अपयशी ठरलो तरी तो वादच संपुष्टात येतो असे समजण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. जुन्नरे ...

अनुवादित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

आपल्याला दुसरी बाब नजरेआड करुन चालणार नाही.

माओवादाचे नाव घेऊन नक्षलाईट उभे राहिलेले आहेत, यांना मुळातच माओवाद समजलाच नाही. ज्या माओने लॉंग मार्च काढला, शेतकरी-शेतमजुरांना एकत्रित केले त्या माओने कधीही तुम्ही निरपराध लोकांची हत्या करा असे सांगितल्याचे मला इतिहासात कोठेही आएळले नाही. परंतु हे जे नक्षलाईट आहे ते ख-या अर्थाने गुंड आहेत, ते माओवादी असूच शकत नाही, मार्क्सवादी असू शकत नाहीत, लेनीनवादी असू शकत नाही. यांच्याकडे हिंसाचार हा एकच वाद आहे. लोकांना यामधून जर बाहेर काढावयाचे असेल तर पहिल्यांदा आपल्याला लोकांच्या मनातील भीती प्रथम दूर करावी लागेल, लोक जागृती करावी लागेल. ज्यावेळेस लोकांचा प्रतिकार करण्याची शक्ती वाढेल त्या दिवशी सुरक्षा जवान असो किंवा नसो या नक्षलवाद्यांना पळती भुई थोडी झाल्याशिवाय राहणार नाही याची मला खात्री आहे. त्यामुळे यासंदर्भातील जाणीवा आपल्याला नक्षलवादी भागात जाऊन उभ्या कराव्या लागतील. आबांनी ठोशास ठोसा देऊ असे जे उत्तर दिलेले आहे ते जवानांचे, सर्वसामान्य माणसांचे मनोबल वाढवणारी बाब आहे.

सभापती महोदय, माओ असे म्हणतात की, माणूस हा विचारी प्राणी आहे, सामूहिक प्राणी आहे, गतिशील प्राणी आहे परंतु नक्षलवादी गती रोखण्याचे काम करीत आहेत. नक्षली माओवाद्यांना संपवण्याचा प्रयत्न करीत आहेत. नक्षलींचे ॲनलिसीस करीत असतांना, आपल्या विरोधकांचे आपल्या दुश्मनांचे जर आपण ॲनलिसीस करु शकलो नाही तर काही उपयोग नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती काय आहे, राजकीय परिस्थिती काय आहे, पैशाचा सोर्स कोठून येतो, आधुनिक शस्त्रास्त्रे कोठून येतात याच्या मुळात जाणे गरजेचे आहे. मुळापासून रोग उपटून काढला नाही तर तो रोग पुन्हा पुन्हा उदभवण्याची शक्यता असते. त्यामुळे रोगाच्या मुळाशी जाऊन तो रोग संपवावावा लागेल. गोरगरिबांची माणसे नक्षली म्हणून कशी ॲट्रॅक्ट केली जातात, प्रशिक्षण कसे दिले जाते हे पहावे लागेल. अतिरेक्यांना बॉम्बस्फोट घडवून आणावयाचा असेल, मानवी बॉम्ब वापरावयाचा असेल तर त्यांना विशिष्ट प्रशिक्षण दिले जाते व त्यांच्या नजरेमध्ये देश, माणूस, जिवंतपणा काहीही गोष्टी नसतात. त्यांच्या समोर एकच लक्ष असते की, माझ्या समोर जो माणूस आहे त्याला मारायचे आहे एवढेच त्याला शिकवलेले असते. आदिवासी भागातील कोठलाही मुलगा किंवा कोणीही या प्रवृत्तीला

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे...

बळी पडणार नाही यासाठी आपल्याला आदिवासीचा विश्वास संपादन करावा लागेल, त्यांचे आर्थिक जीवन सुधारावे लागेल. मला आनंद वाटतो की, शासनाने आदिवासी भागासाठी मोठया प्रमाणात विकासाच्या योजना केलेल्या आहेत. परंतु याही पेक्षा अधिक तरतूद केली तर ते चांगले होईल. जर अजूनही अशा प्रकारच्या घटना घडत असतील तर या घटना निंद्य आहेत. माणसाचा जन्म एकदाच येतो व त्याला जगण्याचा अधिकार आहे व त्याला तो जगता आला पाहिजे. चार्वाक असे म्हणाले होते की, भस्मी, भूतस्य, देहस्य पुनरागमन् कुत: चारवाक यांचा पुनर्जन्मावर विश्वास नव्हता, महात्मा गौतम बुध्दांचा पुनर्जन्मावर विश्वास नव्हता, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुनर्जन्मावर विश्वास नव्हता. त्यामुळे याचि देही, याचि डोळी जीवन आनंदाने जगता आले पाहिजे व ते जर कोणी हिसकावून घेत असेल व त्याचे अकाली मरण होत असेल तर त्याला प्रतिबंध करणे व त्या विरोधात मोठी फौज उभे करणे एक गरजेची बाब आहे.

सभापती महोदय, 100 नक्षलवाद्यांना पोलिसांनी घेराव घालून अडचणीत आणले व त्यातील बरेच नक्षलवादी ठार झाल्याची बातमी माझ्या हातामध्ये आहे. आपले जवान काहीच करत नाही असे नाही तर आपले जवान शहीद पण होत आहेत व प्रतिकार सुध्दा करीत आहेत. या बातमीमध्ये जवानांनी आसपासच्या 2 ते 3 कि.मी. च्या भागात घेराव घातला, सुरक्षा दलाच्या 400 जवानांनी चारही बाजूनी गोळीबार केला,यामध्ये एका पाठोपाठ एक असे नक्षलवादी ठार झाले, जवानांनी दोन महिलांसह 8 नक्षलवाद्यांचे मृतदेह जप्त केले अशी ही बातमी आहे. आपले जवान स्वत:चे शीर तळहातावर घेऊन लढतांना दिसत आहेत. त्यामुळे आपण आता एकच बाब लक्षात ठेवली पाहिजे ती अशी की, आबा म्हणतात त्या पध्दतीने नक्षली भागात नागरी सेवा पुरविणे, त्यांना शैक्षणिक दृष्टया समृध्द करणे, केवळ साक्षर नव्हे तर या देशाचे समर्थ नागरिक व देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये आदिवासींचा सहभाग होऊ शकेल अशा पध्दतीची प्रतिष्ठा निर्माण करणे, आदिवासींना श्रम देणे, रोजगार देणे व त्यांच्या रोजगाराला प्रतिष्ठा व मूल्य मिळवून देणे यासाठी आपल्याला अहोरात्र प्रयत्न करावे लागतील, त्यांच्या आरोग्यासाठी प्रयत्न करावे लागेल, आदिवासी भागात शेतीच्या संदर्भात असो,

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

माळरान असेल तर त्या विषयी काय करायचे, लघु उद्योग कसे उभे करायचे हे पाहिले पाहिजे. आपण नक्षलवाद संपवला पाहिजे. आदिवासी या देशाचे समर्थ नागरिक कसे होतील हे पाहिले पाहिजे. या आदिवासींना देशाच्या प्रवाहामध्ये आणले पाहिजे. आपल्या खाद्यांला खांदा आदिवासी कसा लावेल याची दक्षता आपल्याला घ्यावी लागेल. मी येथे विरोधी पक्षाचे आभार मानते. त्यांनी अत्यंत संवेदनशील असा विषय उपस्थित केला आहे. कोणलाही मारणे हा सामाजिक गुन्हा आहे. पोलिसांना मारणे म्हणजे देशाशी शत्रुत्व घेण्या सारखे आहे. यावर चांगली चर्चा विरोधी पक्षाने घडवून आणली आहे. त्या निमित्ताने मला सभागृहा समोर मत व्यक्त करता आले. या बद्दल मी विरोधी पक्षाचे आभार मानते आणि आपलेही आभार मानते इथेच माझे विचार संपविते. धन्यवाद.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, काल नियम 289 अन्वये सूचना दिली होती. ती आपण मान्य केली. खरे म्हणजे कालच यावर चर्चा होणार होती. परंतु, सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील हे गडचिरोली येथील घटनास्थळी गेल्याचे कळले. ते सभागृहात आल्यानंतर नेमकी वस्तुस्थिती कळेल म्हणूनच कालच्या ऐवजी आपण आज चर्चा घेण्याचा निर्णय घेतला. या चर्चेला आपण मान्यता दिल्याबद्दल मी प्रथमत: आपले आभार मानतो.

नक्षलवाद्यांकडून जे शहीद होतात त्यासंबंधी सभागृहात चर्चा होते. पुढे असा कधीही प्रसंग येणार नाही, पुन्हा या विधान मंडळामध्ये एखादा जवान शहीद झाला असे ऐकायला मिळणार नाही अशी आमची भावना असते, सत्ताधाऱ्यांची देखील भावना असते. माझ्या भाषणाच्या सुरूवातीला मला एक गोष्ट सांगितली पाहिजे. श्री.आर.आर.पाटील यांनी आपले शासन किती गंभीर आहे. आपले शासन आपल्या पाठीमागे किती खंबीर आहे, हे त्यांना सांगितले पाहिजे. एखाद्या माणसाचे हात पाय बांधले आणि त्याला पळ म्हणून सांगितले तर त्याला पळता येणार नाही. त्याची जाणीव आम्हाला देखील आहे. या सभागृहात अनेक वेळा घोषणा होतात. त्यावेळी एक विश्वास असतो की, माझे सरकार माझ्या पाठीशी आहे. पण अशा घटना घडल्यानंतर कळते की, श्री.आर.आर.पाटील पुन्हा तोंडघशी पडले. अशा घटना घडल्या नंतर या सभागृहात चर्चा झालेल्या आहेत. त्यावेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील काही घोषणा केल्या आहेत. पण खऱ्या अर्थाने आपण त्या मूळा पर्यंत पोहोचलो आहोत काय ? श्री.आर.आर.पाटील यांचे अभिनंदन एवढ्या साठी केले पाहिजे की, त्यांनी गडचिरोली जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारले. तेवढे धाडस तरी दाखविले. नुसते पोलीसच नाही तर राज्यातील जनतेच्या जीविताचे रक्षण करण्याची जबाबदारी घेतल्यानंतर मी देखील त्या जिल्ह्याचे पालकत्व स्वीकारू शकतो हे दाखविल्याबद्दल आम्ही आपले अभिनंदन केले.

नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी अनेक गोष्टी सन्माननीय सदस्या श्रीमती उषाताई दराडे यांनी येथे सांगितल्या आहेत. आपण जो पर्यंत आदिवासीला सक्षम करीत नाही तो पर्यंत काहीही होणार नाही. तेथे तेंदू पत्ता काढणारे ठेकेदार आहेत. त्यांच्याकडून पुष्कळशी माहिती मिळू शकते. माझ्याकडे अशी माहिती आहे की, तेंदू पत्ता ठेकेदारांचे नक्षलवाद्यांशी संबंध असतात. तसेच, येथे

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

बांबूचा व्यवसाय करणारे आहेत त्यांचा देखील नक्षलवाद्यांशी संबंध असतो. मला त्याची कल्पना आहे. मी देखील राज्याचा गृह राज्य मंत्री होतो. माझा देखील थोडा अभ्यास आहे. पण आता पर्यंत या मुळाशी कोणी पोहोचले आहे काय ? गुप्तचर यंत्रणेचा येथे ओझरता उल्लेख करण्यात आला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

खरेतर तेंदूपत्ता गोळा करणारा कामगार म्हणून काही गुप्तहेर खात्याचे पोलीस देखील बरोबर जाऊ शकले असते. खरे म्हणजे या गोष्टी उघडपणे बोलण्याच्या नाहीत याची मला कल्पना आहे.तसेच बांबूचा व्यवसाय करणाऱ्या कंत्राटदाराबरोबर देखील सी.आय.डी.ची माणसे, पोलीस पथकातील लोक किंवा कामगार तेथे जाऊ शकले असते. त्याबाबतीत जर आपण गुप्तचर यंत्रणेच्या माध्यमातून व्यवस्थित नियोजन केले तर काही अडचण नाही.

सभापती महोदय, मी माननीय गृहमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, मी याबाबतीत थोडी माहिती काढली. त्यानुसार एखादा जवान किंवा खबऱ्या नक्षलवाद्यांकडून उडविला जातो, तेव्हा त्यांच्या कुंटुंबियांकडे कोणीही पहात नाही. परंतु याठिकाणी खरे काम हे खबऱ्यांचेच आहे. गुप्तहेर खात्याकडून त्याला माहिती दिली जाईल.पण अशा ठिकाणी खऱ्या अर्थाने खबऱ्यांचे जाळे विणण्याचे काम झाले पाहिजे. पण मी माझ्या देशासाठी, राज्यासाठी मेल्यानंतर माझे कुटुंब उद्या उपाशी मरणार नाही अशी ज्यादिवशी त्याला शाश्वती मिळेल त्यावेळी तुम्हाला खऱ्या अर्थाने तेथे रिझल्ट मिळेल. आतापर्यंत नक्षलवाद्यांनी किती खबऱ्यांना मारले आहे याची तुम्ही यादी तयार करावी. कारण आपण त्यांच्या कुटुंबातील लोकांना एक प्रकारचा विश्वास द्यावयास पाहिजे. सकाळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी चांगला विषय मांडला होता. जेव्हा अतिरेकी हल्ला करतात मग ते कसाबचे साथीदार असू देत, त्या हल्ल्यामध्ये जी माणसे मारली जातात तसेच ज्यावेळी रेल्वेमध्ये बॉम्ब स्फोट होतात त्यामध्ये जी माणसे मरतात तेव्हा कोणाला 2 लाख तर कोणाला 3 लाख रुपये देऊन त्यांच्या कुटुंबीयांना मदत केली जाते. त्याच प्रमाणे खोपडी पिऊन मेलेल्या लोकांच्या कुटुंबीयांना देखील 3-3 लाख रुपयांची मदत केली जाते.पण याठिकाणी जवळजवळ 452 लोक मरण पावले, त्यापैकी किती लोकांना मदत करण्यात आली हे माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी सांगावे. या लोकांना कुटुंबे नाहीत, ते पिकनिकला गेले होते काय ? तुमच्या-आमच्या देशाचे, राज्याचे रक्षण करण्यासाठी ज्यावेळी उदार होऊन जवान तेथे जातात. त्यावेळी त्याच्या पत्नीला विश्वास नसतो की, माझे कुंकू किती दिवस शाबूत राहील. ज्यावेळेला गडचिरोली येथे बदली होते तेव्हा 99 टक्के लोक हे आम्हाला बदली नको असे सांगतात. माझ्याकडे एक अधिकारी असे सांगण्यासाठी आला की, मी तेथे जाणार नाही, नोकरी सोडून देईन.

श्री.आर.आर.पाटील (खाली बसून) : बऱ्याच जणांनी नोकऱ्या सोडल्या.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी जबाबदारीने बोलत आहे. कारण तेथे जाणे म्हणजे त्याठिकाणी आपल्या जीविताचे रक्षण होऊ शकत नाही. त्यामुळे आपली मुले-बाळे उघड्यावर पडणार आहेत याची त्यांना खात्री असते आणि मी फार जबाबदारीने बोलत आहे. म्हणून आपण याबाबतीत कधी निर्णय घेणार आहोत? त्या लोकांना कधी विश्वास देणार आहोत? नेमक्या याच गोष्टी होत नाहीत.

सभापती महोदय, जसे मी मघाशी खबऱ्यांच्या जाळयाबाबत बोललो तसेच गुप्तचर खात्याबद्दल आहे. धानोरा येथे ही जी घटना घडली आहे, ती आपण पाहिली. त्याठिकाणी केंद्रीय मंत्री श्री.जयराम रमेश येऊन गेल्यावर ही घटना घडली. आपण पाठिमागे जाऊन पाहिले तर आणखी एका गोष्टीबाबत सांगता येईल की,ज्यावेळी तेथे माननीय केंद्रीय गृहमंत्री श्री.पी.चिदंबरम साहेब येऊन गेले, त्यानंतर लगेच घटना घडली म्हणजेच ज्या-ज्यावेळी केंद्र सरकारमधील माननीय मंत्री महोदय तेथे येतात, तेव्हा ताबडतोब त्यांच्याकडून रिॲक्शन घडतात आणि आम्ही केंद्र शासनाला जुमानत नाही, तुम्हाला जुमानत नाही आणि आम्ही तुमचे चॅलेंज स्वीकारले आहे असे त्यांना दाखवावयाचे आहे. कारण या दोन्ही घटना अशाच वेळेला झालेल्या आहेत. त्याठिकाणी माननीय केंद्रीय मंत्री श्री.जयराम रमेश येऊन गेले,केंद्रीय गृहमंत्री श्री.पी.चिंदबरम साहेब येऊन गेल्यानंतर 3 जवानांना मारण्यात आले होते. तसेच आता त्यांनी जी काही व्यवस्था केली होती, त्याच्या पाठीमागे नेमके कारण काय आहे याचा आपण अभ्यास केला पाहिजे. त्या लोकांची एवढी हिंमत कशी होते ? याबाबतीत विचार करणे अत्यंत आवश्यक आहे, गरजेचे आहे.

सभापती महोदय, खरेतर मंगळवारी नक्षलवाद्यांचे टार्गेट श्री.विजयकुमार होते. ते 112 जवान घेऊन येत आहेत आणि ते कशासाठी चालले होते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

तेथील आदिवासींना मदत करण्यासाठी चालले होते. तेथील आदिवासींना शिलाई मशीन, पंखे देण्यासाठी चालले होते. तेथील आदिवासी सक्षम झाला पाहिजे ही बाब मनात घेऊन तेथे चालले होते. परंतु प्रत्येक बाब नक्षलवाद्यांपर्यंत कशी पोहोचते हे समजत नाही. घर का भेदी लंका जाळी असे आपण म्हणतो. तेव्हा हे नेमके कोण आहेत जे नक्षलवाद्यांकडे बातम्या पोहोचवितात ही बातमी काढणे देखील गुप्तचर विभागाचे काम आहे. स्थानिक पोलीस आणि सीपीआरएफचे जवान यांच्यामध्ये किती समन्वय होता हे आबा आपणास माहीत आहे. आपण पोलीस विभाग जबाबदारीने सांभाळत आहात, आपण या घटनेची सर्व माहिती घेतली असणार, आपण काल स्वत: त्या ठिकाणी जाऊन आला. राज्य पोलीस आणि सीपीआरएफचे जवान यांच्यामध्ये समन्वय नाही. खरे म्हणजे पुढे जाऊन तेथील सुरुंग किंवा बॉम्ब असतील ते निकामी करण्याची सीपीआरएफच्या जवानांची जबाबदारी होती. परंतु तसे झाले नाही. आता अशी घटना घडल्या नंतर वर्तमानपत्रात, टी.व्ही. चॅनेल्सवर बातम्या आल्या की, नक्षलवाद्यांनी घडवून आणलेल्य स्फोटामध्ये 10 जवान मृत्युमुखी पडले. मग आबांना टार्गेट केले जाते. मग आबा तुम्ही टीव्हीवर व प्रेसवर दिसता. माझे तर असे प्रामाणिक मत आहे या गोष्टीला शासन जबाबदार आहे. त्यास माननीय मुख्यमंत्री, माननीय उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री व संपूर्ण मंत्रिमंडळ जबाबदार आहे. खरे म्हणजे मंत्रिमंडळाने गडचिरोली जिल्ह्यासाठी अधिकाधिक निधीची तरतूद करुन तेथे विकास कामे घडवून आणली पाहिजेत. ही जबाबदारी एकट्या गृह मंत्री महोदयांची नाही म्हणून मी मघाशी म्हटले की, आबांचे हातपाय बांधायचे आणि त्यांना पळा म्हणून सांगायचे. मग अशा प्रकारची घटना घडल्यानंतर आबांना जबाबदार धरायचे. या गोष्टाला बाबा देखील जबाबदार आहेत. बाबा नंतर दादा आणि भाई इकडे आहेत. बाबा मुख्यमंत्री, दादा पैसे देणारे आणि आबा त्याची अंमलबजावणी करणारे. दादांनी काहीच दिले नाही तर आबा अंमलबजावणी कशी करणार हे मला देखील कळते.

सभापती महोदय, माननीय गृह मंत्री महोदयांनी विधानसभेत सांगितले होते की, केंद्राकडून आम्हाला सात हेलिकॉप्टर्स मिळणार आहेत. मी हे जबाबदारीने बोलत आहे. आपण सांगितले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम..

नसेल तर माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले असेल, कदाचित माझा आकडा चुकला असेल, परंतु मी आजपर्यंत कधीच हवेत बोललो नाही. आम्ही हेलिकॉप्टर्समधून टेहळणी करणार असे सांगितले होते. मला ते आठवते. पण आता जवान मृत्युमुखी पडल्यानंतर त्यांना उचलण्यासाठी हेलिकॉप्टर्स येत आहेत नेमके उलटे घडत आहे. अशा घटना घडल्यानंतर आपण किती जवान मृत्युमुखी पडले हे मोजतो. आपण स्वत: हेलिकॉप्टर्स घेऊ शकत नाही याची मला कल्पना आहे. हेलिकॉप्टर्स खरेदी करण्याचे काम केंद्र सरकारचे आहे. तेव्हा एखादी घोषणा केल्यानंतर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारची असते. परंतु नेमक्या त्याच बाबी होत नाहीत याचे मला दु:ख आहे.

सभापती महोदय, काल 12 जवान शहीद झाले. आतापर्यंत राज्य शासनाने आश्वासनाचे मोठ मोठे पंतग उठविले परंतु त्याची दुर्दैवाने अंमलबजावणी केली नाही. जोपर्यंत तेथील आदिवासींच्या पोटाची खळगी भरण्याचा प्रश्न सुटणार नाही, प्रत्येक आदिवासीच्या घरापर्यंत डांबरी रस्ता जाणार नाही, वाहतूक चालू होणार नाही, शाळा होणार नाही, रेशन दुकान होणार नाही, त्यांच्या हाताला काम मिळणार नाही तोपर्यंत अशाच घटना घडत राहणार असे आम्ही समजायचे काय ? आता नक्षलवादी आमचे काहीही करु शकणार नाही असा विश्वास त्यांच्या मनात निर्माण केला पाहिजे. परंतु आदिवासींच्या मनात अशा प्रकारचा विश्वास निर्माण करण्यासाठी सरकार आपल्या पाठिशी खंबीरपणे उभे आहे काय हे आबा आपण प्रथम सांगावे.

सभापती महोदय, आपणास स्वातंत्र्य मिळून 60 वर्षाहून अधिक काळ लोटला. या वर्षात आपण कोणती सुधारणा केली ? आदिवासी भागामध्ये दहावी नंतरच्या वर्गातील मुलांची उपस्थिती पाहिली तर डोळ्यात आज देखील पाणी येते.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामदास कदम...

ठीक आहे, आपण अर्थसंकल्प सादर करतो त्यावर भाषणे होतात. पण नेमका जो नाहिरेवाल्याचा भाग आहे, जो शेवटचा माणूस आहे, त्या शेवटच्या माणसाच्या पदारात नेमके काय पडते, त्याची चूल पेटते का? आपण या संदर्भात आबा, काय उत्तर देणार आहात याची आम्हाला कल्पना आहे. आम्ही माफ करणार नाही, सोडणार नाही, गय करणार नाही वगैरे-वगैरे सर्व ठीक आहे. तुमच्या बोलण्यामध्ये चांगले वजन असते, बोलताना तुमच्या मनामध्ये तो विश्वास असतो. पण त्या विश्वासाला तडा देण्याचे काम नेमके कोण करीत आहे याचे आत्मपरीक्षण देखील तुम्ही केले पाहिजे असे मला वाटते. नक्षलवाद्यांचा हिंसाचार सहन केला जाणार नाही असे नुसते शब्दांचे बुडबुडे आम्हाला या सभागृहात ऐकावयाला मिळणार नाहीत अशी अपेक्षा मला आबांकडून निश्चितपणे केली पाहिजे. पोलीस कारवायासाठी आणि आणीबाणीच्या प्रसंगी तातडीच्या मदत कार्यासाठी वापरावयाचे हेलीकॉप्टर्स नक्षली हल्ल्यात शहीद झालेल्या पोलिसांचे मृतदेह आणण्यासाठी वापरात येता कामा नयेत. खऱ्या अर्थाने नक्षलवाद्यांचा बंदोबस्त करण्यासाठी आपल्याला ते हेलीकॉप्टर्स हवेत. अशा हेलीकॉप्टर्सची व्यवस्था शासनाकडून होणार आहे का? काल पर्यंत नक्षलवाद्यांचे लोण गोंदिया, गडचिरोली या भागापर्यंत मर्यादित होते पण आज मंत्रालयाच्या दाराशी ते कधी येईल याची शाश्वती नाही. आज काय अवस्था आहे?आपण पाहतो की, हे लोण आता मुंबई, पुणे, ठाणे आणि डोंबिवली या सर्व ठिकाणी पोहचले आहे. कालपर्यंत या दोन जिल्हयामध्ये असलेले नक्षलवादी आता मुंबई, पुणे,ठाणे आणि कधीही मंत्रालयाच्या दरवाज्यापर्यंत येऊन पोहचू शकतील अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर आपण आणखी किती दिवस थांबणार आहोत. ज्या मंत्रालयामध्ये या राज्याचा कारभार चालतो त्या मंत्रालयाच्या दाराशी येईपर्यंत आपण त्यांची वाट पाहणार आहोत का?

सभापती महोदय, मला या ठिकाणी दुर्दैवाने एक उदाहरण द्यावेसे वाटते. आंध्र प्रदेशमध्ये पिपल्स वॉर ग्रुपच्या माध्यमातून नक्षली हिंसा चालू होत्या. त्यावेळी अनेक ठिकाणी अनेक वर्ष असेच लोक मारले जात होते. पण आज आपण असे चित्र पाहतो की, ज्या ठिकाणी कधीकाळी नक्षली चळवळ पराकोटीला पोहचली होती त्याच आंध्रप्रदेशने आज नक्षली हिंसेवर प्रभावी नियंत्रण मिळविले आहे. आता त्या आंध्र प्रदेशकडून आपण आदर्श घ्यावा का? एक छोटेसे राज्य अशा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. रामदास कदम. . . .

पध्दतीने सक्षम होते, नियंत्रण मिळवते आणि आपण तर महाराष्ट्र आहोत, आम्ही सर्व आपल्या सोबत आहोत. हा राजकीय विषय होऊच शकत नाही. हा राजकीय आणि एकमेकांचे उणेदुणे काढण्याचा विषयच होऊ शकत नाही त्याच्या पलीकडचा हा विषय आहे. म्हणून आंध्र प्रदेशकडून आदर्श घेऊन, त्यांनी नेमक्या काय उपाययोजना केल्या, कशा पध्दतीने त्यांनी त्या ठिकाणच्या नक्षली कारवाया संपविल्या याबाबत माहिती घेऊन आत्मपरीक्षण केले तर चांगले होईल.

सभापती महोदय, या नक्षलवाद्यांनी त्या भागामध्ये असलेले अनेक पोलीस स्टेशन उडविली आहेत. अनेक शाळा उडविल्या, ग्राम पंचायतीचे ऑफिसेस उडविले. रस्ते तोडले, झाडे तोडली सगळया गोष्टी त्यांनी केलेल्या आहेत म्हणून या बाबतीत यापुढे कशा पध्दतीने उपाययोजना करण्यात येणार आहे याचे उत्तर मंत्री महोदयांकडून मिळणे अत्यंत आवश्यक आहे, अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते. आबा आपण काल तातडीने त्या ठिकाणी गेला आणि दाखवून दिले की, मी संवेदनशील माणूस आहे आणि त्याबद्दल आमच्या कोणाच्याही मनात शंका असण्याचे काही कारण नाही. कारण आपण विधिमंडळाचे कामकाज चालू असताना हे सर्व कामकाज बाजूला ठेवून तेथे गेला आणि जी माणसे गेली ती माझी आहेत, माझ्या रक्तामांसाची आहेत, मी त्यांचा कुटुंब प्रमुख आहे यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब करण्याचे काम आपण काल केलेले आहे. याबद्दल कोणतेही दुमत नाही. तुम्ही मला किती दिवस असे एकाकी पाडणार आहात याबाबत आपण मंत्रिमंडळात चर्चा करावी.

सभापती महोदय, आतापर्यंत किती जवान मृत्यूमुखी पडलले आहेत या संबंधीची आकडेवारी मी वाचून दाखवितो. आतापर्यंत 165 जवान मृत्युमुखी पडले आहेत.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामदास कदम .....

1991 मध्ये 93 जवान शहीद झाले. 1994 मध्ये 5 जवान शहीद झाले. 2009 मध्ये 6 जवान शहीद झाले. 2005 मध्ये 11 जवान शहीद झाले. 1992 मध्ये 9 जवान शहीद झाले. 1998 मध्ये 5 जवान शहीद झाले. 2004 मध्ये 5 जवान शहीद झाले. 2009 मध्ये 3 घटनांमध्ये 51 जण शहीद झाले. 2011 मध्ये 7 जवान शहीद झाले. 2012 मध्ये कालच्या घटनेत 12 जवान शहीद झाले. असे एकूण जवळजवळ 165 जवान आतापर्यंत शहीद झालेले आहेत. एकूण सगळे 412 लोक आहेत. ही बाब महाराष्ट्रासाठी निश्चितपणे भूषणावह नाही. ही बाब दुर्दैवी आहे. ही बाब खेदजनक आहे. आमची सगळ्यांची आपल्याकडून आता एकच अपेक्षा आहे.

26/11 सारखी घटना पुन्हा होणार नाही हे आपण त्यावेळी ठणकावून सांगितले. मधल्या काळामध्ये मला आपली एक गोष्ट आवडली. ही बाब अजून सभागृहाच्या बाहेर आलेली नाही पण मी माहिती काढली.. बॉम्बस्फोटाच्या संदर्भात लागणाऱ्या सुट्सची आपण 6 कोटी रुपयांची ऑर्डर दिली होती आणि ज्यांना हे काम दिले होते त्यांनी सगळे बनावट सुट्स आणले होते. त्या विमल अग्रवालला आपण जेलमध्ये टाकले. ही गोष्ट अजून कोणाला माहीत नाही. ही गोष्ट अजून बाहेर आलेली नाही पण माझ्याकडे सगळी माहिती आहे. आपण ते खपवून घेतले नाही. बुलेटप्रूफ जॅकेट्सचा विषय मी त्यावेळी सभागृहात उपस्थित केला होता. आपण या ठिकाणी संवेदनशीलपणा दाखविला. कदाचित आपण त्याची चाचणी केली असेल. ज्यांनी हे सगळे बोगस जॅकेट्स किंवा बॉम्ब सुट्स आणले होते त्या अग्रवालला आपण जेलमध्ये पाठविले. त्याबद्दल आपले निश्चितपणे अभिनंदन करतो. आपली दृष्टी काय आहे, आपल्या मनामध्ये काय आहे, ते त्या निमित्ताने आम्हाला कळते. पण या ठिकाणी काय परिस्थिती आहे ? पुन्हा एकदा सगळ्या कॅबिनेटची बैठक घेऊन कॅबिनेटमध्ये ठोस असा कार्यक्रम ठरवावा. वेळ पडल्यास बाकीची कामे बाजूला ठेवा. मघाशी मी त्याबाबत वाचून दाखविले. मी दोन चार दिवसामध्ये आणखी मोठा घोटाळा काढून दाखवतो.

आज मी अर्थसंकल्पावर बोलत असताना बांधकाम खात्याचे 80-80 कोटी रुपयांचे घोटाळे सांगितले. आपल्या पोलीस लाईनमध्ये पोलिसांकडून घेतलेले पैसे, अर्थसंकल्पातून घेतलेले पैसे आहेत त्यातून बोगस बिले काढली. कामे काहीही केली नाहीत. एका एका इमारतीमध्ये चार चार वेळा दुरुस्ती केल्याचे दाखविले. ज्यांनी हे काढले ते आता ॲडमिट आहेत. असे 80-80 कोटी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. रामदास कदम .....

रुपये, 500-500 कोटी रुपये एखाद्या बंगल्यावरचा खर्च आपण बघाल तर अवाक होऊन जाल. हे पैसे असे नाहक खर्च करण्यापेक्षा, सगळी बोगस बिले बनवून ठेकेदारांच्या घशामध्ये पैसे घालण्यापेक्षा हे पैसे जर गडचिरोली सारख्या आदिवासी भागाच्या विकासासाठी खर्ची पडले तर निश्चितपणे त्या ठिकाणी आमच्या जवानांचे प्राण वाचतील आणि पोलीस त्या ठिकाणी जाण्यासाठी तयार होतील. एक दिवस असा आला पाहिजे आणि महाराष्ट्रातील पोलिसांनी असे म्हटले पाहिजे की, मला मुंबईत नव्हे तर गडचिरोलीला बदली पाहिजे. मला त्या ठिकाणी गेले पाहिजे, त्या ठिक्राणी चांगले काम केले पाहिजे अशी भावना पोलिसांमध्ये निर्माण व्हावयास पाहिजे. त्या ठिकाणी माझ्या पत्नीच्या जीवाला धक्का लागणार नाही, माझ्या जीवाला धक्का लागणार नाही, माझी मुले शाबूत राहतील अशी भावना निर्माण झाली पाहिजे. जेव्हा असा दिवस येईल तो खरा सोन्याचा दिवस असेल. तो दिवस कधी येईल अशी अपेक्षा जर आम्ही आपल्याकडून व्यक्त केली तर मी चूक केली असे मला निश्चितपणे वाटणार नाही.

सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना पुन्हा एकदा विनंती आहे. या महाराष्ट्रामध्ये एका बाजूने देशद्रोही, पाकिस्तान धार्जिणे नव्हे तर पाकिस्तानचेच लोक येत आहेत आणि दुसऱ्या बाजूला नक्षलवादी आहेत. दोन्ही बाजूने जणूकाही युध्दच चालू आहे की काय अशी परिस्थिती आहे. जर मी याला छुपे युध्द म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. हे छुपे युध्दच आहे. या युध्दामध्ये आपण का कमी पडत आहोत ? आपली माणसे, आपले जवान का मारले जात आहेत, हे कधी थांबणार आहे, यावर ठोस उपाययोजना आपण कधी करणार आहात ? या संदर्भात मी दोन तीन उपाययोजना सांगितल्या. त्यामध्ये खबऱ्याच्या बाबतीत, गुप्तहेर यंत्रणेच्या बाबतीत सांगितले तसेच त्या ठिकाणी तेथील गरीब माणसाला सक्षम करण्यासाठी आपली यंत्रणा असेल, तेथील पोलिसांना आपल्या जीवाची शाश्वती असेल अशा पध्दतीचे काम, अशा पध्दतीचा कारभार आपल्याकडून कधी होईल, कसा होईल ? आम्हाला आपल्याकडून आश्वासन नको. आपण त्या भागासाठी काय करणार आहोत ? आपण त्या ठिकाणी मोटारसायकलने गेलात आणि आपण दाखवून दिले. तेथील पोलिसांचे मनोबल वाढावे हा त्या पाठीमागचा आपला हेतू होता. कोणी काहीही म्हणून द्या पण ही गोष्ट माझ्यासारख्या माणसाच्या लक्षात येते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम.....

आपण तेथे मोटर सायकलवरुन जाऊन आलात त्याच्या पाठीमागे तेथील पोलिसांचे व जवानांचे मनोबल आणखी वाढावे, आमच्या खात्याचे मंत्री त्या भागात जाऊ शकतात, मग आपण का नाही, अशी आपली भूमिका होती. हे दाखविण्याचा आपण प्रयत्न केला आहे. अशी हिंमत आतापर्यंत कोणीही दाखविली नव्हती. केंद्रीय गृह मंत्री श्री.चिदंबरम असोत किंवा श्री.जयराम रमेश असोत, ते जाऊन आल्यानंतर लगेच त्याला वेगळ्या पध्दतीने उत्तर दिले जात आहे. त्यासाठी ठोस उपाययोजना केली पाहिजे. बाकीच्या विकासाच्या कामाला कात्री लावली तरी चालेल. कारण विकासाच्या नावाखाली बोगस बिले घेतली जात आहेत. एका रस्त्याच्या कामासाठी 1 लाख रुपये कॉंक्रीटकरणाच्या कामासाठी आतापर्यंत लागत होते. परंतु त्याच कामासाठी एक वर्षामध्ये किंमत दुप्पट होते. सिंचनाच्या कामामध्ये एका वर्षात प्रकल्पाची किंमत दुप्पट होते. या कामांमध्ये भ्रष्टाचार होत आहे. या राज्याच्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून उपलब्ध होणारा पैसा ठेकेदारामार्फत लुटण्याचे काम सुरु आहे. हा पैसा गडचिरोली जिल्ह्यासाठी दिला, तो पैसा गरिबांसाठी दिला, त्या पैशातून हेलिकॉप्टर विकत घेतले, जवानांना अत्याधुनिक शस्त्र दिली तर ते चांगले होईल.

आज पोलीस हातामध्ये गंजलेल्या बंदुका घेऊन उभे असतात. त्यामुळे पोलीस स्टेशन जाळण्याची नक्षलवाद्यांची हिंमत होते. तेथील पोलिसांच्या हातात एके 47 बंदुक असेल तर आलेल्या नक्षलवाद्यांना धैर्याने ते तोंड देऊ शकतील. पोलिसांमध्ये हिंमत आहे. मी देखील पोलीस शिपायाचा मुलगा आहे. कसाबने हल्ला केला होता त्यावेळी आपण सर्वांनी काय झाले ते पाहिलेले आहे. मग साळसकर असतील, कामटे असतील, ओंबळे असतील. या लोकांच्या हातात अत्याधुनिक शस्त्रे असती तर तेथल्या तेथेच कसाबला गोळ्या घातल्या असत्या. पण दुर्दैवाने आज परिस्थिती उलट आहे. गंजलेल्या बंदुका पोलिसांच्या हातामध्ये देऊन त्यांना लढ म्हणावयाचे. त्यांच्याकडे शत्रे कोठून येतात ? त्यांनी आपल्याच गाडया लुटल्या आहेत, आपलीच पोलीस स्टेशन्स लुटली आहेत. आपल्याकडून सामग्री घेऊन गेले आहेत. त्यांच्याकडे हे सर्व कोठून आले हा संशोधनाचा विषय होऊ शकत नाही. आपल्या राज्याची, पोलिसांची शस्त्रे आहेत. हा शस्त्रसाठा पोलीस

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम....

दलाचा आहे. त्यासाठी ज्योतिषाकडे जाण्याची आवश्यकता नाही. यापुढे या राज्यातील कोणताही माझा भाऊ, कोणताही पोलीस, कोणताही जवान शहीद होणार नाही, कोणतीही माझी भगिनी विधवा होणार नाही. याची खात्री व विश्वास दिला पाहिजे. माननीय गृहमंत्री हे एकटे काही करु शकत नाहीत. त्यासाठी कॅबिनेटमध्ये निर्णय होणे आवश्यक आहेत. ते जर होत नसेल तर मुख्यमंत्र्यांकडे राजीनामा देऊन मोकळे व्हावे. त्या ठिकाणी किड्या मुंग्यासारखे माझे जवान मरत असतील तर मी कशासाठी गृह मंत्री म्हणून काम करावयाचे अशी भूमिका तुम्हाला घ्यावी लागेल. त्यासाठी आम्ही सर्वजण आपल्या पाठिशी आहोत. आपण काल त्या ठिकाणी जाऊन भेट दिली आहे. नक्षलवाद्यांच्या किंवा अतिरेक्यामध्ये हल्ल्यात कोणतीही व्यक्ती मरण पावली त्याबाबतची चर्चा पुन्हा या सभागृहात होण्याचा प्रसंग येऊ नये अशी अपेक्षा व्यक्त करतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये गडचिरोली जिल्ह्यामध्ये नक्षलवाद्यांनी मांडलेला उच्छाद सभागृहासमोर आणलेला आहे. मला वाटते की, हा सगळयांच्या दृष्टीने अतिशय गंभीर व तातडीने चर्चा घडवून आणण्याचा विषय आहे. नक्षलवाद, नक्षलवाद हा सुरु कसा झाला, त्याचा उगम झाल्यानंतर तो कोठपर्यंत गेला आणि कोठपर्यंत जाणार आहे ? समाजव्यवस्थेविरुध्द दबलेल्या लोकांना एकत्र करुन जी काही शासनाची, प्रशासनाची चौकट मोडून आम्ही काही तरी समानतेची नवीन समाजाची बांधणी करणार आहोत अशा प्रकारचा वेगळा विचार घेऊन प्रेरित झालेल्या लोकांनी अशा प्रकारची चळवळ उभी केलेली असते.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

परिस्थितीने गांजलेले, समाजाने नाकारलेले, अर्धपोटी, उपाशी, दारिद्र्यात राहाणारे असे जे लोक असतात त्यांच्या पुढे पर्यायच उपलब्ध नसतो. कोणाकडून काही तरी हुसकावून घेतल्या शिवाय आपल्या वाट्याला कधीच काही येणार नाही अशा प्रकारची एक मनोभूमिका तयार करण्यासाठी अशा चळवळींचा वापर केला जातो. यामध्ये जे लोक अशा चळवळीचे नेतृत्व करीत असतात ते सुशिक्षित असतात.

मला आठवते मी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या बरोबर नागपूरच्या अधिवेशनाचे वेळी नागपूरच्या तुरुंगाला भेट देण्यासाठी गेलो होतो. त्यावेळी माझ्या मनामध्ये तुरुंगातील कैद्यांविषयी काही तरी नवे लिखाण करण्याचा विचार होता. त्या भेटीच्या वेळी तुरुंगातील काही शिक्षा भोगणा-या कैद्यांबरोबर तेथील व्यवस्था कशी आहे याची पहाणी गृहमंत्री करणार होते. त्यावेळी त्यांनी एका कैद्याबरोबर संवाद साधण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी मी त्यांच्या समवेत होतो. त्यावेळी गृहमंत्री हे तुरुंगात जेथे बंदी होते त्या जाळीच्या दाराबाहेर उभे होते आणि आतमध्ये तो कैदी उभा होता. अशावेळी एक नक्षलवादी चळवळीत सापडलेला आणि नागपूरच्या जेलमध्ये शिक्षा भोगत असलेला कैदी आपल्या समोर आला. तो त्या भागात सापडलेला होता परंतु तो त्या भागातील नव्हता. तो आंध्रप्रदेश मधून या भागामध्ये या चळवळीचा प्रसार करण्यासाठी आलेला होता. त्याची कोठडीमध्ये जेथे झोपण्याची व्यवस्था केलेले होती तेथे सतरंजी आणि बाकी काही होते. पण पुस्तकाचा फार मोठा गठ्ठा त्या ठिकाणी ठेवलेला होता. आपण चौकशी केली. तो कैदी सुशिक्षित होता, डबल ग्रज्युएट होता. या समाज व्यवस्थेमध्ये दबलेल्यांचा आवाज उठवण्यासाठी ठिकठिकाहून जे लोक प्रेरीत होऊन या चळवळीत येतात त्या चळवळीतील तो एक होता. ज्यावेळी त्याच्याशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला त्यावेळी माननीय गृहमंत्री श्री. आर.आर.पाटील यांच्या डोळयाला डोळा भिडवून तो करीत असलेल्या त्याच्या चळवळीचे समर्थन करीत होता. इतकी प्रखर भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण होते आणि जो भाग अशा चळवळीला पोषक आहे, जेथे जंगल खूप आहे, जेथे दाट वस्ती नाही, लोक दूर अंतरावर रहातात आणि ज्यांना जगण्याची पुरेशी साधने उपलब्ध नाहीत अशी या चळवळींना खतपाणी घालणारी अशी भूमी निवडली जाते.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले...

आपण सबंध देशाचा विचार केला तर या देशामध्ये नक्षलवादी चळवळ ज्या ज्या ठिकाणी आहे त्या चळवळी त्या त्या भागामध्ये कशा कशा झालेल्या आहेत हे आपल्या सहज लक्षात येऊ शकते. अशा भागात गेल्यानंतर आपण आपल्या यंत्रणे मार्फत गेली कित्येक वर्षे त्यांच्या बरोबर एक प्रकारचा संघर्ष उभा करण्याचा प्रयत्न करतो. तेथे राहाणा-या लोकांना आम्ही तुमची सर्व व्यवस्था करु, अन्नधान्य, आरोग्य, शिक्षणाची सोय करु असे सांगून त्या गोष्टी आपण करायला जातो. जेव्हा आपण असे करायला जातो तेव्हा या चळवळीत उतरलेले लोक जर अशा प्रकारची व्यवस्था सरकार मार्फत झाली तर त्या चळवळीला मिळणारे पाठबल नष्ट होईल या भीतीने त्या लोकांवर दबाव आणून अशा प्रकारच्या ज्या सुविधा आपण निर्माण करण्याचा प्रयत्न करीत असतो त्या कशा होणारच नाहीत हे पहातात. किंबहुना अशा सुखसोई, सुविधा निर्माण करणारी जी यंत्रणा असेल ती मुळात हाणून पाडण्याच्या प्रयत्नात ते राहातात. आपण शाळा बांधायला गेला तर रात्रीच्या वेळी नक्षलवादी त्या गावामध्ये जातात.

.....नंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

कोणीही त्या शाळेत जाणार नाही, कोणीही त्या शाळेत शिकविण्यास जाऊ शकणार नाही अशा प्रकारचे वातावरण निर्माण करतात. जेणेकरुन त्या चळवळीत असलेल्या लोकांना तेथील जनतेमध्ये असा संदेश पोहोचवायचा असतो की, आता असलेली जी यंत्रणा आहे ती तुमच्यासाठी काहीही करणार नाही. जे काही करावयाचे असेल ते आम्हीच करु. असे वातावरण तयार केल्यानंतर या चळवळीला गेल्या काही वर्षामध्ये जे काही समर्थन मिळत गेले आहे ते समर्थन जर आपण पाहिले तर आपल्या मुंबईजवळच्या ठाण्यामध्ये काही लोकांकडे नक्षलवादाचा प्रसार करणारे प्रचार साहित्य सापडते.

सभापती महोदय, या चळवळीबाबत आपण एका गोष्ट लक्षात घेतली पाहिजे, आज देशातील सगळ्या सुरक्षा व्यवस्थेपुढे एक प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मग ते कदाचित थोड्या दिवसांनी निवृत्त होणाऱ्या लष्कर प्रमुखांच्या वक्तव्यातून आले असेल. सभोवतालचे जे देश आहेत तेथील घटकाकडून अशा चळवळींना समर्थन आणि पाठिंबा मिळविण्यासाठी मोहीम उघडण्यात आली आहे. ते केवळ यांच्या आपापसातील जी जोडणी आहे ती जोडणी आता केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित राहिलेली नाही. आपण याचा विचार जेव्हा करीत असताना ज्या पध्दतीने ही सगळी बांधणी केली जाते त्याबद्दल केवळ पोलीस दलच या सगळ्या नक्षलवादी चळवळीला आळा घालू शकेल अशी परिस्थिती नाही. पोलिसांच्या धाकाने नक्षलवादी चळवळीला आळा घालण्यात येईल किंवा बंदोबस्त करता येईल अशी परिस्थिती राहिलेली नाही. केवळ इतर राज्यातून नव्हे तर परदेशातून अशा प्रकारच्या संघटनांचे एक मोठे जाळे त्या निमित्ताने तयार होते. आपल्याला निश्चितच माहित असेल की, श्रीलंकेमध्ये असलेली चळवळ असेल किंवा सेव्हन हिल्स राज्यामधील असेल अशा सर्व चळवळीच्या माध्यमातून हे घडत आहे. पोलीस सक्षम असणे, पोलिसांजवळ पुरेशी हत्यारे असणे, पोलीस यंत्रणा मजबूत करणे या सगळ्या गोष्टी अतिशय आवश्यक असल्या तरी तेवढ्यापुरत्या त्या पुरेशा नाहीत. त्या पलीकडे जाऊन या नक्षलवादी चळवळीमधून फायदा मिळविणारे सुध्दा समाजाचे काही घटक असतात. त्या घटकांचा सुध्दा बंदोबस्त करण्याची आज आवश्यकता निर्माण झाली आहे. वेळोवेळी आपल्या सभागृहात या विषयावर चर्चा झाल्यानंतर यावर एक कायमची उपाययोजना करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत अशी विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो.

--- नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विनियोजन (लेखानुदान) विधेयक

L.A. BILL NO. VII OF 2012.

(A BILL TO PROVIDE FOR THE WITHDRAWAL OF CERTAIN SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF A PART OF THE FINANCIAL YEAR 2012-2013.)

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री) : महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्या प्रमाणे सन 2011 चे वि.स.वि.क्र. 7 - राज्याच्या एकत्रित निधीतून 2012-13 या वित्तीय वर्षाच्या काही भागातील कामांकरिता विवक्षित रकमा काढून घेण्यासाठी तरतूद करण्याकरिता विधेयक आपल्या अनुमतीने सभागृहासमोर मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) द्वारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक विचारात घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात.

(खंड 2 ते 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उप सभापती : ज्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सभागृहाची विशेष बैठक उद्या शुक्रवार, दि. 30 मार्च, 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.30 पर्यंत भरेल. त्यानंतर सकाळी 11.45 वाजता सभागृहाची नियमित बैठक भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 28 ते शुक्रवार, दि. 30 मार्च, 2012 रोजी सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही